म. ग्रं. सं. ठाणें.
विषय इतिहास
सं. क्र. २८०

REFBK-0003430

॥ श्री ॥

# क्षात्रतेजाचा प्रताप

अथवा

## गोव्यांतील राण्यांच्या बंडांची धामधूम.

लेखक

**वामन नारायण पालेकर**

यांनीं खानापूर घर नं. ६४३ येथें लोकमित्र ऑफिसात प्रसिद्ध केलें.

मुद्रक

**दत्तात्रेय गोविंद सडेकर**

खान… …क.

3430

REFBK-0003430

—सोल एजंट—

**एस् एस् पालेकर,**

बुकसेलर व पब्लिशर डिचोली—गोवा.

शके १८४९] **किंमत १२ आणे.** [सन १९२७

श्री

# क्षात्रतेजाचा प्रताप.

## विषयानुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| उपोद्घात—कार्यकारणमीमांसा. | ... | १ ते ८ |
| प्रकरण १ लें—राणे लोकांचा पूर्ववृत्तांत. | ... | ९ |
| ,, २ रें—विषयप्रवेश. | ... | १९ |
| ,, ३ रें—सवतिमत्सराचा वायगोळा. | ... | ४२ |
| ,, ४ थें—परिस्थिति घोर तेथील लोक बंडखोर. | ... | ६० |
| ,, ५ वें—दुबळ्यांनीं केलेला आक्रोश. | ... | ७७ |
| ,, ६ वें—राजा व प्रजा. | ... | ९४ |
| ,, ७ वें—स्वार्थी जुलूम. | ... | ११२ |
| ,, ८ वें—निर्बलांची गळचेप. | ... | १३० |
| ,, ९ वें—विषयोपन्यास. | ... | १४९ ते १६० |
| परिशिष्ट. | ... | १ ते २ |

# अर्पण पत्रिका.

हें पुस्तक

**वैद्यराज रामचंद्र वामन नायक**
**करंडे शास्त्री**

—यांस—

त्यांची स्वधर्मनिष्ठा, स्वदेशहिताविषयीं गद्यपद्य लेखनद्वारा दाखविलेली उत्कट कळकळ, त्यांनीं व्याख्यानद्वारां हिंदूंच्या उत्कर्षास घेतलेले अश्रांत परिश्रम, त्यांचा दृढनिश्चयी स्वभाव, सार्वजनिक लोकोपयोगी संस्थांबद्दल आदरभाव, स्वसमाजाच्या हितार्थ शक्य त्या रीतीनें झटण्याची हौस, गुणिजनांविषयीं पूर्ण आदरभाव इत्यादि त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या श्रेष्ठ गुणाबद्दल वाटणाऱ्या अभिमानाचें किंचित् द्योतक ह्मणून आदरपूर्वक अर्पण केलें आहे.

—पुस्तक कर्ता.

# प्रस्तावना.

पोर्तुगीजसरकार आणि सत्तर प्रांतांतील राणे लोक यांच्यांत वेळोवेळीं उडालेले खटके ह्मणजे स्वार्थ व न्याय या मनोविकारांतील लहानशी लढाईच होय ! पण त्याला सशक्त व अशक्त, सधन व निर्धन किंवा सशस्त्र वा निःशस्त्र असें स्वरूप प्राप्त झाल्यामुळें बंड ही संज्ञा मिळून आज कैकवर्षें परस्परांत बंड किंवा लढाई चालत होती हें खास. या बंडाबद्दल परकीय इतिहासकारांनीं राणे लोकांविषयीं लोकांचे मनांत खोटेनाटे ग्रह उत्पन्न करणारा पक्षपातीपणा दाखविलेला आहे. यावरून राणेलोक हे बंडखोर, लुटारू व खुनी इसम आहेत, अशा भलत्याच समजुती होणें सहाजीक आहे. पण खरा प्रकार तसा नाहीं. ह्मणून शक्य तितकी खटपट करून निरनिराळ्या ठिकाणीं शोधांतीं मिळालेल्या कागदपत्रांवरून मिळालेल्या माहितीच्या आधारें सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करून आजवर होऊन गेलेल्या बंडांचा इतिहास लोकांपुढें पुस्तक रूपानें ठेवावा, हाच पुस्तक लेखनाचा मुख्य हेतु होय !

गोमांतकीय लोकांच्या मानेवर पोर्तुगीज राजसत्तेचें जूं पडून आज सुमारें चारशें वर्षेंपेक्षां जास्तच झालीं. त्या वेळेपासून आजपर्यंत गोमांतक डोळे बांधून घाण्यास जुंपलेल्या बैलाप्रमाणें चालत आहे व परकियांच्या लुटीच्या आसुडानें पीडलेलें क्षात्ररक्त वेळोवेळीं कशा उसळ्या मारीत होतें व तें कोणत्या कारणामुळें लगेंच थंड पडत होतें हेंही दाखवून, पुढें त्या रक्ताचा उपयोग गोमांतकाच्या मुक्ततेकरितां कसा करतां येईल, याचा ऊहापोहा झालेला आहे, त्यांतही उद्देश असा कीं, रावणाच्या जुलमी त्रासानें संतप्त झालेल्या जनतेस मुक्त करण्याकरितां त्या काळचे जगद्वंद्य पुढारी नारदऋषी हे होत ! ते योग्य अनुयायांचा शोध अखिल भरतखंडांत करीत असतां मोठमोठ्या शहरांत विद्वान, पंडित, महापंडित असतांही त्यांजकडे त्यांचें लक्ष मुळींच जात नव्हतें, याचें कारण काय ? तर ते सर्व आसुरी संपत्तीस लुब्ध झालेल्या चंचल मनाला देशासाठीं फकीरी स्वीकारून एकाद्या पुढाऱ्यानें दाखवून दिलेला मार्ग स्विकारणें ह्मणजे कमीपणा मानणारे होते.

नारदऋषींना असल्या घटकेंत सूत तर घटकेंत भूत करणाऱ्यांची मुळींच गरज नव्हती ह्मणून त्यांनीं पुष्कळ शोधाअंतीं, वाटमाऱ्या, खुनी व खुनांचे रांजण भरणारा वाल्याकोळीच निवडून काढला. वाला खुनी होता; पण दृढनिश्चयी व एकमार्गी होता. दिलेल्या उपदेशाचें चीज करणारा होता. ज्याला राम राम ह्मणतां येत नव्हतें तोच पुढें योग्य गुरूच्या अनुग्रहानें शतकोटी रामायणासारखा ग्रंथ लिहिणारा महाकवि वाल्मिकऋषी झाला. याचें कारण त्याच्याकडे धरसोडपणा नव्हता. तो शंका कुशंकांचा कीस काढीत नव्हता. पुढें त्यानें आंखलेल्या मार्गाप्रमाणें सर्व गोष्टी घडून रावणाचा नाश होऊन भरतखंडांतील जनता सुखी झाली, हें सर्वांना श्रुत आहेच.

ऐतिहासीक गोष्टींकडे दृष्टी दिली असतां असें दिसून येईल कीं, मोंगलाईसारख्या प्रखर काळांत स्वराज्यस्थापनेची मुहूर्तमेढ ज्यांनीं महाराष्ट्रांत रोंविली, त्यांच्या पूर्व तयारीस श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांस खेडवळ पण विश्वासू, आडदांड पण काटक व अशिक्षीत पण सिध्या मार्गानें जाणारे मावळेच फार उपयोगी पडले. दिल्लीश्वराच्या कह्यांत न रहातां रानावनांत भटकून पारतंत्र्याच्या अमीरीपेक्षां स्वतंत्रतेची फकिरी प्रिय मानणाऱ्या राणाप्रताप-सिंहाला आपली सूर्यचिन्हांकित पताका चितोड गडावर पुन्हां उभारण्यास रानवट, पण सरळ मार्गी भिल्लच बऱ्हांशीं कारण झाले.

तात्पर्य, राष्ट्रोद्धाराचे कामीं मनानें चंचल असलेले लोक उपयोगीं पडत नाहींत हें जाणून गोमांतकानें त्यांच्या शिक्षणाची आज काळजी घेतली तर तेच पुढें सनदशीर मार्गाचा लढा लढवून पुष्कळशा सुधारणा पोर्तुगीज सरकारकडून करून घेऊं शकतील. अशी आमची कल्पना आहे, आणि सरकारनें त्यांच्या अडचणी दूर करून चांगल्या शिक्षणाचा फैलाव त्यांच्यांत केल्यास ते चांगल्याप्रतीचे नागरीक होऊन त्यांच्या हालचालींवर टेहळणी करण्यासाठीं ठेवावी लागलेली निग्रोंची पलटण पुढें ठेवावी लागणार नाहीं; शिवाय सरकारतर्फे लढणारे रणशूर शिपायी तयार होतील अशीही आमची सरकारास सूचना आहे. सि० पोंम साहेबांनीं कर्तव्यबुद्धीनें वागून जशी आपली कारकीर्द सुखावह करून दाखविली तशीच पुढें प्रत्येक अधिकारी कर्तव्यबुद्धीनें प्रेरीत होऊन वागूं लागल्यास बंडासारखी आपत्ति गोव्यावर

येणार नाहीं असेंही आह्मांस वाटतें. रोग्याची व्याधी कोणती हें वैद्यास समजलें ह्मणजे औषधी योजना करण्यांस बरें पडतें. एकाद्या समाजाचें किंवा व्यक्तीचें मनोगत प्रगट करून दाखविणें उभयपक्षीं हितावह होत असतें. याच-बुद्धीनें दे० भ० दास यांनीं सिराजगंज या शहरीं बंगाल प्रांतिक परिषदेंत गोपिनाथ शहाच्या स्वदेशभक्तीबद्दल आदर व्यक्त करणारा ठराव पास केला. असें असतां मोठ्या खेदाची गोष्ट ही कीं, इंग्लंडासारख्या देशांत रॉबिन हूड सारख्या दरवडेखोरांचीं चरित्रें लिहिलीं जातात, स्कॉटलंडांत रॉडारिक धू या दरवडेखोरांचीं स्वातंत्र्यकाव्यें लिहिलीं जातात, आणि आपल्या पोर्तुगाल देशांत पायन्ह कॉसेर सारख्याचे गुणगोडवे गाइले जातात; पण आपल्या हक्कासाठीं झगडणाऱ्या लढवय्या राण्यांची हकीकत थोडी सुद्धां लिहिलेली दिसूं नये याचें कारण काय ? तर तें इतकेंच कीं, ते सरकारच्या अप्रीतीस कारण झालेले. ते गोमांतकाच्या एका खेडवळ भागांत राहणारे आणि ते अशिक्षित ह्मणूनच ना ? असो. तात्पर्य काय तर फार काळपर्यंत अनेक कारणांनीं लोकांच्या हृदयांत भिनून राहिलेले पूर्वग्रह काढून टाकून तद्विरुद्ध कल्पना त्यांच्या मनावर ठसवूं पहाण्याचा प्रयत्न फार बिकट असला तथापि अनिष्ठ प्रकारची परिस्थिती इष्टदिशेनें बदलण्याची आकांक्षा करून पुढें येणाऱ्या आह्मांसारख्या अल्पमति इसमांला हा बिकट प्रयत्न हातीं घेऊन पृच्छा करणें अनेक दृष्टींनीं कठीणच होय. तरीपण फार परिश्रमानें उपलब्ध झालेली माहिती तशीच टाकून देणें इष्ट वाटलें नाहीं ह्मणून **क्षात्रतेजाचा प्रताप** ( राणे लोकांच्या बंडाचा इतिहास ) या पुस्तकाचीं पुढील पानें लिहिणेचें आह्मीं धाडस केलें आहे. आतां तें सरस किंवा निरस वठलें आहे हें पाहण्याचें काम प्रेमळ वाचकांकडे सोंपवून गोमांतकाच्या एका टोंकास असलेल्या क्षत्रीयांच्या मनःस्थितीची जुनी झालेली आठवण नव्या मनूंत करून देण्यासाठीं केलेली खटपट हिंदू समाजाच्या उत्कर्षास कारणीभूत होवो अशी परमेश्वराकडे प्रार्थना करून वाचकांची रजा घेतों.

सर्वांचा नम्र,

**वामन नारायण पालेकर.**

# उपोद्घात.

असती सत्यचि क्षत्रिय दाखवितां धाक काय हो मजला ॥
अथवा वाद कशाला हरितो तुमच्या पहा पताकेला ॥

## कार्यकारणमीमांसा.

गोमांतकाच्या इतिहासमहारण्यांत संचार करीत असतां जो कांहीं अमूल्य रत्नसमुच्चय अवलोकनांत येतो, त्याच्या प्रभावशीलतेनें मनांत पूज्यभाव उत्पन्न होऊन त्यांतील एकेक वीररत्नाची शौर्य, स्वाभिमान, शालीनता, समयसूचकता, स्वामीकार्यदक्षता, इत्याद्यनेक गुणांच्या शेंकडों उदाहरणांनीं परिप्लुत अशीं कथानकें अवलोकनांत आल्यावर मनाला उत्साह वाटून त्याजबद्दल अकृत्रिम प्रेमांकुर मनांत उत्पन्न होतो; तथापि सांप्रतच्या आपल्या शोचनीय स्थितीचें चित्र डोळ्यांसमोर दिसूं लागलें कीं, ती आनंदाची वृत्ति, तो उत्साह, तें प्रेम आणि घटकाभर मनांत ठसलेला अभिमान या सर्वांचा क्षणार्धांत चक्काचुराडा होऊन शेवटीं मन उदासीन होतें. आपण अशा नेभळ्या स्थितीप्रत कसे आलों, तसाच हा भागुबाईपणा आणखी कोठवर वाढत जाणार, ही शोचनीय स्थिति सुधारण्यास उपलब्ध उपाय कोणते वगैरेबद्दल विचार करितां विद्वन्मान्य इतिहासासारखा सुलभ मार्ग क्वचित् असेल असें वाटतें; परंतु आपल्या अर्वाचीन इतिहासाची पोर्तुगीज लेखकांनीं विपरीत समजूत पसरून दिली असल्याकारणानें खऱ्या हेतूचा विपर्यास होऊन आपलेच लोक आपणास अत्यंत तिरस्करणीय वाटूं लागणें हें सहाजीकच होय यांत संशय नाहीं. राणे लोक हे समाजाचे शत्रू नसून समाजाचे मित्र आणि हितकर्ते आहेत ! असें असतांही त्यांना भामटे, बंडखोर व लुटारू ठरविणारे लेखक डोळे असून अंध नव्हेत काय ? क्षत्रिय लोकांस भामटे व लुटारू ह्मणणें ह्मणजे शब्दाचा भयंकर विपर्यास करण्यासारखें आहे. जे राजसत्तेच्या बळावर गरीब निःशस्त्र प्रजेला अनेक तऱ्हेचे कर लादून लुटित होते, त्यांची ही लूट राणे लोकांनीं जगाच्या निदर्शनास आणली. राणेलोकांनीं एखादें कृत्य केलें असेल तर तें हेंच होय आणि त्यांच्यावर कांहीं पोर्तुगीज लोकांचा जो विलक्षण राग आहे तो ह्याच कारणाकरितां आहे.

ह्याचीं कांहीं उदाहरणें इथें द्यायला हरकत नाहीं. पहिलें उदाहरण सरकारी अंमलदार आणि प्रजाजन हें घ्या ! ज्या कालापासून मानवी समाजांत राज्यकर्ते आणि प्रजा उत्पन्न झाली त्या कालापासून आतांपर्यंत हा संबंध चालत आलेला आहे; तथापि आतांपर्यंत हा संबंध एका विशिष्ट गैरसमजूतीवर उभारला गेलेला आहे. ती गैरसमजूत ही कीं, सरकारी अंमलदार हे प्रजाजनांपेक्षां श्रेष्ठ आहेत. त्यांची मर्जी संभाळणें हेंच प्रजाजनाचें कर्तव्य होय, आणि हें कर्तव्य जर त्यांनीं बजावलें नाहीं तर त्यांत त्यांचा घोर अपराध आहे. ही समजूत किती उलटी व विपरीत आहे पहा. सरकारी अंमलदारांना प्रजाजनांपेक्षां श्रेष्ठ कां गणलें जावें ह्याला कांहींएक कारण नाहीं. सरकारच्या कोणत्याही खात्यांतील एक शिक्का त्यांच्या नांवावर बसला ह्मणजे त्या मनुष्याच्या अंगांत असे कोणते नवीन दैवी गुण संचारतात कीं, ज्याच्यामुळें इतर लोकांनीं सरकारी अंमलदारांना मान द्यावा व मुजरे करीत असावे ? सरकार ह्मणजे कांहीं स्वर्गांतील इंद्र नव्हे; प्रजेच्या संरक्षणाकरितांच सरकार निर्माण झालेलें असतें व प्रजेच्या संरक्षणासाठींच प्रजाजनांकडून कर वसूल करण्यांत येतो. सरकारी अंमलदार हे प्रजेच्या संरक्षणाकरितां आहेत; प्रजेच्या भक्षणाकरितां नव्हेत. खऱ्या दृष्टीनें विचार केला तर प्रजा हीच त्यांची मालक होय, पण आतांपर्यंत अशी रूढी पडून गेलेली आहे कीं, प्रजाजनांपैकीं बुद्धीनें अथवा कर्तबगारीनें कोणी कितीही श्रेष्ठ असला तरी त्याचें स्थान खालीं व सरकारी अंमलदारांपैकीं अगदीं मंदबुद्धि पण वशील्याचीं तट्टें असलीं तरी त्यांचें स्थान वर ! सरकारी अंमलदार हे जर प्रजाजनांच्या संरक्षणाकरितां नेमलेले असतील आणि प्रजाजनांच्या कमाईंतूनच जर सरकारी अंमलदारांना पगार मिळत असेल तर प्रजाजनांच्या पुढें सरकारी अंमलदारांनींच नमलें पाहिजे; पण अनुभव मात्र अगदीं उलट येतो. अंमलदार लोक प्रजाजनांचे पुढें नमण्याऐवजीं समाजांतील लोक मात्र सरकारी अंमलदारापुढें नमतात व ते तसे आपखुषीनें नमले नाहींत तर सरकारी अंमलदार त्यांना जबरदस्तीनें नमावयाला लावतात. किती उलटी स्थिति ही ! चाकर भाकर खाऊन ढेंकर देतो आणि धनी उपासानें कर भरतो; ह्मणजे धन्याचें नांव विठ्या आणि चाकराचें नांव शामराव सांतडाप हा प्रकार नव्हे काय ?

ह्या प्रकारच्या योगानें प्रजाजन गांजले जातात, लुटले जातात, नागविले जातात व शेवटीं कमकुवत बनतात ! शतकानुशतकें हा प्रकार चाललेला आहे. आजपर्यंत ज्या ज्या लोकांनीं ह्या प्रकाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला त्यांना त्यांना पुंड, बंडखोर, दरोडेखोर, लुटारू अशीं दरबारी भाषेचीं विशेषणें लाऊन बंदुकीच्या गोळ्या घालून मारिलें; भयंकर आरोप लादून अंदमानास काळ्या पाण्यावर पाठविलें; आणि कित्येकांस अकल्पित छळ सोसावा लागला; पण शास्त्रोक्तरीतीनें प्रजाजन आणि सरकारी अंमलदार ह्यांचेमधील संबंध सेव्यसेवकत्वाच्या खऱ्या पायावर उभारण्याचें ह्या युरोपीयन राजनीतिकोविदांना सुचलेलें नाहीं आणि अनीतीचा प्रसार करून अज्ञ जनतेच्या माना मुरगळण्याचे प्रकार या कुटिल राजनीतीला आवडूं लागले आहेत. ह्यांत त्यांचा स्वार्थी हेतू आहे हें समजून घ्यायला विशेष बुद्धिकौशल्य पाहिजे असें नाहीं. हा त्यांचा हेतू चव्हाट्यावर येऊन त्यांची छीःथूः होईल ही गोष्ट खरी; पण कांहीं कालपर्यंत तरी त्यांनीं सर्व जगाला फसविण्याची कुशलता दाखविली; याबद्दल त्यांचा संताप येणें साहजिक असलें तरी खोटेपणांत इतका अट्टलपणा दाखविल्याबद्दल त्यांना एक सर्टिफिकेट देण्याचीही बुद्धि होते ह्यांत संशय नाहीं.

दारूच्या पाणपोई, सोडतीच्या तिकिटांसारखे जिकडे तिकडे अड्डे, देहविक्रीच्या व्यभिचारास संमति आणि फोलीच्या चिटोऱ्यांनीं कोंबडीं झुजविण्यांत व त्यांवर यथेच्छ ताव मारण्यास न्यायाचे खेळखंडोबा याविषयीं गैरसमज पसरविण्यांतील मुख्य उद्देश एतद्देशीय लोकांची लूट आतांपर्यंत चाललेली आहे तिला कायमपणा आणणें हाच आहे. क्षत्रियतेज राजकीय क्षितिजावर उदय पावण्यापूर्वी ही लूट धर्माच्या नांवाखालीं राजरोसपणें चाललेली होती. प्रत्येक बुद्धिमान् मनुष्य ह्या लुटींत सामील होत असे. जे लोक ही लूट जास्त सफाईनें करीत त्यांची विशेष वाहवा होत असे. जे लोक ही लूट करीत ते ती बेमालूमरीतीनें दडवीत आणि ज्या लोकांची ही लूट चाललेली असे ते लोकही ह्या लुटीविषयीं इतके बेफिकीर रहात कीं, जणुं कांहीं दुसऱ्याकडून आपण लुटवून घेण्याकरितांच जन्माला आलेले आहोंत असें त्यांना वाटत असे. ही भुरळ दूर करण्याची राणेलोक खटपट करीत असत व ही त्यांची खट-

पट कैकवेळां फ−द्रु झाली व कैकवेळां विफलही झालेली आहे. विफल होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांतील मुख्य मुख्य पाहिल्यास असें दिसतें कीं, बंडाचे प्रमुख पुढारी हे जात्या अशिक्षित असल्यामुळें आकुंचित दृष्टीचें ध्येय व क्षुद्र-बुद्धीचा स्वार्थ यावर आपली सर्व मजल मारीत असत. राष्ट्राच्या पारतंत्र्याकडे त्यांनीं आपली दृष्टि वळविलेली नव्हती. तीच जर त्यांनीं उदारबुद्धि व दूरदृष्टि ठेवली असती तर त्यांच्या क्षात्रतेजाची जगांत वाहवा झाली असती; पण त्याला शहाणपणा लागतो, प्रामाणिकपणा लागतो, कर्तव्य-निष्ठेची जरूरी असते ती ह्या बंडखोरांत नसल्याकारणानें लोकांच्या आशेची निराशा होत होती. ती अशी कीं, क्षात्रतेजाची जागृति ऐकून सभ्य लुटारूंना कर्णकटु जरी वाटत होती तरी गरीब, गांजलेले, तुडविले गेलेले, अन्यायाच्या छळणुकींमुळें रडकुंडीला आलेले असे सर्व लोक ही जागृति अशा मुक्त अंतःकरणानें ऐकून घेत कीं, आतां तरी आपल्या दावणीचें बिरडें सढळ होईल अशी ते आशा धरून बसत. शतकानुशतकें पारतंत्र्याखालीं चिरडलेल्या लोकांना ही जागृति ऐकून स्वातंत्र्याची इच्छा बळावत होती हें जरी खरें असलें तरी दीनदुबळ्या धनगरांना लुबाडणें, अनाथ बायका पोरांचीं वस्त्रें, चिंध्या चोरणें, भटभिक्षुकांना दरडाऊन त्यांच्या मालमत्तेचा अपहार करणें, परस्त्रियांची विटंबना करणें आणि क्षुल्लक द्वेषानें आपल्या लोकांचे संधी साधून खून पाडणें असले घाणेरडे, ओंगळ व तिरस्करणीय प्रकार थोरपणाला काळिमा फासीत होते. जनतेच्या आशेची निराशा करीत होते आणि 'भीक नको पण कुत्रा आवर' ह्या ह्मणीप्रमाणें स्वातंत्र्य नको पण हें बंड एकदां थांबवा अशी परकीय प्रभूची प्रार्थना करावी लागत असे.

सारांश, येथील क्षत्रियांत पारतंत्र्याची बेडी तोडण्याची शक्ति होती, धमक होती, आणि अद्यापिही तें चैतन्य त्यांच्यांत खेळत आहे; पण दिशा उमगलेली नाहीं, मार्ग सांपडलेला नाहीं ह्मणून तर ते चोर, दरोडेखोर, बंडखोर, पुंड या नांवानें संबोधिले जातात आणि चोर असलेले शिरजोर बनून सभ्यपणें लूट काढतात. त्याचें प्रत्यंतर पहाण्यास फार दूर जावयास नको. आपले माजी गव्हर्नर स्रोसाहेब यांनीं स्वतः संभावितपणा घेऊन मोत्यांच्या कंठानें उघडकीस आलेली हजारो रुपयांची लूट ही केवळ आपल्या

प्रियपात्र साठींच; पण आपणासाठीं असोळणेची सरकारी जमीन विक्रीस काढलेली असून त्यांतही सरसाहेबांचा हिस्सा होता आणि ता. २०।७।१७ त मुरगांव बंदरांत अटक केलेलीं जर्मन जहाजें विकण्याकरितां ह्मणून मुर्गांवचे तत्कालीन वेलेगाद, पणजी येथील आल्फादचे कोमीसार किंवा कमिशनरसाहेब इत्यादिकांनीं जी मुंबईस ३ महिने राहून १३॥ लक्ष रुपयांची लूट काढली त्यांतही सरसाहेबांचा हिस्सा होता. इतकेंच नव्हे तर ह्या हिश्शास लागून सर्वच लूट चव्हाट्यावर आली व आणखी काळोखांतील लुटी पुढें येऊं नयेत ह्मणून तर सिंज्योरफांन्सु लोयलचें वृत्तपत्र बंद पाडलें; तरी पण अधूनमधून ह्या काळोखांतील संभावित लुटी आपलें डोकें बाहेर काढून भीतीचेच आंकडे दाखवीत असत. शेतकीखात्याची सुधारणा करण्याकरितां मुद्दाम पोर्तुगालहून त्या खात्यावर सि० वेल्लेर ह्मणून जे चीफ आणले त्यांनीं सत्तर प्रांतीं राहून जमिनीची सुधारणा करण्यास व लागवड लावण्यास ह्मणून सरासरी पंचवीस तीस हजारांचा गंडा घालून गेले. लष्करी शिक्षणाच्या नांवाखालीं सांवळागोंधळ तर चाललेला जनतेस महशूर आहेच. तात्पर्य काय तर इतक्या लांब पल्ल्याहून पोर्तुगीज लोक गोव्यांत येऊन येथील लोकांचें कोटकल्याण करावें या उद्देशानें राज्याधिकारी झालेले नसून स्वतःला यथेच्छ लूट मिळवितां यावी या इच्छेनें उंटावरून शेळ्या हांकण्याचा व्यापार त्यांनीं पत्करलेला आहे ह्मणूनच येथील निःसत्व जनतेवर त्यांचा इतका तोरा असतो कीं, येथील लोकांना ते कस्पटाप्रमाणें लेखितात व त्यांच्यावर वाटेल तसा जुलूम करितात; पण आमच्या लोकांना त्याची खंती तरी आहे काय ? छे ! नाहीं मुळींच नाहीं. एखादवेळ प्रांताधिकाऱ्याची स्वारी दौऱ्यावर निघाली कीं, त्यांच्याशीं हस्तांदोलन करण्याकरितां व आपली ओळख पटवून देण्याकरितां त्यांच्या मोंवतीं कितीतरी येथील बड्या धेंडांचा घोळका जमत असतो. तो कितीही मूर्खपणाचें बोलणें बोलला तरी त्याचें कौतुक करावें, त्यानें कितीही एककलीपणाचा हुकूम सोडला तरी त्याची थुंकी झेलीत असावें, तो आपला देव समजून त्याचे वारंवार उपकार मानीत असावें, आपण उपाशीं मरावें व त्यास लक्षावधी रुपयांची लूट काढण्यास यावी हा येथील लोकांचा आतांपर्यंतचा क्रम आहे. ह्या क्रमांत राजेलोकांनींच काय पण एखाद्या निस्पृह

वर्तमानपत्रकर्त्यानें सुद्धां गडबड करणें ह्मणजे भयंकर आगळीक करणें होय! येथील प्रजेनें आपल्या राज्यकर्त्याशीं शांततेनें वागूं नये असें आमचें ह्मणणें नाहीं. मात्र जी संवय आपल्या कमकुवतपणामुळें पाश्चात्य लोकांना येथील प्रजेनें लाऊन दिलेली आहे ती संवय ह्मणजे भयंकर जुलमाची व लुटारूपणाचींच दर्शक चिन्हें आहेत असें आह्मांस वाटतें; कारण स्वतःची लूट लक्षांत न आणतां दुसऱ्याच्या लुटीचा गवगवा करणें ह्मणजे स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ न पहातां दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ जगापुढें आणणें नव्हे काय ? वस्तुतः ह्या परस्परांच्या लुटीमुळें झालें जर काय तर 'रेड्यापाड्यांची झुंज आणि झाडावर काळ' या ह्मणीप्रमाणें येथील प्रजा अन्नाला दिवसेंदिवस मोताद होत चालली; ह्या एकमेकांच्या अदावतीनें येथील जनता हैराण होत चालली; ह्या उभयतांच्या लुटालुटीनें येथील लोक कंगाल होत चालले. तस्मात् राण्याची लूट दहा पंधरा वेळच झाली असेल व ती लूट आपल्या हद्दींतल्या हद्दींत तरी आहे, किंवा राम्याला लुटून सोम्याला श्रीमंत तरी करण्याच्या कामीं उपयोगी पडली; परंतु अधिकाऱ्याची लूट सतत चारशें वर्षें चाललेली आहे, आणि ती सातासमुद्रापार गेलेली आहे व जात आहे. अंमलदारांच्या लुटीनें गोव्याची संपत्ति खलास झाली; नोकरशाहीच्या लुटीमुळें येथील संपत्ति द्वीपांतरास गेली ! या लुटीविरुद्ध जनतेच्या पुढाऱ्यांनीं अनेकपरीनें तक्रारी केल्या त्यांपैकीं **सिऑर सालीस आनद्राद** यांना बंदिवास भोगावा लागला. सिऑर रिबेर पेरेर यांना स्वतःच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल जबर शिक्षा भोगावी लागली. तस्मात् शठंप्रति शाठ्यं या तत्वाचा पुरस्कार क्षात्रियवंशीय राणे लोकांनींच आजपर्यंत केला, तरी ते ज्या तत्वाचा पुरस्कार करतात तीं तत्वें त्यांच्या विचारांत व भावनांत गुरफटून राहिल्याकारणानें तीं त्यांच्याकडून केव्हांही कृतींत आलेली नाहींत. उलट गरीबाचा कैवार घेण्याऐवजीं गरीबाचा संहार मात्र त्यांच्याकडून झालेला आहे. याचें कारण बुद्धिबलाची उणीव हेंच होय ! उदाहरणार्थ आयर्लंडचें बंड घ्या ! हें बंड उभारण्याची कल्पना प्रेसिडेंट ( ! ) डी. व्हॅलेरा याच्या कल्पक डोक्यांतून निघाली आहे. या व्हॅलेराचा जो बंडवाला पक्ष तोच. सिनफेन पक्ष होय हा बंडखोर सिनफेन पक्ष आतां जगप्रसिद्ध होऊन बसला आहे. सिनफेन याचा मूळ अर्थ तरी

'आमचे आह्मी' असा होतो. हे बंडखोर इंग्लिशलोकांच्या पारतंत्र्याचें जूं फेकून देण्यासाठींच बंड करीत होते आणि ह्या बंडखोरांची रग जिरवण्याकरितां ब्रिटिशसाम्राज्यसरकारानें फार जय्यत तयारी करून ठेवलेली होती. ती अशी कीं, साठ हजारापासून एक लक्षपर्यंत सशस्त्र सैनिक नेऊन ठेवलेले होते, याशिवाय दहा हजार पोलिस व त्यांचीं १३३२ ठाणीं जिकडे तिकडे पसरलीं होतीं. दारुगोळ्यांच्या ढिगाचे ढीग नेऊन ठेवले होते. तोफा किती, विमानें किती, याची तर गणती नाहीं. ह्या सर्व धाकधपटशानें साधारण बंडखोरांची घाबरगुंडी झाली असती परंतु आयरिश बंडवाल्यांनीं काडीमात्र न डगमगतां दुसरें सरकार निर्माण करून इंग्लिशांपासून स्वतंत्रता मिळविली. हा कशाचा प्रभाव तर एका बुद्धिवैभवाचाच नव्हे काय ? ह्मटलेंच आहे कीं, 'बुद्धिर्यस्यबलं तस्य निर्बुद्धिस्तु कुतो बलम्' इजिप्शिअन् लोकांनीं बलाढ्य इंग्लिशांविरुद्ध बंड पुकारलें व गनिमी कावा लढवून इंग्रजांना सळो कीं पळो करून सोडलें. इतकेंच नव्हे तर स्वतंत्रताही मिळविली. याचें कारण जगलुलपाशासारखे सुजाण ह्मोरके होते ह्मणूनच ना ! सारांश राणे लोकांत धैर्य आहे, शौर्य आहे; पण बौद्धिक कमतरता असल्याकारणानें करायला जातात गणपति आणि होतें खेंते. सरकारच्या अन्यायामुळें बंड उभारतात पण लुटतात गरिबांना ! एवंच सरकारचा सोडगा व राण्याचा बडगा खाऊन प्रजा कंटाळली ह्मणजे ती राण्याच्या नांवानें जिकडे तिकडे टाहो फोडूं लागते. एवंच थोरांनीं बुद्धिपुरस्सर केलेला गुन्हा कोणी लक्षांत सुद्धां आणीत नाहींत; आणि चोहोंबाजूंनीं भंडाऊन सोडलेल्या एकाद्या वर्गानें आपले न्यायी हक्क संरक्षणार्थ नाइलाजानें अज्ञानपणा केल्यास त्यांना आततायी, अत्याचारी, क्रांतिकारक ह्मणून जो डांगोरा पिटतात याचें नांव काय ? ज्यांना क्रांति घडऊन आणायची असते ते फाटफूट करून कधींच थांबत नसतात. त्यांचें सारसर्वस्व परमुलखांतील पताका आपल्या मुलखांत फडकूं देऊं नये, स्वतःच्या ध्वजेनें धूळ खात पडावें व त्याठिकाणीं दुसरी ध्वजा तळपत असलेली पाहिली ह्मणजे मानी लोकांच्या पायांची तिडक मस्तकाला जाऊन पोंचते व ते ती पताका परत आपल्या मुलखाला जाईपर्यंत लढत असतात; परंतु आजपर्यंत सत्तरमांतीं उठलेल्या बंडाचा इतिहास पाहिल्यास त्यांचा पोर्तुगीजांच्या पताकेवरही रोष नव्हता असेंच दिसून येईल.

ह्यावरून गोवाप्रांतांत बंडखोर लोक निर्माण होणें न होणें यदृच्छेवर अवलंबून नसून लोकांस ज्यांच्याकडून न्याय मिळावयाचा त्यांच्या हातून अन्याय होण्या न होण्यावर अवलंबून असतें, असें ह्मणण्यास दिक्कत वाटत नाहीं. कांकीं, आह्मीं रात्रंदिवस लष्करशाहीचे उर्मट चाळे पराधीनपणामुळें अनुभवित आहोंच; परंतु पोर्तुगालचे नामांकित मुत्सद्दी डॉ० **आंतोन जुजे द आल्मैद** यांनीं सुद्धां माजी पार्लमेंट सभेपुढें केलेल्या एका भाषणांत गोंव्यांतील हिंदूकडून कधींमधीं जी विरोधात्मक चळवळ होत असते तिला स्वार्थसाधु लोक बंड ही फार मोठी संज्ञा देत असतात; तथापि ती पोर्तुगीज सरकारची सत्ता झुगारून देण्याच्या हेतूनें केलेली चळवळ नव्हे हें आपण कधींही विसरतां कामा नये. या डॉक्टरसाहेबांच्या मतावरूनही असें वाटतें कीं, खऱ्या स्वातंत्र्याकरितां येथील क्षत्रियांनीं एकही बंड केलें नव्हतें. नपेक्षां स्वातंत्र्याच्या लढाईला एकदां सुरवात झाली ह्मणजे ती लढण्याचा बोजा मृत्यूचे दारीं बसलेल्या बापाकडून त्याच्या मुलाच्या खांद्यावर येऊन पडतो व या लढाईत जरी मधून मधून पारतंत्र्यशृंखलाबद्ध लोकांचा पराभव होतो तरी ईश्वरी संकेत असा आहे कीं, शेवटीं अशाच लोकांचा जय हटकून व्हावयाचाच; एकंदरींत गोष्टीचा सारांश हाच कीं, सरकारच्या न्यायी वर्तनाबद्दल लोकांची खात्री असणें हेंच राज्याच्या चिरस्थायीपणास अत्यावश्यक आहे.

॥ श्री ॥

# क्षात्रतेजाचा प्रताप

अथवा

# मोऱ्यांतील राण्यांच्या बंडाची धामधूम.

प्रकरण पहिलें.

## राणे लोकांचा पूर्व वृत्तांत.

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥

सातव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंतच्या काळांत सर्व हिंदुस्थानभर रजपूत राजांचीं राज्यें होतीं. अरवली पर्वताच्या दोहों अंगास अद्यापही राजपुताना हें नांव आहे; पण हिमालयाच्या बर्फाच्छादित खिंडींतून ज्यावेळीं हे लोक पंजाबांत शिरले, त्याच मार्गानें कांहीं काळानें हिंदुस्थानच्या वायव्य कोंपऱ्यास लागून असलेल्या अफगाणिस्थानतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन फार त्रास देऊं लागल्यामुळें रजपूत लोकांची पांगापांग होऊन ते ज्याठिकाणीं सुखानें राहतां येईल तेथें राहूं लागले. ह्या रजपूतांपैकीं सिंगापूर प्रांतांत राहणारा एक इसम श्रीपांडुरंगाच्या भक्तीस फार लुब्ध झाला होता. तो आपलें भगव्या फडक्याचें निशाण घेऊन आषाढी व कार्तिकी ह्या दोन वारीस पंढरपुरास येऊन देवदर्शन घेत असे. अशा क्रमानें कांहीं काळ गेल्यानंतर एके दिवशीं अशी गोष्ट घडून आली:—

सुमारें चारशेंपस्तीस वर्षांपूर्वीं ह्या पुण्यपुरुष श्रीविठोबारायाचे दर्शनास पंढरपुरीं गेला असतां प्रवासाचीं कष्टदायक साधनें व मोरोपंतांनीं वर्णन केल्याप्रमाणें 'कुंतांतकटकामलध्वज जेरे' चें निशाण फडकूं लागल्यामुळें शरीराची होणारी परावलंबी स्थिति याची दुःखद कल्पना मनांत येऊन यापुढें नियमीतपणें पंढरिरायाचें वारंवार दर्शन घडणार नाहीं असें त्याच्या मनांत आल्यामुळें या भगवद्भक्तानें सद्गदित अंतःकरणानें पांडुरंगाच्या चरणावर कितीदां

तरी मस्तक ठेवलें व निश्चलांतःकरणानें देवाचें ध्यान चित्तांत आणून त्याच्या चरणकमलावर प्रेमाश्रुजलाचे पाट वाहविले. अशा स्थितींत पांडुरंगाच्या चिंतनांत तो निद्रावश झाला असतां त्याच्या एकनिष्ठ भक्तीनें प्रसन्न होऊन पांडुरंग मध्यरात्रीच्या सुमारास त्याच्या स्वप्नांत येऊन ह्मणाला " प्रिय भक्ता! ज्याप्रमाणें माझा दुःसह वियोग तुला कष्टप्रद होणार तसाच तुझाही वियोग मला दुःखदायकच वाटणार यासाठीं उभयतांनाही एकमेकांचें वियोग-दुःख होऊं नये ह्मणून मला तूं तुझ्याबरोबर घेऊन जा आणि ज्याठिकाणीं तुला माझा भार असह्य होईल त्या ठिकाणीं तूं मला ठेव. मी तुझी वाट पहात रहातों. " याप्रमाणें दृष्टान्त होतांच साधु खडबडून जागा झाला व घडलेल्या गोष्टीचा प्रत्यय पाहण्यासाठीं देवळाजवळ जाणार तोंच देवाची मूर्ति देवळांत असून दारांना कुलूपकड्या कितीतरी आहेत, अपरात्रीचा समय! वाटेंत मस्त पहारेवाले भेटले किंवा बडवे—उपाध्ये यांची गांठ पडली तर काय प्रसंग येईल अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत आले. तथापि अशा दुस्तर अडचणींतूनही मार्ग दाखविणारा एक परमेश्वरच आहे ही खूण-गांठ लक्षात बाळगून तो साधु भीभेच्या कांठानें देवळाजवळ गेला; पण चमत्कार असा झाला कीं, त्यावेळीं देवालयाचीं दारें उघडीं झालेलीं असून जिकडे तिकडे पूर्ण शांतता होती. ह्या आश्चर्यकारक दृश्यानें भगवद्भक्त इतका हर्षभरित झाला कीं, कोणत्याही प्रकारची भीति किंवा संशय न बाळगतां तो तडक देवळांत शिरला व तेथील उत्सवमूर्ति घेऊन आपल्या बिऱ्हाडीं परतला. इच्छित वस्तु अनपेक्षितपणें प्राप्त झाल्यामुळें होणाऱ्या अवर्णनीय आनंदानें या साधूची इतकी विलक्षण स्थिति झाली कीं, आपण कुठें गेलें पाहिजे वगैरे गोष्टीचाही विचार न करतां तशा त्या काळोख्या रात्रीं घरांतील बाहेरच्या खुंटीस लावलेली आपली मधुकरीची झोळी तेवढी घेऊन अगदीं मुकाट्यानें तो उत्सवमूर्तीसह वाट मिळेल त्या बाजूला पळत सुटला. खडे लागून पाय दुखूं लागले तरी त्यानें त्याची पर्वा केली नाहीं. देह जावो अथवा राहो अशा तन्मय स्थितींत रंगून गेलेल्या ह्या पुरुषानें थंडीवाऱ्याची, उन्हातान्हाची, अतिरिक्त श्रमाची व मार्गांतील कोणत्याही संकटांची कदर बाळगली नाहीं. संशयितवृत्तीचा पगडा मनावर बसल्यामुळें गांठता येईल

तितका पल्ला गांठावा म्हणून तो फारच नेटानें चालला होता. अशाप्रकारें ह्या भगवद्भक्ताचें—राण्याचें—मार्गक्रमण कांहींसें भीतीनें तर कांहींसें शंकेनें चालू असतां अरुणोदय होऊन दिशा रक्तरंजित होऊं लागल्या. इकडे देवालयांत नित्याप्रमाणें पांच घटका रात्रीस काकडआरती झाली. त्यावेळीं जरी उत्सव-मूर्तीकडे कोणाचें लक्ष्य गेलें नाहीं तरी पण अभिषेकाच्यावेळीं मूर्ति न दिस-ल्यामुळें देवळांत विलक्षण गडबड उडून गेली. मूर्तीचा जारीनें शोध सुरू झाला. पुष्कळप्रकारें चौकशी केल्यानंतर मूर्ती नाहींशी होणें व रजपूत गृहस्थ अचानक बेपत्ता होणें ह्यांतच कार्यकारणसंबंध असावा असें वाटून त्या रजपूत गृहस्थाचा तपास करण्यासाठीं माणसांची दौड सुरू झाली. तपासाला निघालेले लोक उत्तरेकडे निघालेले होते तर हा भगवद्भक्त उत्सवमूर्तीसह दक्षिणे-कडे चालला होता. यामुळें लांबचा पल्ला गांठण्यास त्यास भरपूर संधी मिळाली. शिवाय बेळगावच्या बाजूनें येणारे गोव्यांतील सांखळी गांवचे कांहीं यात्रेकरूही मिळून त्याला पुष्कळच मदत झाली. अशाप्रकारें कल्पनेच्या बाहेर मजल मारून तो श्रमी झाला होता तरी देवाला कोणी नेतील कीं काय या चिंतेनें तो अन्न पाणी, विसावा ह्या गोष्टी विसरूनच गेला होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आणि असें होणें साहजिकच आहे. 'ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी' अशी स्थिति साधूची झाली असली तरी तुकोबारायाच्या निर्धाराप्रमाणें स्वतः देवच जर त्याच्या बरोबर तर त्यास संकटाची बाधा कोठून होणार? 'माझे भक्त गाती जेथें। नारदा मी उभा तेथें' असें स्वतः देवच जर आश्वा-सन देतात तर आपल्या प्रिय भक्तास तो तोंडघशी पाडील अशी कल्पना तरी करतां येईल काय? छे! असें होणें कधींच शक्य नाहीं. गोव्याकडील आपल्या मार्गबंधूंना आपली गुप्त गोष्ट सांगून त्या साधूनें आपल्यास याप्रसंगीं मदत करण्यास त्यांना विनविलें. साधूची ही विनंति सर्वांनीं मान्य करून 'निर्भय असा, पुढील काळजी देवास' असें सांगून तेही त्याचे परम स्नेही झाले व त्यामुळें साधूच्या मनांतील चिंता नाहींशी होऊन ते सर्वजण बेळ-गांवच्या घाटानें वाळपईहून हरवळेस आले आणि गुप्त गोष्टीचा स्फोट होऊं नये ह्मणून सर्व मंडळी सांखळीस येऊन व साधूस तिथेंच थोडे दिवस रहा-

त्यास सांगून सर्वांच्या विचारें कोडाळीजवळ एका निवांतस्थळीं * डोंगरावर त्या उत्सवमूर्तीस कांहीं काळ ठेवली.

पंढरपुरांत तर मूर्तीबद्दल जिकडे तिकडे जारीनें तपास चालला होता. त्यांनीं सबंध हिंदुस्थान धुंडाळलें पण मूर्तीचा कांहींकेल्या पत्ता लागेना. बडवे मंडळी अखेर गोव्यांतही आली व तेथें त्यांनीं खूप तपास केला; पण हात हालवीत हिरमुसलें तोंड करून माघारीं परत जाण्यापलीकडे त्यांच्या वांट्यास कांहींहि आलें नाहीं.

बराचकाळपर्यंत पंढरपुरास गेलेला आपला इसम घरीं न पोंचल्यामुळें सिंगापूर येथील मंडळीस काळजी वाटून त्यांनींही आपल्यापरीनें तपास चालविला होता. पंढरपुरांत नाहीं ह्मणून कळतांच त्याच्या शोधार्थ घरची मंडळी निघाली, परंतु तपास लागेना. एका गांवांहून दुसऱ्या गांवीं व एका शहरांतून दुसऱ्या शहरीं फिरतां फिरतां ग्वाल्हेरींत अशी बातमी लागली कीं, ' पंढरपुराहून कांहीं इसम इथें आले होते व ते सांगत होते कीं, ' मूर्ति घेऊन जाणारा इसम बहुतकरून कोंकणप्रांतीं असावा असा आमचा तर्क आहे ' तरी आपण मुद्दाम पंढरपुरीं जाऊन साधूची माहिती मिळवावी; पण आपली ओळख मात्र त्यांस दाखवूं नये; कारण आपल्यावर कांहीं तरी कुभांड येईल ' याप्रमाणें सल्ला ऐकून मंडळी पंढरपुरास गेली. पंढरपुरींही तोच वहीम असल्याबद्दल माहिती मिळाली; पण मुसलमानी सत्तेच्या वरचष्म्यामुळें हिंदूंच्या देवाची बारकाईनें चौकशी होणें मुळींच दुरापास्त होतें. शिवाय बेदरकरांचें व विजापूरकराचें वैमनस्य व हिंदूचे देव व हिंदूंचा धर्म धुळीस मिळविण्याची इस्लामी सत्तेची प्रबळ इच्छा इत्यादि कारणामुळें मूर्तीची चौकशी व्हावी तितकी झाली नाहीं. हें एक भावी संकट ओळखून श्रीविठोबारायांनीं अशी गोष्ट मुद्दाम घडवून आणली असावी असाही भास होतो; कारण भक्त-लीलामृतांत असा वृत्तांत आहे कीं, ह्यानंतर बेदरच्या बादशहानें पंढरपूरच्या लोकांस फारच उपद्रव दिला. त्यानें श्रीविठोबाच्या देवालयाचा व क्षेत्रांतील आणखी कित्येक देवालयांचा विध्वंस करून विठ्ठलमंदिराच्या ठिकाणीं मशीद

* टीप--आज याठिकाणीं दोन कुंडें, एक नळी व उंचीनं लहानसें देवालय ( ह्यास येथें देवळी ह्मणतात, ) असून तीन वर्षांनीं एकवेळ ह्याठिकाणीं भागीरथी येते आणि यात्रा भरते.

बांधली. तेव्हां या जुलमी कृत्यामुळें पंढरींतील बहुतेक लोक देशांतरास गेले. नंतर थोड्या कालांत बादशहाची आवडती स्त्री एकाएकीं मरण पावली आणि त्यामुळें बादशहास फार दुःख झालें. त्यावेळीं **चांगकेशी** या नांवाचा विठलभक्त साधु बादशहास जाऊन भेटला, आणि त्यास त्याच्या जुलमी कृत्याविषयीं बोध करून प्रजेस दुःख झालेलें त्यानें सांगितलें. चांगकेशीच्या उपदेशामुळें बादशहासही पश्चात्ताप होऊन तो त्याच्या चरणीं लीन झाला. साधूनें देवाची स्तुति करून संजीविनीविद्येच्या प्रयोगानें मरण पावलेल्या राणीस जिवंत केलें. हा चमत्कार पाहून बादशहा आश्चर्यस्तंभित झाला. आपल्या जुलमी कृत्याविषयीं उपरति उत्पन्न होऊन त्यानें पंढरपुरीं बांधलेली मशीद पाडवून देवालय बांधविलें व तेथें देवाची स्थापना करवून मोठा उत्सव केला.' या गोष्टीवरून देवाच्याच मनांतून इकडे येण्याचें होतें अशी अटकळ बांधण्यास कोणती हरकत आहे? असो.

साधूच्या शोधासाठीं बाहेर पडलेली घरची मंडळी फिरत फिरत गोव्यास आली. पुष्कळ शोधाअंतीं साधूची भेट होऊन त्याबद्दल साहजिकच घरच्या मंडळीस समाधान झालें; पण साधूची इच्छा घरीं परतण्याची नव्हती. उत्सवमूर्तीच्या सेवेंत रंगून गेलेल्या ह्या पुरुषाचा 'जेथें माझा देव तेथें मी' हाच एक अंतःकरणाचा दृढ निश्चय होता. साधूच्या विलक्षण निर्धारानें घरच्या मंडळींचा अर्थातच हिरमोड झाला खरा; पण त्यामुळें गांवांतील लोकांची त्याजबद्दल विशेष पूज्यबुद्धि वाढली. साधूची लोकप्रियता, त्याचें विशुद्ध वर्तन व अकृत्रिम भक्ति पाहून शोधार्थ आलेल्या मंडळीनेंही विचार बदलू लागले व कालांतरानें त्यांनींही इकडेच वास्तव्य केलें. ह्या नवीन वसाहत करणाऱ्या लोकांत **सत्रोजीराव राणे** हे मुख्य असून ते रजपूत लोकांत असणाऱ्या शौर्यधैर्यादि गुणांनीं मंडित होते. अतिथिसत्कार, दिलेलें वचन न मोडणें, शत्रूस पाठ न दाखविणें आणि अपमान सहन न करणें वगैरे वीरोचित मर्दानी गुणांमुळेंच त्यांना ह्यावेळीं असाध्य गोष्ट साध्य करून घेतां आली ती अशीः—

'सत्तरीचा भाग त्यावेळीं दिल्ली येथील तघलख वंशाच्या बादशहानें कुडाळच्या देशमुख देसायांकडे सोंपविला होता व पहिले खेमसावंत हे त्याचे वढवणयातर्फे वसुली कामदार नाईक ह्या हुद्यावर होते; पण पुढें दुसऱ्या खेम-

सावंत भोंसल्याची व कुडाळच्या देशप्रभूची लढाई जुंपल्यामुळें बराच काळ-पावेतों ह्या अरण्यमय व ओसाड भागाकडे कोणाचेंही लक्ष्य नव्हतें; कारण ह्या डोंगराळ प्रदेशीं रानटी हबशी काळ्या लोकांची वस्ती असून तीमुळें राजाला उत्पन्नाची बाब ह्मणजे गगनचुंबित वृक्ष तोडणें यांवांचून कांहींच नव्हती; पण सांखळी भागांतील जनता क्रूर अशा हबशी लोकांचें भय मानीत असल्यानें एकटेदुकटे सांखळीपुढें पाऊल टाकण्याला मुळींच धजत नसत. कारण हबशी लोक हे मांसाहारी असल्यानें नेहमीं ते आपली उपजीविका वनपशू व कंदमुळें यांवर करीत. त्यांतही एकाद्या दिवशीं माणसाचें मांस मिळालें कीं ते फार संतुष्ट होत. आपल्या आंगाच्या आच्छादनाकरितां ते कपडेवजा चामडें वापरीत. हरीण जसे गानलोलुप किंवा सर्प जसे स्वरलोलुप असतात तसे हे प्राणी स्वरलोलुप असल्यामुळें स्वराकरितां मात्र ते बेसावध होऊन जवळ येत असत. बाकी सदा सावध राहून शिकारी लोकांची चाहुल ऐकली कीं, गिरिकंदरीं अथवा निबिड जागीं लपून आपला बचाव करीत असत. हा त्यांचा स्वभावगुण सत्रोजीनें ऐकल्यापासून त्यांच्यावर स्वारी करण्याची त्यानें तयारी केली, आणि एके दिवशीं आपल्या अनुयायांसह पुंग्या, ढोलकीं वगैरे कांहीं तमाशाचीं साधनें घेऊन तो त्या ठिकाणीं गेला. पुंग्या वाजवून ढोलक्यांचा नाद दुमदुमूं लागतांच तास दीड तासाच्या आंत बहुतेक रानटी लोक गोळा झाले. लोक जमा होऊं लागले तसतसें त्यांना खाद्य वगैरे चारून बेसावध स्थितींत सत्रोजीनें व त्याच्या साथीदारांनीं त्या लोकांत दांडपट्टा फिरवून बहुतेकांस ठार केलें. कित्येकांस पकडून बांधून टाकलें आणि कित्येक जिवाच्या भीतीनें पळून गेले. शेवटीं त्या प्रदेशीं जी त्या रानटी लोकांची भीति होती ती आपल्या शौर्यधैर्यादि गुणांनीं सत्रोजीनें नाहीशी करून त्या ठिकाणीं नव्या लोकांच्या मदतीनें झाडें झुडपें तोडून वसाहतीस योग्य अशी जमीन केली. गुरेंढोरें आणून शेती वसागिली व उपयुक्त झाडांची लागवड केली. एवंच भयाण अरण्यास आपल्या कर्तबगारीनें रमणीय व सुंदर असें रूप देऊन सत्रोजीनें त्या डोंगराळ प्रदेशाची चांगल्या प्रकारें वसाहत केली. याप्रमाणें तो डोंगराळ प्रदेश आपल्या हुकमतीखालीं आणल्या-नंतर कांहीं वर्षांनीं, ह्मणजे इ. स. १६७५ ह्या वर्षी तिसऱ्या खेमसावंतास—

कुडाळच्या देशमुखांवर विजय मिळाल्यानें-- विजापूरच्या बादशहाकडून सरदेशमूख ही पदवी मिळून इकडील सर्व भाग त्याच्या सत्तेंत आला तरी पण इकडून तिकडे व तिकडून इकडे स्वाऱ्या करण्याच्या मानगडींत असल्यामुळें सत्तरप्रांतांतील गडबडीकडे लक्ष पुरविण्यास त्यांना मुळींच फावलें नाहीं. तरी राण्याच्या अतिरेकाच्या कागाळ्या त्यांच्या कानावर वेळोवेळीं जात होत्या. शेवटीं राण्यास पकडून आणण्याकरितां त्यांनीं आपले कांहीं सशस्त्र शिपाई सांखळीस पाठविले तेव्हां सत्रोजीराव राण्यानें आपल्या उपास्य दैवताची करुणा भाकून सर्व मरिमार त्यावर ठेवून जाण्यास निघाला. जातांना एका चाणाक्ष सारस्वत ब्राह्मणास बरोबर घेऊन जाता झाला. मजल दरमजल करीत एकदां सर्व मंडळी सावंतवाडीस जाऊन पोंचली. हें वर्तमान शिपायांकडून राजेसाहेबांना कळल्यानंतर त्यांनीं त्यास आपल्या राहत्या बंगल्यासमोरच एका प्रशस्त अशा घरांत नजरकैदेंत ठेवण्यास सांगून त्याच्या राहण्याची, जेवणखाण्याची व्यवस्था दरबारीथाटाप्रमाणें ठेवण्यांत आली. ह्याप्रमाणें महिनापंधरा दिवस गेल्यानंतर एक दिवस अशी गोष्ट घडली कीं, राज-कैद्यासाठीं ह्मणून राजेसाहेबांचा आचारी अन्नाचें ताट घेऊन जात असतां वाटेंत,त्या ताटावरील झांकलेलें पान खालीं पडलें. तें त्या आचाऱ्यानें झाडून पुन्हां त्या अन्नावर झांकलें. ह्यावेळीं सत्रोजीराव आपल्या माडीच्या खिडकींत उभे होते. त्यांना ही कृति पाहून संताप आला आणि त्या संतापाच्या भरांत आचारी जवळ येतांच प्रथम त्याच्या तोंडांत भडकावून असली ओंगळ कृति पुनः करशील काय ? असें दरडावून जरबीनें विचारतां गयावया करून आचाऱ्यानें त्याजपाशीं माफी मागीतली. पुन्हां दुसऱ्या दिवशीं ताट घेऊन जाण्याच्या वेळीं आदल्या दिवशीं झालेला प्रकार राजेसाहेबांना सांगून मी राण्याकडे आज ताट घेऊन जात नाहीं. ह्मणून रडूं लागला घडलेला प्रकार ऐकून राजेसाहेबांस आश्चर्य वाटलें. अपराधी ह्मणून ज्यास आह्मी नजर-कैदेंत ठेवलें त्याच मनुष्यानें आमची कदर न बाळगतां आमच्या समोर आमच्याच आश्रितास मारावें ही एकादृष्टीनें संतापजनक गोष्ट खरीच पण राजेसाहेब हे खरे गुणग्राहक असल्यानें सत्रोजीच्या ह्या विलक्षण धारिष्टाबद्दल राजेसाहेबांच्या अंतःकरणांत त्याजबद्दल आदर उत्पन्न झाल्यावांचून राहिला

नाहीं. निधड्या छातीच्या वीरांना जवळ करून मराठ्यांचें नांव गाजविण्याची राजेसाहेबांची इच्छा प्रबल असल्यामुळें शूर लोकांना मराठी राज्याचे आधारस्तंभ बनविण्यास ते कधींही माघार घेत नसत. अर्थात् सत्रोजीसारख्या तेजस्वी रत्नाला दवडणें त्यांना शक्यच नव्हतें. राजेसाहेबांनीं वरकरणीं संतापाचा आव आणून आपल्या आचाऱ्याला शासन करणाऱ्याचें पारिपत्य होणें जरूर आहे ह्मणून दुसऱ्या दिवशीं सत्रोजीला दरबारांत आणून राजेसाहेबांनीं त्याची चौकशी चालविली. खटल्याची साद्यंत हकीकत सांगण्यास सत्रोजीनें आपला दुमाषी पुढें केला व आपण अगदीं अदबीनें व विनयानें राजेसाहेबांच्या प्रश्नाचीं उत्तरें देऊं लागला. सत्रोजीच्या सद्वर्तनानें महाराज अंतःकरणापासून खुष झाले. त्यांच्यानें आणखी प्रश्न करवेनात. राजेसाहेब ह्मणाले—' आपल्या खटपटीनें उभी झालेली वसाहत आह्मी घेऊं इच्छीत नाहीं पण आपल्यासारखे वीरपुरुष आमच्या बाजूनें लढावे व आमचें स्वामित्व कबूल करावें हीच इच्छा. बाकी आपले अपराध आह्मी आपणास केव्हांच माफ केले आहेत. सत्रोजीनें मोठ्या प्रेमानें सावंतांचें प्रमुत्व कबूल केल्यानंतर उभयतांच्या प्रेमांत भर पडून असें ठरलें कीं, " राण्यानें सांखळीपासून सर्व सत्तरप्रांत आपल्या ताब्यांत ठेवून दरसाल स्वामित्वाबद्दल ठराविक खंडणी वाडी सरकारांत आणून द्यावी आणि वेळप्रसंगीं बारगीर वगैरे फौजफांटा घेऊन सरकारास मदत देत असावी. " याप्रमाणें महाराजांच्या पदरीं राहून राणा मोठ्या योग्यतेस चढला हें निराळें सांगावयास नकोच. ह्या वंशांतील अनेक पुरुषांच्या धैर्याच्या, स्वदेशाभिमानाच्या गोष्टी इतिहासांत मोठ्या प्रेमानें गाइल्या आहेत. शेवटीं सत्रोजी स्वस्थळास येऊन घडलेली आनंददायक गोष्ट ही विठोबारायाची कृपाच होय अशा भावनेनें त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागला आणि त्यानें आपली राजकीय पद्धतीची गादी सांखळीस ठेवली. पुढें श्रीपांडुरंगाच्या मूर्तीची स्थापना शके १४१० त आदिलशाहींतील पडक्या मशिदीवर उभारलेल्या देवालयांत करून मूर्तीबरोबर असलेल्या बाकरे उपनावाच्या ब्राह्मणास पूजेचा अधिकार, कामत यास आरतीबद्दल वतन, पुडकर यास कीर्तनाबद्दल वतन, दुमाण्यास कारभारीपणा व पिंगे यास कोठीवरील अधिकार दिला.

श्रीविठोबाराय सत्रोजीची स्नुषा राजाबाई हिच्या व धावजेकर उपनांवाचे वैष्णव ब्राह्मणाच्या नवसास पावल्यामुळें देवालयाच्या उभारणीस त्यांनीं बरीच मदत केली. श्री विठोबाराय हे पुष्कळांच्या नवसास पावले आहेत. त्यांपैकीं श्रीमंत ढेपे यांचें उदाहरण देऊन हें प्रकरण पुरें करूं.

मागें एकदां ह्मणजे इ. स. १८४० त पणजींचे ढेपे यांचा व्यापार आफ्रिकेपर्यंत चालत असल्याकारणानें एक मोठें जहाज गोव्यांतून माल घेऊन मोंबासाला गेलें होतें व तेथून ठरावीक मुदतींत तें माल घेऊन परतावयास पाहिजे होतें; पण महिना दोन महिने झाले तरी त्याचा पत्ता नाहीं ह्मणून मंडळी काळजी करीत होती; व त्या काळजींत ते पिंगळी ज्योतिषी यांनाही प्रश्न करीत. पण एकाच्याही प्रश्नाचें उत्तर बरोबर न आल्याकारणानें त्या गोष्टी तरणेताठे लोक झूट ह्मणत. तर वृद्ध लोक श्रद्धेनें एखाद्या ज्योतिषास विचारल्यावांचून रहात नसत. असें चाललें असतां एक दिवस पांडुरंगाचे पुजारी बाकरे हे कांहीं कामाकरितां ढेप्याच्या येथें गेले असतां तेथलि कांहीं पोक्त मंडळींनीं पंगाय ( मोठें जहाज ) बद्दल सर्व हकीकत सांगून प्रश्न काढण्यास विनंती केली असतां त्या भाविक ब्राह्मणानें पांडुरंगाचें नांव घेऊन सांगितलें कीं, ‘ तुमचें जहाज आजपासून तिसरे दिवशीं येईल. ’ हे शब्द ऐकतांच तरुण मंडळींत असा कांहीं हंशा पिकला कीं, त्या भटास अतिशय खट्टूपणा वाटला; परंतु तरुणांनीं त्यावर वाग्बाण सोडण्यास कमी केलें नाहीं. एक ह्मणाला कीं, ‘ जर तीन दिवसांत जहाज आलें तर आह्मीं तुला शंभर रुपये देऊं, नाहीं तर आपण काय द्याल बोला ? ’ दुसरा ह्मणतो ‘ अगा भटा तीन दिवसांनीं येणारच ह्मणून आपणांस देवानें येऊन सांगितलें कीं काय? ’ अशा वेळीं बाकऱ्यांनीं सर्वांसमक्ष प्रतिज्ञा करून सांगितलें कीं, ‘ तीन दिवसपर्यंत मी अन्न न घेतां खडतर उपवास करीन आणि तिसरे दिवशीं जहाज न आलें तर प्राणत्याग करीन ’ असा दृढ निर्धार करून तो ब्राह्मण अनुष्ठानास बसला. तिसऱ्या दिवशीं बारा वाजतां रात्रौ जहाज आग्वाद येथें आल्याबद्दल तोफ होऊन इषारा झाला. सर्वांस ही गोष्ट विदित झाली. इकडे ब्राह्मणास भोजन करण्याबद्दल मालक विनंति करूं लागले; पण त्या ब्राह्मणानें सर्वांना निक्षून सांगितलें कीं, ‘ पांडुरंगावर अभिषेक केल्यावांचून मी

अन्न ग्रहण करणार नाहीं.' त्याप्रमाणें तो घरीं येऊन देवास अभिषेक करून रात्रौ स्वस्थ चित्तानें झोंपला असतां स्वप्नांत देव येऊन ह्मणाले कीं, 'तुझ्या निर्वाणीच्या उपवासाकरितां मला जहाजाच्या तपासास जावें लागलें व तें जहाज चिखलांत रुतून बसलें होतें, तें हालवून पाण्यांत आणण्यास मला अत्यंत कष्ट करावे लागल्यामुळें माझें सर्वांग सारखें दुखत आहे. तरी पुनः असल्या भानगडींत तूं मला घालूं नको.' या गोष्टीनें त्या ब्राह्मणास फार दुःख होऊन त्यानें देवास औषध करून दिलें; लोणी-तूप लावून आंग चोळून दुधाच्या अभिषेकानें न्हाऊं घातलें. अशा अनुपमेय श्रद्धेनें त्यानें देवाची क्षमा मागितली. पुढें ही बातमी ढेंप्यास कळून त्यांनींही दुग्धाभिषेक करण्यास लावून पुढें प्रतिवर्षी गोपाळकाल्याकरितां पोहे, केळीं, दूध, फळफळावळ वगैरे पाठविण्याचा क्रम ठेवला होता. सारांश, ज्यांनीं श्रीपांडुरंगाची निश्चयानें भक्तिपूर्वक आराधना केली त्यांस साक्षात्कार होऊन ते सर्व दुःखापासून मुक्त झाले आहेत. रामदासस्वामीस प्रभूनें रामरूपानें दर्शन दिलें आहे, नरहरी सोनारास शिवरूपानें भेटले आहेत, चोखामेळ्याबरोबर गुरें ओढिलीं आहेत, दामाजीपंताकरितां महार झाले आहेत, नामदेवाच्या तर घरांतच राहिले होते, जनाबाईसंगें तर दळण कांडण चाललेंच होतें. ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून अंतःकरणपूर्वक श्रीविठ्ठलाचें भजनपूजन केलें त्यांवर त्यांनीं अनुग्रह केल्याचे साक्षात्कार अगणित आहेत.

अद्याप राण्याच्या वंशांतील अथवा साधुबरोबर प्रवासांत असलेल्या लोकांच्या वंशांतील कोणाही इसमानें पंढरपुरास जातां कामा नये. गेल्यास बाधा झाल्याशिवाय राहत नाहीं. 'मीच जर तुमच्यासाठीं येथें आलों आहें तर तुह्मी श्रद्धाहीनपणें पंढरपुरास कां जातां, असा पंढरीरायांचा त्यांना सवाल आहे. ही गोष्ट सर्व गोमांतकस्थ बंधूंनीं लक्षांत ठेवून सांखळी येथील श्रीविठ्ठलचरणीं श्रद्धा ठेवून प्रभूचा महिमा वाढवावा हें फार उत्तम.

यावेळीं सावंतवाडीचे राजेसाहेब भोंसले आणि सत्तर प्रांतांतील राणे लोक यांचा सेव्यसेवक—संबंध बराच काल चालला असतां कोणत्या कारणानें वितुष्ट आलें याचें विवेचन करण्यापूर्वी इतकें सांगावेंसें वाटतें कीं, परीक्षकाला हिऱ्याचें मोल कळलें नाहीं व त्यामुळें त्यानें तो कवडीमोल ठरविला तर त्याचा दोष परीक्षकाकडे किंवा हिऱ्याकडे ?

---

१ परिशिष्ट नंबर ५ मधील मजकूर पहा.

## प्रकरण दुसरें.

# विषयप्रवेश

जातीनें अधम असो वा, घातकही असो महाघोर ।
जो कायकृतज्ञ प्राज्ञमतें पुरुष तो जगीं थोर ॥ —मोरोपंत.

संस्कृतीच्या अफाट समरांगणांतील जीवितयुद्धांत मुक्या जनावरांप्रमाणें सहज हाकवून घेवूं नका तर एखाद्या रणशूराप्रमाणें त्यांत लढा.

ज्या पोर्तुगीज लोकांनीं एकाकाळीं आपल्या शौर्यशक्तीच्या बळावर तेराव्या शतकापासुन सोळाव्या शतकापर्यंत किती तरी लढाया मारल्या आणि जगांतिल बहुतेक भागांतून सोनें, रुपें, हिरे, माणीक, मोतीं यांचे ढिगांचे ढिग राजसिंहासनापुढें आणून ओतले त्या पोर्तुगीजांनीं सत्तरप्रांत काबीज झाला असतां कातडीच्या भिन्नत्वामुळें दुसऱ्याच्या शौर्याची पारख न करतां राजसेवेस ( Heroes ) शूरपुरुषांची जी एकप्रकारें मदत मिळवितां आली असतां ती न मिळतां योग्य कामाकडे योग्य पुरुषाचा उपयोग करण्याऐवजीं त्यांजविषयीं वैमनस्य या युरोपीयन लोकांत वाढत जावें हें धर्मभेदामुळें ठीकच आहे. कांकीं हिऱ्यामोत्यांची ज्या लोकांना किंमत कळत होती त्याच लोकांना माणसाच्या बुद्धीची आणि शौर्याची किंमत कळूं नये ना ! उलट त्यांना आपल्या शौर्यशक्तीच्या गुर्मीखालीं चिरडून निःसत्व व निर्बुद्ध करूं पहाणाऱ्या श्वेतद्वीपस्थ सरकारला जसा कटू अनुभव यावयाला पाहिजे होता तसा तो आला ह्यांत नवल नाहीं.

इ. स. १७३९ त मुंबई जवळील साष्टी परगणा व वसईकिल्ला यासंबंधीं जी मराठे व पोर्तुगीज यांच्यांत भयंकर आणि घनघोर लढाई झाली, त्याचवेळीं पेशव्यांचा एक सरदार व्यंकटराव नारायण घोरपडे गोव्यांत घुसून फोंड्याचा मर्दनगड किल्ला आणि साष्ट—बारदेश प्रांत घेऊन मध्यभागीं सांपडलेल्या शत्रूंस त्रास देऊं लागला. तिकडे वसईचा किल्लाही मोठ्या हिंमतीनें चिमाजी आप्पानें घेऊन मराठ्यांच्या मर्दुमकीचें पाणी पोर्तुगीजांस पाजल्याकारणानें गोव्याचे गव्हर्नर लुइजद मिनेजीस हे एखाद्या चावऱ्या कुत्र्याप्रमाणें इतके चवताळून गेले होते कीं, पोर्तुगीजांच्या क्रूरतेचा मासला मराठ्यांस

दाखवून त्यांना आपल्या वर्चस्वाखालीं ठेवावें अशा इच्छेनें आजील देशाहून काळ्या क्रूर व धाडसी लोकांच्या दोन पलटणी कवाइतींत निपुण करून व पोर्तुगालहून गोऱ्या सोल्जरांच्या दोन पलटणी आणून मराठ्यांचें पुरें पारिपत्य करूं या प्रबल इच्छेनें शिकस्त केली; भरपूर फौज आणली आणि जवळचे भाग पेशव्यांच्या ताब्यांतून हिरावून घेतले.

अशा अतोनात त्रासांत वसईवर हल्ला करण्याची महत्वाकांक्षा धरून खटपट चालू असतां एकाएकीं सीक पडून गव्हर्नर खिस्तवासी झाले. अर्थात् पेशव्याशीं निकरानें सामना देण्याचें एकाच बाजूला राहून नवीन सैन्याच्या बळावर नवीन सुभेदारांनीं सावंतवाडकरांस तंबी देण्याचें काम सुरूं केलें; आणि त्याप्रमाणें वाडकरांच्या ताब्यांतील डिचोली, सांखळी, सत्तर, पेडणें आणि मणेरी इतके भाग पोर्तुगीज लोकांनीं काबीज केले. अशा वेळीं सुंदरवाडीचा राज्यकारभार भोंसले कुळांत प्रख्यात असलेल्या जयराम सांवत देसाई व रामचंद्र सांवत देसाई या बंधुद्वयाकडून चालविला जात होता. जयराम सांवत लढाईच्या कामांत इतका कांहीं पटाईत होता कीं, तो आपली आवडती बोरमाणकी घोडी शत्रूच्या सैन्यांत घालून शत्रूंना कंठस्नान घालून बाहेर निघे. अंगांत अचाट शक्ति, धिप्पाड देह, ईश्वराच्या ठिकाणीं विलक्षण श्रद्धा, आणि आपल्या सनातन धर्माचा पूर्ण अभिमान, यामुळें पुण्याच्या पेशवे दरबारांत त्याचें चांगलेंच वजन होतें; आणि बुद्धिचातुर्याच्या बाबतींत रामचंद्र सांवत फार हुषार असल्यामुळें शौर्य व बुद्धि यांचा मिलाफ होऊन यावेळीं वाडी संस्थानची दिवसेंदिवस भरभराट होत होती. अशा समयीं पोर्तुगिजांनीं आपल्या राज्यावर हल्ला केलेला ऐकतांच भीमार्जुनासारखे समपराक्रमी बंधु एकदम खवळून उठले व जय्यत तयारी करून पोर्तुगिजांशीं सामना देण्याकरितां पेडण्यावर हल्ला चढविला; आवेशाच्या पहिल्या उकळीसरशीं पांचही परगणे घेऊन आपल्या राज्यांतून पोर्तुगिजांस हांकून लावलें व आपली दहशत फिरंगी यांस बसावी ह्मणून बारदेश प्रांतावर स्वारी केली. त्या ठिकाणीं उभयतांची बरीच खराबी होऊन शेवटीं सांवत मागें फिरले. तरी पण मधून मधून सांवतांचे सैनिक सरहद्दीवरून फिरंगी मुलखांत धुमाकूळ घालीत असत. गनिमी काव्याच्या लढाईंत पोर्तुगीज लोक फारच हैराण होऊन गेल्यानें

सांवताची खोड जिरवून वारंवार होणाऱ्या पिडापिडीचा बंदोबस्त करण्याच्या इरायानें आपल्या सर्व सैन्याचे दोन विभाग करून एक खुष्कीच्या मार्गानें डिचोलीवर पाठविला, आणि दुसरा आपलें चिमुकलें आरमार घेऊन समुद्राच्या मार्गानें अदिलाबाद ऊर्फ बांद्यास जाऊन भडिमार करूं लागले.

दोन्हीकडे सैन्य फांकवावें लागल्याकारणानें भोंसल्याची फारच गाळण उडाली. इतक्यांत सांवतांनीं कोल्हापूरकराकडे मागितलेली मदत मिळाल्याकारणानें लढाईचें पारडें फिरलें. सांखळीच्या पूर्वेस सह्याद्री पर्वताच्या शिखरावर असलेला भिमगड किल्ला पोर्तुगीजांचा सरदार **कुतीन दमेल** हा बळकावून बसला होता. त्यास तेथून कोल्हापूरकराचे सरदार यशवंतराव शिंदे, नरसिंगराव शिंदे आणि सेनापती बच्च्याजी जिवाजीराव शिंदे यांनीं मोठ्या हिंमतीनें हांकून लावून सांखळी व डिचोली सर केली; तेव्हां पोर्तुगीजांची फौज आमोण्याच्या किल्यावरही गेली. तिकडेहि शिंद्यांनीं मोर्चा वळविल्यामुळें त्वेषानें आमोण्याचा किल्ला मोडून आपण गोव्याकडे पळत सुटले. यावेळींही सांवतावर सूड उगवितां न आल्याकारणानें पोर्तुगीज सांवतांवर दांतओठ खात होते. त्यांत आणखी इ. स. १७४३ त माकवहून येणारीं पोर्तुगीजांचीं जहाजें पकडून लुटल्यामुळें फिरंगी फारच चिडून मराठ्यांस शिक्षा करण्याकरितां त्यांनीं सांवताकडे मदत मागितली. ती न मिळाल्याकारणानें सौंदेकराकडे मदत मागितली; तेव्हां सौंदेकरांनीं दहा हजार फौज देऊन पोर्तुगीजांस सहाय्य केलें; यामुळें सौंदेकर फिरंग्याचे दोस्त बनले. मराठ्यांशीं तह करून उभयतांचें सैन्य सांवतांच्या मुलखांत घुसलें. यावेळीं जयराम सांवत व रामचंद्र सांवत ह्यांत बेबनाव येऊन भाऊबंदकी माजली. ही संधी पोर्तुगीजांच्या फायद्यावर पडून त्यांनीं डिचोली, सांखळी इत्यादि सांवताच्या हद्दींतील भाग सर केले. तेव्हां भंतग्रामचे ब्राह्मण देसाई आणि सांखळींतील राणे देसाई यांनीं पोर्तुगालच्या राजास अर्ज करून आपण आमचा मानमरातब राखून पूर्वापार भोंसल्याकडून मिळत असलेल्या सवलती देत असाल तर आम्हीं आपणाकडे निष्ठेनें वागूं अशी इच्छा दर्शविली; कारण वाडी दरबारांतील बेबंदशाई कारभार आणि पोर्तुगीजांचे नाहक छळ यांपासून हे लोक अतिशय कंटाळले होते. शेवटीं राज्यकारभारांतून आपलें अंग काढून

जयराम सांवत निरुत्साह मनानें दूर राहूं लागले व राज्यव्यवहार रामचंद्र सांवत पाहूं लागले. त्यांनीं पोर्तुगीजांशीं तह करून डिचोली, सांखळी, सत्तर हे भाग घेऊन तहान्वयें ठरलेली रक्कम दरसाल गोवा सरकारास द्यावी असें ठरलें.

ही गोष्ट इ० स० १७४४ त आक्टोबर माहेच्या २४ तारखेस घडली. तदनंतर भोंसले सरकारकडून आठ नऊ वर्षेंपर्यंत तहानें ठरविलेली रक्कम नाहीं ती नाहीं, वर आणखी मालवणच्या बाजूकडे चांचेपणाणें पोर्तुगीजांच्या गलबतांवर जातां येतां हल्ले होऊं लागले. शिवाय कांहीं देसाई सरदार पोर्तुगीजांचे पाळेगार बनले होते. त्यांसही धाकडपटशा दाखवून त्यांकडील खंडणीहि तेच बळकावूं लागले. यामुळें पोर्तुगीज सरकारास राग येऊन त्यांनीं आपल्या पेद्रगिलेमें सरदाराच्या हाताखालीं फौज देऊन त्यास डिचोली, सांखळी सर करण्यास पाठविलें. इकडे डिचोलीच्या कोटांत अवघी वीस पंचवीस मंडळी ठेवून लोक दिपवाळीकरितां पूर्व दिवशीं घरीं गेल्या कारणानें डिचोली बिनहरकत पोर्तुगीजांस सर करतां आली. त्यांनीं किल्ल्यासमोर डोंगरावर तोफा जोडून बार काढले; पण कोणीच हालचाल केली नाहीं ह्मणून सर्व फौजेसह कोटाजवळ येऊन पहातात तों असलेल्याही शिपायांनीं पळ काढला. हें पहातांच पोर्तुगीज सैनिकांनीं आपलें निशाण किल्ल्यावर उभारून पहारा ठेवला दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता. २६ सप्टेंबर सन १७४६ रोजीं सांखळीचा किल्ला घेऊन राणे देसाई यांचें मजबूत घरही घेतलें. पुढें मणेरी-वर हल्ला करण्यास गेले. तेथें उभयतांची लढाई होऊन तह झाला. त्यांत पोर्तुगीजांनीं जिंकलेला भाग पोर्तुगीज सरकारकडे असावा असें ठरलें. तेव्हां ही गोष्ट पोर्तुगालच्या राजास समजून त्यांनीं असें फर्मान प्रसिद्ध करावयास लावलें कीं, ' ब्राह्मण देसाई, मराठे देसाई, राणे सरदेसाई इत्यादि आमच्या राज्यांत समाविष्ट होणाऱ्या सरदारांस भोंसल्यांच्या हाताखालीं मिळत असत तेच हक्क त्यांना आमच्या सत्तेंत मिळतील. इतकेंच नव्हे तर भोंसल्यांनीं त्यांचें जे हक्क काढून घेतले असतील ते त्यांना परत मिळतील आणि पोर्तुगीज सरकारानें या सरदारांच्या उपयोगासाठीं ८०० शिपाई ठेवून त्यांना दरमहा पांच रुपये व १० अंमलदारांना ३० पारदावप्रमाण पगार द्यावा असा

जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर वाडकर आणि राणे यांचें संबंध सुटून ह्या भागांतील राणे, देसाई आणि रयत यांनीं पोर्तुगीज सत्तेचें सार्वभौमत्व कबूल करून आपण पोर्तुगीज प्रजाजन असल्याबद्दल लेखी शपथा घेतल्या. हेतु इतकाच कीं, पाश्चात्यांच्या सहवासानें निदान बुद्धीचा विकास होऊन ज्ञानाची थोडीशी तरी ओळख होईल. पण अनुभव मात्र उलट येऊं लागला.

हिंदुसरदारांचा दिवसेंदिवस होत असलेला उत्कर्ष बाटक्या लोकांना न आवडून पोर्तुगीज गव्हर्नरांत अति मत्सराचें वारें फिरूं लागलें. होतां होईतों 'कोंकण्यास' डोईजड करूं नये; कारण त्यापासून आपल्या राज्यास अपाय होईल असले कुविचार संधी सांपडेल त्यावेळीं दरबारी मंडळींच्या मनांत भरून वातावरण दूषित झालें. इकडेहि राणे व देसाई पोर्तुगीजांच्या धर्मछळामुळें गाफिल न राहतां वेळप्रसंगीं दोन हात करितां यावे या बेतांत होतेच. एवंच उभयतांच्या मनोवृत्ति विजोड बाजूनें फिरत असल्या-कारणानें राण्याच्या व देसाई यांच्या मनांतून राज्यकर्त्यांनीं आपणांस समतेनें व आदरबुद्धीनें वागवावें असें होतें. तर राज्यकर्ते आपण धनी या अभिमानाच्या तोऱ्यांत विषमतेनें वागत होते. सारांश पोर्तुगीज लोक बादशहाच्या हुकुमाचा मुलाजा न ठेवतां केवळ मत्सरी लोकांच्या चिथावणीनें नवीन् काबीजादींतील सरदारांचा घडींघडीं पाणउतारा व दुराग्रहानें उपमर्द करूं लागतांच स्वामीकार्यासाठीं स्वदेहाची आहुती देण्यास सदा तत्पर असलेल्या मानी लोकांस होत असलेला अपमान असह्य होऊन अंत:करण क्रोधाग्नीनें भडकून जाऊन त्यास कांहीं सुचेनासें झालें. त्यांनीं बादशहाच्या हुकमाचा विचार करण्यास गव्हर्नरास परोपरीनें विनंत्या करून पाहिल्या; परंतु त्यांचा कांहीं एक उपयोग न होतां मनाची उद्विग्नता मात्र जास्त वाढत चालली.

अशा स्थितींत पोर्तुगीज सरकारचा मूर्खपणा त्यांच्या नजरेस आणून द्यावा ह्मणून ह्यापुढें आणखी अधिकाऱ्यांचे उंबरठे खेपा घालून झिजवीत न बसतां आंगच्या खऱ्या गुणांनींच त्यांचे डोळे दिपवावे ह्मणून स्वाभिमानोत्पादक विचार राणे व देसाई यांना सुचूं लागले, व असे विचार त्यांना सुचणें स्वाभाविक होतें. कारण, ज्यांची विवेकदृष्टी नष्ट होऊन रोमरंध्रांत मानीपणानें भरलेल्या लोकांस लांगूलचालनादि साधनानें अनुकूल करून घेण्यापेक्षां केवळ

स्वावलंबनानें या परकीय लोकांच्या माना वांकवणें हाच मार्ग इष्ट आहे असें त्यांना वाटूं लागलें. कां कीं, ज्यांनीं आपणांस सुधारलेल्या लोकांकडून विद्या, कला यांचा फायदा मिळावा सुखासमाधानानें राहातां यावें, आणि आपल्या वर्ज्यांत किमपिही कमीपणा येऊं नये अशा आशेनें ज्यांनीं फिरंग्यांचें स्वामित्व स्वीकारून पराधीनपणा स्वीकारला त्यानांच अल्प अवधींतच स्वतांच्या शब्दाला हरताळ फासून यःकश्चित गुलामाप्रमाणें लेखून ओंगळ, घाणेरडें आणि ओकारी येण्यासारखें उच्छिष्ट चाखावयाला लावण्याची इच्छा अधिकारी करूं लागले तर तें वीर व मानी पुरुषांना कसें सहन व्हावें ? त्यांच्या वीरवृत्तीला यावच्चंद्रदिवाकरौ आपण, पोर्तुगीज लोकांचीं उष्टीं चाटून पिढ्यान् पिढ्या रहावें आणि स्वतःचा घाम पिळून फार श्रमानें थाटलेला संसार परद्विपस्थ लोकांची मालमत्ता बनून रहावा हें आवडेल काय ? ज्यांच्या कुजक्या मेंदूंतील मत्सरयुक्त विचार हेच कायदे; अशा कायद्यांना बळी पडून क्रिस्तानुयायांचे कळप वाढविणें त्यांना पसंत कसें पडावें ? आमच्या हुकमावांचून तुह्मी अमुक करावयाचें नाहीं अमुकच केलें पाहिजे, असा आमचा तुह्मास हुकूम आहे असले अरेरावीचे कायदे रजपुती मार्न रक्ताला कसे सहन व्हावे ? बेगुमानपणानें भर रणांत स्वशिर हातावर घेऊन ज्यांनीं खुशाल विहार करावा, त्यांनीं परकीय लोकांकडून हाकवून देण्याचे झटदिशीं सोडून देऊन सरकारी अंमलदाराबरोबर लढण्यास तयार व्हावें योग्यच होय.

करारी पुरुषांना ‘ मरणे क्षणिकं दुःखं मानभंगो दिने दिने ’ मानखंडनेमुळें निद्रासुद्धां स्वस्थ लागत नाहीं; व अन्न गोड लागत नसतें. ते आपल्या मानभंगाचा सूड घेण्यास आपल्या नाशवंत देहाची पर्वासुद्धां करीत नसतात. अशा पुरुषांची खरी योग्यता न जाणतां गोव्यांतील अधिकाऱ्यांनीं त्यांना चिथवून अराजक मात्र बनविले; आणि ह्या लोकांना सुद्धां अनेकाऱ्यांच्या अतिरेकानें आपले ईश्वरापासून मिळविलेले मानवी हक्कसंरक्षणा सरकाराविरुद्ध शस्त्र उपसणें भाग पडलें, आणि दिवसाढवळ्या मोठमोठ्या अमंलदाराचे खून पडून जिकडे तिकडे लुटालूट जाळपोळ, मोडतोड हो लागली. तेव्हां मात्र घोडामैदान जवळ येऊन ठेपलें. कायद्याच्या शस्त्रा

.चा दिमाख दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांची आणि कायद्याच्या अत्याचारानें रून गेलेल्या असंतुष्ट प्रजेची बंडाच्या रूपानें गांठ पडून एकप्रकारें उभय-च्या सामर्थ्याची शर्यत सुरू झाली. तरीपण अहंकारानें अंध झालेल्या पोर्तु-जसरकारानें बंडखोरांची खोड जिरविण्याच्या इराद्यानें नवीन सैन्य ठेवून गजंग पछाडून पाहिले; परंतु बंडखोर आवरले नाहींत. सरकारास बंडवा-ांच्या शौर्याची पारख होऊन एरव्हीं राजवाड्यांत शांततेच्या वेळीं काय-ाच्या फुशारक्या मारणाऱ्या दरबारी मंडळींच्या निर्बलत्वाचें प्रदर्शन घडण्याची वेळ जवळ आली. किंवा बंडांत सामील झालेल्यांचें नशीब ोरावर होतें म्हणून त्यांना फार काळ गिरिकंदरीं फिरून उद्विग्नता भोगावी ागली नाहीं, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. या यशाचें कारण म्हणजे ाभिमान संरक्षणाची उत्कट इच्छा हेंच होय. नपेक्षां शस्त्रसामुग्री, सैन्य ाणि विपुल खजिना, इत्यादि साधनांनी संपन्न असलेल्या सरकारास माळ ालण्याचें सोडून अनवाणी वनोपवनें भटकणाऱ्या कफल्लक बंडखोरांच्या ळ्यांत माळ घालण्यास विजयश्री कां तयार झाली असती? ज्यांच्याकडे वायतींत निष्णात केलेली सेना नाहीं, विपुल धनाचा कोश नाहीं किंवा श्चात्य पद्धतीचीं शस्त्रेंही नाहींत, अशा बंडखोरांपुढें प्रबळ सरकारानें नमतें ऊन त्यांचें म्हणणें कबूल करावें, याचें कारण इतकेंच कीं प्रामाणिकपणानें पारलेलें कार्य जुलमाच्या शक्तीनें धुळीस मिळवितां येत नाहीं.

न्याय्य हक्काबद्दल आठ आठ दिवस उपोषित राहून दृढनिश्चयानें ाणि स्वाभिमानानें दिलेली टक्कर अपेशी कशी होणार? शस्त्रसामुग्रीच्या लाबलावर जयापजय अवलंबून असता, तर एकादा बलिष्ठ राजा अखिल मंडळाचा सम्राट होऊन बसला असता; पण तसा प्रकार झालेला कोठेंही आढळत नाहीं व यावरून केवळ युद्धसामुग्रीच्या बलातिशयावर जय संपा-दितां येत नाहीं हेंच सिद्ध होत आहे. भूपतिश्रेष्ठ रावणाचा नरवानरांनीं ेलेला विध्वंस, सम्राट दुर्योधनाचा पंडुपुत्रांनीं केलेला संहार, ठेंगू एशिया-टिक जपानी वीरांनीं धिप्पाड कोसॅक स्वारांची उतरलेली अहंमन्यतेची गुर्मी, त्यादयनेक उदाहरणें सत्पक्षाला विजय हटकून मिळावयाचा, हेंच सत्य पष्ट करीत आहेत. असें जर नसतें तर शिवाजीसारख्या वीराला दरिद्री

४

मावळ्यांच्या हातून चार पांच बलाढ्य शाह्यांचा फडशा केव्हांही पाई आला नसता. ' आपण आह्मांस साह्य केल्यास आह्मीं तुमचा मानमर राखून हक्काचें संरक्षण करूं, ' या सरकारच्याच वचनास हरताळ फ सरकारी नोकर लष्करी मस्तीच्या बळावर दुसऱ्यास गुलाम लेखूं लागले तें स्वातंत्र्यप्रिय रणशूर मनुष्यास कसें सहन होईल ? ते आपल्या न हक्कांची पायमल्ली कशी करूं देतील ? त्यांनीं आपला जीव धोक्यांत घा अग्नीनें अग्नी विझत नाहीं, हें सिद्ध करण्यास सरकारी अधिकाऱ्यांस भा पाडलें तेव्हांच त्यांच्या हक्काची जोपासना करण्याचें पोर्तुगिजांनीं कबूल के माफीची द्वाही फिरवून प्रथम बंडाची शांतता केली.

एवढ्यावरून आह्मीं सरकारला दोष देऊन बंडखोरांची तरफ करतों अशांतली गोष्ट नाहीं. सत्यकथन हें इतिहासाचें कार्य लक्षात र बंडवाल्यांतील दुर्गुणांचा जर आपण धिक्कार करणार आहों, तर त्यांच्यांत सद्गुणांचा सत्कार निःपक्षपातीपणानें आह्मांस केलाच पाहिजे; कारण आज पर्यंत जगाच्या रंगभूमीवर निरनिराळ्या देशांतील अनेक पात्रें घटकाभ चमकून मृत्युरूप पडद्याच्या आंत अंतर्धान पावलीं; परंतु आह्मीं हिंदुलोक अनादिकालापासून या रंगभूमीवर नाचत आहोंत व प्रलयकालपर्यंत अ नाचत राहणार. आमच्यांतील हा विशिष्ट गुण जो टिकाऊपणा, तो जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत कशापासूनही भीति बाळगण्यास नको असली तरी जगाच्या अंतापर्यंत आपण नुसते टिकलों किंवा जगलों, ह्मणजे आपली कृ तंव्यता झाली असें कोणी समजतां कामा नये. आपणास जें जगावयाचें तें सुस्थितींत जगावयाचें आहे; दुःस्थितींत कुजत पडावयाचें नाहीं. स्थितींत आपणास जगांतील इतर राष्ट्रांकडून मान मिळेल व जगांतील लोकांच्या मांडीशी मांडी लावून बसतां येण्याची योग्यता आपल्या येईल, ती स्थिति प्राप्त करून घेण्यास प्रत्येक हिंदवासीयानें आपलें तन-मन धन अर्पण करून मनापासून झटलें पाहिजे व अशी स्थिति प्राप्त होणें श नसेल तर रोमन्स, इजिप्शियन वगैरे पुरातन लोकांप्रमाणें आपणही नाश झालेलेंच बरें ! सदैव हलाखींत दिवस काढून जगांत आपलें हंसें करून घेण्या पेक्षां एकदां या जगांतून आपलें तोंड काळें करणेंच जास्त चांगलें !

असें निराश होण्याचें आपणांस मुळींच कारण नाहीं; कारण जोंपर्यंत वरील रख्या कृतप्रज्ञ गुणांचीं माणसें आपल्या समाजांत आहेत, तोंपर्यंत तरी पणांस भाग्याचे दिवस येतील असें मानण्यास कोणतीच हरकत नाहीं. येंच दृश्य सबळ सरकारास ता. १८ जानेवारी सन १७५५ या दिवशीं ल बंडवाल्या लोकांनीं हिंमतीनें लढून आपली मागणी मान्य करावयास वेली यावरून दिसून येत नाहीं काय?

ही शांतता ड्युक्यांव मिरिकत व्हाइसरॉयच्या जाग्यावर होते तोंपर्यंत ठली नव्हती. त्यांच्या मागून आलेले अधिकारी अधिकारमदानें धुंद होऊन जातीय प्रजेला करपटाप्रमाणें लेखूं लागले; गत दुःखाचा वचपा काढण्या- ाठीं कायद्याच्या दात्यांत भरडून तिला निःसत्व करण्याची हांव धरूं लागले. यांच्या दृष्टीला सत्ताबलाचें मांद्य चढून सत्तांध बनले. अशा वेळीं त्यांना यायान्याय, योग्यायोग्य गोष्टी दिसत नाहींत, याचा अनुभव आह्मां गोमांतकीयांना क्षणोक्षणीं व पदोपदीं आला आहे व येत आहे. ा सत्ताजन्य अन्धत्वानें ते विपरीत गोष्टी करूं लागले, ह्मणजे कोणीतरी सव्वाशेर भेटून चरचरीत अंजन घालून त्यांची दृष्टि साफ करतो. ाचा अनुभव त्यांनीं 'पुढच्यास ठेंच—मागचा शहाणा' या न्यायानें घेतला ाहिजे होता; परंतु सत्तेपुढें शहाणपण विसरणाऱ्या अधिकारीवर्गाला दीन- ळ्या रयतेच्या सुखदुःखाची कल्पना कशी व्हावी? हजारों कोसांवरून हालविल्या जाणाऱ्या राज्यसूत्रांच्या लहरीस आपली प्रजा अन्नाविणें ा आहे, हें कसें दिसणार? दैवाच्या प्रतिकूलतेमुळें वेळोवेळीं खाविंद- ारविंदाचा आश्रय करून एखाद्या चतुष्पाद जनावराप्रमाणें काबाडकष्ट ावे व पोटाची आग विझवावी, या स्थितीचा अनुभव आमच्या देशाच्या न्नावर ताव मारून पोळ बनलेल्या अधिकाऱ्यांस कसा यावा? एवंच ापली प्रजा ह्मणजे आपल्या चैनीचें व सुखाचें साधन समजून ज्या ज्या ळीं स्वतःच्या कल्पनेला व लहरीला मानतील तसे कायदे करून ना पिळली जाते—दरडावली जाते—त्या त्या वेळीं त्याच प्रजेतून संतोषी अनार्किष्ट ( बंडखोर ) निपजून असले अरेरावी सुलतानशाहींतील ायदे बंद पाडण्यास लावतात. त्या कायद्यांच्या चोपड्यांना कायदे न

समजतां यःकश्चित् कागदाचे चिटोरे समजून स्वतःचाही ईश्वरदत्त कायद दाखविण्यास तयार होतात. सरकारच्या नोकरांना वाटत असेल कीं, कड कायदे करून प्रजेस हालचाल करूं न देण्याइतकें घट्ट जखडून बांधलें कं मग आपली पोळी पिकेल; पण ही पोळी सुळावर चढून खावी लागते; व कधीं आपलें अंग कांट्यावर घालून खावी लागते; या पोळीमुळें आपा आपल्यासाठीं सभोंवतीं खड्डा खणून ठेवावा लागतो; परंतु याचा विचार धुंद होत नसल्याकारणानें बंडाच्या वणव्यांत देह पोळला जातो. असे कित्ये देह लोकक्षोभाच्या वणव्यांत होरपळूं नयेत अशी इच्छा करणाऱ्या सरकार किंवा सरकारी नोकरांनीं प्रत्येक कायद्यास सरकारची संमति घेतली पाहिजे ती न घेतां, रयतेची आबादानी न पाहतां, जुलूमजबरदस्तीनें कर वसूल करणें ह्मणजे सैतानीपणाच नव्हे काय? असा सैतानीपणाचा धिंगाणा मना गुलाम बनून कमकुवत बनलेल्या लोकांपुढें बिनहरकत घालतां येतो; परं प्रसंगोपात् शरीर गुलामगिरींत सांपडलें तरी मनाचा मानीपणा, स्वतंत्र विचार, स्वावलंबी आचरण ठेवून ज्यानें स्वतःचें मन परस्वाधीन केलें नाहीं अशा शूर पुरुषांशीं असल्या विक्षिप्त कायद्याची मातब्बरी काय? एखाद्या रोग्याचं ताप जास्त आणून मारतां येतो; प्रचंड पुरानें दुथडी जोरानें भरून चाल लेल्या नदीच्या पाण्याचा ओघही मुखाजवळ समुद्राच्या लाटेच्या थप्पडीनें कांहीं वेळ उलट वाहूं शकतो; परंतु अग्नीनें अग्नि विझवितां येत नाहीं हें ध्यानां ठेविलें पाहिजे. तें विसरून सरकारच जर कायद्याची समशेर घेऊन प्रजे उठलें तर प्रजेला तरी शस्त्रास हात घातल्याविना स्वस्थतेचा भाग मि शक्य नसतें; कारण सरकार व लोक या उभयतांच्या सुरक्षिततेसाठीं अव असें हें कायद्याचें शस्त्र एकट्या सरकारच्या हातांत असल्यानें लोकांन बाबतींत बोलण्याचा अधिकार मुळींच नव्हता.

अधिकारी करतात ते कायदे आपण निमूटपणें मान्य करूं लाग तर आमचें व आमच्या मुलांबाळांचें पुढें काय होणार या विवंचनेंत स्व विचारांचीं माणसें चूर होऊन मग नाइलाजानें बंडास प्रवृत्त होत हे, आजच्या काळांत कायदे गर्भांत कसे येतात, ते जन्म कसा घेतात, त्यांचं बाललीला, यौवनक्रीडा कशा चालतात, हें आजच्या प्रजासत्ताक मनूंत

ाहण्यांत येत आहे. याचें पर्यवसान कसें होणार हें पहाण्यासही कल्पना-ात्कीला शीण देण्याची जरूरी राहिलेली नाहीं. आयर्लंड, इजिप्त, रशिया, ृस्थान वगैरे देश हें भविष्य मोठ्यानें ओरडून सांगतच आहेत; तथापि क़ायदा ' या वस्तूचें यथातथ्य ज्ञान होण्यास, परमेश्वरानें दिलेल्या नर-्रेमानुरूप त्यानें दाखविलेलें कर्तव्य मानण्याचें कार्य करण्यास व आजच्या ंकट परिस्थितींतूनही खरा मार्ग दृग्गोचर होण्यास कायद्याची मूळपीठिका ाहिली पाहिजे. कायदा ह्मणून ज्याला आज आपण ह्मणतों त्याचा पहिला भवतार कधीं झाला असेल ? कायदा ही संज्ञा उत्पन्न होण्यापूर्वी त्याचें नांव ाय होतें ? ज्या परिस्थितींत कायदे करावे लागतात, तशा परिस्थितीचें ायद्याच्या अभावीं नांवच नसतें. अगदीं प्रथम सत्ययुग होतें असें जें आप-ांस वाडवडील सांगतात त्याप्रमाणें कायदा ही संज्ञा जन्मास येण्यापूर्वी जेकडे तिकडे सत्याचें साम्राज्य, सत्याची देवघेव व सत्याचाच व्यवहार चालत होता. हें वाटेल त्या धर्मांतील धर्मग्रंथ चाळले असतां ध्यानांत येतें. या सत्ययुगांतील सत्याच्या साम्राज्यांतही पुढें कायदे झाले; पण आपण आज कायद्यांकडे ज्या दृष्टीनें पहात आहों व कायदेहि आपलें स्वरूप आप-णास ज्या तऱ्हेचें दाखवीत आहेत, तसे कायदे सत्ययुगांत मुळींच नव्हते, हें ज्या कायद्यावरून लोक बंडाला प्रवृत्त झाले, त्या कायद्यावरून दिसून येणार आहे. प्रथम हिंदु व मुसलमान धर्मानुयायांकडून करांच्या रूपानें पैसा घेऊन ्वळ खिस्तीधर्मप्रसारार्थ खर्च करणें राजा या दृष्टीनें अनुचित होय. असें सतां स्वतःच्या प्रांताबाहेर असलेल्या चार बिशप व पन्नास पाद्रीभटांसाठीं ्रसाल दोन लक्ष रुपये खिस्तीधर्मप्रचारक ह्मणून खर्चिले जात असत. ामुळें पक्षपातीपणा जनतेंत प्रथमच पसरला होता. त्यांतही हिंदुदेवतांना ़टण्यास सरकार अरेरावी करीत असे.

स्वधर्मी लोकांना डोक्यावर घेऊन परधर्मियांचा मत्सर करण्यांत येई. ा व इतर अनेक कारणांमुळें विधर्मी प्रजेंत सरकारच्या आचरणानें बेदील-ा पसरला होता. तशांतून नुकताच आपल्या राज्यास जोडलेला पेडणें ़हाल कीं, ज्या भागांतील लोकांची परकेपणाची द्वेषबुद्धी अद्याप नष्ट झाली ़व्हती, अशा स्थितींत मोर्जीच्या समुद्रकिनाऱ्यावर वागाळेचे देसाई व

सरकारचे सोल्जर यांच्यांत कांहीं कारणामुळें बाचाबाची होऊन देसायांस अपमान सोसून प्रकरण नमतें घ्यावें लागलें. तेंही त्यांच्यांत धुमसत हो अशा वेळीं ह्मणजे इ० स० १७५५ त सरकारलाही पैशाच्या कमतरतेमुळें पैसा उत्पन्न करावा लागला. कारण पंचवीस लाखपर्यंत वाढलेला लष्करी खर्च धर्म खर्च, शिवाय ऑफिसर खर्च इत्यादि खर्चांचीं कलमें वाढल्यानें तिजो रींतलि पैसा पुरत नव्हता, ह्मणून आणखी पैसा उत्पन्न करण्याची सरकारला जरूरी भासली; परंतु प्रजाही हैराण होऊन कंगाल स्थितीस पावली होती आणि आणखी कर भरण्यास तिच्यांत त्राण राहिलें नव्हतें. हेंही सरकारास विदित झालें असतां जबरदस्तीनें तंबाखूवर कर बसवून तो वसूल करण्यास अधिकारी जुलूम करूं लागले.

गोव्याबाहेरून तंबाकू आणल्याच्या आरोपावरून कित्येकांवर खटले केले गेले व कित्येकांस दंड भरावयास भाग पाडलें. या व पूर्वींच्या कांही कारणांमुळें या महालांतील रयतेनें सदर सालांतील डिसेंबरच्या १८ तारखेस बंड उभारून पुंडाई माजविली. लोकांस कर भरण्याची नावड, तर सरकारास कर वसूल करण्याची आवड. अशा आवडीनावडीच्या दुकलीं शर्यत लागून बंडाचें मान वाढूं लागलें. अशा स्थितींत मोऱ्यांची रग जिरवावी ह्मणून मोर्जीचे अनंतराव दत्तोबा पालेकर हे आरोलेंकरातर्फे उगेंच्या कोटाचे क्याप्टन होते, तेही आपल्या तुकडीसह बंडांत सामील होऊन बंडाची धुमाळी बरीच माजली. जिकडे तिकडे छापे घालून खून पाडणें, जाळपोळ करून इमारतींची नासधूस करणें, खजीना लुटणें, अधिकाऱ्यांस पळवून नेऊन ओलीस ठेवणें इत्यादि गोष्टींचा धूमधडाका चालू झाला. अर्थात् ही दुर्निवार आपत्ति सर्व प्रजेवर कोसळली ती एका सरकारी सापेक्ष कायद्यामुळें नव्हे काय? हल्लींचे कायदे जसे सापेक्ष लहरीचे असतात, तसे ते सत्ययुगांत मुळींच नव्हते. त्यावेळचे कायदे निरपेक्ष होते ह्मणून रामरायाविरुद्ध किंवा कुरु श्रेष्ठ पांडवांविरुद्ध कोणीहि बंडाला प्रवृत्त होत नव्हते. त्यावेळचे लोक आपल्या नेहमींच्या सत्याच्या मार्गानें वागत असत व तसें वागतांना जर एकादा वि

१ टीप-( पानवेळ येथील रा. कामत वाघ यांच्या संग्रही असलेल्या गोमं कांच्या इतिहासाच्या हस्तलिखीत प्रतीच्या आधारें. )

क परिणाम दिसून आला तर तो कशानें घडून आला याचीं कारणें ताबड-
ाब शोधून काढून एक निर्बंध ठरवीत व तो जाहीर करीत. एवढा खटाटोप
रण्यांतही त्यांचा हेतु एवढाच असे कीं, आपण इतके शुद्ध रीतीनें वागत
सतांही अमक्या कारणानें अमुक निंद्य प्रकार आपल्या हातून घडला, तर
ामान्य लोकांची गोष्ट कशाला पाहिजे? तेव्हां आपल्याप्रमाणें इतरांना तरी
ेंच खाण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून त्यांस यांतील रहस्य सांगून टाकावें
व पुढील पिढीसाठीं एकादा निर्बंध ठरवून टाकावा, ह्मणजे आंधळ्यालाही
ठेंच खाण्याचा प्रसंग येणार नाहीं. अशा निरपेक्षबुद्धीनें त्यावेळीं निर्बंध ठर-
वण्यांत येत व त्यामुळें ते सर्व समाजाला कल्याणकारक होत. आजमितीस
निरनिराळ्या समाजांत जीं सामाजिक बंधनें व धार्मिक निर्बंध आहेत, ते
त्या त्या समाजांतील थोर पुरुषांच्या स्वतःच्या अनुभवावरून ठरविले गेले
आहेत व ते निरपेक्षतेच्या व सामाजिक हिताच्या उच्च हेतूच्या पायावर
उभारले गेल्यामुळें आजपर्यंत कोणालाहि नुकसानकारक न होतां, त्या त्या
समाजाची पूर्वपरंपरा अबाधित राखण्यास उपयोगी पडले आहेत.

हीं बंधनें व निर्बंध हेच कायदे होत. कायद्याचा पहिला व सात्त्विक
अवतार याप्रमाणें झालेला आहे व हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या सात्त्विक
कायद्याबरोबरच—नव्हे, त्याच्या आधींच, सात्त्विकच कां होईना; पण अन्याय
अगर गुन्हा हा जन्मास येत असतो. मुलगा होईपर्यंत आईबापांची जी वृत्ति
असते, ती मुलगा झाल्यावर टिकत नाहीं व पुढें मुलगा मोठा झाल्यावर जशी
ही टिकत नाहीं, तशी कायदा प्रथम जन्मास आणतांना त्यावेळच्या मनु-
ष्याची बुद्धि जशी सात्त्विक होती. तशी ती पुढें राहिली नाहीं. प्रथम जे
कायदे जन्मास आले त्यांच्या जनकास आपल्या हातून कांहींतरी अन्याय
झाला असें वाटे व पुन्हां तो आपल्याकडूनच कांय पण आपल्या देशबांधवां-
कडूनही होऊं नये ह्मणून त्यास कायद्याचें अगत्य पडलें. यापुढें जे कायदे
जन्मास आले, त्यांच्या जनकास आपल्या हातून अन्याय घडला असें मनांत
आलें तरी पूर्वीच्या सात्त्विक बुद्धीचा ऱ्हास पुढें होत गेल्यामुळें आपली चूक
कबूल करून दाखविण्याची त्याला लाज वाटूं लागली व त्यामुळें ती चूक सुधार-
ण्याचें तर नांवच नको, पण उलट झालेली गोष्ट सशास्त्र आहे हें सिद्ध

करण्याकरितां त्याला कायद्याची आवश्यकता भासूं लागली व त्यामुळें कायद्याचा मूळ हेतु विसरून मनुष्य त्याचा दुरुपयोग करून घेऊं लागला.

आपल्या स्वतःलाच जो मनुष्य अशारीतीनें फसवून घेऊं लागला, मनुष्य पुढें समाजाची तरी काळजी काय बाळगणार ? राणे व देसाई यां जी पोर्तुगीज छत्राखालीं रहाण्याची इच्छा दाखविली, ती गुलामगिरी नरकवासामध्यें मोठासा संतोष आहे असें कल्पून नव्हे, तर या बंदिखान्याच अंधारकोठडीमध्यें गोमांतकांतील लोकांकरितां जर कोणता प्रकाशाचा किर असेल, तर तो आपल्या भावी उत्कर्षाच्या आशेचाच होय. तो हिंदुलोकांच्य आशेचा हृदयमंदिरांतील दिवा कोणत्याही धूर्त पोर्तुगिज मुत्सद्यानें माल नये, त्या दिव्यांतील तेल शोषून घेण्याची नीच मनोवृत्ति कोणत्याही लो पोर्तुगिज मनुष्यानें धरूं नये; कारण त्या परम पवित्र ज्योतीवर सर्व गोमां कार्चे जीवित अवलंबून राहिलेलें आहे, असा साऱ्या प्रजेचा मानस होत लोकांची गुलामगिरींतील ही जीवितयात्रा त्यांना जड होत नसली, तर केवळ या आशेमुळें होत नव्हती. फक्त या भावी उत्कर्षासाठीं विद्यार्थ विद्यार्जनार्थ उत्सुक होते, शांततेच्या दिव्य प्रकाशांत कांहीं धन संपाद करावें ह्मणून धनिक पहात होते, व्यापारी उद्योगधंदे वाढविण्याच्या इ होते, कारागीर कलाकौशल्य आणि हुन्नरवृद्धीची अपेक्षा करीत होते, शिप शिपाईगिरींत तरबेज होण्याच्या विचारांत होते, शूर क्षात्रतेज वाढविण्या, इच्छा करीत होते, मुत्सद्दी आपलीं नीतितत्त्वें वाढविण्याच्या तयारींत हो विद्वान् आपली विद्वत्ता लढविण्यास पहात होते. ग्रंथकार ग्रंथ निर्माण क ण्याच्या बेतांत होते, सारांश ही जर आशा नसती तर या गुलामगिरी जाचांत कोण जगलें असतें ? आणि असल्या अपमानाच्या गर्तमध्यें आप जीव आपल्या कुडीमध्यें रहावा ह्मणून कोणी इच्छा केली असती ? आपले भावी कल्याण साधून घेण्यासाठीं राणे व देसाई पोर्तुगीजांच्या अमलाखा स्वसंतोषानें राहिले होते. असें असतां त्यांच्या आशेची निराशा करून, भ असलेला करांचा फायदा नाहीं तो नाहींच. वर आणखी आपल्या लोकां सुखसोईसाठीं—थैल्या भरून युरोपांत नेण्यासाठीं—भलतेच कर प्रजेवर ल अधिकारी लोक पैसा उकळण्यास शोधूं लागले, तर राणांना विसावा के

ज्यांच्या हातचे व्रण अजून वाळले नाहींत, शत्रूंशीं झुंजतां झुंजतां अंगास झालेल्या ज्यांच्या जखमा अजून साफ बऱ्या झाल्या नाहींत; त्यांनीं आप-मतलबीपणानें कायदे करून लादलेले कर मुकाट्यानें कां भरावे ? उपजत शस्त्राला न पाहिलेल्या लोकांना सरकारचे कायदे भिववूं शकतील; पगारखाऊ फौजेचा डामडौल निशःस्त्र लोकांत शेखी मिरवील आणि सरकारच्या बड्या नांवावर हे लोक बेहिंमती प्रजेला लुटूं शकतील; परंतु हिंमतीनें शस्त्र धरून पुढें सरल्यावर ‘ बालिश बहु बायकांत बडबडला । ’ अशीच स्थिति व्हावयाची. लाखों रुपयांची खराबी करून व हजारों सैनिकांचे बळी देऊनही बंडखोर वठणीला येण्याचें चिन्ह दिसेना. अशा वेळीं गोव्याचे सरसुभेदार फ्रांसिश्क आन्तॉनियु दे व्हिएग काब्राल यांनीं सर्व स्थिति पोर्तुगाल सरकारला कळवून पुढील व्यवस्था कशी ठेवावी याचा विचार घेतला. बंडखोर तर समोरासमोर सामना देईनात; व जिकडे तिकडे दरोडे घालून व आडून गोळ्या घालून ऑफिसर लोकांचे खून पाडीत असल्यानें सुरक्षित राज्य-कारभार चालविणें तर शक्य नाहीं. सेना सज्ज करून जावें तर, समोर कोणी येत नाहीं; पाठलाग करावा तर परमुलुखांत जातात. अशा रीतीनें फार त्रासून व वैतागून शेवटीं कायदा रद्द केल्याशिवाय बंड शांत होण्याचें चिन्ह दिसेना. अधिकाऱ्यांच्या लष्करी फुशारक्या ऐकून खर्चाचें मान वाढत चाललें तेव्हां समेट करण्यांत आला व कायदा रद्द केल्याचें जाहीर करून सर्वांना माफी दिल्याचें अभिवचन दिलें. मात्र राजपद्धति बदलून समानता देण्याची टाळाटाळ पोर्तुगीज लोक करूं लागले. मुख्य अटींतील तें कलम अमलांत आणण्याची टाळाटाळ करून भावी संकटाचें बीज रोवून ठेवण्याची बुद्धी पोर्तुगीजांस होण्याचें कारण एवढेंच कीं, दुसऱ्या लोकांस गुलामगिरींत ठेवून आपण त्यांच्या माथ्यावर सतत नाचावें, गोमांतकाच्या कुरणांत आपलीं गुरें नेहमीं स्वैर सोडतां यावीं व कोणीही आपल्या घांसाच्या आड येऊं नये. अशा इच्छेनें ते वागत म्हणूनच वेळोवेळीं बंडें होत. शेवटीं फसवेगिरीचा मार्ग पत्करून बंडाची शांतता केली !

गोव्यांतील अधिकाऱ्यांना आपल्या जीविताबद्दल इतकी भीति वाटत असली तरी लोकांवर जुलूम करण्याचें व निरपराधी लोकांची संपत्ती हरण

करण्याचें काम बंद ठेवण्याची त्यांना इच्छा होत नव्हती. पेडणें महालांतील कटु अनुभव विसरून जाऊन सांखळी—डिचोलींतील जमीनधारा वाढविण्याची इच्छा व्हावी, हें चिन्ह कशाचें ? अशा रीतीनें कायद्याच्या प्रथमावस्थेंत जो अन्याय अजाणतेपणें अधिकाऱ्यांच्या हातून घडला, त्याचें उच्चाटन होण्याचें बाजूला राहून कायद्याच्या दुसऱ्या अवस्थेंत कायद्याच्या जोरावर त्याला समाजांत उजळ माथ्यानें फिरण्यास फूस मिळाली. पूर्वी नकळत एखाद्या वेळीं चुकूनमाकून जन्मास येणारा व कायद्याच्या जोरावर तेथल्या-तेथेंच चेपला जाणारा अन्याय पुढें उघडपणें जन्मोत्सव करून घेऊं लागला व मनुष्यांच्या डोळ्यांवर धूळ फेंकून त्यांच्या डोक्यावर बसून नाचूं लागला. कायद्याच्या वाढत्या स्तोमाबरोबर अन्यायाची अगर गुन्ह्याची वाढही अशी होत जाते, आणि हेच गुन्हे जेव्हां शिक्षेच्या प्रमाणानें मर्यादित करण्यांत येतात, तेव्हां कायद्याची फार आबाळ होते. ब्राह्मणाचें वर्म काय, तर कापसाचें जानवें; त्याचप्रमाणें कायद्याचें वर्म काय, तर कांहीं तरी शिक्षा, असें लोक ह्मणूं लागतात व मग त्या मानानें कायद्याचें महत्त्व अगदींच कमी होत जातें. एका न्यायाधिशानें एका अपराध्यास थोबाडींत मारल्याच्या गुन्ह्याबद्दल पांच रुपये दंड केला; तेव्हां त्यानें न्यायाधिशाच्या थोबाडींत मारून आणखी पांच रुपये पुढें ठेविले. अशी जी गोष्ट विनोदमहदाख्यायिकांमधून आपल्या वाचण्यांत किंवा ऐकण्यांत येते, तिच्यांतील रहस्य यावरून वाचकांच्या ध्यानीं येईल.

अगदीं प्रथमचे कायदे समाजास एक प्रकारें तारक होतात, परंतु पुढें एकामागून एक होत जाणारे कायदे समाजास जास्त जास्त जाचक अगर मारक होऊं लागतात. कायद्याच्या अगदीं प्राथमिक स्थितींत न्यायी व परोपकारशील सरकार व सात्विक लोक यांचें साम्राज्य असतें, तर कायद्याच्या पुढील एकेक स्थितींत मतलबी व जुलमी सरकार आणि आपल्यापुरतेंच पहाणारे प्रजाजन यांचें साम्राज्य माजतें व देशाच्या सौभाग्यरक्षणाच्या कामीं अवश्य असलेल्या परस्पर सहाय्यकारक अशा सरकार व लोक या दोन संस्था ह्यांत कायद्याच्या वाढीबरोबर दुहीची वाढ होत जाते किंवा रोग आंत राहून बाह्योपचारांनीं जखमेची बाहेरील बाजू जरी बरी झाली तरी दूषित

हवेच्या वेळीं जशी ती जखम कसल्याही निमित्तानें वहावयास लागते; तद्वत् अशुद्ध राज्यपद्धतीच्या योगानें बेजबाबदार माणसांच्या हातांत अधिकारसूत्रें जाऊन कायद्याचा अतिरेक झाला ह्मणजे लोकमताला उकळी फुटून ती बंडाच्या रूपानें पसरल्यावांचून रहात नसते. तशांतून गोव्यासारख्या अति दूरच्या वसाहतींत जाण्यास चांगले बुद्धिमान्, निस्पृह, निःस्वार्थी, उच्च-कुलोत्पन्न मनुष्य क्वचितच तयार होतात. त्यांतूनही वसाहतीच्या प्रधानाकडे अगर अन्य मंत्रिमंडळाकडे थैल्या उघड्या करून ज्यांनीं गुणाधिक्य दाख-विलें, त्यांची प्रथम वर्णी लागावयाची! अर्थात्, उघड्या केलेल्या थैल्या पुनः भरण्याची जबाबदारी बरोबर घेऊन इकडे आलेला इसम कितीही सुवि-चारी किंवा राजकारणविशारद असला तरी त्याचा स्वार्थ त्यास आवरणे शक्य नाहीं. तशांतही जे कोणी इकडे येत, त्यांना येथील परिस्थितीचें यथार्थ आकलन करून घेऊन तदनुरूप वागण्याचें न सुचण्यास अनेक कारणें होत होतीं. तीं अशीं कीं, अधिकारसत्तेवर लुब्ध होऊन अप्सरासमान नव-यौवनसंपन्न तरुणी लेव्हींच्या नाचाच्या मिषानें आपल्या मोहाच्या जाळ्यांत अधिकाऱ्यांस अडकवण्याकरितां अनेक कुटिल कारस्थानें रचीत असत. कांहीं हांजीहांजीखोर तोंडपुजे नराधम या बड्या अधिकाऱ्यांची मर्जी सुप्रसन्न करून घेण्याकरितां हलकट कामगिरी पत्करून अक्षरशत्रूंस विद्वानांच्या कोटींत व विद्वानांस अक्षरशून्य बनवून आपली तुंबडी भरीत असत एवंच 'अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री' याप्रमाणें सल्लामसलतदारांची मंडळी मुंगीस हत्ती व हत्तीस मुंगी बनवून दिशाभूल करीत असत.

इतक्या षड्रिपुखळांच्या तावडींतून सुटणारा प्राणी विरळा. बहुत-करून या लोकांच्या जाळ्यांत सांपडून त्यांच्या हातांतील बाहुलें बनलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बालीश लीलांना गोव्यांतील राजकारणांत केवळ एका सत्तेमुळें ऊत येऊं लागला ह्मणजे बिचाऱ्या परधर्मी प्रजेच्या हालअपे-ष्टांस पारावार रहात नसे. अधिकाऱ्यांच्या लहरीस पसंत होतील ते कायदे व ते घालतील तो कर. मुकाट्यानें कायदे पाळणें व कर ट्रेझरीखात्यांत नेऊन भरणें. हे भरण्याचें आह्मांस त्राण नाहीं अथवा हे अयोग्य आहेत असें ह्मणणाऱ्यांस तुरुंगाची हवा खावी लागत असे. बरें यदाकदाचित्

या अधिकाऱ्यांच्या हाताखालचे महालाधिकारी सुलतानशाही गाजवूं लागले, किंवा प्रतिष्ठित माणसाला मारपीट करूं लागले, ह्मणून त्यांच्या विरुद्ध वरिष्ठांकडे तक्रार केली तर ते गुन्हेगारास तूं अमूक तऱ्हेनें गुन्हां केलास काय, ह्मणून प्रश्न करीत आणि त्याचें उत्तर नटवून सजवून स्वमतसमर्थनार्थ 'नाहीं' ह्मणून आलें-कीं, न्याय मिळविण्याच्या आशेनें केलेला अर्ज केराच्या टोपलींत पडून कूचकामीं होई व ज्याच्या विरुद्ध फिर्याद केली असेल त्याच्या द्वेषास अर्ज करणारा नाहक पात्र होऊन त्याला छल सोसावा लागे. वस्तुतः अपराधी जर आपण केलेले अन्याय आपोआप कबूल करते, तर सत्तेच्या जोरावर प्रजेचा पैसा कराच्या रूपानें गोळा करून न्यायासन स्थापण्याची आमच्या सरकारास जरूर कां भासली असती ? अधिकारी अंमलदारांसाठीं हीं कोर्टें नसून केवळ अर्धदमडीच्या फोलीच्या तुकड्याचा एक रुपया घ्यावा, पावदमडीच्या तिकिटीबद्दल दोन रुपये द्यावे, आणि कोर्टफी भरून भाईभाईनीं झगडावें व हीं अप्रबुद्ध कोंबडीं झुंजविण्यासाठीं वकीलवर्गानें कण्या टाकीत रहावें ! अधिकाऱ्यांचा न्याय या कोर्टांकडून होत नाहीं झालाच, तर अतितोलाच्या बाजूनें पारडें झुकावें हें साहजिक आहे. मात्र दोन्हीं बाजूंनीं प्रजेच्या पैशावर पोसणारीं हीं कोर्टें प्रजेच्या न्यायाच्या वेळीं अंध बनून डोळे झांकून न्यायमनसुभा ज्याठिकाणीं चालविला जातो, त्या ठिकाणीं दंगे, दरोडे, लूट, मारामाऱ्या, खून, गुप्त छापे, जाळपोळ यांचा थैमान चालल्यास मोठेंसें नवल नाहीं, असें न चालणें ह्मणजेच अधिकाऱ्यांची पूर्वपुण्याई समजली पाहिजे. कारण, गोव्यांतील चळवळीला इटालींतील मॅझिनीसारखा, रशियांतील क्युरोपाटकीनसारखा, स्कॉटूलंडांतील बुचनसारखा मार्गदर्शक मिळाला असता तर आज गोव्याच्या राजकारणास निरालेंच स्वरूप प्राप्त झालें असतें; पण गोव्यांतील ही चळवळ ध्येयशून्य होती. जुलूम झाले कीं बंड करावयाचें, माफी दिली कीं बंड थांबवावयाचें. त्यांतल्यात्यांत आपल्यापुरत्या प्रांतिक सवलती मिळाल्या कीं, क्रांतिवाले तात्पुरते तरी थंड पडत.

परकीयांचें बोजड जूं फेंकून देण्याकरितां किंवा जुलुमाची कायमची वासलात लावण्याकरितां त्यांनीं केव्हांच प्रयत्न केले नाहींत. रशियांत अशाच

रीतीनें प्रजेला पिळण्याची ज्यावेळीं स्थिति होती, त्यावेळचें जिवंत चित्र ह्मणजे रशियाच्या प्रधानांपैकीं एम्. डी. प्लेहव्हे यांच्या अंगावर एक कुलपी गोळा फेंकून त्याचा प्राण घेण्यांत आला. एम्. डी. प्लेहव्हे यांच्या राजकीय धोरणापासून फिनलंड, पोलंड वगैरे ठिकाणच्या लोकांना अतिशय त्रास होत असे व या त्रासाबद्दल एम्. डी. प्लेहव्हे यांना हें योग्य प्रायश्चित्त मिळालें. सोशिॲलिष्ट लोकांचें असें मत आहे कीं, अशा रीतीनें लोकांना नाहक छळणाऱ्या माणसांना शासन करण्यांत बिलकूल दोष नाहीं. अशा प्रकारें शासन करणाऱ्यांना ते Murderer ( खून करणारा ) असा शब्दच लावीत नाहींत. Remover ( दूर उचलून टाकणारा हा त्यांचा शब्द आहे व ज्याला ते दूर उचलून टाकतात त्याला ते Removed असें ह्मणतात. ग्रीक आणि रोमन इतिहासावरून असें दिसतें कीं, लोकांवर विनाकारण जुलूम करणाऱ्या माणसांना दूर उचलून ठेवणें हा पुरुषाच्या ठिकाणीं अतिशय मोठा सद्गुण ह्मणून तिकडे मानला जात आहे. ज्यूलियस् सीझर याला दूर करणारे ब्रुटस वगैरे लोक किती योग्यतेचे होते. हें सर्वांना माहीतच आहे. ही दूर करण्याची पद्धत बायबलमध्येंही सिसेरोच्या गोष्टीवरून दिसून येते व तसें करणाऱ्याची बायबलमध्यें स्तुतीच केली आहे. इटालीचा पुरस्कर्ता मॅझिनी याला ही पद्धत अमान्य होती असें नाहीं. माणसें दूर उचलून ठेवण्याचा प्रघात स्कॉट्लंडमध्येंही होता असें दिसतें.

प्रख्यात धर्मसुधारक नॉक्स याचें रिझियो याला दूर करण्याच्या कामीं अंग होतें, असें ह्मणतात व त्या कृत्याचें त्यानें उघडरीतीनें समर्थन केलें आहे. स्कॉटलंडमधील प्रसिद्ध लेखक बुचनन यानें आपल्या एका पुस्तकामध्यें याच ' माणसें उचलून दूर ठेवणाच्या विषयाचें विवेचन केलें आहे. त्यांत बुचननें एका संभाषणामध्यें ओघानें असें आणून दाखविलें आहे कीं, अरण्यांतील क्रूर श्वापदें आपण मारतों; परंतु तीं मारलीं ह्मणजे आपण गुन्हा केला असें कोणीही समजत नाहीं; कारण तीं लोकांना त्रास देणारीं असतात, आणि जर तसाच त्रास एखाद्या जुलमी माणसाकडून लोकांना होऊं लागला तर असलीं जुलमी माणसें व अरण्यांतील क्रूर पशू यांच्यामध्यें काय फरक ? असल्या व्यवस्थेनें समाजव्यवस्थेमध्यें अनर्थ होतील हें बुचननला कबूल आहे.

परंतु त्यावर त्याचें असें ह्मणणें आहे कीं, एकाद्या रोगावर वैद्य जसें एकादें औषध सांगतो, त्याप्रमाणें या रोगावर हें एक औषध आहे. तें औषध एकानें भलत्याच वेळीं दिलें, तर त्याचा दोष वैद्याकडे नाहीं. सारांश, कोणत्याही ठिकाणीं कां असेना अधिकारी आपल्या अधिकाराचें अतिक्रमण करूं लागतात, तेव्हां लोकांचा क्षोभही अनावर होऊन बंडाच्यारूपानें पुढें येतो. शिवाय युरोपीयनांच्या पायगुणांमुळें इकडे जे कांहीं सद्गुण दिसतात, त्याचबरोबर असल्याही दुर्गुणाची सांथ त्यांच्याचमुळें इकडे चमकूं लागली. उदाहरणार्थ, बेर्नार्दीन सील्व्ह या इन्डियन गृहस्थाला बादशहानें गोव्याचे गव्हर्नर नेमल्याबरोबर कित्येक गोऱ्यांना मत्सरवायु होऊन अशांचा सासूपणा आपणांवर नको ह्मणून त्यांनीं Murdering Club स्थापन करून त्याला प्रायश्चित्त दिलें ! बुद्धिवर्चस्व असह्य होऊन रामचात्र घोडेकरांना होडीवर गोळ्या घालून निजवून किंवा अलीकडील गोष्ट ह्मणजे लिबॅरियु पेरैरीवर सैनिक पाठवून जें शिक्षण दिलें त्याच वळणाचा मोबदला प्रो. देन्तीज्ञावर येथील लोकांनीं देऊन ' गुरुसे शिष्य सवाई ' असल्याचें प्रत्ययास आणून दिलें.

युरोपमध्यें जे अनेक दुर्गुण माजले आहेत त्यांतीलच हा एक आहे. सिदॉनियु पाइसचें शरीर पार्लमेंटपुढील धुळींत टाकण्यास कोठले राणे गेले होते ? आफॉंस कॉस्तावर रिव्हॉल्व्हर कुणी झाडलें ? आल्मैदीवर बॉंब कुणी फेंकला ? तात्पर्य, एकाच्या विरुद्ध एक गेल्यानें जीवापहारक गोष्टी जर तिकडे होतात तर आमचें स्वातंत्र्य नष्ट करून आपणांस जनावराप्रमाणें लेखण्यांत येतें तेथें बंडावर बंडें कां होऊं नयेत ? केव्हांही व कोठेंही झालें तरी वाईटापासून वाईटच उत्पन्न व्हावयाचें ! मात्र त्याला संधी, काळ, वेळ पहावी लागत असते. तशी या तिसऱ्या बंडास योग्य संधी मिळण्याचीं कारणें अशीं झालीं कीं, इ० स० १७९९ सालीं फ्रान्सांतील जगद्विख्यात नेपोलिन बादशहानें पोर्तुगाल पादाक्रांत करावें या इच्छेनें त्या राष्ट्रावर हल्ला चढविला. अर्थात् त्याचा प्रतिकार करण्यास पोर्तुगीजांस आपली सर्व शक्ति खर्च करणें भाग पडलें. पोर्तुगाल लढण्यांत गुंतला असतां गोव्यांत चंचुप्रवेश करण्याच्या हेतूनें इंग्लिश लोकांनीं कॅ. स्कुइलर या आपल्या वकिलाचा अपमान व असल्याच कांहीं कुरापती काढून आपल्या फौजेचा तळ गोव्यांतील मुख्य शहर

पणजी येथें आणून ठेविला. ही बातमी सावंतवाडकर यांना समजून त्यांनींही या अलभ्य वेळेचा कांहीं फायदा मिळतो तर पहावा ह्मणून भोंसल्यांचा सरदार शंभू गोविंद देसाई याच्याकरवीं एकदम तेरेखोलच्या कोटावर हल्ला चढवून तो सर केला व पोर्तुगीजांस तेथून पिटाळून लावलें. याप्रमाणें प्रत्येकानें आपापल्यापरी या संधीचा फायदा घ्यावा ह्मणून खटपटी चालविल्या असतां ज्यांना पोर्तुगीजांच्या जुलमांत वागावें लागत असे, त्यांनींही या संधीचा फायदा घ्यावा हें साहजिकच आहे. त्याप्रमाणें सत्तरकर राण्यांनीं कांहीं कारणें पुढें करून बंड सुरू केलें. तीं कारणें अशीं कीं, धार्मिक बाबतींत सरकारनें सर्व धर्म सारखे मानून आपल्या धर्माप्रमाणें इतर धर्मियांनाही मदत करून आमच्याही भटांस पगार द्यावे, पाद्री भटांचे पगार तरी सरकारी तिजोरींतून दिले जाऊं नयेत. भोंसल्यांच्या ताब्यांतील लोकांना शांततेनें वागवावें; कराच्या बाबतींत भोंसल्यांकडून 'मोतर्फा'[1] वसूल करण्यांत येत होता, त्यांत कांहीं वाढ झाली तरी आमची हरकत नाहीं; परंतु 'बाजेदस्त'[2] न वाढवतां केवळ 'इजरा'[3] पद्धतीनें आमच्यांतील एकास प्रमुख धरून वसूल करण्यांत यावा ह्मणजे आमच्या अज्ञानपणामुळें किंवा कामदारांच्या स्वार्थीपणामुळें आमचीं घरें किंवा वतनवाड्या सरकारजमा होणार नाहींत. तरी आमची गरिबी व अशिक्षितपणा दयाळू सरकारनें लक्षांत आणून आह्मांस न्याय द्यावा. अशा अर्थाची अर्जद्वारा विनंति केली होती; परंतु त्या विनंतीस वाटाण्याच्या अक्षता लावून धुडकावल्यामुळें प्रकरण बंडापर्यंत आलें, आणि संधी साधून जकातीचीं नाकीं लुटणें, दरोडे घालून प्रजेकडून पैसा काढणें, पोस्टऑफीसांवर, ट्रेझरीखात्यावर हल्ला चढवून धनसंचय करणें, ऑफीसरांचे खून पाडणें, बराकी जाळणें अशा रीतीनें ते सरकारास भंडावून सोडूं लागले. त्यांकडे शस्त्रें ह्मणजे पाळ, कुऱ्हाडी, कोयते, तलवारी, कांहीं रिव्हॉल्व्हरें व बंदुका; परंतु इतक्यानेंच ते सबळ सरकारास सळो कीं पळो करून सोडीत. मग सरकारनेंही पित्त खवळून बंडवाल्यांना वठणीवर आणण्यासाठीं त्यानें हरतऱ्हा करून पाहिली; पण नखानें तुटणारें काम कुऱ्हाडी लावूनही साध्य होणें मुष्कील होतें.

१ किरकोळ. २ दशम भाग. ३ मक्तेदारीनें.

ज्या सरकारास आपल्या प्रजेस शंभर रुपये सूट देणें दुर्घट वाटत होतें, तेंच सरकार विकारवशतेच्या भरांत हजारों रुपये खर्च करी; पण तेही फुकट जात असत. आपल्या लोकांच्या चुकीचा निर्णय देणें त्यांना मोठें कठीण वाटे. त्यांच्याकडून इभ्रतीच्या भीतीनें कितीही आडदांडपणा दाखविला गेला तर मोठेंसें नवल नाहीं. आपली प्रजा निरुपद्रवी असावी असें ज्या सरकारास वाटत असतें तें सरकार आपल्या लष्करच्या जोरावर दुसऱ्यांच्या उच्च भावना दाबून टाकून आपल्या प्रजेला दास्यांत ठेवून लुटालूट करण्यास केव्हांही धजतें ना! उलट त्यांना लुबाडण्यास मिळावें ह्मणून चांगलें शिक्षण देण्याचें नाहीं, मानवी हक्क दाखवावयाचे नाहींत, सुधारणा करावयाची नाहीं, अज्ञानांत ठेवून लुबाडावयाचें, त्यांच्याकडून आपली सेवा करून घ्यावयाची आणि जर कां ते आपल्या विरुद्ध गेले तर त्यांचे प्राण घेऊन, कत्तल करून उलट मायबाप सरकार ह्मणून शेखी मिरवावयाची. हें या गोऱ्या कातडीच्या लोकांना आकाशांतील बापानें स्वयंप्रेरणेनें आह्मांवर राज्य करावें अशी ज्या हिंमती माणसांची समजूत झाली असेल त्यांनाच पसंत पडेल. युरोपीयनांकरितां युरोप, तसेंच गोमांतकीयांकरितां गोमांतक असें मानणाऱ्या लोकांस जुलमाचें वर्तन कसें पसंत पडावें? त्यांनीं ताकद नसतांही बंडाला प्रवृत्त व्हावें तेव्हांच त्यांची रग जिरून दुराचरणास आळा पडावा. शेवटीं चौफेर आपत्तींच्या वणव्यांत सांपडलेल्या पोर्तुगीजांनीं युरोपांत फ्रेंच व इंग्लिश यांच्याशीं तह करून पणजी शहरावर आलेली इंग्रजांची धाड परतविण्याची व्यवस्था केली आणि राणे लोकांच्या मागण्या शक्य त्या देऊन व झालेल्या अपराधाची त्यांना माफी करून सत्तर प्रांतांत शांतता केली. आणि वाडकरचें प्रकरण समेटास कबूल न झाल्यावरून लिस्बनहून आपलें गोरें लष्कर आणून गोव्याच्या गव्हर्नरांनीं इ० स० १८०२ त जानेवारीच्या ८ तारखेस कूच करून तेरेखोलच्या किल्ल्यावर हल्ला चढविला.

अशा समयीं सुप्रसिद्ध केरकरांचें घराणें शत्रूपक्षास सामील असल्याच्या संशयावरून त्यांच्याही घरास वेढा घातला; पण मजा अशी झाली कीं, बाहेरून सैनिक आरडाओरड करीत आहेत, बंदुकांचे बार काढीत आहेत, अशा स्थितींत गव्हर्नर स्वतः आंत जाऊन पहातात, तों आंतील पुरुष

खुशाल पत्ते खेळत बसलेले पाहून साहेबांस आश्चर्य वाटलें व त्यांच्या धीरोदात्त गुणांचें कौतुक करून त्यांनीं खरी माहिती मिळविली; तेव्हां संशयाची निवृत्ति होऊन मनाचीही निर्वृत्ति झाली व त्यांचेही कांहीं शिपाई पोर्तुगिजांतर्फे भोंसल्याशीं लढूं लागले व इतर बाबतींतही सरकारास त्यांनीं मदत केली. शेवटीं बरीच घासाघीस होऊन तेरेखोल किल्ला पोर्तुगिजांनीं घेतला. या कामीं पोर्तुगिजांचीही बरीच नुकसानी झाली. तरी पण दम न सोडतां, रेडियेच्या कोटावर ते चाल करून गेले. पण तेथील बंदोबस्त ठीक असल्यामुळें पोर्तुगीजांकडून होणाऱ्या हल्ल्यास ते मुळींच जुमानीत नव्हते. जितक्या जोमानें हल्ला केला जाई तितक्याच किंबहुना कांहीं जास्त जोरानें तो परतविला जाई. अशा रीतीनें एकवीस दिवसपर्यंत उभयतांची झुंज चालली असतां पोर्तुगिज कमजोर झाले. तशांतून सावंतास आणखी मदत येत आहे असें ऐकून तर त्यांचा दम सुटला आणि आंतील व बाहेरील माऱ्याच्या मध्यंतरीं सांपडून नामशेष होऊं या भीतीनें वेढा उठवून माघार घेतली. सर्व जगाचा पुरा परिचय होऊन अनुभव आला आणि सोळाव्या शतकांत चालविलेले क्रूरतेचे चाळे दिवसेंदिवस पचणार नाहींत ह्मणून वेळाकाळानें जो गोमांतक आपल्या घरांत पडला आहे त्यांतील प्रजेचा अभ्युदय करण्यांत उभयतांच्या कल्याणाचा मार्ग आहे.

" प्रजा ही राज्यकर्त्याहून परकी नसते, प्रजेचें हित तेंच राज्यकर्त्याचें हित आहे, अशी भावना निदान कासाविस होऊन स्थापन केलेल्या शांततेच्या वेळीं तरी पोर्तुगिजांना होऊन वर्णभेद–धर्मभेदादिजनित उच्चनीच भाव काढून टाकणारा एकादा तरी कायदा करून ठेविला काय? नाहीं, मुळींच नाहीं. इतकी सुबुद्धि आमच्या सरकारास झाली नाहीं; ह्मणून तर पुनः पुनः हीं माणसें अघोर मार्गाचें अवलंबन करीत असत. एकाद्या ऐतोबासारखी चैन चालविण्याकरितां प्रजेचा रक्तशोष करणाऱ्या अधिकाऱ्यांचे खून पाडले गेले तर वरील विवेचनावरून कर्तव्याला कोण चुकला असें मानावयाचें? आपल्या बापजाद्यांची वारसदारी नसतां किंवा मिरास नसतां गोमांतकावर तोफा डागण्याचा विचार ज्या सरकारकडून झाला, त्या पोर्तुगिज सरकारचा कित्ता अभिमानपूर्वक गिरविणारे प्रजाजन आततायी झाले तर तें बरोबर झालें नाहीं

असें कसें ह्मणतां येईल ? आपल्या लोकांच्या तुंबड्या भरण्याकरितां विजातीय प्रजेला पिळून काढणाऱ्या लोकांना प्रायश्चित्त मिळणें रास्त आहे, असा विचार करून कांहीं सत्यप्रिय लोकांनीं अघोर मार्ग स्वीकारला. त्यांत गैर-वाजवी असें काय आहे ? यथा राजा तथा प्रजा होऊं नये काय ?

प्रकरण तिसरें.

## सवतीमत्सराचा वायगोळा.

एकांतविध्वंसिषु मद्विधाना, पिण्डेष्वनास्था खलु भौतिकेषु ॥
—कालिदास, ( रघुवंश, सर्ग २ रा. )

आपला दर्जा आहे त्यांत कमी व्हावा, अशी इच्छा जगांतील कोण-त्याही स्वाभिमानी पुरुषाला सुषुप्तींतसुद्धां होणार नाहीं, तर मग उपजत मानी रक्तानें ताठलेल्या रजपूतवंशीय राणे लोकांना सत्तेच्या जोरावर गोव्यांतील पोर्तुगीज अधिकारी मग्रूरपणें मालकालाच यःकश्चित् समजून घडीघडी पाणउतारा करूं लागले, त्यांच्या जहागिरींत आपला अधिकार गाजवूं लागले, आणि कायदे करून त्यांच्या माना वाकवूं लागले, तर त्या लोकांनीं आपला क्रोध कोणत्या मार्गानें व्यक्त करावा ? त्यांनीं आपलें क्षात्रतेज कोणत्या ठिकाणीं प्रगट करावें ? आणि त्यांनीं आपली विटंबना कितपत करून घ्यावी ? अशा मनुष्यांना आपल्या धनदौलतीची किंवा जीविताची पर्वा वाटत नाहीं; पण मानभंगानें त्यांचें अंग रात्रंदिवस जळत असतें, ह्मणून या लोकांना विनाकारण चिडवून बंडखोर बनविण्यापेक्षां शांतताप्रिय राहण्यासाठीं दयाळू सरकारनें या लोकांवर शांत व सुविचारी अशा अंमलदारांची योजना केली पाहिजे होती. ती काळजी न घेतां व त्यांच्या दादफिर्यादीचा विचार सहानुभूतीपूर्वक न करतां सरकार आपल्या उर्मट, हेकेखोर नोकरांना डोक्यावर घेऊन नाचत होतें. त्याचा परिणाम बंडाच्या रूपानें मध्यम रयतेस बाधक होऊन राण्यांचा बडगा आणि सरका-रचा सोडगा खाऊन तिला कंगालांतील कंगाल बनावें लागे; कारण हे महालाधिकारी ( Administradores do concelho ) आपल्या हातांतील

तुटपुंज्या सत्तेच्या जोरावर अंध बनून किंवा नसत्या अभिमानाच्या भरीस पडून राणे लोकांना जेव्हां जेव्हां अनेक तऱ्हेनें चिडवीत असत, तेव्हां तेव्हां पूर्वाभिमानाची ज्योत जागृत होऊन त्यांच्याकडून बंडाच्या रूपानें वणवा पेटविला जात होता. केव्हांही झालें तरी पेरल्याशिवाय उगवत नाहीं; अर्थात् उगवलेलें दिसतें, तितकें पेरलेलें असलें पाहिजे. मग त्या कार्याचा कर्ता अनियंत्रित सत्ता चालविणारा आद्‌मिनिस्त्रादोर असो, किंवा डायरशाही गाजविणारा लष्करी कॅप्टन असो, अगर अहंमन्य सार्जंट अथवा यःकश्चित् पोलीस शिपाई असो. सत्तर प्रांतीं आजपर्यंत जीं बंडें झालीं आहेत, तीं देखील वरील न्यायानें आपोआप प्रादुर्भूत झालेलीं नसून, कोणा तरी कर्त्याच्या परिश्रमाचें तें फळ असलें पाहिजे हें निःसंशय आहे.

चांगल्या कार्याचें कर्तृत्व योग्यायोग्य पुराव्यांनीं आपणांकडे ओढून घेऊन वाईट कार्याचें कर्तृत्व कोणाच्या तरी गळ्यांत बांधून आपण मोकळें व्हावें आणि हें एकादे वेळीं जमेनासें झालें तर तें कार्य बिनवारशी ठेवावें; पण एकजात त्याचा संबंध आपणाशीं ह्मणून लागून घेऊं नये अशी अधिकाऱ्यांची व्यावहारिक वहिवाट असते. वस्तुतः सरकारनें हा सवतीमत्सराचा वायगोळा प्रांताधिकारी, महालाधिकारी किंवा एकादा कनिष्ठ नोकर यांच्याच पोटांत कां उठतो व राणे लोकच या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत कां सलूं लागतात? शिवाय असला मत्सराग्नी धुमसत ठेवल्यानें ' मेरा बी भंजन आणि तेरा बी निसंतन ' कसें होऊं शकतें, इत्यादि गोष्टींचा बारकाईनें विचार करून तदनुरूप कायद्याचें धोरण ठेवून दुहीचें समूळ उच्चाटन केलें पाहिजे होतें. तें न करतां जर काय केलें असेल, तर क्षयरोग जसा प्रथम प्रथम कित्येक दिवसपर्यंत मुळींच दिसत नाहीं, त्याप्रमाणें आपल्या प्रांतास लागलेली ही मत्सररूपी दुहीची कीड कित्येक दिवसपर्यंत अधिकाऱ्यांच्या ध्यानांत न येतां राहिली व पुढें त्याचें स्वरूप बदलून रोग एक व औषध निराळें होऊन त्याचा भलताच परिणाम शांततेनें राहणाऱ्या जनतेला व अदूरदर्शी सरकारला भोगावयाला लावला, ह्मणून सरकारनें कायदे करावे व लोकांनीं ते शिरसावंद्य मानावे—कारण सरकार करील तें लोकांच्या हिताचेंच करील—ही जी पूर्वापार समजूत अगर नियम तिला अनुसरून प्रथम कित्येक दिवसपर्यंत

विकल्प येत नाहीं. सरकार कायदे करीत असतें व लोक हे सरकारी कायदे ह्मणून त्यांस मान देत असतात; परंतु याच कायद्यांचा ताळमेळ नाहींसा होऊन ते लोकांना जाचक होऊं लागले कीं, मग ते कायद्याची मूळपीठिका शोधूं लागतात. कोणी हे कायदे ईश्वरी इच्छेच्या विरुद्ध आहेत किंवा अनुकूल आहेत, याचें परीक्षण करून त्यांतील रहस्य लोकांस सांगतात, तर कोणीं सरकार व लोक यांच्या संरक्षणासाठीं योजण्यांत आलेली ही कायद्याची समशेर एकट्या सरकारपक्षाच्याच हातांत कशी संपविली गेली याचा विचार करूं लागतात.

जोंपर्यंत सरकार आईसारखें निरपेक्ष असतें व प्रजा हेंच सर्वस्व मानीत असतें, तोंपर्यंत प्रजेनेंही आपलें सर्वस्व ' ना विष्णुः पृथिवीपतिः । ' या न्यायानें सरकारच्या चरणीं अर्पण करणें योग्य असतें; पण सरकार जर केवळ आपल्यापुरतें पाहूं लागलें, तर प्रजेसही आपल्यापुरतें कांहीं पहावयास नको काय ? लोकांस असें वाटतें व ते ह्मणतात कीं, सरकार व लोक या उभयतांच्या संरक्षणासाठीं योजलेल्या कायद्याचा सरकार जर आपल्याच संरक्षणासाठीं उपयोग करून घेऊं लागलें तर सरकार ज्या ज्या वेळीं आतां कायद्याची रचना करील त्या त्या वेळीं त्या कायद्यांत आमचें संरक्षण आहे कीं नाहीं हें आह्मांस पहावयास नको काय ? कारण, Laws are strictly speaking, only the conditions of Civil association. The people which submit to the laws, ought to be their author. या बोसॅंकेट नामक एका आंग्ल तत्त्ववेत्त्याच्या ह्मणण्याप्रमाणें पाहिलें तर कायदा हा प्रजेसाठीं असतो; सरकारसाठीं त्याचें अस्तित्त्व नसतें.

उदाहरणार्थ, लोकांचा कारभार लोकांकडून हांकला जाणें हें लोकसत्तात्मक पद्धतीचें मूलबीज आहे. या कारभारांतील कायदे करण्याची विधायक सत्ता ( Poder legislativo ) ही जरी लोकप्रतिनिधींच्या पार्लमेंटकडून बजावली जात आहे, तरीसुद्धां निर्दोष कायद्यांची निपज होऊं नये हें देशाचें दुर्भाग्य नव्हे काय ? कारण लेखकाला आलेला अनुभव सदोषता सिद्ध करीत आहे. " आह्मीं घर बांधण्याच्या वेळीं कायद्याबरहुकूम सगळे विधि उरकून प्लॅन व लायसन्स पब्लिकवर्क्स खात्याच्या हेळसांडीमळें

ठराविक मुदतीत येण्यास विलंब लागला ह्मणून कायद्यांत न संभवणारी गोष्ट ह्मणजे घराचा नुसता पाया खोदणें एवढीच आह्मीं पत्करली व तीही कोन्स्त्रुसांव ( Construecao ) या सदरांत येत नाहीं ह्मणून; परंतु कायद्याची अंमलबजावणी तडफदारीनें व्हावी एतदर्थ आद्मिनिस्त्रांवचे व मुनिसिपल् असे कांहीं अधिकार नवीन कायद्यान्वयें लष्करी लोकांकडे देऊन पोलीसी अंमल सुरू केल्यानें आह्मांस पोलीसच्या लोकांनीं दहा रुपये दंड केला. हा दंड सकारण आह्मांस योग्य नाहीं असें त्यावेळीं आह्मीं अधिकाऱ्यांस सांगितलें. कारण त्यावेळीं आह्मीं कोणत्याच तऱ्हेची घडवणूक केली नव्हती याबद्दल साक्षीपुरावा देण्यासही आह्मी तयार होतों; परंतु तें कांहींही न ऐकतां आपण केलें तेंच बरोबर आहे असें त्यांचें मत पडलें. ज्यांचा अंमल हे पोलीस आपणांकडे चालवितात त्या म्युनिसिपालिटीकडे व महालाधिकाऱ्यांकडे तक्रारी अर्ज करून पाहिला; पण व्यर्थ. शेवटीं न्यायकचेरीकडे न्यायाच्या आशेनें धांव घेतली असती; पण कोर्टफी, वकील, स्टँपकागद, स्टँप वगैरेकरितां पन्नास साठ रुपये खर्च करून समजा, कोर्टाचा निकाल आमच्यासारखा झाला तरी दंड करणाऱ्या अधिकाऱ्यास शासन काय? कांहींएक नाहीं. मग पन्नास साठ रुपये खर्च करून दहा रुपये बचाव करण्यापेक्षां पन्नास रुपये वांचविणें अधिक श्रेयस्कर नव्हे काय?" सरकारनें स्वतः अमुक रीतीनें वागलें पाहिजे ह्मणून सरकार कायदे करीत नाहीं, तर आपण आपल्या प्रजाजनांस कसें वागविलें पाहिजे याचा विचार सरकार कायद्यामध्यें करीत असतें. कायद्याची स्वतंत्रता व शोभा कोठपर्यंत? तर जोंपर्यंत त्याची उभारणी निरपेक्षतेच्या पायावर होत असेल तोंपर्यंत. तिच्या अभावीं सापेक्षता आली कीं, कायदा परतंत्र होतो व मग त्यास एकप्रकारें करारांचें स्वरूप येतें.

कायदा हा लोकसंमत असला तरच त्याला कायदा हें अन्वर्थक नांव देतां येईल; आणि असें जोपर्यंत झालें नाहीं, तोंपर्यंत त्यास कायद्याचें स्वरूपही देतां येणार नाहीं. अशाच तऱ्हेचें मत सि. कुऱ्हेय आफोंस यांनीं मडगांव येथील म्युनिसिपल वाड्यांत जमीनधारा ( Contribui cao Pridial ) वाढविण्याच्या वेळीं, ह्मणजे सन १९१२ तील १४ नवंबर रोजीं प्रतिपादन केलें होतें; पण भाषण करणारेही पोर्तुगिजांचेच शिष्य असल्यामुळें,

तेवढ्या वेळेपुरतीच त्या भाषणाची किंमत. नाटकांतील राजाचें वैभव जसें व्यवहारांत निरुपयोगी असतें, तसेंच दरील वक्त्याचें भाषण प्रसंगीं निरुपयोगी होऊन प्रजेच्या उपहासास कारण झालें. तें असें कीं, याच राजेश्रींना प्रजेनें आपले प्रतिनिधी ह्मणून जेव्हां कौन्सिलांत पाठविलें तेव्हां करवाढीचे कायदे करून व प्रजेला डुकराची उपमा देण्यास व स्वतःस सरकारच्या सोनेरी बेडींत अडकवून घेऊन भरपूर स्वार्थ साधण्यास यांनी कमी केलें नाहीं.

राणे लोक झालेला अपमान मुकाट्यानें सहन करण्यास राजी नसल्यानें मनाजोगता न्याय न मिळाला तर ते शस्त्र घेऊन अधिकाऱ्यांवर धांवण्यास व शस्त्रानें न्याय मिळविण्यास मागें पुढें पहात नसत. व याचसाठीं त्या वर्गावर नोकरशाहीचा डोळा होता. ते फिरून सरकारी कचेरींत न्याय मागावयाला आले कीं, गर्वानें फुगलेले नोकरलोक त्यांच्याकडे तुच्छतेनें पहात, आणि त्यांनीं बंड सुरू केलें कीं, भीतीनें अंग दडवीत. असें जरी असलें तरी लांचलुचपतीस व स्वार्थास सोकावल्यावर त्यांचे सुद्धां रास्त व न्याय्य हक्क पायाखालीं तुडवून आपल्या सामर्थ्याचा टेंभा मिरविण्यास धजत असत. येणेंकरून खालच्या अधिकाऱ्यांपासून सुटलेलें मत्सराचें तीव्र वारें सर्वांच्याच मस्तकांभोंवतीं घिरट्या घालूं लागतें. याकारणानें ज्या वस्तूचा उपयोग चांगल्या कामाकडे करतां येणार होता त्याच गोष्टीचा उपयोग वाईट कामाकडे करून घेणें, ह्मणजे ती गोष्ट योजकाच्या बुद्धीवर अवलंबून असते, असेंच ह्मणावें लागतें. उदाहरणार्थ, इंग्लिश लोकांनीं पंजाबी, जाट, रजपूत, नेपाळी या नैसर्गिक शौर्यसंपन्न लोकांना आपलेसें करून लष्करांत घेतल्याकारणानें त्यांच्या राष्ट्रास आतिशय बळकटी येऊन बंडाचाही कांटा उपटून काढल्यासारखें झालें आहे. त्याचप्रमाणें, जर आमच्या गोवासरकारनें राणे लोकांची पलटण बनवून पणजीला ठेवली असती, तर बंडें उद्भवलींच नसतीं, पण ही गोष्ट सरकारला सांगावी कोणीं? सदुपयोग केला असतां जें अन्न मनुष्याला तारक होतें, तेंच जर दुरुपयोगानें वापरलें तर मारकही होऊं शकतें. ह्मणून त्याचा भार उपयोग करणाऱ्यावर अवलंबून असतो. मात्र इतकें खरें कीं, आमच्या गोवासरकारास अनुभवानें कळून चुकलें असतां त्या लोकांना शिक्षण देणें नाहीं, त्यांना आपल्या तल्लग्रांत

ठेवणें नाहीं. पुनः पुनः खाजवून खरूज उत्पन्न करण्यांत काय हंशील आहे, हें त्यांचें त्यांनाच माहीत. पण आपलें गाडगें फायद्यावांचून रस्त्यावर फोडण्यास ही लष्करशाही कशी तयार होते! कांहींची हिंदूलोकांची स्वातंत्र्याची रग जिरवून टाकण्याची इच्छा, कोणाची लांच खाऊन न्यायाची अदलाबदल करण्याची आकांक्षा तर कित्येकांना गढूळ पाण्यांतच मासे पकडण्याची हांव मिळून कोणत्या ना कोणत्या हेतूनें नोकरशाही दडपशाहीचा नंगानाच घाली व नामर्दलोक हालअपेष्टा सोसून उगी रहात; पण ज्यांचा जन्मस्वभाव दिलीपानें वर्णन केलेल्या अवतरणांतील संस्कृत वाक्यांत उद्धृत केल्याप्रमाणें, ह्मणजे ज्या लोकांनी आपल्या आयुष्याचें एक उद्दिष्ट एकदां ठाम ठरवून त्याच्या सुकाणूप्रमाणें वागण्याचा निर्धार करून तो कसल्याही आपत्तींतून पार पाडणें हें वीराचें लक्षण आहे.

या उक्तीनुसार ते विरोधच करून प्रसंगोपात् चाहील तें करूं शकतात. हें अनेकदां दृष्टोत्पत्तीस आल्यावरसुद्धां फिरून फिरून त्यांच्या वतनवाडीवर नजर ठेवून लुबाडूं पाहणाऱ्या कामगारांना मुभा देणें ह्मणजे बंडाला आव्हानच करणें नव्हे काय ? कारण इंव्हेन्तार्य, कोन्त्रिबुइसांव दु रेजिस्तु प्रेदियाल् इत्यादि कायद्यांनीं त्यांचीं घरेंदारें, वतनवाड्या वगैरे त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन लिलावांत पैशापासरी फुंकतांना या नोकर लोकांच्या मनाचा न्याय सरकारानें पाहिला होता काय ? द्रौपदीचीं लुगडीं भांडारांत भरण्यास आज्ञा करतांना धृतराष्ट्रास जितका हर्ष वाटला, तितकाच हर्ष आमच्या सरकारास हे नोकर आठशें--हजार रुपयांचें ठिकाण सव्वा रुपयासाठीं हे कायदे लिलांवावर काढण्यास धजत, तेव्हां वाटत होता; परंतु तुझे आज दहा पुत्र मेले, उद्या पंधरा गेले, असें ऐकिलें कीं, धृतराष्ट्रास फार वाईट वाटत असे. तसेंच आमच्या सरकारासही आज राण्यांनीं अमूक अमूक खून केले, अमूक ऑफिसें लुटलीं व अमूक बराकी जाळल्या ह्मणून ऐकिल्याबरोबर वाटत होतें; पण असले बंडाचे सोहळे अनुभवण्याचें प्रजेच्या नशिबीं कां येत आहे याचा विचार करून एकाही गव्हर्नरानें सरळ व समतेचे कायदे करण्याचें मनावर घेतलें नाहीं. उलट विश्वासघातकी, अप्रामाणिक, कपटी, देशद्रोही, बंडखोर अशा शेलक्या शब्दांनीं त्यांची पूजा

केली आहे; पण हे उन्मत्त विचाराचे अधिकारी कांहीं रानटी भुरट्यांनीं शस्त्रें उगारल्याबरोबर पळूं लागत. याचें प्रत्यंतर प्रत्येक बंडांत आपल्या प्रबळ पोर्तुगीज राष्ट्रानें निर्बल बंडवाल्यांस माफी देऊन जाहीर केलें आहे. असें होण्याचें कारण दिलीप रघुवंशांत असें दाखवितो कीं, आयुष्य क्षणभंगुर आहे, ही गोष्ट वीरांच्या मनावर ठसली असल्यानें या पंचभौतिक पिंडाची प्रतिष्ठा ते मानीत नाहींत; कारण केव्हां तरी ज्या पिंडाची चिमूटभर राख होणार त्या पिंडाविषयीं वीरांची अनास्था असते व म्हणूनच त्यांना मरणाची भीति वाटत नाहीं. देहाच्या अस्थिरतेविषयीं नित्य जागृति असल्यामुळें आपल्या जीविताची अमुकच एक इतिकर्तव्यता आहे असें एकदां मुक्रर ठरवून शूर लोक आपला पिंड त्या इतिकर्तव्यासाठीं वाहतो. त्याच्या बुद्धीला चंचलता होत नाहीं. जे गुण एकाद्या वस्तूमध्यें नैसर्गिकरीत्या संभवलेले असतात त्यांची कितीही कसून पारख केली, तरी प्रत्येक वस्तूंतील विशिष्ट गुण अनुभवास आल्यावांचून रहाणार नाहीं. उदाहरणार्थ, कावळ्याचा काळेपणा, हंसाचा पांढरेपणा, नागाचा दीर्घद्वेषीपणा किंवा पोपटाचा बेइमानीपणा यांशी कितीं-दाही घर्षण करीत बसल्यानें मूळ गुण बदलणें शक्य नाहीं. कोळसा एकदां उगाळला तरी काळें आणि शंभरदां उगाळला तरी काळेंच पाणी निघणार. तद्वत् निश्चयी किंवा यशसंरक्षक मनुष्यावर संकटांमागून संकटें कोसळलीं तरी ते आपल्या उपजत गुणापासून केव्हांही परावृत्त होणार नाहींत.

ही गोष्ट आमच्या पोर्तुगीज सरकारच्या लक्षांत आली असती, तर प्रजेच्या अविश्वासास पात्र झालेल्या न्यायकचेरींतील बेबंदशाही बंद करून व न्यायदेवतेचें तोंड उजळ करून त्यानें प्रजेस विश्वासांत घेतलें असतें. आणि आपत्तीचा उगमही बंद केला असता. ज्या राज्यांत प्रजेनें न्याय शोधण्यासाठीं न्यायकचेरीकडे धांवत जावें तिथेंच जर अन्याय होऊं लागला, तिथूनच जर चार आण्याच्या पैशासाठीं हजार आठशांच्या वतनवाडीचा रुपया सव्वा रुपयाला लिलांव पुकारूं लागले, आणि येथीलच बेलीफ आठ आठ कोसांवरील समन्सें मालकास नकळत घरीं बसून लिहूं लागले, तर अशि-क्षित लोकांनीं करावें तरी काय? सुशिक्षित म्हणविणारे वकील लोक कायद्याचा आधार घेऊन अजाण माणसांचीं ठिकाणें इंग्जुल बिवोलेंतच्या

आधारें दोन साक्षीदार काढून पैशांचून स्वाहा करूं लागले, तर या अडाणी लोकांचे निराशेचे टाहो पोर्तुगालांतील कायदेपंडितांना ऐकूं तरी येतात काय ? नाहीं, खचीत नाहीं. गरीबांच्या रोदनाचे स्वर त्यांना ऐकूं आले असते, तर त्यांनीं कायद्याचें चोपडें बदलून न्यायाची इभ्रत वाढविली असती. आकस्मिक इंस्पेक्सावें करून प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐकिलीं असतीं, आणि लांचखाऊ नोकरांना कडक शासनें करून खोटेपणावर वचक ठेवला असता. तसें न झाल्यानें पोर्तुगालांत फक्त बंडाचेच रौद्रस्वर ऐकूं यावे व तेही राणेलोकांचेच. याचें कारण काय ? तर तें हेंच कीं, राणेलोकांवांचून इतर प्रजा मेषपात्र बनून गारुड्याच्या सापाप्रमाणें दंतमग्न झाली आहे. धिटाईनें उत्तर देण्याइतकेंही त्राण न राहण्याइतका नोकरशाहीचा वचक तिच्या अंगांत भिनला आहे. आणि राणे लोकांत स्वाभिमानापुढें मागचा पुढचा विचार करण्याला अवसर नसल्याकारणानें कोणत्याही अघोर कर्मास ते लगेच तयार होतात. एका अर्थानें हा त्यांचा अविचार मार्गेपुढें त्यांना नडतो, तर दुसऱ्या अर्थानें त्यांच्यांतलि तापट रक्ताचा जातीस्वभाव दाखवितो. अशा स्वभावाशीं सरळ न्याय देण्यासाठीं सरकारी नोकरांनीं अथवा अधिकाऱ्यांनीं दक्षता ठेवावयास पाहिजे होती. ती तर गोष्ट बाजूलाच राहून या लोकांच्या ठिकाणीं असलेल्या भाषेच्या व कायद्याच्या अज्ञानाचा फायदा कज्जेदलालांपासून पाटील-कुळकर्णी-महालाधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकजण आपापल्यापरी घेण्याची इच्छा करीत होते. अर्थात् कोणत्या ना कोणत्या कामदारापासून दुःख पावलेल्या या लोकांचा संघ विशेषेंकरून वचपा घेण्याच्या हेतूनें जरी बंडांत सामील होत होता, तरी बाकी सर्व वर्गाकडून त्या बंडाला मदत होत नव्हती असें नाहीं. प्रत्येक बंडांत ख्रिस्ती, मुसलमान, हिंदू सामील होत; मात्र अध्यक्षपदाचा मान राण्यांचाच असे. म्हणून पुढील उपपद तरी राणा असेंच लागत आलेलें आहे. यावरून गोव्यांत बंड झालें कीं, जिकडे तिकडे राण्यांचें नांव पसरावें हें साहजिकच होय ! कां कीं, राण्यांनीं सूत उवाच केल्यावांचून एकाही ख्रिस्त्याला किंवा मुसलमानाला सरकारी नोकराची रग जिरविण्याची धमक आलेली नाहीं. पाद्र्यांनीं एक वेळ बंड केलें, परंतु ख्रिस्तीधर्माशिवाय त्यांत दुसरा धर्म सामील झाला नव्हता, आणि

ब्राह्मण देसायांनीं दोन तीन बंडें केलीं पण अधिकाऱ्यांची रग जिरविण्याची ताकद पुढें त्यांच्यांत कायम न राहिल्यामुळें ह्मणा, अगर सरकारच्या सेवेंत बद्ध झाल्यामुळें ह्मणा, मानभंगाची चीड त्यांच्यांत राहिली नाहीं, आणि सत्तरकरांच्या अज्ञानपणामुळें पोर्तुगीज कायदे त्यांच्या वतनवाडीचे आणि धनदौलतीचे लचके तोडूं लागले ह्मणून अखेरपर्यंत सरकाराबरोबर झगडणें त्यांना भाग पडलें व कायद्याचें रूप आहे तसेंच कायम राहिल्यास पुढेंही बंड होणार नाहीं कशावरून ? ज्या कायद्यानें अज्ञान मुलाची इस्टेट सरकार रखवाली करीत आहे तोच कायदा जर त्या मुलाला अखेर भिक्षांदेही करावयाला लावतो, तर कायद्याला रक्षक ह्मणावें कीं भक्षक ह्मणावें ? सारांश, बिन अनुभवाचे आमच्या सरकारचे कायदे डोळसांना अंध कसे बनवतात, आणि शांतताप्रिय लोकांना बंडखोर बनण्यास कसे लावतात, हें समजून घेण्यासाठीं मागील इतिहासाकडे वळूं.

इ० स० १८०८ त सप्टेंबरच्या पहिल्या तारखेला जें बंड झालें, तें सुरू होण्यास अशीं कारणें झालीं कीं, वीस हजार वस्तीचा सत्तर प्रांत एका आद्‌मिनिस्त्रादोराच्या लहरीवर असून प्रत्येक खेड्यांत आद्‌मिनिस्त्रादोरानें नेमलेले पाटील यांच्यामार्फत होणारी जी राजव्यवस्था तिचें निरीक्षण स्वतः आद्‌मिनिस्त्रादोरानें पांच दिवस तरी तेथें राहून केलें असेल असें कांहीं वाटत नाहीं. सांखळी येथील स्वतःच्या वाड्यांत राहून क्लार्क सुचवितील त्याप्रमाणें पाटलांकडून सबंध प्रांताचीं भलीं किंवा बुरीं राजकीय कामें व्हावयाचीं. अर्थात् हे पाटील येथील नबाबजादे बनून ‘ हमकरे सो कायदा ’ या न्याया-प्रमाणें वागत असत. अशिक्षित व अडाणी प्रजेला आपण नेमलेले पाटील–फौजदार कितपत न्याय देतात याची धास्ती महाल अधिकाऱ्यांसही थोडीच. हाताखालचे नोकर जी माहिती देतील तिच्यावर भार ठेवून निकाल देणें व निकालाविरुद्ध गेल्यास त्यांना नाहक छळणें व शेवटीं प्रांताधिकाऱ्यांस सामील करून घेऊन कायद्याच्या नांवावर वाटेल तसा धिंगाणा घालणें, हींच से आपलीं प्रजापालनाचीं कर्तव्यें समजत असत. त्यामुळें पोर्तुगीज भाषेचा गंधही नसलेल्या सत्तरींतील लोकांना रेजिदोरावर किंवा आद्‌मिनिस्त्रादोरावर फिर्याद करून न्याय मिळविणें मोठें मुष्कील होतें, ह्मणून सत्तरीचे लोक

रेजिदोर किंवा आदमिनिस्त्रादोर यांनाच आपले धनी समजून मोठ्या आदबीनें वागत असत, आणि पाटील-फौजदारहि त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन आपला स्वार्थ साधीत होते. तो असा कीं, उपरोक्त तारखेच्या दिवशीं गांवठणच्या राण्यांच्या घराण्यांत अमृतराव नांवाचा पुरुष आकस्मिकरीत्या वारला, तेव्हां सर्व मंडळी दुःखदस्थितींत असतां एका शेजाऱ्यानें प्रेतदहना-करितां शिरस्त्याप्रमाणें चावडीवर पाटीलसाहेबांना सांगितलें व परवानगी मागितली. पाटलाच्या मनांत त्या घराण्यासंबंधीं पूर्ववैर असल्यानें त्याला चिरडण्याचें होतें ह्मणून तोंडींच अनुमती देऊन नंतर कांहीं दिवसांनीं तूं कायद्याविरुद्ध वागलास, तेव्हां अमुक रुपये दंड भरशील, तरच गुपचूप थोडक्यांत सुटशील, नपेक्षां कोर्टाकडून भारी दंडाला पात्र होशील असें सांगूं लागला. ही त्याची गोष्ट राण्यानें न ऐकिल्याकारणानें ती पाटलानें मामलेदार कचे-रींत पदरच्या कांहीं गोष्टी घालून कळविली; मामलेदार साहेबानें लेखी पुरावा मागितला; व तो नसल्याकारणानें सरकारी माणसावर खोटा आरोप घातल्याबद्दल राण्याचा उपहास करून, त्यावर खटला भरून चालविण्यास जज्ज कचेरींत कळविलें. मूषकालाही मिळण्यासाठीं आ पसरून बसलेल्या जज्ज कचेरींतील नोकरांनीं आपले श्रम वाया जाणार नाहींत अशी अटकळ बांधून खटल्याचें कांम आठ दिवसांचें आठ महिने चालाविलें व अखेर खटला त्याच्या अंगावर घातला, आणि खटल्याच्या कामीं गोळा झालेली रक्कम अमुक मुदतींत भरावी अशी त्याला नोटीस दिली. रकमेची भरपाई मुदतींत न झाल्याकारणानें त्याची वतनवाडी लिलावांत काढून कोर्टाची भरपाई तर करून घेतलीच व वरती आणखी तो कोर्टाच्या हुकुमाच्यावेळीं हजर न झाल्या-बद्दल त्यावर खटला करून पकडून आणण्यासाठीं वॉरंट निघालें. अशा समयीं कृष्णराव अप्पासाहेब राणे यांना काय वाटलें असेल ? एक तर विनाकारण गहजब उडून पोटगीचें साधन लिलांवावर पडून वायु भक्षण करण्याची वेळ; दुसरें, मोकळें फिरून पोट भरण्याची मारामार. अशावेळीं कुटुंबासह परमुलुखांत जाऊन दुसऱ्याची नोकरी करून पोट जाळण्यापेक्षां ज्याच्यामुळें देशोधडीस लागण्याचा प्रसंग आला त्याचा सूड घेऊन सत्तांध सरकारला त्रास देतां देतां मरण आलें तर फार चांगलें, असें वाटूं लागणें

सहजिक नव्हे काय ? व या इच्छेप्रमाणें त्यांनीं कांहीं साथीदारही तयार केले आणि कल्पनेप्रमाणें बंडाचीं साधनें जमवून प्रथम आपल्या शत्रूचा सूड घेतला, ह्मणजे पाटलास ठार करून त्याचे जे जे पाठीराखे होते, त्यांना आव्हान करून बंडाला सुरवात केली मग काय ? जिकडून तिकडून बाजार-बुणग्या लुटारूंची पोळीं पिकून जो तो श्रीमंत होण्याच्या आशेनें बंडवाला बनूं लागला. येणेंकरून अराजक लोकांचें प्रस्थ वाढून रयत लोकांना भारीच त्रास होऊं लागला. नवीन काबिजादींत तर सर्वत्र भीतीची छाया पसरून जो तो आपला पैसाअडका, दागदागिनें आणि जीवित यांची काळजी करण्यांत चूर होऊन गेला. सरकारच्या लोकांना स्वतःचीच खबरदारी घेणें कठीण पडे, त्यापुढें रयतेच्या गाऱ्हाण्याची दाद घेतो कोण ? या बंडखोरांचा तांडा ज्या गांवांत किंवा शहरांत रिघे, त्या गांवांतील धनकनक, कपडालत्ता आणि दाणागोटा धुऊन निघे. कित्येक ठिकाणीं बंडखोर आपलें पूर्ववैर साधण्यासाठीं खून पाडीत आणि कांहीं कांहीं जागीं वित्ताच्या आशेनें दुसऱ्यांचे बळी घेत असत. त्याचप्रमाणें सरकारच्या बराकी जाळणें, ठाणीं—कष्टमऑफिसें लुटणें, शिपाई-पोलीसांवर गोळ्या झाडणें; एवंच एकीकडून इंग्रजांच्या चढावाची भीति, तर दुसरीकडून राण्यांचा त्रास सोसून डबघाईस आलेल्या गोवासरकारनें पुनः पोर्तुगालसरकारकडे तक्रार करून इंग्लीश लोकांची गोंव्याबद्दल असलेली अभिलाषबुद्धी आणि तदनुरूप गोंव्यांत त्यांनीं वखारी, बराकी आणि हॉस्पिटलें वगैरे बांधण्यास केलेली सुरवात, यांची जाणीव करून दिली; तेव्हां पोर्तुगालसरकारनें इंग्लंडच्या कंपनी-सरकारकडे फिर्याद नेऊन मोठ्या मुष्किलीनें इंग्लीश फौज इ० स० १८१२ त एप्रीलच्या दोन तारखेस उठवून लावली. अशा रीतीनें एका भीतींतून मोकळे झाल्यावर आमच्या सरकारनें शिलकी फौज गोळा करून राणे लोकांवर चढाव केला; पण पोर्तुगीज शिपाई दऱ्याखोऱ्यांतून आणि रानावनांतून वणवण करून भारीच कंटाळले होते, शिवाय राण्यांची लढण्याची तऱ्हा ह्मणजे दबा धरून एकदम छापा घालण्याची; तीमुळें तर ते अतिशय रडकुंडीस आलेले होते. हिंदी प्रजेतही धार्मिक जुलुमाबद्दल सरकारसंबंधीं अप्रीति, पोर्तुगीजांचें अस्तित्व नष्ट करण्याची इच्छा करणारें शेजारी राष्ट्र; अशा अनेक कार-

णांनीं राण्यांशीं समेट करून माफीची द्वाही फिरवून त्यावेळीं तरी तात्पुरती शांतता केली. राण्यांवरील वारंट काढून घेतलें व त्यांचीं ठिकाणें त्यांस देवविलीं; धार्मिक जुलूम कमी करण्याची खबरदारी घेतल्याचें जाहीर केलें.

प्रसंगांत सांपडलेल्या सरकारनें जरी सवलतींचीं पुष्कळ आमिषें प्रजेला दाखविलीं, तरी गोव्यांतील प्रजेच्या नशिबीं जे त्रास लिहून विधात्यानें एकवेळ पोर्तुगीज लोकांच्या हातांत राज्यसूत्रें दिलीं आहेत, ते त्रास पोर्तुगीज लोक न्यायप्रिय झाल्यावांचून चुकणार नाहींत; कारण आजपर्यंत असा अनुभव आहे कीं, सरकारी नोकर कायद्यानें बांधून घेतलेले नसून कायदा नोकरांच्या लहरीवर अवलंबून असलेला दिसतो. उदाहरणार्थ, न्यायकचेरींत साक्षीकरितां बेलीफ जर आठ वाजतां हजर राहण्यास सांगतो, तर न्यायाधीश आपण स्वतः येतात बारा वाजतां व ते येईपर्यंत येणाऱ्या बिचाऱ्याला चार चार तास कामधाम सोडून तिष्ठत रखडावें लागतें. बरें, यदाकदाचित् साक्षीदारास न्यायाधिश आल्यानंतर जर पांच मिनिटें हांकेस ओ देण्यास विलंब लागला तर दिजोबिदियन्ति ( गैरहजर ) ह्मणून शिक्षेला पात्र व्हावें लागतें. हा झाला न्यायखात्यांतील प्रकार. आतां कष्टमखात्यांत जे वरिष्ठ असतात, त्यांच्यावर भार ह्मणजे कागद पाहून सही करण्याचा; पण त्याला किती कष्ट ? एकादा प्रतिष्ठित व्यापारी हजार-आठशें कर भरणारा, परंतु त्याची सुद्धां या नोकरांना पर्वा नसते. या नोकरांचा फ्रेंड किंवा पाहुणा गोष्टीला असल्यास त्याच्या सहीसाठीं त्या व्यापाऱ्यास दोन दोन तास दरवाजावर खडा पहारा करावा लागतो. अशा या अन्धेरनगरींतील शांतता काय आणि अशांतता काय ? हा प्रकार आजकालचा नसून पोर्तुगीजांचे पाय ह्या भूमीस लागल्यापासूनचा आहे. लुटारूंनीं लुटावें, खाणाऱ्यांनीं खावें आणि कर भरभरणाऱ्यांनीं आज जर आठ आणे भरले असतील तर उद्यां एक रुपया देण्यास रुज्ज व्हावें. आठ आण्यांचे सहा आणे होतील अशी आशा या पोर्तुगीज राज्यांत मुळींच करूं नये ? आतां तर त्यांना कोणाचीच भीति नाहीं; कारण अवाढव्य हिंदुस्थान सांपडून इंग्रजांना अजीर्ण झालेलें आहे. पेशवे कालाच्या उदरांत गडप झाले आणि सौंदेकर व वाडीचे सावंत भोंसले इंग्लिश, पोर्तुगीजांच्या पिंजऱ्यांतील पोपट बनलेले आहेत; पण त्यावेळच्या

चिरफाड स्थितींत तर त्यांनीं आपला कोडगेपणा सोडला नाहीं. इंग्लिश, पेशवे, सौंदेकर आणि सावंत यांच्यापासून बचावून आणलेला जो मलिदा तो आज ते पिळून पिळून खात आहेत. त्यांच्या ग्रासाआड आलेल्यांना ते बंडखोर ठरविल्याशिवाय कसे राहतील? गोमांतकाला पूर्वी कोणी वारसच नव्हता असें ते समजत आहेत; पण ज्या ज्या वेळीं मूळच्या वारसदारांना या पोर्तुगीज लोकांच्या अतिरेकाचा चिमटा बसे त्या त्या वेळीं ते आपल्या जीवाचा धडा करून शस्त्रसामुग्रीनें शिरजोर बनलेल्या परद्वीपस्थ लोकांवर उठून त्यांना आपलें अस्तित्व कबूल करावयास लावीत असत. आतां त्यांच्या या धडपडीपासून राष्ट्रीयदृष्ट्या मुळींच फायदा होत नव्हता हें आह्मांस कबूल आहे; परंतु बुद्धि, धन व शौर्य ह्या त्रयींच्या मिलाफापासून जर त्या गोष्टी घडल्या तर आह्मांस आजची स्थिति खचित आली नसती. असो.

एका प्रांताधिकाऱ्याच्या लहरीवर हजारों लोकांचें जीवित अवलंबून असावें, येथील सर्व लोकांच्या उपजीविकेच्या वगैरे हितसंबंधाचें काम एका व्यक्तीनें आपल्या इच्छेला येईल त्याप्रमाणें करावें ही कल्पनाच मुळीं असह्य. मागील बंडांची शांतता करण्याकरितां ह्मणून ज्या सवलती सरकारनें कबूल केल्या त्या केवळ न्याय्य, सौजन्य किंवा उदारता ह्मणून नव्हे, तर दोन्हीं तीन्हीं बाजूंनीं वारें संभाळणें कठीण पडलें ह्मणून. अशी जरी सवबीची गोष्ट असली तरी कृष्णराव हा वचनास व तहनाम्यास Scraps of paper ह्मणजे कागदाचीं चिटोरीं समजणारा धूर्त राजकारणी नव्हता. त्यानें पोर्तुगिजांच्या प्रामाणिक शब्दावर आपलें बंड थंड पाडलें होतें. तीच जर त्याच्यांत देशस्वातंत्र्याची तळमळ असती, विद्वत्तेचें पाणी असतें आणि दारूगोळा, शस्त्रास्त्रें, पैशाची भरपूर मदत असती तर इ० स० १७७९ त अमेरिकेशीं इंग्लंडाची लढाई जुंपली असतां आयर्लंडच्या स्वातंत्र्याकरतां जीवावर उदार झालेल्या ग्रॅटननें इंग्लिशांच्या दाढेंतून देशाची मुक्तता करावी ह्मणून इंग्लिशांविरुद्ध बंड पुकारून अल्पकाळांत साठ हजार व्हॉलंटीयर सैन्य जमवून इंग्लिश अधिकाऱ्यांना वचक बसविला आणि इंग्लिश राजाकडून पुष्कळच हक्क पैदा केले त्यावेळींहि इंग्लिशांनीं वेळ मारून नेण्याकरिता आयर्लंडास लांब लांब थापा दिल्या होत्या; परंतु देशभक्त ग्रॅटन सत्तरीतील राण्याप्रमाणें आपल्या-

पुरतें पाहणारा किंवा अशिक्षित नव्हता, ह्मणून सबंध देशाच्या मुक्ततेस तयार झालेले स्वयंसैनिक बिनमोबदला हांकेसरशीं तयार होणारे होते ह्मणून इंग्लिशांना त्यांना फसवतां आलें नाहीं. उलट येथील राण्यांचीं बंडें हीं देशस्वातंत्र्याकरितां चाललीं होतीं असें नसून केवळ स्वतःच्या किंवा स्वतःच्या भागाच्या सुखदुःखाकरितां चाललीं होतीं, ह्मणजे एकदां बाजारबुणग्या लुटारूंचा घोळका विस्कटला ह्मणजे पुनः त्याची जमवाजमव होण्यास बरेच सायास पडत असत. तात्पर्य हींच शकल पोर्तुगीज सरकारनें लढवून प्रसंगोपात मधुर मधुर आमिषें बंडवाल्यांच्या मुखास लावून वेळ मारून नेली. हैदरअली आणि सौंदेकर यांच्यांत संगनमत होऊन आपणांवर संकट कोसळेल ह्मणून सौंदेकर यांस द्यावी लागणारी रक्कम अडवून ठेवण्याची मसलत कॉन्द रिय पाद्र या गव्हर्नरास धर्मखात्याचे मुख्य आर्चबीशप यांनीं दिली व तो पैसा घेऊन 'आर्चमीण्मास ' हवाशीर जागा पाहिजे ह्मणून पणजी येथील आदीलशाही कोट पाडून इमारत बांधण्यास सुरवात केली; परंतु सौंदेकर गप्प बसल्याचा फायदा घेऊन पेडणें महालांतील सनदी लष्करी लोकांचे आणि देसाई व इतर हकदार लोक यांचेही हकाचे पैसे मिळण्यास आढेवेढे पडूं लागले; अशा रीतीनें सनदी नोकरांचीं मनें कलुषित होत चाललीं; राणे लोकांना कबूल केलेल्या सवलती न मिळून कोणी कोठपर्यंत जमीन भोगावी व त्या जमिनीवर सरकारचा हक्क कितपत असावा याचा नियम नसल्यानें आपसांत कलह होत होते. आणि नोकरीला असमर्थ ठरलेले कामगार व पेन्शन घेऊन बसलेल्या कामदारांचीं पेन्शनें मिळण्याला दिरंगाई होऊं लागली. ह्यावरून अस्वस्थतेचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसत असतां त्यांकडे दुर्लक्ष करून सुभेदारसाहेब आपल्या लहरीप्रमाणें पैसे खर्च करूं लागले आणि धर्माधिकारी नाचवतील तसे नाचूं लागले. अडलेल्या लोकांच्या अर्जविनंत्यांची दाद लागेनाशी झाली तेव्हां ही सर्व हकीगत वरील लोकांनीं पोर्तुगालास पाठविली. ती बातमी गव्हर्नरास समजून त्यांनीं राजेसाहेबांस असें कळविलें कीं, "सौंदेकर बाहेर फिरून मदत मिळविण्याची खटपट करीत असल्याचें समजतें व हिंदू हिंदूंस मिळून राज्यावर संकटें येऊं नयेत ह्मणून आपण खबरदारी घेत आहों; लष्करी लोकांची जय्यत तयारी ठेवणें

माग असल्यावरून पेन्शनर लोकांचे पगार व हक्कदारांचे हक्क मागें राहिले आहेत. तरी परिस्थिति बघून फेरफार करणार आहों " यावर राजेसाहेबां-कडून असा उलट हुकूम आला कीं, " होतांहोईतों सौंदेकरास नजरेच्या टप्प्यांत ठेवून घ्यावा; याउपर ते जरी बाहेर जाणारच असले, तरी त्यांच्या-कडून मित्रद्रोह किंवा विश्वासघात होण्याची भीति नसल्याची खात्री झाल्यास त्यांचें ठरावीक वर्षासन त्यांस देण्यास अनमान करूं नये. " बाकीच्यांची मागणी गव्हर्नराच्या इच्छेवर ठेवली. अशा या मडकलेल्या परिस्थितींत गोव्यांतील नव्या बंडाची तयारी चालली असतां बांदें येथील चंद्रोबा सुभे-दार आणि त्याचा प्रधान विठ्ठल नारायण गायतोंडे यांनीं पोर्तुगिजांच्या हद्दी-वर चांचेपणा चालविला. येणेंकरून पोर्तुगीज लोकांबद्दल ज्यांना ज्यांना संताप होता, त्यांनीं वरील लोकांच्या पुंडाईस महत्व यावें म्हणून लोकांना फिरंग्याविरुद्ध चिथावून त्याला बंडाचें रूप दिलें. त्या हद्दींतील लोकांनीं दारू-गोळ्याची मदत या लोकांना करावी आणि या हद्दींतील लोकांनीं त्यांना मदत करावी. याप्रमाणें दोन्ही राष्ट्रांत बंडाचा धांगडधिंगा सुरू झाला. त्यावेळीं सावंत-वाडीवर इंग्लिश सैन्याची देखरेख असून या सैन्याचे कॅप्टन हॅचिसन येथील शांतता व सुव्यवस्था (Pease & Order) राखीत असत. त्यांना ही बंडाची ज्याद त्रास देऊं लागली व बंडखोरांची संख्या वाढत जाऊं लागली. देसाई, राणे वगैरे सर्व बंडांत सामील झाले. लुटालूट, खून, जाळपोळ वगैरे कृत्यांनीं त्यांनीं रयतेस सळो कीं पळो करून सोडलें. अशा प्रसंगीं म्हणजे इ० स० १८१४ त इंग्लिशांचा गोवें येथें असलेला वकील कॅप्टन स्कुइलर यालाच चंद्रोबाच्या चांचेपणाचा बंदोबस्त करून बंड शांत करावें आणि धार्मिक जुलुमास आळा पडावा म्हणून पोर्तुगीजांनीं खबरदारी घ्यावी, असें मुंबईसर-कारकडून बजावण्यांत आलें.

इकडे वकीलसाहेबांनीं पोर्तुगीज मुलखांतील बंडवाल्यांचा बंदोबस्त करण्यास फिरंगी सरकारास तम्बी दिली; कारण पोर्तुगीजांच्या हद्दींतून सावं-तवाडीच्या बंडवाल्यांस दारूगोळा, शस्त्रें वगैरे मदत मिळते, अशी इंग्लिशांची समजूत झाली होती; पण ती खोटी ठरून सावंतवाडीच्या अराजकांकडूनच गोव्याच्या अराजकांना दारूगोळ्याची आणि शस्त्रसामुग्रीची मदत होत होती.

ती अशी कीं, पोर्तुगीजांच्या त्रासास कंटाळून राणेलोक सावंतवाडी, कुडाळ व घाट याठिकाणीं जाऊन राहिले होते व त्यांच्याकडून वेळप्रसंगीं जातीनें किंवा अन्य मार्गांनीं मदत होत होती, आणि या वेळीं तर सावंतवाडीचे बाबुराव आपाजी राणे, निपाणीचे आपाजी सुभाव राणे, आणि कुडाळचे जयसिंगराव राणे चंद्रोबाच्या मदतीस आले होते. ह्या सर्वांनीं दारूगोळा निर्माण करण्याचा गुप्त कारखाना उसपाच्या रानांत काढला होता व त्यांच्याचकडून तो सत्तरकर राण्यांना आणि पेडणेकर देसाई व सांखळीकर देसाई यांकडून बंडवाल्यांना पोंचत होता व याचसाठीं जरी इंग्रजांनीं पोर्तुगीज बंडवाल्या लोकांना आपल्या हद्दींतून दारूगोळा मिळूं नये ह्मणून आटोकाट प्रयत्न केले तरी क्रांतिवाल्या लोकांना दारूगोळ्याची कमतरता भासली नाहीं.

शत्रू हतबल होण्याऐवजीं बलवान् होऊन सरकारास पीडापीड करूं लागतात आणि हटवादानें खर्चही भारी करावा लागतो, शिवाय प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐकून जीवही बेजार होतो ह्मणून अधिकाऱ्यांनीं सलोखा करण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्याच बंडवाल्यांनीं आमच्या मागण्या सरकारनें मान्य करून हक्कांची तहकुबी ( Suspensâs das garautias ) प्रथम काढून घेऊन आमच्या हक्कदारीच्या जमिनी आह्मांस बिनहरकत मिळाव्या, सनदी नोकरांचे पगार फेडले जावे, जप्त झालेलीं वर्षासनें चालू व्हावीं, सरकारी नोकरीस असमर्थ झालेल्यांचे पगार आणि पेन्शनदार लोकांचीं पेन्शनें दिलीं जावीं, धर्मांत जुलूम करून हिंदु व ख्रिस्ती असा भेदभाव सरकारांत ठेवूं नये इत्यादि मागण्या पुरविण्याचें जाहीर करून, त्याप्रमाणें पुढेंही पाळाव्या. या त्यांच्या सूचना सरकारनें मान्य करून फक्त पांच जणांनाच त्यावेळीं मोकासपट्टे ( सनदा ) करून दिले. त्यांत सालेलकर, अडवयकर, गुळेलीकर, रावणकर आणि सावर्डेकर हीं घराणीं होतीं. तहकूब झालेलीं पेन्शनें व वर्षासनें देण्यासही सुरवात झाली. माफी ( Amnistia ) ही जाहिर करून एकदां हें बंड शांत केलें. सावंतवाडीच्या बंडखोरांची रग जिरविण्यास इंग्लिश जारीनें खटपट करूं लागले. जिकडे जिकडे सांपडतील तेथें तेथें बंडवाल्यांस गोळ्या घालून मारूं लागले. शेवटीं कांहीं लोकांना सलोख्यानें व कांहींना जबरदस्तीनें वठणीवर आणलें व तिकडेही शांतता प्रस्था-

पित केली. आमच्या पोर्तुगीज सरकारनें पंक्तिप्रपंच करून ओरडणाऱ्यांची भूक शमाविली, पण निजलेल्यांची काळजी घेतली नसल्यानें आपसांत कटकटी होऊं लागल्या; त्यांकडे लक्ष देण्याचें सरकारनें नाकारल्यामुळें ह्मणा अगर सरकारचें लक्ष वेधावें ह्मणून ह्मणा असंतुष्ट राणे व देसाई यांची कुरकूर चालली होती, तीच विकोपास जाऊन बंडाच्या रूपानें दिसूं लागली; व हें असें होणें साहजिक होतें. कारण असें कीं, वडिलांचा मान केरीच्या राण्यांच्या घराकडे असून औदार्याच्या वांटणींत सरकारनें त्यांची आठवण केली नाहीं; व बाकी कित्येक घराणीं प्रतिष्ठितपणांत समान असतां त्यांना वगळणें योग्यहि नव्हतें. अर्थात् पोर्तुगीज राज्यांतील न्याय ह्मणजे मोठ्यानें ओरडणाऱ्यांची भूक खरी व मुकाट्यानें गप्प बसणाऱ्यांची भूक खोटी ठरून आई तिकडे लक्षसुद्धां देत नाहीं, तशांतली गत. तर ज्यांना ज्यांना हक्कदारीची भूक लागली आहे त्यांनीं ओरडूनच आपली भूक शमवून घेतली पाहिजे हें ठराविक झालें. त्याप्रमाणें केरीच्या विठोजीराव राण्यानें ता. २१ आक्टोबर १९१४ त बंड सुरू केलें व त्यास गांवठणकर देसाई, मावळींगकर राणे, गुळ्ळेकर राणे सामील होऊन धुमाकुळ घालूं लागले. अशा समयीं सावंतवाडींतही कंपनीसरकारविरुद्ध आना सावंताच्या प्रमुखत्वाखालीं बंड उभारण्याचें ठरून तयारी चालली होती. शिवाय पोर्तुगालची परिस्थिति बिघडून केव्हां स्फोट होईल याचा नेम नव्हता; कारण क्रूर व आपमतलबी पाद्र्यांनीं त्यावेळीं खुद्द अमीरउमरावांसारख्या सरदारांवर आपल्या वर्चस्वाची कडी केली होती.

ज्या आयरिश फेर्हेर सरदारानें आपलें तारुण्य पोर्तुगालच्या उत्कर्षासाठीं धाडसी कृत्यें करून वेंचलें व मोठमोठे मानाचे हुद्दे पटकाविले आणि ज्याचा मुलगा रूय फेर्हेर ह्मणून पराक्रमाचे बाबतींत गोमांतकांत गाजत आहे, अशाची पर्वा न करतां पाद्र्यांनीं त्याच्यावर आपला करडा अंमल गाजविला. ते इतरांना कसे छळीत याचें वर्णन काय करावें ? सारांश याच संधीस पोर्तुगालांतही जनरल गॉमिस फेर्हेर, मार्केन द पोंबाल यांच्या प्रामुख्याखालीं अराजक लोकांनीं बंडाला सुरवात केली, आणि ते धर्मांध राज्यपद्धतीचा नायनाट करण्याची खटपट करूं लागले. त्याचा परिणाम गोव्यांतील लष्करांतही दिसूं लागला. अशा अनेक कारणांमुळें गोवासरकारनें विशेष आढेवेढे

किंवा हट्टीपणा न धरतां सत्तरीच्या बंडखोरांचे हेतू समजून घेण्याकरितां बंडखोरांच्या तळावर डॉ. लीम द लैतांव, रा. नारायण सखाराम कामत, वाघ आणि मानुएल द सौझ या इसमांस पाठविलें. त्यांनीं बंडखोरांच्या तक्रारी ऐकून घेऊन सरकारास कळवल्या व सरकारनें इतरांबरोबर त्यांनाहीं इनामपट्टे करून दिले. ते दिले नसते व त्यांच्या मनाची समजूत करून बंडाचें शमन केलें नसतें, तर पुढें लगेंच जें वार्डीतील सरदार लोकांनीं बंड उभारलें आणि इंग्लिशांशीं टक्कर दिली, त्यांत ह्याही मंडळीचा समावेश होऊन दीनदुबळ्या रयतेच्या दुर्दशेस पारावार राहिला नसता, आणि पोर्तुगालांतील फेरबदल होऊन रिपब्लिकन लोकांचा जय झाल्यामुळें, गोव्याच्या गव्हर्नरास कात्रच्या किल्ल्यांत कैद करून ठेवल्यानें जी खळबळ सैन्यांत माजली, तिचाही बंदोबस्त करून पूर्वस्थितीवर आणणें पुढें कठीण झालें असतें. यापूर्वींच बंडाची शांतता करून ठेविली, तें एकपरी बरें झालें. नंतर चौघां लष्करी अधिकाऱ्यांनीं गोव्याचे अधिकार आपणांकडे घेऊन लोकांस उद्देशून जो जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यांत नव्या सरकारचे हेतू दाखविले होते; व ते त्यावेळीं सरकारमार्फत निघणाऱ्या ' गाझेति द गोअ ' नांवाच्या पत्रांत प्रसिद्ध होऊन हिंदी प्रजेला तो एक आशाकिरणच वाटला होता; परंतु येथील लोकांची राष्ट्रस्वातंत्र्याची कल्पनाच मृत झाली असल्यानें असो, अथवा पाद्रोआदचें ऋण न फिटल्यामुळें असो, पोर्तुगालांत राजपक्षियांचा जय होणें आणि गोमांतकांत रिपब्लिकन लोकांस राणे, देसाई किंवा हिंदू प्रजा यांचें साह्य न मिळणें ह्मणजे गोमांतकाच्या नशिबीं लिहलेली पारतंत्र्याची किंवा गुलामगिरीची जखड बेडी कायम राहणें नव्हे काय ? असो. राजपक्षीय लोकांनीं शिकस्तीनें एक वर्षापूर्वी ह्मणजे इ० स० १८२२ त आपलें विजयी निशाण लिज्बनच्या राजवाड्यावर चढवून रिपब्लिकन लोकांचा पुरा मोड केला, आणि पुन्हां एकमुखी राजपद्धतीला सुरवात झाली. गोव्यांत राजप्रतिनिधि ह्मणून त्यावेळीं सि० मानुएल काम्र या नांवाचे गृहस्थ गव्हर्नर जनरलपदावर आले, त्यांच्या कारभाराचें वर्णन पुढील भागांत करूं.

## प्रकरण चौथें.

# परिस्थिति घोर तेथील लोक बंडखोर!

कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्तेर्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।
अधोमुखस्यापि कृतस्य वन्हेर्नाधःशिखा याति कदाचिदेव ॥ १ ॥

—भर्तृहरि

शापादपि आणि शरादपि अशा बाण्यानें वागणाऱ्या गोमांतक भूमातेच्या पुत्राला ह्मणजे जिवाजी बल्लाळ केरकर यांना आपल्या अंगांत शत्रूची हड्डी नरम करण्याचें क्षात्रतेज असतां आपली भूमाता पारतंत्र्यांत सोडून खर्ड्याच्या लढाईंत शिमड कां करावी लागली? आपल्या बुद्धींत राज्यांच्या उलाढाली करण्याचा मुत्सद्दीपणा असतांना रामचंद्र मल्हार सुखठणकरांना आपली बौद्धिक बहादरी ना ।साहेब पेशव्यांच्या सान्निध्यांत राहून रजपूत व जाट यांच्या तहनाम्यांत दाखविणें कां भाग पडलें? एकंदर हिंदूंच्या दैन्यावस्थेस कारण झालेल्या पाद्रोआदूचा ( Padroado ) गोव्याच्या तिजोरींतून मिळत असलेला दीड लक्ष प्रतिवार्षिक तनखा राजपक्ष जाऊन प्रजापक्ष स्थापन झाला तरी बंद कां पडत नाहीं? आणि ह्यापभें येथें वर्षप्रतिवर्षी खिस्ती लोक काढीत असलेला सावंत भोंसले यांचा मिरवणूकीवजा धिंडवडा बंद करण्याचें सामर्थ्य येथील हिंदूंत किंवा तद्बीजोत्पन्न राज्यांत कां दिसत नाहीं? याचें उत्तर इतकेंच कीं, आज स्वतंत्र असें हिंदूंचें राज्य नसल्यानें शौर्य-धैर्य दाखविण्यास वाव नाहीं. अक्कलहुशारी सिद्ध करण्यास स्थल नाहीं, परसत्तेशीं टक्कर देण्यास सामर्थ्य नाहीं व ह्मणूनच हे प्रत्यहीं घडत असलेले अपमान उघड्या डोळ्यांनीं बघून गप्प बसावें लागतें. शिवाय, त्या काळच्या लोकस्थितींत व आजच्या लोकस्थितींत केवढें महदन्तर! त्यावेळच्या समाजाच्या मनोवृत्तींत व हल्लींच्या समाजाच्या मनोवृत्तींत केवढा भेद! उजेड व अंधार, ज्ञान व अज्ञान किंवा आशा व निराशा या दुकलीमध्यें जितका फरक, तितकाच किंबहुना कांकणभर जास्त फरक अठराव्या शतकांतील हिंदुस्थानांत व विसाव्या शतकांतील हिंदुस्थानांत दिसून येत आहे.

अठराव्या शतकांतील जिकडे तिकडे हिंदूराज्यें, हिंदूंच्या फौजा, हिंदूंचे पराक्रम व हिंदूंचे राजकारण दुमदुमत होतें; तर उलट हल्लीं हिंदूंची गुलामगिरी, हिंदूंचे हाल, हिंदूंचे राजकीय अधःपतन, जिकडे तिकडे दिसून येत असून एकंदरींत अधःपाताला कारणीभूत झालें आहे. रणशूर हिंदीलोक लष्करांत निरुपयोगी आणि प्रसंगीं केळींच्या कांड्या पिळून खाणारे, दरमहा पांचपांचशें रुपये घेणारे रणभीरू ख्रिस्तानुयायी कॅप्टनच्या हुद्यावर चढण्यास योग्य; शट्शास्त्रसंपन्न पंडिताला ' अ बे से' येत नसल्या-कारणानें राष्ट्राच्या निवडणूकींत मताधिकार मिळत नाहीं आणि ' अ बे से ' शिकणाऱ्या कालच्या शेंबड्या पोराला हा अधिकार मिळूं शकतो; या प्रका-रांचें कारण, आपण राज्यभ्रष्ट झालों हेंच होय. उदाहरणार्थ निजामच्या दरबारांत पेशवे व नाना फडणीस यांचीं सोंगें आणून थट्टा केल्यामुळें निजा-मावर स्वारी होऊन लढाईचा प्रसंग ओढवला व त्यावेळीं गोमांतकीय क्षात्र-तेजानें खर्ड्याच्या लढाईंत शत्रुसेनेचा धुव्वा उडवून भरपूर सूड घेतला; पण तीच आज काय स्थिति आहे ? आज सावंतवाडीचे राजेबहादूर इंग्र-जांचे अंकीत झाल्यामुळें पोर्तुगीजांना नुसता जबाब विचारणें कठीण ! आणि या इंग्लिशांची मातब्बरी तरी कुठपर्यंत ? तर तीही हिंदुस्थानापुरतीच; कारण या इंग्लिशांचे मोठे मुत्सद्दी समजले जाणारे, बंगालच्या फाळणीनें नांवाजलेले आणि हिंदुस्थानांत असतां वाघासारखे गुरगुरणारे लॉर्ड कर्झन युरोपांत कसे भित्रे बनतात पहा; रशियांतील बोल्शेव्हिशीं व्यापारी संबंध तोडून टाक-ण्याची जेव्हां हे मुत्सद्दी गृहस्थ धमकी घालूं लागले तेव्हांपासून रशियनांनीं कर्झनसाहेबांचीं वेडींवांकडीं सोंगें काढून थट्टा उडवली. इंग्लंडांतील कांहीं पत्रें संतापानें बोल्शेव्हिकांना शिव्या देतात तर कर्झनसाहेबांना चीड येत नाहीं याचें कारण हिंदुस्थान निःशस्त्र, निर्बल, पराधीन आणि रशिया सशस्त्र, सबल आणि स्वतंत्र हेंच होय. स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क असतो. तो हिरावून घेणारा व हिरावूं देणारा दोघेही परमेश्वराच्या दरबारीं अपराधी ठरतात. स्वातंत्र्यासाठीं लढत राहणें हें प्रत्येकाचें पवित्र कर्तव्य आहे. परमेश्वराच्या दृष्टीनें निंद्य ठरलेल्या कोणत्याही गोष्टीला सत्याचा पाठिंबा नसतो. अन्यायाच्या पायावर सत्ताधाऱ्यांनीं उभारलेला पोकळ डोल्हारा केव्हां

जमीनदोस्त होईल याचा नेम नाहीं.' आपलें जुलुमाचें सिंहासन स्थिर करण्याकरितां, तें नानातऱ्हांच्या दुष्कृत्यांनीं रंगविलेलें असल्यानें त्यांना जुलुमाचा मार्ग स्वीकारावा लागतो. सत्ताधाऱ्यांची विवेकबुद्धि नष्ट होऊन जेव्हां अज्ञ लोकांचा अनन्वित छळ होतो, तेव्हांच बंडवाला पक्ष उदयाला येतो. या क्रांतिकारक लोकांवर सरकारपक्षाकडून होणाऱ्या आघातांपासून स्वतःचा बचाव करण्याकरितां हजारों रयतेचे बळी द्यावे लागतात व नानाप्रकारच्या संकटांना धैर्यानें तोंड द्यावें लागतें. क्रांतिकारक पक्षाचें धुरीणत्व पत्करून रशियांतील लेनिननें बलिष्ठ झारशाहीला तोंडघशी पाडल्यामुळें युरोपांत लॉर्ड लोकांस वचक बसला. विशेषतः इंग्लिशांचे पाय गोगलगाईप्रमाणें पोटांत सरले. तशी स्थिति हिंदुस्थानची नसल्यामुळें लॉर्ड कर्झन ह्मणजे कर्दनकाळ वाटत होता आणि त्याहून परतंत्र स्थितींत असणाऱ्या गोमांतकाला पदोपदीं अपमान सहन करूनही माणसांवर कर द्यावे लागतात. अशा स्थितींत स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करून दाखविणाऱ्या पुढाऱ्यांचा—मग ते प्राचीन असोत किंवा अर्वाचीन असोत, स्वकीय असोत किंवा परकीय असोत—अभिमान व आनंद सारखाच वाटणार. उदाहरणार्थ, श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांबद्दल वाटतो तितकाच आनंद व पूज्यबुद्धि इटालीला स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या मॅझिनीबद्दल वाटणार, जितकें प्रेम पोर्तुगालास राजसत्तेच्या मगरमिठींतून सोडविणाऱ्या आफोंस कॉस्ताबद्दल मनांत उद्भवतें, तितकेंच प्रेम स्वदेशासाठीं कारागृहांत २ महिने उपवास करून आयर्लंडांत नवचैतन्य उत्पन्न करणाऱ्या टेरेन्स मॅक्स्विनीबद्दल वाटत आहे. सत्य हें एकच आहे व तें त्रिकालाबाधित आहे. या सत्याचा झेंडा उभारणाऱ्या प्रत्येक देशभक्ताचा, मग तो तुर्कस्थानांतील गाझी केमालपाशा असो, आयर्लंडांतील डी. व्हॅलेरा असो, इजिप्तांतील झगलूलपाशा असो, बंगाल्यांतील सी. आर. दास असो, पंजाबांतील लाला लजपतराय असो, गुजराथेंतील महात्मा गांधी असो, पुण्यांतील लो. टिळक असो किंबहुना सत्तरींतील हक्कासाठीं भांडणारा दीपाजी राणा असो, जग जयजयकार करीत असतें. सत्याकरितां लढणाऱ्यांचा जयजयकार करणें हा मनुष्याचा स्वाभाविक धर्म आहे.

मानवी प्राण्यानें जगाकरितां केलेला आत्मयज्ञ ह्मणजेच जगाचा इतिहास होय. आपल्या भावी पिढीला आदर्शभूत असा धडा घालून देण्याचें

कांम वर्तमान पिढीचें आहे. सध्यां ही पवित्र कामगिरी बजाविली जात आहे काय ? प्रत्येकानें याचा विचार करावा. पाशवी सामर्थ्याच्या बळावर प्रत्येक आधुनिक राष्ट्र आज जुलुमाची धामधूम माजवून सत्ता गाजवित आहे. ज्ञानयुगांत जर या गोष्टी तर राजतृष्णा व धर्मप्रसारासारख्या बार्बरी कालांत राज्यकर्त्यांची काय समजूत असेल हें पाद्री लोकांच्या बंडानें प्रत्यक्षतः लोकांना विदीत केलेलें आहे. शिवाय तत्कालीन गोवासरकारनें कायदे-कौंसिलमध्यें प्रजापक्षाचे ह्मणून निवडलेले एक समासद आणि गोव्यांतील मडगांव येथें निघणाऱ्या पहिल्या " उल्त्रामार " ( Ultramar ) नामक पत्राचे जनक सि० बेर्नार्द द कॉस्त यांच्या कामगिरीवरून असें दिसत आहे कीं, फिरंगी सरकार आपल्या प्रजेच्या हिताबद्दल अत्यंत बेफिकीर आहे. उदाहरणार्थ, प्रजेच्या हितवृद्धीस व हक्कांस आड येणाऱ्या कायद्यास इ० स० १८२१ सालीं अनुमती न देतां जोरानें निषेध केला ह्मणून त्या लोक-हितवादी पुरुषास सरकारच्या लोकांनीं कागदपत्र चोरल्याचे अति नीच प्रकारचे आरोप लादले; ते लुबाडण्याच्या कामास अनुमती देईनात ह्मणून विवेकशून्य नरपशूंनीं त्यांवर असह्य जुलूम चालवला. ज्यांना गोव्यांतील व दमण प्रांतांतील प्रजेनें आपले विश्वासू प्रतिनिधी ह्मणून लिस्बनच्या कायद्ये-सभेंत निवडून दिलें व हा मान ज्यांना चार वेळ मिळाला; इतकेंच नव्हे तर पोर्तुगालांतील इतर उदारमतवादी सभासदांनीं ज्यांच्या लोकहित-दक्षतेची आणि अगाध ज्ञानाची मुक्तकंठानें प्रशंसा केली, अशा इसमास बंडखोर ठरवून आजन्म दमणप्रांतीं ठेवण्यास त्यांच्या असुरीवृत्तीला यत्किंचित् विशाद वाटला नाहीं; मग सत्तरप्रांतासारख्या अशिक्षित प्रदेशांतील विजातिय व विधर्मीय लोकांवर जुलूम चालवून लूट काढण्यास ज्या ज्या वेळीं प्रतिबंध होई त्या त्या प्रसंगीं ' बंड ' असें भपकेबाज दरबारी नांव देऊन लष्करी खातें ढेरपोटें करण्यास संधी दिली तर त्यांत नवल तें काय ?

सारांश, प्रजेबद्दल सरकारच्या मनांत काडीभर सहिष्णुता नसल्यानें इकडून करांचें ओझें घ्या न पेक्षां तिकडून बंदुकीच्या गोळ्या घ्या, अशा रीतीनें प्रजेला निःशक्त, निर्जीव व निस्तेज करण्याच्या ज्या खटपटी केल्या त्यामुळें इतर भागांतील दुर्दमनीय ताज्या रक्ताचे हिंदू हतवीर्य आणि हतबल

होऊन त्यांचें गरम रक्त व तामसी विचार थंड पडले आणि त्यांची स्थिति गारुड्याच्या सापाप्रमाणें झाली. ख्रिस्ती लोकांचा तळीराम सर्व खात्यांत शिरकाव मिळून व हिंदूलोकांना लुटून थंड होऊं लागला; परंतु क्षत्रियबीजांत नसानसांतून सळसळणारें ताजें रक्त वेळोवेळीं उसळत असल्यामुळें तें थंड पाडण्यासाठींच खाजवून खरूज उत्पन्न करीत होतें.

६. सन १८२१ सालीं प्रजेला ज्या सवलती दिल्या त्यामुळें प्रथमतः पोर्तुगालच्या कांग्रसमेंत गेलेल्या गोंव्याच्या प्रतिनिधींनीं ह्मणजे सिं. कॉस्तॉस द कॉस्त यांनीं तेथील लोकांपुढें भाषण करतांना असें दाखवून दिलें होतें कीं, गोंवाप्रांत ह्मणजे फिरंग्याच्या लष्करी शक्तीचें आगर होऊन बसल्यामुळें लष्करच्या स्वैरसंचारी उत्साहास शेंकडों लोकांचे बळी पडत आहेत. याची घमेंड वेळीं न जिरविल्यास हें एकच खातें सर्व प्रांताच्या शांततेचें गूळखोबरें करण्यास पुरेसें आहे; कारण उठल्यासुटल्या वेळीं या लष्करी लोकांचा ससेमिरा पाठीस लागून छळवादाचा कळस झाला ह्मणजे दुर्बलांसही बळ चढून बंडास प्रवृत्त व्हावें लागतें. या लोकप्रतिनिधींच्या बोलाचा मुलाजा न राखतां लोकइच्छेविरुद्ध भराभर कायदे करून प्रजेला पिळीत सुटणें हें ' सरकार ' हें नांव धारण करणाऱ्यांना उचित नाहीं.

ज्या लोकांना मायबाप सरकार ह्मणून मिरवावयाचें असतें ते लोक आपली प्रजा ही आपल्या मुलांबाळांप्रमाणें समजून तिचें पालनपोषण करीत असतात; परंतु आमचें फिरंगी सरकार पोरक्या पोरांचें हित करावें ह्मणून ' इंव्हॅन्तार्य ' ( Invrntario ) कायद्यानें झटत आहे; मात्र त्यामुळें पोरांचें हित न होतां अहित होऊन त्यांच्या नशिबीं आईबापांनीं ठेविलेली इस्टेट कायद्याला खावबून स्वतःच्या उदरपूर्तिसाठीं भिक्षापात्र घेण्याचा प्रसंग मात्र येतो. याला मायबाप सरकार कसें ह्मणतां येईल ? लांचखाऊ नोकर, आपस्वार्थी जाचक कायदे, करडी वसूलपद्धति आणि जबर शेतसारा यांहींकरून नवीन काबिजादींतील बहुतेक प्रजा अन्नाला महाग होऊन बसली यांत नवल नाहीं. याचें कारण युरोपच्या विचारांच्या आणि आपल्या गोंव्यांतील विचारांच्या तारतम्यांत जमीनअस्मानाचा फरक दिसून येतो हेंच होय. फ्रान्सांतील प्रो० एम्. व्हीक्टर बॉस ह्मणतात कीं, " हिंदुस्थानांतील

लोक सर्व विद्यांत निपुण असून खून करण्यांत ( The at of Killing ) नेभळे असल्यामुळें अन्नाला महाग झाले आहेत, आणि असल्या राज्यपद्धतीच्या जुलमाची पीडा युरोपांत ज्यावेळीं चालूं लागली त्यावेळीं जुलमानें संत्रस्त झालेल्या रोग्यांना रामबाण औषध सांगण्याकरितां जे राजवैद्य पुढें आले, त्यांत स्कॉटलंडमधील प्रसिद्ध लेखक मि. बुचनन यांनीं या रोगाची चिकित्सा खालीलप्रमाणें केली आहे; बुचनन आपल्या पुस्तकांत ह्मणतो:—" अरण्यांतील क्रूर श्वापदांना आपण मारतों; पण तीं मारलीं ह्मणजे आपण गुन्हा केला असें कोणी समजत नाहीं; कारण तीं लोकांना विनाकारण त्रास देणारीं असतात, आणि तसाच त्रास एकाद्या जुलमी मनुष्याकडून होऊं लागला तर असलीं जुलमी माणसें आणि अरण्यांतील क्रूरपशू यांच्यामध्यें फरक तो काय राहिला ? " अशा कल्पनेनें समाजव्यवस्थेमध्यें अनर्थ होईल, हें बुचननला कबूल आहे; परंतु त्यावर त्याचें असें ह्मणणें आहे कीं, एकाद्या रोगावर वैद्य जसें एखादें औषध सांगतो त्याचप्रमाणे या रोगावर हें एक औषधच आहे. औषध एकाद्यानें भलत्याच वेळीं दिलें तर त्याचा दोष वैद्याकडे येत नाहीं, अशा प्रकारचा हा या प्रश्नावरील इतिहास आहे. याचा जर विचार केला तर फिरून फिरून मि. बुचननचे शब्द आह्मीं आधारास कां घेतों, हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. अविचारी व स्वार्थपटु अशा एका व्यक्तीवर सबंध सत्तरींतील प्रजेला अवलंबून ठेवणें हेंच प्रथम वेडेपणाचें. एका रजीदोरसाहेबाकडून सत्तरप्रांताचा राज्यकारभार चालविणें ह्मणजे ' अजायुथा लांडगा जसा पाळी ' याप्रमाणें लांडग्याचीं नखें लागून दुखवलेल्या बकऱ्यांनीं लांडग्याचा खून केला, तर कोंडवाड्याच्या मालकानें बकऱ्यांवर कां ह्मणून संतापावें ? परंतु संतापाची गोम त्यांतच असल्यानें गरीब बकऱ्यांची कड घेण्याऐवजीं लांडग्याचेच साथीदार बनणारे जेथें धनी निघतात, तेथें मेंढ्याबकऱ्यांना बळ चढून बंडापर्यंत मजल येते. हें जर आमच्या पोर्तुगीज सरकारला पटलें असतें तर मणावर फिरून टोंच मारण्यांत मोठा पुरुषार्थ नाहीं ही जाणीव त्यांना झाली असती; तो न होणें ह्मणजे अर्थात् आपल्या नोकरांकडून परिस्थिति घोर करवून लोकांना बंडखोर बनविणें होय व हें काम आपल्या कायद्यानीं सरकारच निर्माण करीत होतें

असेंच ह्मणावें लागतें; , कारण राजसत्ता ही प्रजेच्या सुखासाठीं आहे, ह्मणून तर प्रजाजन आपखुषीनें आपल्या उत्पन्नांतील दशमभाग कराच्या रूपानें ती सुरळीत व समाधानानें चालावी ह्मणून सरकारतिजोरींत नेऊन देत असतात. आणि प्रजाजनांकडून कराच्या रूपानें पैसा मिळतो ह्मणूनच तर सरकारलाही त्या पैशाच्या जोरावर नोकर, सैन्य, शस्त्रें वगैरे जवळ ठेवून व्यवस्थितपणानें मानवी कारभार चालविणें, यथान्याय प्रजेचें पालन करणें आणि पर शत्रू-पासून जनतेचें संरक्षण करणें सुशक्य होतें. या उचित गोष्टी सोडून जर एकादें सरकार अरेरावीनें धनीपणा गाजवूं लागलें, तर तें रास्त व न्याय्य होईल काय ? प्रजेच्या पैशावर पोसले जाणारे नोकर समर्थाघरचे कुत्रे बनून प्रजेलाच जर लुटूं लागले तर या लुटीच्या चाव्याची कळ प्रजाजनांनीं कित-पर्यंत सहन करावी ? प्रजेच्या पैशांवर पोसलें जाणारें लष्कर प्रजेच्या पैशांनीं घेतलेलीं शस्त्रें प्रजेच्या रक्षणार्थ परशत्रूंवर घालण्याचें सोडून प्रजेलाच लुटण्याच्या कामीं वापरूं लागलें तर तें प्रजेनें कां सहन करावें ? प्रजेची अनुमती न घेतां आपल्या ख्यालीखुशालीसाठीं आणि उधळपट्टीसाठीं अवाच्या सवा पैसा उत्पन्न करण्याकरतां मलभलतेच कर प्रजेवर लादणें, विक्षिप्त कायदे करून प्रजेला बंधन घालणें, आपण प्रजेचे नोकर असून व्यवस्था राखण्या-करितां जरी उंच जागीं बसलों असलों तरी प्रजेच्या पैशांनींच आपलें पोट जाळीत आहों, ही खरी भावना सोडून हरामखोरपणानें तिच्यावर क्षुल्लक कारणासाठीं गुरगुरणें, हा बेईमानपणाच नव्हे काय ? तात्पर्य, प्रजेच्या हक्कांना न जुमानतां स्वैर वागणें, आणि यदाकदाचित् प्रजेनें कांकूं केलें तर शस्त्रसैन्याच्या बागुलबोवानें तिला धाकांत ठेवूं पाहणें ह्मणजे परमेश्वरानें आपणालाच तेवढी बुद्धी आणि मानवी देह दिला असून बाकीचे मनुष्यच नव्हेत असेंच समजणें नव्हे काय ? पण या सत्ताजन्य अंधत्वाला चरचरीत अंजन घालून दृष्टीचें मांद्य दूर करण्याकरितांच सत्तरींतील राणे मोडकीतुटकीं मिळतील तसलीं शस्त्रें घेऊन धांवत होते व त्यालाच ' बंड ' अशी मोठी संज्ञा देण्यांत येत होती. नपेक्षां राष्ट्रपरिवर्तनाच्या हेतूनें जर आजपर्यंतचीं ' बंडें ' झालीं असतीं तर निदान प्रत्येक बंडांत शेंदोनशें तरी सरकारी अंमलदार धारातीर्थीं पावन झाले असते; तशांतला भाग मुळींच नसून पांच

दहा शिपाई किंवा एकादा सार्जंट पडला ह्मणून '.बंड' 'बंड' अशी ओरड करण्यांत स्वार्थी कावेबाजपणा छपून बसला होता हें निःसंशय खरें आहे व ती कावेबाजी ह्मणजे आपल्या गणगोताचा लष्करी खात्यांत शिरकाव करून घेणें, बेअकली माणसांना आयासाविना बढती मिळविणें, पांच खर्च करून पन्नासांचा भार तिजोरीवर घालण्याची संधि साधणें, असल्याच स्वरूपाची असून बाकी शौर्याच्या नांवानें भोपळ्शाएवढें शून्य तें शून्यच ! उदाहरणार्थ, १३ आगष्ट १८२३ रोजीं राणे लोकांत मानापमानाचें ग्रामण्य माजून तें प्रकरण एकमेकांत मारामारी होऊन विकोपास गेलें. त्याचा विपर्यास करून सरकारी ऑफिसरांनीं मोठा गलबला केला; परंतु गोव्याचे तत्कालीन गव्हर्नर मानुएल काम्र हे स्वतः बुद्धिवान् असल्यामुळें या गलबल्यानें बुजून न जातां त्यांनीं परिस्थितीचें स्वतः डोळ्यांनीं अवलोकन करून, शक्य ती मेहनत घेऊन आणि मिळून मिसळून वागून बंडाचा ओघ शांततेंत समरस केला. हेंच जर त्यांनीं एका पक्षाला हाताशीं धरून चढेलपणाच्या धोरणानें दुसऱ्याला चिरडूं पाहिलें असतें तर बंडाच्या वणव्यांत सर्वांना पोळून निघावें लागलें असतें. हें जरी खरें असलें तरी मिजासीला सोकावलेल्या ऑफिसरांचें मात्र समाधान या गोष्टीनें झालेलें दिसलें नाही. त्यांचा हेतु आपल्या क्रौर्याची दहशत बसवून राणे लोकांना चिरडून टाकण्याचा होता. अशा समयीं गव्हर्नरांनीं घाटून घाटून पाहिलें कीं, खड्या सैन्याचा बडेजाव राखून शहरांची सुधारणा करणें, मुलकी खातीं वाढवून सरकारची इभ्रत वाढवणें इत्यादि गोष्टीसाठीं पैसा तर पाहिजे, आणि तिजोरी तर खालावलेली आहे, अशा स्थितींत काय युक्ति योजावी या विवंचनेंत सरसाहेब असतां कांहीं कौन्सिलर साथीदारांनीं दयाभूतपणाच्या नांवाखालीं नीतिमत्तेचा खून करण्याची मसलत दिली.* ती ह्मणजे लॉटरीचीं तिकिटें काढून पैसा उत्पन्न करण्याची शकल काढली ही होय.

या गोष्टीला जरी गव्हर्नरसाहेब प्रथम कबूल नव्हते, तरी नीतिमत्तेला कमी लेखून गरज सांवरली आणि नीतिमत्ता हांकलून घातली; तेव्हांपासून राजरोसपणें आपल्या प्रजेला जुगार खेळवून आपली चैन भागविण्यांत येऊं लागली व अज्ञानामुळें जसा मासा नदीकांठीं बसून गळास लावून मांस

टाकणाऱ्या मूतद्येला मुलून आपले प्राण गमावतो, किंवा एकादा कुत्रा स्मशानभूमींतील सुक्या हाडास चघळून चघळून अज्ञानपणानें स्वतांच्या दाढेंतून निघणारें रक्त चाटून सुक्या हाडांपासून रक्त मिळाल्याबद्दल संतोष मानतो, तशाच तऱ्हेचा व तितकाच संतोष एकादें टिकीट फलद्रूप झालेल्या गोव्यांतील मनुष्याला होऊं लागला; पण परकीय सरकारनें आपणास जुगारी बनविल्याबद्दल खंती झाली नाहीं. आणि गोवासरकारच्या नैतिक आचरणास जी येथून ओहटी लागली तिला पुढें भरती आणण्याचें एकालाही रुचलें नाहीं. पुढें पुढें तर पैशांनीं न्याय विकला जाऊं लागला. कुंटणखाने ( Putare ) मोबदला घेऊन सुरू होऊं लागले. लायसन्स काढून देहविक्री होऊं लागली, तसतसे त्यांचे सोंगडी दारूचे अड्डेही ( Tavernas ) काढूं लागले. सारांश, या गव्हर्नराच्या कारकीर्दींत शील—सचोटीस बरोबर घेऊन नीतिमत्तेनें जो पळ काढला, तो ती अद्यापर्यंत गोमांतकप्रांतांत येण्यास भिते !

अशा रीतीनें आपली कारकीर्द संस्मरणीय करून गव्हर्नरसाहेब निजधामास गेल्यानंतर त्या जागीं इ. सन १८२७ त फेब्रुवारीच्या ९ तारखेस सि. मानवेल पोर्तुगाल कास्त्र या नांवाचे इसम आले. हे प्रथम परिस्थितीचें निरीक्षण करण्याकरितां एक दोन वर्षें शहर सुधारणेंत घालून रस्ते, इमारती, धक्के इत्यादि गोष्टींत राबूं लागले; पण त्याही गोष्टींना पैसा हा पाहिजेच, आणि 'नाकापेक्षां मोतीं गोठें' या म्हणीप्रमाणें लष्करी खातें फार वाढलें असल्याकारणानें उत्पन्नाचा अर्धा पैसा तें खातें गट्ट करीत असे व असें असलें तरी गोवा सरकारास त्यापुढें सून होऊन सासूपणाचा मान त्या खात्याला द्यावा लागे. अर्थात् त्या खात्यावर कातर धरण्याची हिंमत होईना. पैशाची तर जरूरी फार तेव्हां, पैसा कसा उत्पन्न करावा हा प्रश्न प्रत्येक गव्हर्नरास सोडविणें भाग पडे व तो प्रश्न शेवटीं दांत नसलेल्या गाईप्रमाणें प्रजेवर कर वाढवा अशीच सल्ला मिळून प्रचारांत येई. वाढलेला जमीनसारा कमी करण्याबद्दल विनंत्या येत तर सरकार तो न भरल्याबद्दल एझेकुसांव ( Execucao ) चा सोडगा दाखवून तो चापून वसूल करण्यांत आपली हिंमत दाखवी. त्यावर आणि कोंत्रिबुइसांव द रेजीस्त ( Contri ouieao do Registo ) हा कायदा करून पैसा उत्पन्न करण्याची योजना करण्यांत आली. यावेळीं सत्त-

रीच्या लोकांनीं आपली जमीन पिकाच्या बाबतींत अगदीं नादान असल्यानें पडीत जमिनींत लागवड करणें मूळचेंच कठीण; त्यांत जुन्या काबिजादींत केलेला कायदा येथें लावूं नये; त्या जमिनींचें उत्पन्न व या जमिनीचें उत्पन्न ध्यानांत घ्या; आणि आमच्यावर दशांश कर न लादतां कायम धान्याची पद्धत अमलांत आणा; 'भरडकुमेर' करण्यास आम्हांला परवानगी द्या; आणि तुमचे धार्मिक जुलूम आमच्यावर चालवूं नका; अशी इच्छा दर्शविली; तेव्हां एकमेकांच्या विरुद्ध इच्छांत मेळ न पडून प्रजेंत असंतोष वावरूं लागला. यावेळीं सावंतवाडींतही कांहीं लोक बिथरून सत्तरींतील राण्यांना येऊन भेटले, आणि त्या हद्दींत आत्मा चौकेकर, भोजसावंत माण-गांवकर आणि सदाशिव रामचंद्र जोशी यांनीं धुमाकूळ सुरूं केला. त्याचप्रमाणें या हद्दींतही कांहीं राण्यांचीं घराणीं बंडांत सामील होऊन धामधूम सुरूं झाली. ही धामधूम ता. १८ सन १८२७ त चालू झाली. जिकडे तिकडे गुप्त छापे, लुटालूट, जाळपोळ, खून, दरोडे, हीं कृत्यें बंडखोरांनीं चालविलीं. त्यांच्या शमनार्थ किंवा सूडार्थ सरकारच्या लष्करी लोकांची दौड चालली. पण त्यांत तुटकी आढ्यता, कोरडी फुशारकी, नसता डौल, सगळ्या नवीन काबीजादींत हुतुतू घालीत होता.

अशा या धामधुमींत बिचाऱ्या प्रजेचें दुर्दैव आडवें येऊन सरकारचा धक्का व राण्यांची बुक्की खातां खातां घर नको, दार नको, वतनवाडी नको म्हणून जिवाच्या आशेनें कुठें तरी अर्धपोटीं रहावें लागे. कारण पांचपांचशें पगार खावून निःशस्त्र प्रजेवर शांततेच्या काळीं सिगारेटच्या झुरक्याबरोबर हिंमत गाजवणारे कॅप्टन गोळी लागेल या भीतीनें गर्भगळीत होऊन जात व मेंढरांबकऱ्यांप्रमाणें पुढें ढकललेले शिपाई राण्यांना न दुखवतां हवेंत वायबार काढून भटकत. यामुळें येथल्या बंडाचा बंदोबस्त करणें बिकट किंबहुना अशक्य होऊन तसेंच, पीडा पावणाऱ्या प्रजेच्या वाढत्या हलकल्लोळानें भेटा-कूटीस येऊन आपण घालूं त्या शर्तीवर ( बाह्यतः माफी या नांवाखालीं मोडला जाणारा ) संधि करावयाला तयार होईल असा त्यांचा अंदाज होता व तसा संधि जोंवर घडून येत नाहीं तोंवर आपले अत्याचार ते उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणावर करीत सुटले होते. सरकारासही आपल्या पगारखाऊ लष्कराची

हिंमत कळून चुकली होती. तेव्हां त्यानें राणेलोकांशीं सलोख्याचा तह करून बंडाची शांतता केली, तरी बंडामुळें झालेला खर्च ढेरपोट्या लष्करी खात्याची बोळवणी आणि इतर खात्यांचा खर्च चालविणें कठीण होऊं लागलें व जिकडे तिकडे नोकर लोकांची हाकाटी चालूं झाली.

आतां या लोकांची योग्य सम्भावना कशी व्हावी या विवंचनेंत गोवासरकार पडलें असतांना शेवटीं अनावश्यक सैन्य कमी करावें, या हेतूनें एक दोन तुकड्या कमी केल्या; पण मजा अशी झाली कीं, कमी केलेल्या लोकांनीं राणेलोकांस मिळून उलट मंत्र दिला आणि सरकारनें जरी तुह्मांस वरपांगीं माफी दिलेली असली, तरी सरकारच्या मनांत कपट असून वेळप्रसंगीं तें तुमच्या पुढाऱ्यांना कैद करून बाहेर पाठविण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं; तेव्हां पुन्हां बंड चालवाव आह्मींही तुह्मांस मदत करूं अशी मसलत दिली? आणि सरकारनेंही धार्मिक जुलमांत किंवा दशांश रद्द करून कायम धारा सुरू करण्याचें औदार्य न दाखविल्यामुळें सरकारच्या हेतूचा आपलपोट्यालोकांनीं केलेला विपर्यास कांहीं राण्यांना खरा वाटला व राणे यांनीं पुन्हां बंड केलें! ही बातमी पोर्तुगालास समजून गव्हर्नरच्या जागेवर पाठविलेल्या इसमाच्या अल्प कारकीर्दीत पुनः पुन्हां बंडें कां उद्भवतात? तेथील कारभार त्यांना संभाळतां येत नाहीं कीं काय? असा प्रश्न राजदरबारीं घोळूं लागला. त्याची बातमी सि० मानुएल पोर्तुगाल कास्त्र यांनाही लागली. आपल्या हितशत्रूंनीं आपणांविरुद्ध माजविलेलें काहूर थंड पडावें व आपल्या नांवाची बदनामी होऊं नये ह्मणून तेही काळजी घेऊं लागले. त्यांनीं वस्तुस्थिति पोर्तुगालदरबारीं कळविली; पण तेथें पोर्तुगालदरबारांत पक्षांधपणा माजल्यामुळें समाधानकारक उत्तर मिळेना. शेवटीं शिपाई व राणे यांशीं सामोपचार करून पुन्हां उठलेल्या बंडाची शान्तता केली; कमी केलेल्या तुकड्या कायम केल्या; विश्वासघात न होण्याबद्दल हमी घेतली; व लोकोपयोगी गोष्टी करण्यांत मन घालूं लागले; परंतु पक्षभेदाच्या गोष्टीसाठीं कारकीर्द पुरी होण्याच्या पूर्वींच त्यांना आपलें आसन हालवावें लागलें. कारण, इन्डीयनाचें वर्चस्व यूरपीयनांना नको होतें, तर यूरोपीयनांचा अतिरेक इण्डीयनांना असह्य होत होता. या अशा अदावतीचें पर्यवसान पुढील गोष्टींत झालें:—

दुसऱ्या दोना मेरी राणीच्या वशिल्यानें पोर्तुगालमध्यें विद्याभ्यासास असलेल्या गोंव्यांतील नेवरें गांवच्या सि. बॅनार्द पॅरिस् द सीन्व्ह नांवाच्या मनुष्यास गोंव्यांत गव्हर्नरच्या जागीं नेमावा, अशी प्रधानमंडळाची इच्छा होऊन त्याप्रमाणें त्याला इ० स० १८३५ सालीं जानेवारीच्या १४ तारखेस हुकूम मिळाला. त्यांत त्याला कामदार-ऑफिसर कमजास्त करण्याचा अधिकारहि देण्यांत आला. या गोष्टीमुळें कांहीं युरोपीयन लोकांच्या पोटांत नसता मत्सरी वायगोळा फिरूं लागला. सि. सीन्व्ह यांनीं निर्मत्सरी मनानें पोर्तुगालाहून येतेवेळीं सेक्रेटरी, लष्करी अधिकारी आपल्या पूर्ण विश्वासाचे तिकडून येतांना आणले होते. असें असतां त्यांनीं गोंव्यांत येऊन आपल्या अधिकाराचा चार्ज घेऊन अवघे अठरा दिवस झाले असतील, इतक्या अवधींत कांहीं यूरोपस्थ मत्सरी लोकांनीं त्यांचा खून करावा ह्मणून Murdering Club स्थापन करून ते पानवेल येथें रहात होते. त्या घरावर कटवाल्या लोकांनीं दरवडा घातला व त्यांचा खून केला. त्यांत त्यांनीं पोर्तुगालहून आणलेले लष्करी सेनापति सिं. फोर्तुनातु द मॅल हेही होते. सारांश, या यूरोपीयन लोकांना दुसऱ्याच्या हाताखालीं राहणें नको; पण यांचा सासूपणा तेवढा इतर लोकांनीं सहन केला पाहिजे ! काय ही दुर्निवार इच्छा ! ! या इच्छेला जोंपर्यंत मि. बुचननच्या विचाराचे किंवा प्रो. एम्. व्हीक्टर बॉसच्या विचाराचे लोक मिळाले असते, तोंपर्यंत मात्र ' याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ' या न्यायानें सत्तरप्रांतांत वेळीं अवेळीं उठणारीं बंडें हीं पोर्तुगीज सत्ता नष्ट करणारीं नसून केवळ यूरोपीयन अथैव युरेजीयन यांच्या सासूपणाचा ससेमीरा लागल्यामुळेंच उठत होतीं. त्यांत दोन्हीं अंगें जर शाबूत समबल असतीं तर वरीलसारखा जगाला अनुभव आला असता; परंतु इकडील वस्तुस्थितीच अशी विपरीत आहे कीं, एक अंग जर अज्ञानांत तर दुसरें सज्ञानांत; एक अंग जर अधिकारी तर दुसरें बिनअधिकारी; एक अंग जर सशस्त्र तर दुसरें निःशस्त्र; एक अंग जर लक्षाधिश तर दुसरें भिक्षाधीश. त्यामुळें एका पक्षाला दुसऱ्या पक्षावर वाटेल तसे अनुच्चारीत, ओंगळ, गलीच्छ आरोप लादून भरडून काढतां येतें. तेंच जर त्यांच्यांत बुद्धिबल असतें तर पोर्तुगालांत जाऊन त्यांनीं आपला रास्त न्याय राजदरबारीं लढकावला असता, ह्मणूनच ह्मणतात कीं, 'बुद्धिर्यस्यबलं तस्य निर्बुद्धेस्तु कुतो बलम् ? ' असो,

हे केखोर युरोपीयनांनीं आकांडतांडव करून पुनश्च सि. मानुएल काम्रा-सच गव्हर्नरच्या जागीं बसविला; तेव्हां ही बातमी पोर्तुगालास समजून कटवाल्यांस धरून पाठविण्यासाठीं सि. लॉमिस् लीम नांवाच्या इसमास गोव्यांत गव्हर्नर जनरल करून पाठविण्यांत आलें. याचा काळ बहुतेक राज्यकारभार तपासण्यांत आणि शिक्षणवृद्धि व इतर सुधारणा करण्यांत गेला. अशा समयीं इंग्रजांविरुद्ध सावंतवाडीस बंड सुरू झालें. कारण, दुर्गाबाई वारल्यानंतर खेमसावंताच्या चौघां बायकांतून तीन शिल्लक राहिल्या आणि त्या घरांत किंवा वंशांत पुरुषसंतति न राहिल्याकारणानें दत्तकासंबंधीं उभयतांत भांडणें होऊं लागलीं. यामुळें इंग्रजसरकारनें कॅप्टन हाचिनसन् यास सावंतवाडीचा रेसिडेंत नेमलें. त्याच्या जुलमास कंटाळून एक व दोघांच्या वादांत तिसऱ्यानें आपलें घोडें दकलून अंदाधुंदी चालवावी, मोठमोठ्या सरदारलोकांचा अपमान करावा आणि आपण निर्माल्य होऊन बसावें हें कित्येक सरदारांस न आवडून त्यांनीं खेमसावंताच्या एका बायकोस ह्मणजे लक्ष्मीबाईस आपल्या बाजूनें वळवून घेतली आणि दत्तक मुलाच्या नांवानें बंडाची द्वाही फिरवून स्वतंत्रतेसाठीं आह्मीं लढणार, असें सर्वत्र जाहीर केलें. त्यासमयीं गोव्यांतील राण्यांस मदतीस येण्यास पाचारण झालें व त्याप्रमाणें इकडील दोनशें सशस्त्र मंडळी तिकडे गेली. शिवाय हे लोक त्यांना दारूगोळ्याचीही मदत करीत असत. या गोष्टी लक्ष्यांत येऊन इंग्रजांनीं आपल्या कौन्सिलामार्फत पोर्तुगीज हद्दींतील बंडखोरांचा बंदोबस्त करण्यास इशारत दिली व तीप्रमाणें पोर्तुगीज गव्हर्नरनें आपली फौज सत्तरीस पाठवून संशयी लोकांना पकडून आणून आग्वादच्या किल्ल्यावर ठेवलें; परंतु या गोष्टीमुळें सर्व सत्तरप्रांतीं अस्वस्थता माजली. इतक्यानें सावंतवाडींतील गडबड बंद पडली अशांतलाही प्रकार नसून उलट त्या दुर्दमनीय बंडवाल्यांचा जोम वाढत जाऊं लागला. जिकडे तिकडे बंडवाले पसरले व अगदीं लष्करी ठाण्यानजिकसुद्धां जीविताचें व मालमत्तेचें रक्षण होणें दुरापास्त झालें. बरोबर हत्यारबंद लोक असल्याशिवाय कोठेंही जातां येईना. याचें एक उदाहरण असें घडलें कीं, दोन तरुण अंमलदार बेळगांवाहून वेंगुर्ल्यास घोड्यावर स्वार होऊन बरोबर जात होते. बांद्यांपासून सुमारें एका कोसावर जंगलामध्यें लपून राहिलेल्या लोकांनीं

त्यांवर गोळ्या झाडल्या व त्यांपासून त्यांपैकीं एकास प्राणांतिक जखम लागून तो त्याच दिवशीं संध्याकाळीं मरण पावला! अशाच रीतीनें यासमयीं जिकडे तिकडे बंडखोरांच्या टोळ्या धुमाकूळ घालीत होत्या. पैकीं दाजी लक्ष्मण काळे या नांवाच्या एका मनुष्यानें एका टोळीचें आधिपत्य स्वीकारून जबरीनें सरकारी वसूल घेण्यास सुरवात केली. काळे हा पूर्वी आनासाहेबांकडे खासगी नोकर होता. असो. याप्रमाणें जिकडे तिकडे धूमधडाका चालला असतां इकडील लोकांनीं बापूसाहेब पर्मेकर यांच्या नेतृत्वाखालीं बंड सुरू केलें. याला बहुतांशीं कारण लष्करी लोकांनीं जुलूमजबरदस्ती करून निरपराधी लोकांना पकडून आग्वाद येथें ठेवलें हें होय.

प्रथम हें पाहिलें पाहिजे कीं, आपल्या जातभाईला बरें वाटावें म्हणून आपल्या अंमलाखालील लोकांना बिगरचौकशी अटक करून दोन दोन-तीन तीन महिने ठेवणें आणि प्रजेच्या न्याय्य हक्कांना जुलमानें तुडवणें हें राजसूत्रें हातांत धरणाऱ्यांचें कर्तव्य होतें काय ? केवळ संशयावरून एकाद्याला कैद करणें, वाटेल त्याच्या घरांत शिरून अरेरावी दाखवणें, अशा प्रकारचें गैर-शिस्त वर्तन अधिकाऱ्यांनी कोणाचीही भीति न धरतां आचरणें, कितपत न्याय्य होतें ? ज्यांचें जीवनस्वातंत्र्य आपली सत्ता कायम टिकविण्यासाठीं फिरंग्यांनीं काडीमोल करून टाकलें त्यांच्याशीं वाटेल त्या रीतीनें सामना देण्यासाठीं सत्तरकरांनीं बंडासारखी चळवळ कां करूं नये ? इंग्लीश सावंतवाडकरांना अधिकारभ्रष्ट करूं पहात असतां वाडकरांनीं प्रसंगोपात सत्तरकरांस हांक मारल्यास जातभाईचा पक्ष धरून, 'चोरास सोडून संन्याशास सुळी' देऊं पहाणारें सरकार, अपराधी कोण आणि निरपराधी कोण याचा विचार न करतां सरसकट पकडून कैदखान्यांत कोंबूं लागलें तर त्याच्या शांतीचें मोलमाप काय करावें ? आपण यांच्याकडून शस्त्रें काढून घेऊन यांना निःशस्त्र केलें आहे, तर यांच्यावर करा वाटेल तसा जुलूम; आपण यांना शक्तिहीन केलें आहे तर पिळा यांना पाहिजे तसें; कारण यांच्यांत सामर्थ्य ठेविलेलें नाहीं तर मनास मानेल तसे कायदे करून लुटा यांना; असाच या कृतीचा अर्थ निघत नाहीं काय ? हे तुमचे कायदे आम्हांला जाचतात म्हणून आसेतु हिमाचल ओरड झाली, पण शहाणपणाचें

कंकण ज्यांच्या हातांत बांधलें गेलें आहे ते गरिबांच्या आक्रोशाची पर्वा कशाला करतील ? 'लोकांच्या आरोळ्या गोळ्यांनीं बंद केल्या म्हणजे त्या कायमच्या बंद होतील असा त्यांना भ्रम होता; पण या वेड्या पीरांना इतकें समजूं नये कीं, क्षात्रतेजाचें मानी रक्त ज्यांच्या धमन्यांतून सळसळत आहे, आपल्या शत्रूस झुलवून जेरीस आणणें हे ज्यांचे नित्याचे खेळ झाले आहेत, त्या क्षत्रिय वीरांना या आमच्या छोट्या पोर्तुगीज सैन्याची पर्वा ती काय असणार ? मथाळ्यावर दाखविलेल्या संस्कृत वाक्यांत भर्तृहरी अशा धैर्यशाली पुरुषाची प्रशंसा करून म्हणतात कीं, अग्नीची ज्वाला कितीहि बळानें खालीं चेपली, तथापि ती खालीं न जातां वरच जावयाची, त्याचप्रमाणें धैर्यशाली पुरुष अनेक संकटांनीं दडपून गेला तरी त्यास न जुमानतां तो आपली मान वरच काढितो. याची जाणीव नष्टबुद्ध पोर्तुगीज अधिकाऱ्यांना जर असती तर सत्तरकरांकडे तुच्छतेनें बघावयाला व जुलूमजबरदस्तीचें वर्तन करावयाला ते धजले नसते. ज्या अधिकारलालसेनें त्यांनीं शहरांतील लोकांना टोपलींतील सापाप्रमाणें कायद्याच्या पुंगीनें वांकवून डोलावयास लावलें, आपल्या पूर्वजांचीं चरित्रें पढवून आत्मस्वरूपीं तद्रूप केलें, त्यांच्यापुढें पाहिजे ती तुच्छता दाखविली पाहिजे, तसा अवमान केला किंवा 'कानेक–लांगोटी' अशीं विशेषणें देऊन श्रीमुख रंगविलें, तरी कोणी कांहीं करणार नाहीं; परंतु क्षत्रिय बीजाच्या नागाला डिवचून स्वस्थ घोरत पडण्याची इच्छा पोर्तुगीजांनीं करूं नये होती; कारण हा डंखी नाग केव्हां उलटेल याचा नेम नाहीं, हें अनेकदा आलेल्या अनुभवावरून सिद्ध झालें होतें व त्यावरून तरी त्यांनीं शहाणपणा शिकणें अवश्य होतें. ते न घेतां गुन्हेगार मिळत नाहीं म्हणून वाटेल त्याला पकडून कैदेंत ठेवलें आणि त्याची न्यायकोर्टामार्फत चौकशी देखील केली नाहीं म्हणून या बंडाला उठाव मिळाला, आणि सरकारी बराकी जाळणें, ऑफिसें लुटणें, ठाण्यांवर छापे घालून पोलिसांचे खून पाडणें, असलीं आसुरी कामें चालूं झालीं. इकडे सावंतवाडीसही इ० स० १८४४ त अक्टोबरच्या १२ तारखेस बंडास चांगलें रूप यावें म्हणून फोंड-सावंत यानें युवराज आनासाहेब यास पळवून नेण्याची तजवीज केलीच होती. यावेळीं आनासाहेबाचें वय १६ वर्षांचें होतें व त्यांस बंडांत सामील

होण्याची फूस बापूसाहेबांची कनिष्ठ बायको जानकीबाई स्वतः देत होती. तिची मसलत अशी होती कीं, तो सरकारच्या रोषास पात्र झाला म्हणजे गादीचा अधिकार आपल्या मुलास मिळेल. बंडवाल्यांचा जोम दिवसेंदिवस वाढूं लागला. त्यांनीं मनोहर किल्ल्यावर हल्ला चढवून तो घेतला व जिकडे तिकडे आपले चौकी पहारे ठेविले. यामुळें पोलिटिकल एजंट जेकब साहेब गांगरून जाऊन त्यांनीं परिस्थिति भयंकर असल्याबद्दल मुंबईसरकारास कळविलें, तेव्हां मुंबईच्या गव्हर्नरांनीं मद्रासी काळ्या लोकांची फौज हाताखालीं देऊन मेजर लॅमिंग्टन यांस सावंतवाडीस पाठविलें. तसेंच निवातीच्या किल्ल्यांतून कर्नल आवत्राम हेही आपल्या सैन्याची तुकडी घेऊन तिकडे दाखल झाले. जिकडून तिकडून सैन्याची कुमक पोंचल्याबरोबर बंडखोरांचें धाबें दणाणलें. इकडे गोव्यांतही नवीन गव्हर्नर येऊन त्यानें बंडाचीं कारणें लक्षांत घेऊन संतोषानें बंडखोरांशीं समेट केला; संशयीत आरोपावरून कैद केलेल्यांना सोडून दिलें. माफीची द्वाही फिरवून शांतता केली; यामुळें वाडीच्या बंडवाल्यांना गोव्यां-तील बंडखोरांकडून मिळणारी दारूगोळ्याची मदतहि बंद झाली. वाडीस लष्करी कायदा पुकारून बंडखोरांस गोळ्या घालून ठार करूं लागले. शिवाय एक जाहिरनामा प्रसिद्ध होऊन लोकांना असें कळविलें कीं, जो कोणी फोंडसावंत तांबूळकर यास किंवा त्याच्या चौघां मुलांस पकडून देईल त्यास तीन हजार रुपये व इतर प्रमुख बंडखोरांस पकडून दिल्यास दोन हजार रुपये बक्षिसादाखल देण्यांत येतील. या साहेबी आमिषास लुब्ध होऊन आपसांत फंदफितुरी माजल्याकारणानें व पुढें हिंमतीनें बंड चालविण्याची साधनसामुग्री दुर्मिळ झाल्यामुळें साधकबाधक गोष्टींचा विचार करण्याकरितां सावंतवाडीचे बंडखोर पोर्तुगीजांच्या हद्दींत पेडण्यानजीक विनोंडेस आणि सत्तर प्रांतीं येऊन राहिले व आपले हेतु व स्थिति पोर्तुगीज सरकारास कळवून दयेची याचना केली. तीस पोर्तुगीज गव्हर्नर इयुजे फेरेर पेस्तन यांनीं मान देऊन त्यांना असें कळविलें कीं, तुह्मीं खुशाल आमच्या शहरीं येऊन रहावें; तेव्हां बडी बडी मंडळी पणजीस आली. त्यांचा यथायोग्य सत्कार होऊन त्यांना इतमामाप्रमाणें रहाण्यास जागा दिली गेली. यावेळीं

पणजी शहरांत दोनशें बंडवाले पोर्तुगीजांच्या आश्रयास आले होते. हें वर्तमान मुंबईस कळवून कर्नल औद्राम यानें बांद्याच्या पूर्वेस गोव्याच्या हद्दीवर मद्रासी पलटणी आणून गोव्यांत पळून गेलेल्या बंडवाल्यांचे आणि त्यांच्या आप्तेष्टांचे संबंध तोडून टाकले व गोवा सरकारास शह दिला. नंतर गोवा सरकारच्या 'सेक्रेटार' गॉमिस व सावंतवाडी येथील सैन्याधिपति स्नायडर यांच्या मुलाखती झाल्या; परंतु त्यांपासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं; तेव्हां मुंबईच्या गव्हर्नरांनीं बंडखोरांस आपल्या स्वाधीन करावें म्हणून कॅप्टन आर्थर यांस पणजीच्या गव्हर्नराकडे पाठविलें. तरीहि त्यांची इच्छा सफळ झाली नाहीं. पुढें कंपनीचे मुख्य सरदार जेकबसाहेब पणजीस येऊन त्यांनीं पुष्कळ खटपट करून पाहिली; पण तीहि व्यर्थ गेली. शेवटीं बंडवाल्यांनीं आपणास माफी मिळावी म्हणून अर्ज केला. पोर्तुगीज सरकारनेंही जेकबसाहेबांकडे सावंतवाडीच्या बड्या मंडळींसाठीं बरीच शिफारस केली आणि जर सरदार मंडळींस आपण माफी करीत असाल तर बाकीच्या मंडळींस आफ्रिकेस पाठविण्याचें काम आम्हीं करूं असें सांगितलें; तेव्हां ही बातमी मुंबईच्या गव्हर्नरास कळवून उभयमतानें फोंडसावंतास व त्याच्या मुलांस आणि केवाळकर, उसपकर, तांबुळकर, हूमसकर, बापूसाहेब घाटगे इत्यादि पंचवीस सरदारांस माफी मिळून बाकी १६१ इसमांस पोर्तुगीज सरकारनें काळ्या पाण्यावर आफ्रिकेंत पाठविलें आणि सर्वत्र शांतता प्रस्थापित करून पेस्तनसाहेब अस्तास गेले. कॅथोलिकधर्माचे पुरस्कर्ते व दुरभिमानी बारांव द वोरें नांवाचे इसम गोव्याच्या गव्हर्नर पदावर आरूढ झाले. यांच्या अमदानींत गोव्यांत सुलतानशाही सुरू झाली; धर्मभेद, वर्णभेद माजले, राजदरबारीं हिंदूच्या मतांस मान न मिळून सक्तीचे कायदे सुरू झाले. लष्करी लोकांचें वर्चस्व वाढलें व पाद्र्यांचा धिंगाणा सुरू झाला, सारांश, हमकरेसो कायदा होऊन मोर्टेगपातशाही सुरू झाली. पूर्वीं आश्वासन देऊन संरक्षण केलेले कित्येक हक्क तुडविण्याची इच्छा होऊं लागली व त्यामुळें जें अस्वस्थतेचें साम्राज्य माजलें त्याचें वर्णन पुढील प्रकरणांत करूं.

## दुबळ्यांनीं केलेला आक्रोश हा समर्थांनीं चालविलेल्या जुलमाचा प्रतिध्वनि होय !

मोहद्राजा स्वराष्ट्रंयः कर्षयेत्यनवेक्षया ।
सोऽचिराद् भ्रश्यते राज्याज्जीविताच्च स बांधवा ॥

आपल्या गोवाप्रांताच्या भूतकालीन गोष्टी वाचल्या तर आपणांस असें कळतें कीं, या प्रांताच्या गळ्यास पोर्तुगीजांनीं पारतंत्र्याची तांत लावली, त्यावेळेपासून त्याच्या सर्व गात्रांस असह्य ताप होऊं लागला, राजकीय स्वातंत्र्य नाहींसें झालें. धर्माची राखरांगोळी झाली; संपत्तीची अतोनात लूट झाली. जनतेस पराकाष्ठेचा ताप सहन करावा लागला, देशत्याग, धर्मत्याग, किंबहुना सर्वस्व त्याग याचा सुकाळ झाला आणि जुलूम, बळजबरी यांचें सैतानी साम्राज्य राजरोसपणें चालूं झालें. अशा शोचनीय स्थितीचें चित्र आपला जुना इतिहास पाहिल्याबरोबर नजरेस आल्याशिवाय रहात नाहीं. एकामागून एक असे आपत्तींचे घाले सहन करतां करतां आपल्या पूर्वजांच्या नाकीं नव येत असलेले दिसून येतात. अशी दुर्धर अवस्था होण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे "राजा कालस्य कारणम्" हेंच होय. नवीन गव्हर्नराच्या उदयाबरोबर लोकांच्या अंत:करणांत उगवलेलीं अनेक आशाकमलें सत्ताधिकाऱ्यांनीं आपल्या दुष्कृतीरूप प्रखर दावानलानें करपवून टाकलीं आणि सर्वत्र असा उलट अनुभव आणला कीं, पोर्तुगालांतील उदारमतवाद्यांच्या प्रयत्नानें ज्या तुटपुंज्या सवलती मिळाल्या त्यांस अनुसरून गोवासरकारच्या कायदेकौन्सिलमध्यें इ० स० १८५१ सालीं प्रजेच्या वतीनें सिं. बेर्नार्द फ्रांसीस्क द कॉस्त हे बसले असतांना लष्करी लोकांची तुंबडी भरण्यासाठीं गोव्यांतील ग्रामसंस्थांची इतिश्री करण्याचा विचार आणि एक दोन कर लोकांवर बसवून पैसा उत्पन्न करण्याचा विचार ठरविला होता; त्यास जनपदहितार्थ कॉस्त साहेबांनीं कसून विरोध केला ह्मणून तत्कालीन सरकारी पक्षाचे लोक त्याच्या विरुद्ध होते. इतकेंच नव्हे तर त्यांचा त्यांनीं सारखा छळ मांडला होता. या बौद्धिक युद्धाची पर्वा सत्तेनें केली नाहीं, ह्मणून शस्त्रांनीं सत्तेला पायबंद घालण्याचे विचार

आपसांत चालले होते. अशा समयीं हिंदूंच्या उत्सवांत अधिकारी ढवळाढवळ करून, येशूख्रिस्त मेला ह्मणून आह्मीं जसा दुःखदिन पाळतो तसाच तुह्मीही पाळला पाहिजे करितां वाद्यें बंद ठेवा व तुलसीवृन्दावनें दारांत ठेवूं नका; अशी सक्ती करूं लागले सन १८१२ त जरी सर्वांच्या मोहबतीखातर धर्मसमीक्षणसभेचें कार्य विशेषतः इंग्लीशांच्या आग्रहावरून बंद केलें, तरी सत्तेच्या जोरावर मधून मधून आर्चबिशप साहेबांना विक्षिप्त लहर लागून गव्हर्नर साहेबासही तीस बळीं पडावें लागे; कारण एकाद्या गव्हर्नरास ठेवण्या न ठेवण्याची हिंमत त्यांच्या अंगांत होती. सारांश, अडाणी लोकांत जुलमी सत्तेबद्दल अप्रीती तर सुशिक्षित लोकांत कौन्सिलच्या फार्साबद्दल नाखूषपणा दिवसोंदिवस वाढत जात होता. वस्तुतः राज्यकर्त्या लोकांचे विचार स्थीर असावे लागतात. ' क्षणं वित्तं क्षणं चित्तं ' किंवा घटकेंत उदारमतवादी बनून प्रजेचे मेंबर कौन्सिलांत घेणें व घटकेंत या मेंबरांस न जुमानतां एकतंत्री स्वैर सत्ता गाजविणें, अशा स्वभावाच्या माणसांकडून कोणते अनर्थ घडतील हें सांगणें अशक्य आहे. आपण तिसऱ्या प्रकरणांत चर्चा केल्याप्रमाणें लोकपक्षाकडून आह्मांला हा कायदा मान्य आहे, अशी कबुली दिली गेली, तरच त्याला कायदा हें अन्वर्थक नांव देतां येईल व जोंपर्यंत असें झालेलें नाहीं, तोंपर्यंत त्यास कायद्याचें स्वरूपही देतां येणार नाहीं. कायदे कौन्सिलच्या रचनेच्या मुळाशींही हाच मुख्य हेतू आहे. हल्लींच्या कायदेकौन्सिलांत या मूळ हेतूकडे लक्ष देऊन काम होत नाहीं हें जगजाहीर आहे आणि ह्मणूनच टीकाकार असल्या बैठकीला फार्स अगर नाटक हें नांव देत असतात; परंतु कौन्सिलच्या कार्यक्रमावर टीका करण्या पलीकडे आतां आपल्या हातांत काय राहिलें आहे ? तेव्हां आमचें सरकारास इतकेंच सांगणें आहे कीं, शांततेनें रहाणाऱ्या लोकांना क्रांतिकारक बनूं न देण्याबद्दल खबरदारी घेऊन सरकारनें आतां ही परिस्थिति बदलून टाकली पाहिजे कारण, कायदे करणें हें आतां बऱ्याच अशीं पोर्तुगीज गव्हर्नराच्याच हातांत असल्यामुळें सरकारला वाटेल तो कायदा करतां येतो; परंतु सरकार हल्लीं करीत असलेल्या कायद्याच्या मुळाशीं वर सांगितलेल्या निरपेक्ष बुद्धीचा अभाव असल्यामुळें त्यांचा बोज नाहीसा

होऊन तो शांतता उत्पन्न करण्याऐवजीं अशांतताच उत्पन्न करण्यास कारणीभूत होत आहे आणि ह्मणूनच हल्लींच्या परिस्थितींत कायद्याच्या समशेरीचा कांहींच उपयोग होणार नाहीं, असें तत्कालीन बौद्धिक योद्धे ह्मणजे सिं. फिलीप नेर, सिं. कॉस्त वगैरे पुढारी नानाप्रकारें सरकारास बजावीत होते. आजपर्यंत कायद्याचा हा नाहींसा झालेला बोज पुन्हां उत्पन्न करण्यास पोर्तुगीज सरकारनें कायद्याचें हें धोरण सुधारलें पाहिजे; पण ही सुधारणा ह्मणजे काय? तर अलिकडे दिवसेंदिवस; कायदा व न्याय यांत पडत चाललेला फरक अगदीं काढून टाकणें हाच होय; ह्मणजे कायदा न्यायाला अनुसरून केला पाहिजे. कायद्याचें सौभाग्य न्यायाच्या हातीं असतें. या दोघांत प्रपंच नसतो तोंपर्यंत लोकांचा कायद्यावर विश्वास असतो. यामध्यें बेबनाव आला कीं, लोकांची न्यायावरील श्रद्धा डळमळूं लागून कायद्याचा बोज कमी होऊं लागतो, ह्मणून कायदा व न्याय यांमध्यें बेबनाव नसला पाहिजे. कायद्याची समशेर न्यायाच्या हातांत असली पाहिजे; आणि तसें असेल तरच कायद्याच्या समशेरीनें न्यायाला अनुरूप अशीं उदात्त कार्यें घडून येतील नपेक्षां सुलतानशाहीसुद्धां कायद्याच्या सहाय्यानें करून दाखवितां येईल; तेव्हां ग्रामसंस्थेसारख्या जुन्या व फायदेशीर संस्थांचा नायनाट करण्यास जे कोणी तयार झाले होते, त्यांबरोबर लढण्यासाठीं "बोस्केज" हा ग्रंथ तयार झाला होता. त्यांत त्यांनीं ग्रामसंस्थांची उत्पत्ति, त्यांचें ऐतिहासिक महत्त्व, अर्थशास्त्रदृष्ट्या फायदे, इत्यादिकांचें यथायोग्य प्रतिपादन केलेलें आहे.

या सिं. फिलिपनेरच्या श्रमांबद्दल ग्रामसंस्थांनीं सदैव आभारी असलें पाहिजे, कारण ग्रामसंस्थांचें आजवर संरक्षण होण्यास तेच बहुतांशीं कारणीभूत झाले आहेत. या बुद्धीबलाला त्यावेळीं सत्तरींतील क्षत्रियांचें क्षात्रबल अनपेक्षितपणें सहाय्य झालें. तें झालें नसतें तर आज ग्रामसंस्था ह्मणून मोव्यांत दिसली नसती. असो, सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, असंतोष, माथेफिरूपणा किंवा बंडाची धामधूम समूळ नाहींशी करण्यास कायद्याची समशेर कुचकामाची आहे. अगोदरच कायदे हे गुन्ह्यांचे साथीदार हें वर दाखविलेंच आहे. अशा स्थितींत ते आणखी कडक केले तर

अधिक भयंकर गुन्हे घडवून आणण्यांस कारणीभूत होतील हें जाणून गोवा सरकारनें वेळींच सावध व्हावयाला पाहिजे होतें; पण तसें न करतां केवळ सत्ताबलावर आपल्या हातांत हक्कानें घेतलेली कायद्याची समशेर अधिक कडक करण्यासाठीं परजीत बसणें हें राजनीतिनैपुण्याचें चिन्ह नसून अहंमन्यतेची बुडपशाही आहे. अशावेळीं ईश्वरी इच्छेनें निःशक्तांनाही बळ चढून ठोकर खावी लागते ! तेव्हांच न्यायाचा हात सढळ सोडण्याची बुद्धि होते. याचें ढळढळीत उदाहरण म्हणजे दिपाजी राण्याचें बंड होय. हें बंड सरकारच्या अरेरावी कायद्यांनीं आणि सरकारच्या बेफाम नोकरांच्या चढेलपणामुळें उद्भवलें. तें असें कीं, “ सन १८५१ त आगष्ट माहेच्या १४ तारखेस कुंमारखणींतील दिपा राणा अडवयच्या ओढ्यावर मासे धरण्यास बसला होता. थोड्या वेळानें तो कांहीं मासे धरून घेऊन येत असतां त्यानें वाटेंतील झाडींतून माजीच्या मांडवास उपयोगी पडणाऱ्या सात आठ मेढी तोडून घेतल्या. हातांत दोरीला गुंफलेले मासे व डोकीवर मेढींचा भारा घेऊन घरीं येत असतां वाटेंत एका गुत्त्यापुढें “ग्वार्द व मातुस्” या नांवाचा सरकारी रानसंरक्षक भेटला व त्यानें दिपाकडे मासे आपणास दे म्हणून मागितले. तेव्हां दिपानें आपण खटपट करून धरलेले मासे तुला देण्याला काय तूं असा मोठा खाणारा पडला आहेस ? असें म्हणून तो नेटानें पुढें जाऊन कांहींसें पुटपुटला.

आपल्या मागणीचा अनादर करून हा भलतेंच वर बोलतो व विकट हास्य करून उपहास करितो; तेव्हां त्याला आपल्या अधिकाराचें कांहीं तेज दाखवावें या हेतूनें तो ग्वार्द त्याच्या मागोमाग धांवत जाऊन त्यानें मान्याला हात घातला आणि त्याला जबरीनें मागें फिरवून दारूच्या गुत्त्याजवळ आणलें व तूं हीं झाडें कोणाच्या हुकमानें तोडलींस असा प्रश्न केला. दिपानें तेवढ्याच धिटाईनें उत्तर दिल्याकारणानें ग्वार्द चिडून जाऊन त्यानें दिपाच्या श्रीमुखांत एक भडकावली. या गोष्टीनें जन्मतः मानी असलेल्या दिपाचा राग अनावर झाला, परंतु ही वेळ सूड उगविण्याची नव्हती म्हणून त्यानें त्यावेळीं त्या ग्वार्दाला इतकेंच सांगितलें कीं, या तुझ्या उन्मत्तपणाचा बघपा एक दिवस काढीन तरच मी नांवाचा दिपा

असें ह्मणून तो खिन्न मनानें घरीं गेला. पण त्याला ग्वार्दीच्या सुडावांचून दुसरी कोणतीच गोष्ट गोड वाटेना. वस्तुतः दिपा ह्मणजे मदिरादेवीचा कट्टा उपासक; परंतु मानभंगानें त्याचें व्यसन त्या वेदनांची विस्मृति पाडूं शकलें नाहीं, किंवा बायकापोरें मोह घालूं शकलीं नाहींत. शूर पुरुषांची गोष्ट अशी असते कीं, 'मरणे क्षणिकं दुःखं—मानभंगो दिने दिने.' इकडे 'मोटकीं कालसावें' ऊर्फ तोकडी विजार घातल्यावांचून खेडेगांवांतील लोकांनीं शहरांत येऊं नये; चोळ्या घातल्यावांचून बायकांनीं शहरांत फिरूं नये; पालख्या फिरवणें, प्रसिद्धपणें उत्सव करणें, नामटिळे लावणें वगैरे गोष्टी बंद कराव्या; तुलसीवृंदावनें दारांत ठेवूं नयेत; अशा सारख्या विचित्र हुकुमानीं प्रजा नाखूष झाली होती. त्यांत देवीच्या आजारांकरितां तोटके काढण्याचें बंद करून डॉक्टर लोक पीडापीड करूं लागले आणि ग्रामसंस्थांवर गदा आणल्याकारणानें सुशिक्षित लोकांतहि गवगवा झाला होता. अशा समयीं राणे व सरदेसाई यांनीं केलेल्या मागण्यांचा गव्हर्नरसाहेबांनीं अव्हेर केल्यामुळें दिपाला पुढें करून बंड पुकारण्यांत आलें. प्रथम दिपानें ग्वार्दीवर हल्ला करून त्याला पूर्वस्मृति देऊन खून पाडला आणि तो "पोस्त" जाळून नाणसाच्या कोटाला आग लावली. याप्रमाणें बंडाचीं पूर्वचिन्हें दृष्टोत्पत्तीस आल्यावर तरी आमच्या सरकारनें निर्विकार मनानें त्याची छाननी करून एकाच खुनानें शहाणपणा घेतला असता, तर पुढें आणखी हजारों खून, लाखों रुपये खर्चून सतत सात वर्षें दुबळ्या प्रजेला आक्रोश करून त्राहि त्राहि भगवान् ह्मणावयाला लावलें नसतें. एकदां सोडून सतरांदां बंडाच्या वळशांनीं भंडावून सोडलें, तरी ज्यांचा कोडगेपणा जात नाहीं, अशांना ह्मणावें तरी काय ? हरतऱ्हेनें आपल्या प्रजेस पिळून काढून संपादलेल्या द्रव्यावर स्वतःची चैन चालविणाऱ्या राज्यकर्त्यांत आणि पोटाची आग शमविण्याकरितां आपलीं पिलें भक्षिणाऱ्या क्रूर श्वापदांत अंतर तें काय ? पण व्यवहारांत चांगल्यापेक्षां वाईटच जास्त आढळतें, ही सगळ्यांच्या परिचयाची गोष्ट आहे. 'शैलें शैलें न माणिक्यं—मौक्तिकं न गजे गजे' या प्रमाणें दुराचारी राज्यकर्ते मुबलक व सदाचारी असे प्रजापालक थोडेच निपजतात; इतिहास हीच साक्ष देत आहे. आणि ह्मणूनच अधिकार हा

शब्द जुलूम या शब्दाचा समानार्थक आहे, असा सामान्य समज झाला आहे. आणि या नियमास अनुसरूनच कीं काय नकळे, त्यावेळीं गोव्याचें राजकारण चाललें होतें; व या राजकारणास अनुसरूनच बंडें होत होतीं. बंड ही गोष्ट उद्वेगजनक तर खरी; परंतु बंड करण्यापर्यंत पाळी आणून परिस्थिती घोर करणें व शांत असणाऱ्या माणसांना बंडखोर बनवणें या गोष्टी राज्यकर्त्यांच्या हातांतील असून अधिकारमदानें त्यांकडे दुर्लक्ष करणें ह्मणजे चांगल्या घरास आग लावून ती विझविण्याकरतां धांवपळ करणें हें कृत्य कोणी तरी शहाणपणाचें ह्मणूं शकेल काय ? हातांत सत्ता सांपडली ह्मणून पोर्तुगीज लोक हिंदी प्रजेचे वाटेल तसे लचके तोडूं लागले तर ज्यांना त्यांची असह्य कळ लागेल त्यांनीं बंड कां करूं नये ? दंडांत हिंमत असून कोंडमारा झाला असतां त्याचा प्रतिकार न करतां रडत बसणें हें नामर्दपणाचें काम आहे. तशांत श्वेतद्वीपस्थांचे बूट पॉलिश करून ताटाखालचीं मांजरें बनलेल्या लाचार माणसांना रांडेबटकीचा ह्मणून वरिष्ठानें सुप्रसन्न होऊन खायाला घातलें, ह्मणजे तो आपला देव समजून ते लाळ घोटावयाला लागतील आणि यांतच आपल्या देहाची इतिकर्तव्यता झाली असें मानणारे हरीचे लालही पुष्कळ सांपडतील. परंतु स्वतःच्या इभ्रतीसाठीं, इज्जतीसाठीं आणि स्वसत्वसंरक्षणासाठीं ज्यांनीं आपलें जीवित कःपदार्थ मानलें अशा मानी पुरुषाला बायकामुलें मोह पाडूं शकत नाहींत. घरादाराची पर्वा वाटत नाहीं व स्वतःच्या अपमानाच्या भरांत तो कोणतेंही भयंकर कार्य करूं शकतो. याबद्दलचीं उदाहरणें इतिहास पुष्कळ देऊं शकेल तात्पर्य काय, प्रजाजनांनीं केलेल्या न्याय्य विनंत्यांकडे ढुंकून न पहाणें, खालच्या नोकरांनीं बुद्धिपुरस्सर केलेली दांडगाई लक्षांत न घेतां त्यांचीच बाजू उचलून धरणें आणि आपल्या हातांत सत्ता आहे ह्मणून त्या सत्तेला बेकदर उच्छृंखलपणानें मरधांव सोडून शहाणपणाची शेखी मिरविण्यांत धन्यता मानणें अशा गोष्टी ज्या ठिकाणीं घडतात, त्या ठिकाणीं खून, मारामाऱ्या, दंगेधोपे, जाळपोळ, दरोडे, छापे हे घडून आले तर त्यांत कांहींच नवल नाहीं. कारण कीं, या जुलमी कायद्यांनीं वैतागलेल्या रशियन लोकांनीं प्रबळ झार बादशहाला अर्जविनंत्यांनीं विनवून पाहूनही जेव्हां दाद लागेना तेव्हां

ध्वनीस प्रतिध्वनी या न्यायानें वागण्याचा विचार करून ते जुलमास खुना-नींच उत्तर देऊं लागले. मात्र ते सुशिक्षित असल्यानें त्यांच्या सर्व गोष्टी टापटिपीनें व व्यवस्थित होत असत. आणि सतरींतील लोक अशिक्षित असल्यानें त्यांच्यांत अव्यवस्थितपणा दिसून येत असे. राशियन लोकांनीं अराजक लोकांना नीहीलिस्ट असें नांव देऊन आपल्या कार्यप्रसारार्थ जिकडे तिकडे संघ स्थापून आपल्या ध्येयाचा जो एक जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यांतील सारांश असा होता.

" लोकांच्या हितरक्षणार्थ व ईश्वरदत्त मानवी हक्क राखण्यासाठीं लोकप्रतिनिधींची सभा बोलवा, मतस्वातंत्र्य व मुद्रण-स्वातंत्र्य द्या, लोकमत प्रदर्शनार्थ जाहीर सभा भरविण्यास कोणत्याहि प्रकारच्या हरकती नसाव्या, गरीब रयतेविरुद्ध केलेले जुलमी कायदे रद्द करावे, दुष्काळांत गरीब लोकांच्या होणाऱ्या उपासमारीबद्दल सरकारनें काळजी घ्यावी, आणि राजकीय कैदी बिनशर्त मोकळे करावे. "

या मागण्यांचा सरकारनें मुलाजा न ठेविल्याकारणानें जनरल बाव्री फॉक, एम्. डी. प्लेहव्हे मुख्य प्रधान अशांचे खून पडूं लागले, तेव्हां स्वैर वागणाऱ्या लोकांना आपणांभोंवतीं किती भयंकर कांटेरी जाळें पसरलें आहे याची जाणीव होऊं लागली. तितकी जाणीव पणजीस बसून राजकारण चालविणारांना होत नव्हती; याचें कारण सत्तरींत बंड झालें तर एकादा इंडियन शिपाई, नाईक अगर सार्जंट पडला ह्मणून, किंवा सरकारच्या कृत्यांमुळें बिचाऱ्या प्रजेस बंडवाल्यांनीं लुटलें ह्मणून अरेरावी कायदे निर्माण करणाऱ्यांना त्यांचें दुःख थोडेंच. कारण " चमडा जाणे, कुत्ता जाणे " तुमच्या लोकांनीं तुह्मांला मारलें किंवा तुह्मांला लुटलें, तर आह्मांला काय? पण मारणें किंवा लुटणें या कृती कोणामुळें होतात, या प्रश्नाचा विचार सरकार किंवा राणे करीत नव्हते. सरकारच्या जुलमाला कंटाळून राणे बंडाला जर प्रवृत्त होत, तर तोच जुलूम इतर प्रजा सहन करीत असतां वर राण्यांनीं आणखी त्यांना कां ह्मणून लुटावें? एका बाजूनें सरकारी कायदेशीर लूट, दुसऱ्या बाजूनें बंडखोरांची बेकायदेशीर लूट. अशा लुटींच्या दुहेरी कात्रींत सांपड-लेल्या त्रस्त प्रजाजनांच्या केविलवाण्या स्थितीची कल्पना एक हरीच करूं जाणे! हातांत स्वार्थाची कोलीत असली व त्याला सत्तेचा वारा अनुकूल

झाला ह्मणजे किती भयंकर अनर्थ घडून येतात, याचा अनुभव जालीयनवाला बागेंत झालेल्या भयंकर कत्तलीनें हिंदुस्थानांतील लोकांना आलेलाच आहे. हेकेखोर व हट्टी लोक सिध्या मार्गानें वठणीवर यावयाचे नाहींत, याचा अनुभव सत्तर प्रांतांतील लोकांना पुष्कळ वर्षांपासून होता व या सत्तांधांना डोळस करण्यासाठीं त्यांनीं बंडासारखें जालीम अंजन शोधून काढलें. आपले शिष्य लोकांवर अशा प्रकारचे जुलूम करून त्यांची बंडखोर वृत्ती प्रज्वलित करतील याचें स्वप्न अगाऊ पडल्यामुळेंच कीं काय, येशूख्रिस्तांनीं आपल्या शिष्यांस खालील उपदेश केला होता:—" Lead others n ot by violenee but by Law and Euity " ह्मणजे लोकांवर जुलूम करूं नका व त्यांना न्यायानें व समतेनें वागवा. परंतु या उपदेशाची फिकीर न करतां ते लोकांना विषमतेनें आणि अन्यायानें वागवीत होते; व त्याचा परिणाम जो व्हावयाचा तोच होत होता. दीपाराण्याचें बंड थंड पडावें ह्मणून लष्करी लोकांनीं जंगजंग पछाडून पाहिलें; पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. बंडखोरांच्या सशस्त्र टोळ्या दिवसरात्र सैरावैरा फिरत असत, मोठमोठ्या ऑफिसांवर छापा घालीत, सरकारी ऑफिसें लुटीत, लष्करी ठाण्यांवर हल्ले चढवून तीं जाळून टाकीत; गांवोगांव हिंडून लूट जमवीत; कड्याकपारींत दबा धरून सरकारी सैनिकांवर हल्ला चढवीत, अशा एक ना शेंकडों गोष्टींनीं गोमांतक प्रांत हादरून गेला होता. शहरवासी लोक राण्याचें नांव कानीं पडल्याबरोबर भीतीनें कापूं लागत व प्रत्येक रात्र आज आपणावर कांहीं तरी घोर प्रसंग येणार नाहीं ना ? या घोर विवंचनेंत घालवीत. खुद्द दीपाराण्याचा लोकांना नाहक छळावें, त्यांना विनाकारण त्रास द्यावा किंवा मिळेल तसी लुटालूट करावी, असा उद्देश नसावा असें दिसतें. कारण, त्याच्या टोळीनें जेथें जेथें संचार केला तेथें तेथें त्यांनीं झाड पाहूनच घाव घातलेला दिसतो. उदाहरणार्थ " बारांव द कालापूर ' ह्मणून नाणावलेल्या केंकरे घराण्यावर दरोडे घालण्यासाठीं जेव्हां दीपाराण्याची टोळी कुंभारजुव्यास गेली, तेव्हां त्याचा हुकूम बाबन शेणवी केंकरे यांस फक्त पकडून आणण्याचा होता; परंतु कित्येक गुंडांनीं आणि बाजारबुणग्यांनीं तेथें असा भयंकर आकांत करून सोडला

कीं, या नराधमांनीं धनाशेकरितां कित्येक निरपराधी नागरिकांचे खून पाडले, कित्येक आयाबहिणींचें पातिव्रत्य भ्रष्ट केलें; आणि असेल नसेल तें पुसून नेऊं लागले. या गुंडांत केरीचे कांहीं पर्ये भटही सामील होते. या बंडखोरांच्या अत्याचारास भिऊन लोक घरेंदारें सोडून डोंगरांत किंवा गूढ स्थळीं लपून जिवाचें संरक्षण करीत असत. यामुळें घाल्याच्या वेळीं आई मुलास सोडून, नवरा बायकोस विसरून, बाप मुलांस लोटून स्वसंरक्षणार्थ पळत असे. ही लुटालूट केवळ राणेच करीत असत असें नसून त्यांच्या नांवावर विकत असलेल्या कांहीं उडाणटप्पू लोकांनीं, कांहीं गंजलेल्या टाकाऊ बंदुका, पाळ, कोयते वगैरे शस्त्रांनीं लूट मिळविण्याचें काम चालविलें होतें. या गुंडांवर आपला दाब ठेवणें किंवा त्यांना पगार देऊन आपल्यापाशीं राखणें हें बंडास प्रवृत्त झालेल्या राणे लोकांना शक्य नसल्यामुळें, करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार, असा अनागोंदी व्यवहार चालू होता; तथापि खुद्द राण्यांची ह्मणून एक टोळी होतीच व तिचा निर्वाह चालविण्यासाठीं कांहीं तरी सद्भा-वनाशील उपाय आरंभणें त्यांना भाग होतें व त्याप्रमाणें बाबन शेणवी यांस धरून नेल्यानंतर पुरुषोत्तम बाबा केंकरे जेव्हां त्यांस सोडवून आणण्यासाठीं दिपा राण्यास जाऊन भेटले, तेव्हां त्यांनीं त्यांच्याकडे तीन हजारांची मागणी केली असतां पुरुषोत्तमबाबांनीं एक हजार पुढें ठेवून इतक्यानेंच समजून घ्या असें जेव्हां सांगितलें, तेव्हां तितक्यांतच आनंद मानून त्यांस परत आपल्या घरीं आणून पोंचविलें. आपल्या नांवावर असल्या वाटमाऱ्यांनीं प्रताप गाजवून आपल्या नांवास काळोखी फांसावी हें त्यांना मुळींच आवडत नसे व ह्मणूनच त्यांनीं आपल्या टोळींत असा एकही गुंड राहूं दिला नव्हता. जर त्याची अशा लुटीनें गबर होण्याची इच्छा असती, तर लाखों रुपयाचा माल भरलेल्या ह्मार्दोळच्या जत्रेंत अकस्मात् ते जेव्हां गेले तेव्हां संबंध ह्मार्दोळची जत्रा लुटून त्यांना आपली इच्छा पुरवून घेतां आली असती; परंतु ती इच्छा त्यांना शिवली नाहीं त्यांनीं आपल्या आगमनानें गर्भगळित झालेल्या व्यापाऱ्यांना अभय दिलें व आपल्या टोळींतील लोकांना अशी सक्त ताकीद दिली कीं, त्यांनीं कोणालाही त्रास देतां कामा नये किंवा एका पैचीही मागणी करतां कामा नये. तात्पुरत्या व्यवस्थेकरितां त्यांनीं चौकीही ठेवून दिलेली होती.

अशा थोर अंतःकरणाच्या पुरुषाला लुटारू ह्मणतां येईल काय? त्यांनीं शांतपणानें देवाचें दर्शन घेतलें, ब्राह्मणांना दक्षणा दिली व त्यांचा आशीर्वाद घेतला. त्यांच्या मनांत जर देवाविषयीं आदर नसता, तर त्या देवळांतच त्यांना हजारों रुपयांचे दागदागिने लुटतां आले असते; परंतु त्यांनीं असा कोणताही अत्याचारी प्रकार केला नाहीं. तर मग भयंकर दरोडेखोर, अत्याचारी, लुटारू इत्यादि जे भीषण आरोप त्यांच्यावर केले गेले त्यांचें कारण काय? तर तें हेंच कीं, त्यांच्या क्षात्रबलाला जें ब्रह्मबीजोत्पन्न बौद्धिक बल आणि वाणिज्यांकडून धनबलाचें साह्य पाहिजे होतें तें त्याला मिळालें नव्हतें, हेंच तें कारण होय. याच कारणामुळें या बंडांत अंगावर शहारे आणणारे अत्याचार, भयंकर आसुरी कृत्यें, अमानुष छळ वगैरे कृत्यें होऊन प्रजेचे फार हाल झाले. जर उपरिनिर्दिष्ट बुद्धिबळ व द्रव्यबळ यांचा त्याला लाभ झाला असता, तर लोकांचे हालही झाले नसते व त्याचें नांवही बद्दु झालें नसतें. याशिवाय गोमांतकाच्या पायांमध्यें वसत असलेली पारतंत्र्याची भरभक्कम बेडी दिपाराण्याच्या प्रतापामुळें कदाचित् तुटूनही गेली असती; परंतु हें भाग्य बिचाऱ्या गोमांतकाच्या नशिबीं नव्हतें! न पेक्षां परकीय प्रभूच्या बुटांचे मार खाण्याचा त्याच्यावर असा प्रसंग कां आला असता? रजपूतवंशीय क्षात्रतेज अपार जागृत असतां ब्रह्मतेजाच्या बौद्धिक बलाच्या अभावीं व वाणिज्याच्या द्रव्यबलाच्या व्यतिरिक्त राणेलोकांना आपल्याच धर्मबंधूंत, आपल्याच समाजांत व आपल्याच लोकांत रक्तपात, जाळपोळ व लुटालूट करण्याची पाळी आली. यावरून आपल्या प्रतापशाली पूर्वजांनीं बांधलेलें सिद्धांत किती अनुभवाचे होते याचें प्रत्यन्तर दिपाच्या बंडानें दाखविलें असेंच ह्मटलें पाहिजे. "धिग्बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजो बलं बलं" या वाक्यांत जो अर्थ भरलेला आहे त्याचा प्रभाव श्रीसमर्थ रामदास व क्षत्रियकुलावतंस श्रीशिवाजीराजे यांच्या जोडीनें शत्रुमित्रांस दाखविला नाहीं काय? चाणक्याचें बुद्धिबल व चंद्रगुप्ताचें क्षात्रबल आपणास काय दाखवितें? कोणताही इतिहास पाहिल्यास आपणास असेंच दिसून येईल कीं, मुत्सद्यांचें बुद्धिबळ आणि क्षत्रियांचें क्षात्रबळ एक झाल्यावर त्या राष्ट्राचा भाग्योदय झाल्याशिवाय केव्हांही रहात नाहीं. याचें उत्तम उदाहरण ह्मटलें ह्मणजे

माजी जर्मन् बादशहा किंग विल्यम् व त्याला बुद्धि देणारा कौंट बिस्मार्क यांची जोडी होय. किंवा जपानराष्ट्रास आजची स्थिति प्राप्त करून देणारा जपानी बादशहा मुत्सुहितो व त्याचा बुद्धिवादी मुत्सद्दी मॉर्क्विस इटो हे कारणीभूत झाले नाहींत काय? इटालीसही आजचें महत्त्व येण्यास राजा व्हिक्टर मान्युएल व त्याला बुद्धिवाद देणारा प्रधान कौंट काव्हूर या जोडीनें केलेले परिश्रम कोणाच्या दृष्टिआड होतील? याच्या उलट बुद्धिवादक जर कुमार्गगामी किंवा नेभळट मिळाले तर क्षात्रतेजाचीही वाताहात होत असते, त्याचींही उदाहरणें इतिहासांत थोडथोडकीं नाहींत.

पोर्तुगालचा राजा "दों कार्लुस्" व त्याचा हट्टी प्रधान झ्युआंव फ्राङ्क, किंवा आमच्या महाराष्ट्रीय इतिहासांतील संभाजी आणि कलुषा कबजी हीं दोन उदाहरणें आमच्या वाचकांना ओळखीचीं ह्मणून दाखवितां येतील. दिपाच्या बंडांतही ब्राह्मण होते. परंतु ते ब्राह्मणही स्वार्थाच्या दृष्टीनें या बंडांत सामील झाल्यामुळें त्यांचा बुद्धिवाद लुटालुटीस उत्तेजकच झाला असल्यास त्यांत नवल तें काय? दिपाजीसारख्या तेजस्वी पुरुषाला जर योग्य बुद्धिबल मिळालें असतें, तर त्याच्या सत्तरीपुरत्या संकुचित भावना न राहतां त्यांचा परीघ सबंध गोंव्यांची स्वतंत्रता, सुव्यवस्था व सुसंपन्नता मिळविण्यापर्यंतसुद्धां विस्तृत होऊं शकता. तात्पर्य दिपाजीच्या अंगामध्यें शौर्याबरोबरच मनाचा थोरपणा, उदारपणा व प्रामाणिकपणा हेही गुण वसत होते हें खालील एकदोन उदाहरणांवरून स्पष्ट करतां येईल. दिपाजीच्या फौजेंतील एक तुकडी वाळपईहून सांटेरीच्या गडाकडे जात असतां वाटेंत त्यास एक वाघ भेटला. तो यांस बघून पळत असतां टोळींतील एका शिपायानें मौजेनें त्या वाघास ह्मटलें, "तुला दिपाराण्याची शपथ आहे, पुढें जाऊं नकोस" हे शब्द ऐकिल्याबरोबर तें जनावर जेथल्या तेथें जरा उभें राहिलें. या गोष्टीचा फायदा घेऊन त्या शिपायानें त्या वाघावर बंदुक झाडून त्याचा प्राण घेतला. ही गोष्ट इतर शिपायांकडून जेव्हां दिपाराण्यास समजली तेव्हां त्यानें त्या शिपायास आपल्यासमोर आणून असा प्रश्न केला कीं, "वाघासारख्या क्रूर प्राण्यानें माझ्या नांवाला मान दिला, आणि तूं मनुष्य असून आपलें इमान बुडविलेंस, तेव्हां हें घे त्याचें प्रायश्चित्त." असें

म्हणून त्यानें त्याला दुसऱ्या एका शिपायाकडून गोळी घालून ठार करविलें. जखम होऊन व धांवपळ करण्याच्या श्रमानें दिपाराणा चांदरच्या तरीजवळ तापानें आजारी होऊन पडला असतां. रा. गणेश शे. शेळडेकर यांनीं त्याला आणून औषधोपचार केल्याकारणानें त्याला आराम वाटला. व त्यानें त्यांच्या कुटुंबाला त्रास न देण्याबद्दल इतर बंडवाल्यांना ताकीद दिली. तरी पण चार पांच महिन्यानंतर त्यांच्या घरावर हल्ला झालाच.

या बंडाच्या वेळीं कित्येक अनान्वित व भयंकर गोष्टी घडून आलेल्या असून त्या राण्यांच्या नांवावर जमा झालेल्या आहेत; परंतु खरें कारण पाहूं गेलें असतां ज्या लोकांकडून राणे. लोकांस विनाकारण उपसर्ग पोंचला, अशाच लोकांवर राणे लोकांनीं सूड उगविलेला दिसून येतो. सांखळी येथील गुळ्ळीकर उपनांवाच्या ब्राह्मण गृहस्थांवर जो प्रसंग गुदरला, तो इतक्यांच करतां कीं, सरकारच्या तोफा, सैन्य इत्यादि बळावर विश्वासून राण्यांविरुद्ध सरकारशीं चुगलखोरी करून यानें त्यांच्या हालचाली, त्यांचीं दबा धरून बसण्याचीं ठिकाणें, त्यांना दारूगोळा कुठून मिळतो याची माहिती सरकारकडे जाऊं लागली.

सांखळींतील सगुणशेट कुडतरकर यांच्या घरीं दिपाचें जाणें येणें फार असे. इतकेंच नव्हे तर त्याच्याकडे ठेव ठेवणूक सुद्धां तो करीत असे. सरकारास ही बातमी लागून त्यांच्याकडून कुडतरकरास उपसर्ग पोंचूं लागला. या सर्व कारस्थानांच्या मूळाशीं सदर गोळेकर ब्राह्मण होता. या द्वेषानें एक दिवस बंडवाल्यांनीं त्याच्या घरावर छापा घातला. या आकस्मिक अरिष्टानें गांगरून जाऊन सदर ब्राह्मणानें बंदुकीचे बार चौफेर सोडण्यास सुरवात केली. यामुळें बंडखोरांनींही सदर ब्राह्मणांकडे दारूगोळा व बंदुका किती आहेत याची कल्पना न होऊन सावधगिरीनें हल्ला चढविण्यास सुरवात केली. जसजशी पहांटेची वेळ आली, तसतसा हल्ल्याचा जोर चढला व ब्राह्मणांकडूनही बंदूकींचे बार विशेष प्रमाणांत होऊं लागले. शेवटीं त्या ब्राह्मणाच्या एका भेकड मुलानें “ बाबा, आतां दारू संपली ” असें भित्रेपणानें उच्चारलेलें वाक्य एका बंडवाल्यानें ऐकिलें व त्यामुळें त्यांना विशेष चेव येऊन त्यांनीं दार जास्त नेटानें फोडण्यास सुरवात केली. शेवटीं निरुपाय झाल्यानें

ब्राह्मण मागील दरवाजानें पळण्याच्या बेतांत असतां, बंडवाले आंत घुसून त्यांनीं सर्व मंडळीस हाल हाल करून ठार मारलें. एका मुलाला ते झोडपीत असतां तो निचेष्ट होऊन पडला; तेव्हां तो मेला असें समजून बंडखोर घरांतील चीजवस्त लुटून पळून गेले. मरतेसमयीं सदर ब्राह्मणाच्या कुटुंबानें मोठमोठ्यानें हांका मारल्या; परंतु त्यांना सरकारकडून किंवा अन्य कोणा-कडूनही मदत मिळाली नाहीं. या किंवा असल्या कृत्यांनीं दिपाराण्याच्या बाणेदारपणाला आणि शूरत्वाला थोडा फार कालिमा लागला असल्यास त्यांत नवल नाहीं.

दिपाराण्याच्या अंगामध्यें तडफदारी, क्षात्रतेज, प्रामाणिकपणा इत्या-दिक जे पुष्कळसे वाखाणण्यासारखे गुण होते त्यांची जाणीव सरकारी अधिकाऱ्यांनाही झाली होती. चोहोंबाजूंनीं बंडाचा वणवा पेटून जेव्हां त्याच्या ज्वाळा सरकारपक्षास फार त्रास देऊं लागल्या, तेव्हां बंडवाल्यांस माफी न देण्याचा सरकारचा हट्ट जास्तच पेट घेऊं लागला. पोर्तुगाललाही या बातम्यांमुळें बरीच गडबड उडाली. शेवटीं बंडाचा हा चिघळत जाणारा प्रश्न एकदां वसास लावून सोडावा ह्मणून पोर्तुगालहून नवे अधिकार देऊन व बरोबर नव्या दमाचे युरोपियन शिपाई देऊन बादशहानें पुनः झुजे फेर्रैर पैस्तान यांस व्हाइसरायांच्या हुद्यावर गोव्यास पाठविला. या गव्हर्नरनें येथें येऊन एकंदर परिस्थिती लक्षांत घेतल्यावर बंडखोरांची पूर्ण खोड मोडण्याच्या इरायानें सैन्याची जय्यत तयारी केली आणि लष्करी कायदा पुकारून जेथें जेथें बंडखोर दिसतील तेथें तेथें त्यांना गोळ्या घालून ठार करावें असा हुकूम सोडला व स्वतः कांहीं डोंगरी तोफा, युरोपीयन घोडेस्वार व सोल्जर बरोबर घेऊन दिपाराण्यास स्वतः गांठण्याकरितां त्यानें सत्तरीवर एका बाजूनें स्वारी केली; व दुसऱ्या बाजूनें गुर्दीज्मीर याच्या हाताखालीं हिंदी सैन्य देऊन त्यास रवाना केलें. यावेळीं दिपा आपल्या फौजेसह सांटेरीच्या गडावर होता. पुढील हकीगत निवेदन करण्यापूर्वीं सत्तरप्रांताच्या निसर्गरचनेची थोडीशी कल्पना वाचकांस करून दिलेली बरी.

सत्तरप्रांताचें क्षेत्रफळ अवघें १४४ चौ. मैल आहे. तरी पण हा लहानसा भूप्रदेश सौंदर्याचा अत्युत्तम ठेवा होऊन राहिला आहे. पूर्वेस

घाटमाथा व पश्चिमेस मतग्राम यांच्यामधील भाग गगनचुंबीत तरुराजीनें आच्छादिलेला व कवीच्या कल्पनाशक्तीस रिझविणारा सह्याद्रि यांच्या साहचर्यांत राहिल्यामुळें सृष्टिदेवतेची त्याच्यावर पूर्ण कृपा आहे. सह्याद्रींतून उगम पावलेले निर्झर सत्तरप्रांतांतून समुद्राकडे धांवत असतात. व या निर्झरांस पळतांना बळजबरीनें थांबवून त्यांच्याकडून शेतकरी आपलीं भातखाचरें भिजवून घेत असतात. सत्तरप्रांतांत पाऊस विपुल पडत असल्यामुळें नदीनाल्यांवर सागराचा वियोग सहन करण्याचा दुःखद प्रसंग कधींही ओढवत नाहीं. आकाश मेघाच्छादित, पर्वत वृक्षाच्छादित, जमीन तृणाच्छादित आणि त्यांतील रस्ते गेरूनें आच्छादित अशा आवरणांतून डोक्यावरून पावसाळ्यांत ताडपत्री इरलीं घेऊन जात असलेल्या स्त्रिया दृष्टीस पडतात; व त्याचप्रमाणें पुरुषही कांबळीं घेऊन व आपलें आंगमेहनतीचें काम करून करून अल्पायासानें जमीन भाजून पीक काढण्याची पद्धत ह्मणजे भरडकुमेर करण्यास सरकारची परवानगी मिळण्यास दुर्घट पडतें. छत्र्यांचें काम ठिकठिकाणीं उगवलेल्या सागवान व इतर वृक्षांनीं आपल्या शिरावर घेतल्यामुळें उन्हांतही प्रवास करतांना त्यांस विशेष त्रास वाटत नाहीं.

अशा दुर्गम व निबीड स्थळीं सरकारसैन्य पोंचून त्यांनीं सांटेरच्या किल्ल्यास वेढा घातला. राण्याचे लोक जेवण्यास बसले होते, त्यांनाही स्फुरण चढून त्यांनीं जेवणखाण सोडून व पळण्यास सवड व वाट असतांनाही क्षत्रियांस अनुचित मार्ग ह्मणून मारूं किंवा मरूं अशा दृढनिश्चयानें सरकारी सेनेबरोबर दोन हात केले. सरकारी सैन्य गडावर चढण्याची शिकस्त करतें तर राण्याचे लोक वर चढणाऱ्यांना अचूक गोळी घालून ठार करीत होते. तोफांचा तर धूमधडाकाच चालला होता. याप्रमाणें पांच सहा दिवस सारखी झटापट चालली होती, मात्र कोणी कोणावर बेसावधपणांत हल्ला केला नाहीं, किंवा रात्रीं अपरात्रीं हल्ला केला नाहीं. राष्ट्रीय शर्तीप्रमाणें लढण्याच्या वेळीं इशारत देऊन लढावें व इशारत देऊनच युद्ध बंद करावें असा जरी क्रम चालला होता, तरी राण्याकडील दारूगोळा संपत आला व ते मोठ्या संकटांत सांपडले. अशावेळीं त्यांनीं श्रीपांडुरंगाची करुणा भाकली व सत्तरीच्या दैवतांना संकटाच्या वेळीं हांक मारली. तेव्हां अशी मजा झाली कीं, चोहों-

२५१०

बाजूंनीं गांधीलमाशांचीं भिरीं उठलीं व सरकारलोकांच्या अंगांस झोंबूं लागलीं. त्यांच्या त्रासामुळें लढाईच्या ठिकाणीं उभें रहाणें अशक्य झाल्यामुळें त्यांतील गोऱ्या शिपायांनीं कंटाळून जाऊन उद्वासीनपणें आपल्या वरिष्ठास असें सांगितलें कीं, " एक तर गोळया घालून येथेंच मारून टाका किंवा या गांधीलमाशांच्या बाहेर तरी न्या. " या त्यांच्या केवीलवाण्या स्थितीवरून सरकारी लोकांना छावणीवरून सांखळीस येणें भाग पडलें व राण्यांचा लढण्याचा निश्चयही कळून आला. सरकारही फार कंटाळलें व शेवटीं " तुमच्या काय मागण्या आहेत त्या तरी कळूं द्या. शक्य त्या देऊं व आपल्या अपराधांची आपणांस माफी देऊं. आपण येऊन आह्मांस भेटा " असें पेस्तान गव्हर्नरानें दिपास कळविलें. त्याला उलट दिपानें जबाब दिला कीं, " आह्मीं आपल्या भेटीस यावें अशी जर आपली इच्छा असेल व सरकारास जर आमच्या स्थितीची खरोखर दया आली असेल, तर सरकारनें आपले बडे अधिकारी आमच्या छावणींत ओलीस पाठवावे. नंतर आह्मी आपल्या भेटीस येऊं. " ही गोष्ट सरकारनें मान्य करून आपला मुलगा व चार कर्नल पेस्तानसाहेबांनीं राण्याकडे पाठवून दिले. त्यांचा चांगल्या रीतीनें परामर्ष घेऊन व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांची व्यवस्था राखून दिपाराणा सरकारच्या छावणींत जाण्यास उठला. आपल्या लोकांना पुढील धोरण सुचवून बरोबर साठ दुनारी बंदुका असलेले एकजात पोषाखाचे गडकरी शिपाई घेऊन डिचोलीस महापुरुषाच्या मठांत येऊन उतरला व आपण आल्याची वर्दी गव्हर्नरसाहेबास दिली. तो डिचोलीस आला ही बातमी कळतांच लोकांचे थव्याचे थवे त्याला पहाण्यास जमा होऊं लागले. त्यावेळीं अशी एक गंमत झाली कीं, एक युरोपियन उर्मट शिपाई दिपाराण्यास बघण्यास तेथें आला. त्यानें ज्यावेळीं काळ्या वर्णाची ती ठेंगणी मूर्ती, मानेवर आवाळ, गळयांत पोंवळ्यांची माळ, हातांत रुप्याचें कडें असलेली दुनारी बंदूक पाहिली, त्यावेळीं त्याला काय वाटलें तें एक परमेश्वरच जाणे. तो एकदम झडप घालून ती बंदूक हिरावून घेऊं लागला, त्यावेळीं दिपानें जी एक त्याच्या थोबाडींत लगावली तीमुळें त्याचे डोळे पांढरे होण्याच्या बेतांत आले. नंतर तो आपल्या कॅप्टनास जाऊन सांगूं लागला; पण तेथेंही त्याची हेटाळणीच झाली. कॅप्टन म्हणाला, त्या

गृहस्थाला सख्य करण्यासाठीं ह्मणून सरकारनें बोलावून आणलें त्याच्याशीं धिंगामस्ती करण्याचें तुला कारण काय ? या उत्तरानें तो शिपाई शरमिंधा झाला. गोऱ्या कातडीमध्यें मुत्सद्दीपणा किंवा शहाणपणा सांठविलेला नसून तो कोणत्याही कातडींत असूं शकतो हें खालील एकदोन उदाहरणांवरून कळून येण्यासारखें आहेः—

आठआठशें रुपये कमावणारे मोठमोठे अधिकारी एकेदिवशीं पणजीच्या मिलिटरी कचेरींत एका टेबलासमोर बसून पुढें गोमांतकाचा नकाशा धरून दीपाराण्यास पकडण्यास त्याच्या छावणीकडे जाण्याचा जवळचा रस्ता कोणता, याचा शोध काढीत होते; आणि हौंडा, वाळपई, नाणस, केरी अशीं मार्गांचीं नांवें घेऊन सांटेरच्या नांवावर बोट ठेऊन " आगारे दीपारानिस् " ह्मणून मोठ्या हर्षानें टाळ्या पिटीत होते; पण ह्यांचें हें दीपाराण्यास पकडण्याचें शौर्य किंवा चातुर्य सरकारास परिणामीं उपयोगीं पडलें नाहीं; ऑफीसाच्या ऑफिसांत बसून पगार मात्र फुकट गेला ! दुसरी गोष्ट ह्मणजे एक साताऱ्याकडील गलेलठ्ठ हरिदास एकदां एका गोऱ्या शिपायाच्या तुकडीस वाटेंत सांपडला. त्यास त्यांनीं कोण कुठला ह्मणून प्रश्न केला, तेव्हां त्यानें साताऱ्याचा पुराणीक ह्मणून सांगितलें. अशा समयीं मराठीचा अत्यंत परिचय असलेल्या एका दीडशहाण्यांनीं या शब्दांचा विचित्र अर्थ करून त्याला पकडलें. त्याच्या उत्तराचा यांनीं असा अर्थ लावला कीं, हा " सातारी दिपुराण " आहे व त्यावरून त्याला एकदोन दिवस कैदेंत कोंबलें नंतर स्पष्ट खुलासा झाल्यावर त्याची सुटका झाली. असो.

असल्या लोकांकडे सत्ता जाऊन गोव्यांतील चांगलीं चांगलीं बुद्धिवान् माणसें " जींतीव " या सदराखालीं देशोधडीस लागावीं यांत नवल तें काय ? स्वतःच्या अंगांत गुण असले तरच दुसऱ्याच्या अंगांतील गुणांची पारख होणार हें साहजिकच आहे. शेवटीं दिपाराण्यास छावणींत नेऊन सरकार व बंडवाले याच्यांत खालील अटींवर समेट झाला. सरकारनें ग्रामसंस्थाचें संरक्षण करावें. धार्मिक जुलूम रद्द करावे. निदान सत्तरप्रांतीं तरी बीबियाणा देऊन शेतकऱ्यांना मदत करावी व दशम भाग न वाढवतां कायम धाऱ्यांची पद्धत अमलांत आणावी आणि क्षत्रियांचें क्षात्रतेज लुप्त होऊं नये

ह्मणून सत्तरकरांची एक पलटण कायम ठेवावी. आडमुठे कामदार सत्तरींत पाठवूं नयेत व जे नेमतात त्यांना वेळोवेळीं बदलावें; तेथेंच कायम ठेऊं नये. सर्व बंडखोरांना बिनशर्त माफी मिळावी. अशा मागण्या पोर्तुगीज सरकारानें मान्य करून माफी ( Amnesttia ) जाहीर करून दीपाजीराणयास ५०० रुपये पगारावर कॅप्टन नेमलें व पोषाख व तरवार देऊन डिचोली शहरांत त्याची मिरवणूक काढली आणि दुसऱ्या दिवशीं मोठ्या सन्मानानें त्यांना पणजीस नेऊन त्यांचा जयजयकार केला.

अशा रीतीनें सतत सात वर्षें गोमांतकाला तापदायक झालेल्या या बंडाची शांतता करून जिकडे तिकडे स्थिरस्थावरता प्रस्थापित करण्यांत आली. मात्र पुढें मागें या बंडाची पुनरावृत्ति न होण्याबद्दलची खबरदारी घेतलेली दिसून येत नाहीं. ज्या ज्ञानाच्या अभावीं हे अशिक्षित लोक बंडाला प्रवृत्त होतात, त्यांना ज्ञान दान देण्याची कांहींच व्यवस्था करण्यांत आली नाहीं. ज्या जुलमी राज्यपद्धतीमुळें असल्या बंडांना उठाव मिळतो त्या राज्यपद्धतींत फेरबद्दल होण्याची कोणतीही व्यवस्था झाली नाहीं. वशिल्याचीं तट्टें नोकरींत घुसविण्याचें धोरण तसेंच कायम राहिलें. तात्पर्य जी शांतता प्रस्थापित झाली, ती वहाणाऱ्या जखमेवर केवळ मलमपट्टी बसवून जुजबीपद्धतीनें तात्पुरती बरें करण्यासारखी वरपांगी होती. अंगांत सांचलेल्या दूषित रक्तामुळें दुसरीकडे तसल्यांच जखमेचा उद्भव होऊं नये ह्मणून रक्तशुद्धीचें औषध दिलें नाहीं. असल्या दुर्बळ व अज्ञानी लोकांना सरकारी अधिकाऱ्यांपासून उपसर्ग पोंचूं नये ह्मणून ज्या प्रकारची खबरदारी राज्यकर्त्यांनीं घ्यावयाची असते, तशी ती न घेतल्यामुळें असल्या बंडांचा उद्गम होत असतो, हें पुढील गोष्टीवरून वाचकांच्या ध्यानांत येईल. तात्पर्य जेव्हां जेव्हां राजा प्रजेला दुःख देतो, तेव्हां तेव्हां तो आपल्या प्रजेसहीत नाश पावतो असें स्मृतिवचन आहे. त्याचा बोध राजांनीं व राजप्रतिनिधींनीं अवश्य ध्यानांत ठेविणें इष्ट आहे.

प्रकरण ६ वें.

## राजा व प्रजा यांमधील लढा ह्मणजे स्वार्थ व न्याय या दोन विकारांची लढाई होय.

राजा बंधुरबंधुनाम् राजा चक्षुरचक्षुषाम् ।
राजा पिता च माता च सर्वेषां न्यायवर्तिनाम् ॥

—महाभारत.

ज्या घोर कर्मगतीच्या प्रायश्चित्ताबद्दल परमेश्वरानें आह्मांला पाश्चात्यांच्या दास्यपंकामध्यें ठेविलेलें आहे, त्यामुळें आमचें पौर्वात्य राजनीतिशास्त्र, संस्कृति वगैरे कुचकामाचीं आहेत, असें ते लोक मानीत असतात; परंतु ही त्यांची फार मोठी चूक आहे. ही चूक ज्यांच्या लक्षांत आली नसेल, त्यांच्यासाठीं एका भयंकर बंडाच्या भीषण स्वरूपाची हकीगत निवेदन करणार आहों. ही हकीकत जितकी चमत्कृतिजन्य तितकीच बोधपूर्ण आहे. या गोष्टीपासून प्रजा व सरकार या दोघांनींही बोध घेण्यासारखा आहे. ही गोष्ट इ० स० १८७० त घडली. परंतु पूर्वीप्रमाणें हें बंड जुलमानें त्रस्त झालेल्या लोकांनीं केलेलें नसून खुद्द सरकारी शिपायांनींच केलेलें होतें. प्रजेकडून जबरदस्तीनें पैसे वसूल करून ज्यांचे सरकारनें लाड पुरविले व लठ्ठ पगार देऊन ज्यांना पोसलें त्या लोकांमुळेंच या बंडाला उठावा मिळाला. आजपर्यंत गोमांतकांतील लष्करी वर्ग सरकारच्या फाजील लाडांमुळें वरचढ बनून वेळीं अवेळीं सरकारावरच कुरघोडी करण्यास मागेंपुढें पहात नसे. त्यामुळें गरिबीनें गांजलेल्या या छोट्या गोवा प्रांतांत त्यांची संभावना करतां करतां नाकीं नव येत असत. अशा स्थितींत नाकापेक्षां मोतीं जड या ह्मणींत अन्वर्थित झालेली ही परिस्थिति या प्रांतामध्यें सदैव चालू ठेवणें इष्ट नसल्याचें निरनिराळ्या पर्यायानीं सुचविलें. पण ऋण काढून सण करण्याची संवय लागलेल्या सरकारास दिपाराण्याच्या बंडाचा चरका बसल्यामुळें प्रजापक्षाचा हितोपदेश रुचू लागला.

तथापि चढेलपणा अग्रेसरत्व पावलेल्या या खात्यांत छाटाछाट करण्याचें धैर्य प्रांताधिपतीस होईना ह्मणून गव्हर्नर साहेबांनीं एथील एकंदर परिस्थितीचें

यथार्थ चित्र रेखाटून पोर्तुगालला राजेसाहेबांस कळविलें व आपल्या आज्ञेनुसार वर्तन ठेऊं अशीही विनंती केली. पोर्तुगालचे राजेसाहेब ह्मणजे परधर्मीय प्रजेविषयीं किती दयाशील वृत्तीचे होते हें धर्मक्रांतीनें विदित केलेंच आहे. त्यामुळें अनावश्यक वाटत असलेलें सैन्य कमी करून जमाखर्चाची तोंडमिळवणी करून घ्यावी अशा आशयाचा पातशाही हुकूम डिसेंबर माहेच्या २० तारखेस सन १८६९ त गोव्याच्या गव्हर्नरास आला. सदरहू निरोपाप्रमाणें आपल्या सल्लागारांशीं विचारविनिमय करीत असतां लष्करी लोकांत त्याचा गवगवा होऊन प्रत्येकाला आपापल्या नोकरीची अशाश्वतता वाटूं लागली. कोणास केव्हां बडतर्फ व्हावें लागेल याचा नेम नव्हता. विशेषत: शिंगें मोडून वासरांत शिरलेल्या युरोपीयन लोकांची मोठीच काळजी पडली. कारण या लष्करी खात्यासारखें सुखवस्तु आणि लठ्ठ पगाराचें सुलभ साधन दुसरीकडे मिळणें मुळींच शक्य नाहीं; कारण कोणाचे ना कोणाचे नातेवाईक, गणगोत, सगेसोयरे अथवा इष्टमित्र या खात्यांत असल्यानें उपवर तरुणींच्या मंजुळ शाब्दिक भीडा खर्चून मोठमोठ्या 'दोना' बाईचे वशीले लाऊन किंवा स्वत: प्रेमपात्र बनून आपल्या अशिक्षित पोरांनासुद्धां या खात्यांत शिरकवून घेत असत. यामुळें हें खातें ह्मणजे युरीजीयन व युरोपीयन लोकांचें चरण्याचें कुरण किंवा बापजाद्यांनीं जोडलेली वारसदारीच होऊन बसलें होतें व त्यावर असा आकस्मिक घाला आलेला पहातांच त्यांना वाईट वाटणें साहजिक होतें. या खात्यामध्यें अगदीं खालच्या दर्जाचे अधिकारी जे " सोल्दाद " त्यांना उपाशीपोटीं ठेऊन स्वत: गलेलठ्ठ पगार उपटून खुशाल चैन करावी, ही या युरोपीयन लोकांची पद्धत असे.

बिचारे शिपाईही एकदोन दिवस घरीं जाण्यास मिळावें, किंवा वरीष्ठांची आपणावर सुप्रसन्नता आहे असें लोकांना दिसावें ह्मणून त्यांच्या घरीं पाणी भरणें, त्यांचे बगीचे शिंपणें, त्यांच्या मुलांबाळांस खेळविणें, त्यांच्या घरची बाजारहाट करणें वगैरे हलकीं कामें ते मोठ्या आनंदानें करीत असत व या दैन्यांतून योग्य रीतीनें पार पडल्यानंतर त्यांना एखादा काबोचा हुद्दा मिळाल्यास मिळे. अशा आणीबाणीच्या वेळीं गोवेंप्रांतांत एकंदर चार हजारांवर सैन्य असून त्यांची विभागणी खालीलप्रमाणें करण्यांत

आली होतीः—पहिली पलटण मडगावीं; दुसरी फोंड्यास; तिसरी डिचोलीस व चवथी ह्मापशेंस. याशिवाय तोफखाना, घोडदळ, पोलीस आणि कांहीं नागरीक फौज पणजीस राखून विशेषप्रसंगीं त्यांची इकडून तिकडे अदलाबदल होत असे. बादशाहाच्या हुकूमाप्रमाणें गव्हर्नरांनीं मडगांवींच्या पहिल्या कंपनींतून कांहीं सैन्य कमी केलें. हीच पाळी डिचोलीच्या कंपनीवरही येणार या कल्पनेनें डिचोली येथील २०० लोकांनीं तारीख २ फेब्रुवारी रोजीं आपल्या वरीष्टांस कैद करून दारूगोळा शस्त्रें वगैरे घेऊन असनोडेंस जाऊन ह्मापशाच्या सैन्याची मार्गप्रतिक्षा करूं लागले.

ही बातमी मडगांवीं नोकरींतून कमी केलेल्या नोकरांना समजून त्यांनींही त्यांचेंच अनुकरण केलें; आणि मेजर टॉलिस् याच्या धमकीची पर्वा न करतां शस्त्रसामुग्रीसह पोबारा केला व फोंडेंच्या सैन्याची वाट पहात आमोडेंच्या तरीवर येऊन राहिले. या चारही पलीटणींचा बेत एकत्र होऊन कुंभारजुवेंच्या तरीनें पणजी शहरावर हल्ला करण्याचा होता. मडगांवच्या बिथरलेल्या लोकांनीं खरोखरीच बंड पुकारलेलें आहे, हें फोंड्याच्या शिपायांस कळतांच ते सरकारावर उलटले व मडगांवच्या सैन्यास मिळून त्या दोन्ही पलटणी विचारविनिमयासाठीं कुळीं गांवीं मुक्काम करून राहिल्या. बहुतेक सरकारी सैन्य बिथरून बंडाला प्रवृत्त झाल्याचें लोकांना समजतांच सर्व लोकांचीं मनें चिंतेनें व्यग्र झालीं. सरकारही काळजींत पडलें.

अशासमयीं गव्हर्नरसाहेबांनीं मंत्रिमंडळाच्या विचारें कांहीं प्रतिष्ठित लोकांच्या व अधिकाऱ्यांच्या मध्यस्तीनें या बिथरलेल्या लष्करी लोकांची समजूत घालून त्यांना ताळ्यावर आणतां येईल कीं काय याचा उपाय चालविला. मध्यस्थांनीं बंडखोरांची निरनिराळ्या रीतीनें समजूत घातली; परंतु ते उन्मत्त शिपाई कांहीं केल्या ऐकेनात. अशारीतीनें मध्यस्तीस गेलेली मंडळी निराश होऊन परत आली. तारीख २७ रोजीं बिथरलेली ही सर्व काळी फौज वळवईच्या माळावर जमा होऊन ह्मापशेंच्या पलटणीची वाट पाहूं लागली, आणि तेथून त्यांनीं सरकारास असें कळविलें कीं, जर सरकार पूर्वींचे आमचे हक्क कायम राखून आमच्या अपराधांची आह्मांस माफी देत असेल, तर आह्मीं परत सरकारच्या सेवेस हजर होऊं. ही त्यांची विनंति सरकारानें

मान्य करण्याचें ठरवून तसें बंडखोरांना कळविलेंही; परंतु ह्यापसेंची चवथी पलटण बंडांत सामील होण्यास तयार होऊन व सशस्त्र बाहेर निघाल्याचें ऐकून सरकारकडे केलेल्या विनंतीचा व सरकारनें त्या विनंतीस दिलेल्या उत्तराचा धिक्कार करून आपल्या वचनास मागें सरले. चारही पलटणी अशा रीतीनें बंडांत सामील झाल्यामुळें सरकारची फारच तारांबळ उडाली, आणि आतां पुढें काय करावें या विवंचनेंत सरकारी अधिकारी पडले. त्यांनीं हें वर्तमान पोर्तुगाल सरकारास कळवून एकंदर परिस्थिती फार भयंकर असल्याचें सुचविलें व तडजोडीची शक्य ती खटपट चालविली. या बंडवाल्यांची इच्छा तरी काय आहे, हें समजून घेण्याकरितां तिघांचें एक कमीशन पाठविलें. त्यांत लष्करचे चिटणीस मेजर आल्बुकेर्क, कुंभारजुव्यांचे बारांव आणि कुरेंय सील्व्ह इ गाम असे तिघेजण बंडखोरांकडे वळवईस गेले. त्यांना पहातांच बंडवाल्यांनीं त्यांचा योग्य आदरसत्कार करून आपल्यातर्फे त्यांच्याकडे संभाषण करण्याकरितां आपल्यापैकीं कांहींची निवड करून दिली. उभय वर्गांनीं खलबत करून तें सरकारास कळविण्यासाठीं सरकारी डेप्युटेशन मागें फिरलें, आणि गोवासरकारास त्यांनीं तेथें घडलेली एकंदर हकीकत निवेदन केली. गव्हर्नर साहेबांनीं विशेष आढेवेढे न घेतां त्यांच्या अटी मान्य करण्याचें आश्वासन दिलें व उभयतांतील अटी व झालेल्या गोष्टींचा सारांश छापून काढून प्रत्येक लष्करी छावणींत व ठाण्यावर प्रसिद्ध केला. या ठरविण्यांत आलेल्या तहाच्या अटींमध्यें ज्यांच्या जीवावर या बंडाचें निशाण उभारण्यांत आलें होतें, त्या काळ्या शिपायांना फायदेशीर ह्मणजे त्यांचा सन्मान, दर्जा, बढती किंवा उत्कर्ष यांच्याबद्दल एकही कलमाचा त्यांत समावेश करण्यांत आला नव्हता. या बंडवाल्या पलटणींमध्यें बहुतेक सर्व भरणा हिंदु लोकांचा होता; त्यांनीं जर हिंदूंना वरीष्ठ अधिकाराच्या जागा मिळाव्या, किंवा इतर सर्व बाबतींत समानदर्जा मिळावा अशी मागणी केली असती तर ती त्यावेळीं मान्यही होऊं शकती. यदाकदाचित् त्यांना जरी नोकरीलाही मुकावें लागलें असतें, तरी तत्वतः त्यांत त्यांचें कांहींएक नुकसान झालें नसतें. कारण दहा बारा रुपये पगार घेऊन वरीष्ठाच्या लाथाबुक्या खाऊन, त्यांचीं हलकींसलकीं कामें करून

जीविन कंठण्यापेक्षां शेतीभाती किंवा काबाडकष्ट करून त्यांना स्वतःचें व आपल्या बायकांमुलांचें पोट उत्तम रीतीनें भरतां आलें असतें. असो. सरकार व सैन्य यांचा सलोखा होऊन पूर्ववत् कारभार चालू झाला. मात्र सरकारची धमक व मर्मस्थान शिपायी लोकांना कळून चुकल्यामुळें ते फार शेफारून गेले. त्यांच्या उद्धटपणास ऊत येऊं लागला व निःशस्त्र प्रजेस ते फारच तुच्छतेनें वागवूं लागले. त्यामुळें लोकांत व त्यांच्यामध्यें वारंवार खटके उडून कोर्ट-मार्शलचे खटले भरूं लागले व त्यामुळें शिपायांचा उद्धटपणा वारंवार सरकारच्या नजरेस येऊं लागला. एका कॅप्टनास शिक्षा झाल्यामुळें सरकारच्या हेतूचा विपर्यास करून लष्करांतील कांहीं अंमलदारांनीं शिपायांच्या छावण्यांमध्यें बेदीलपणा उत्पन्न करण्याचा प्रयत्न सुरू केला.

याचवेळीं ह्मणजे १८७१ त डिसेंबरच्या १० तारखेस पोर्तुगालहून राजपुत्र दों आगुस्त वळवईची बंडाई थांबविण्यास आलेले होते. व त्यांच्या-बरोबर नवीन गव्हर्नर व्हीस्कॉन्द द सांजानुआरिव्यु हे गोव्यांत येऊन पेस्तानसाहेब स्वगृहीं चालले होते. नवीन आलेले गव्हर्नर चांगले विद्वान व बुद्धिमान होते; किंवा स्वार्थी नसल्यानें न्यायाच्या कामांत ते दुसऱ्यावर मुळींच विसंबून रहात नसत. ह्मणून लष्करी लोकांच्या स्वैराचरणास आळा पडावा, निःशस्त्र प्रजेची सशस्त्र सैनिकांकडून कुचंबणा न व्हावी, असा त्यांचा मानस होता. तर या त्यांच्या विचाराविरुद्ध मिलिटरी खात्याचा वरचष्मा सरकारावर नेमका ठेविण्याचा कांहीं मगरूर ऑफीसरांचा हेतू असल्यानें असंतोषाचें बीज सैनिक लोकांमध्यें ते नेहमीं जीवंत ठेवीत. यासंबंधींचा संशय गव्हर्नरसाहेबांस येऊन त्यांनीं छावण्यांत बारकाईनें चौकशी चाल-विली. चौकशीअंतीं साक्षीपुराव्यानें असें आढळून आलें कीं, ह्मापशें येथील छावणींत सरकारविरुद्ध मतप्रसार करणारे दोन कॅप्टन आणि आठ फर्स्ट सार्जेण्ट आहेत. या आरोपी लोकांना त्यांच्या गुन्ह्यांबद्दल आग्वाद व मुर्गा-वच्या किल्ल्यांत नेऊन कैदेंत ठेविलें. सरकारच्या या गोष्टीचा कांहीं निमक-हराम लोकांनीं विपर्यास करून असी हूल उठविली कीं, मागील अपराधांचा वचपा काढण्याकरितां गोवा सरकार अशा क्षुल्लक निमित्यांनीं वरीष्ट अमल-दारांना बडतर्फ करीत रहाणार. या गोष्टीनें जो तो आपल्या मनांत

गर्क होऊन गेला होता. त्यांत ह्मापशेंच्या छावणींतील अंमलदारांस कैद केल्यामुळें डिचोलीच्या छावणींत गडबड होऊन दुसऱ्या दिवशीं अकरा वाजतां रात्रौ वरिष्ठांस सैनिकांनीं कैद करून शस्त्रसामुग्री व दारूगोळ्यासह ते पसार झाले व जुन्या गोव्यास जाऊन तेथील युद्धसंग्रहालयांतील लढाऊ सामान स्वाधीन करून घेऊन बॉं झेजूच्या मठांत तळ दिला. तेथील ऑफिसरांवर ते आपली देखरेख ठेऊं लागले. हें वर्तमान हां हां ह्मणतां गोव्यांत सर्वत्र पसरलें; आणि मोठी गडबड उडून राहिली. गव्हर्नरसाहेब स्वतः पणजी शहराची काळजी घेऊं लागले. सर्व शहरभर खडे पहारे ठेऊन बाहेरून शहरांत कोणाचाही शिरकाव होऊं नये ह्मणून रहदारीचे रस्ते रोंखून धरून त्यांवर तोफा मांडल्या व गोलंदाजांकडून योग्य शपथा घेऊन त्यांना असा हुकूम दिला कीं, जरकरतां बंडखोर शहरावर चाल करून येतील तर कांहींच दया माया न धरतां एकदम तोफा डागण्यास सुरवात करा. यामुळें त्यावेळीं पणजी शहर ह्मणजे एक रणभूमीच बनून राहिली होती. अधिकाऱ्यांच्या येरझारा, शिपायांची दौड, गव्हर्नरसाहेबांची लष्करी पोषाखांत शहराची टेहळणी वगैरे गोष्टी पाहून साधारण लोकांच्या मनांत एका प्रकारच्याच कल्पना उदीत होत होत्या. इकडे चारही पलटणी आपआपल्या छावण्या सोडून जुन्या गोव्यास जमा झाल्या. त्यांची इच्छा पणजी शहरावर हल्ला करून तें आपल्या ताब्यांत घेण्याची होती. या उभयतांच्या झटापटीमुळें प्रजेवर मोठा दुर्धर प्रसंग ओढवला. यापुढें आपली काय स्थिति होईल याची चिंता ते अहर्निश करीत होते. अशा स्थितींत गव्हर्नरसाहेबांनीं पहिली रात्र मोठ्या दक्षतेनें गोळीबार करून काढली. अशा दुर्निवार स्थितींत गोवा सरकारला इतर धर्मीयांच्या मदतीची अपेक्षा भासूं लागली. दुसऱ्या दिवशीं गव्हर्नरसाहेबांनीं पोर्तुगीज हिंदुस्थानांतील प्रजाजनांना उद्देशून खालील जाहीरनामा प्रसिद्ध झाला.

## —जाहीरनामा—

" पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सर्व प्रजाजनांस कळविण्यांत येतें कीं, इसवीसन १८६९ तील सप्टेंबरच्या २२ तारखेस डिचोली येथील तिसऱ्या पलटणीनें रात्रौ अकरा वाजतां आपल्या सेनापतीस एकाएकीं

कैद करून बंड उभारलें आणि पहांटेस जुना गोवापर्यंत चाल करून गेल्यावर तेथें फोंड्याची दुसरी व मडगांव येथील पहिली पलटण येऊन त्यांना मिळण्याचें ठरलें. तारीख २३ रोजीं ६ वाजतां फोंड्याच्या पलटणीनें आपली छावणी सोडून आणि २४ तारखेस मडगांवच्या पलटणीनें आपली छावणी सोडून जुन्या गोव्यास त्या जमा झाल्या. या त्यांच्या वर्तनावरून सरकारावर उलटण्याचा त्यांचा बेत आधींच ठरून गेला होता असें दिसतें. या त्यांच्या अकल्पित वर्तनामुळें सर्व देश विस्मयचकित् होऊन सर्व बंडखोर लोकांच्या या वर्तनाचा धिक्कारच करील. विनाकारण आमच्या अन्नदात्या सरकारवर उलटण्याचें कारण काय हें कोणासच समजलेलें नाहीं. ज्या सरकारचे ते ताबेदार आहेत, ज्या सरकारशीं व ज्या प्रजेचे ते संरक्षक आहेत त्या प्रजेशीं वागण्याचे जे नियम त्यांना लागू आहेत, ते उल्लंघन करण्याचें कारण काय, हें जेव्हां ते प्रामाणिकपणें सांगतील तेव्हां त्यांच्या या बहकलेल्या वृत्तीचा व अज्ञपणाचा सर्वांस खेदच वाटेल. अद्यापि आह्मांस अशी आशा आहे कीं, ते आपण होऊन सुविचाराच्या मार्गावरून केलेल्या अपराधाची क्षमा बादशहाकडे मागून त्यांच्या कृपेचा फायदा घेतील. एवढाच त्यांना सरळ व सुलभ मार्ग आहे. देशवासी लोकांनीं असल्या चंचल बुद्धीच्या धमकीला मुळींच भिऊं नये. अधिकाऱ्यांचें जें मूळ तत्त्व आहे, तें आह्मीं सर्वप्रकारें कर्तव्यबुद्धीनें पाळूं, हें दृढतर लक्षांत धरून रहावें. आह्मीं आमच्या सैनिकांकडे सदोदित मित्रभावानें पहात असतां व त्यांचें हित तेंच आमचें हित ह्मणून वेळप्रसंगीं त्यांची तरफदारी करीत असतां आणि त्यांस नवे नवे फायदे मिळावे व पोर्तुगीज सैनिकांचा लौकिक वाढावा ह्मणून खटपट करीत असतां, त्यांनीं कुबुद्धीनें आपल्या लौकिकाचा दुर्लौकिक करण्यास झटावें, यासारखी खेदजनक गोष्ट दुसरी कोणती असूं शकेल ? आह्मीं न्यायानें त्यांच्याकडे वागत असतां त्यांनीं आह्मांस पायबंद घालण्याचा जो उपाय योजिला आहे, त्याची मात्र गय केली जाणार नाहीं, हें त्यांनीं साफ समजावें. फंदफितुरीनें बंडाला प्रवृत्त होण्यापेक्षां हक्कानें न्याय मागणें

योग्य झालें असतें. देशांतील प्रजेनें आणि बंडाला उभे राहिलेल्या पोर्तुगीज सैनिकांनीं अंतःकरणापासून सांगावें कीं, त्यांनीं जो हा प्रकार मांडला आहे तो धडधडीत उपकारांची फेड अपकारांनींच करण्याचा नव्हे काय? आपल्या निशाणावर ज्यांच्या देशाचीं यशस्वी चिन्हें आहेत, त्यांच्या ऐवजीं दुसरें कांहीं नांव किंवा स्वकपोलकल्पित चिन्ह देण्याचा त्यांचा हेतु आहे काय? हा हेतू त्यांनीं बोलून दाखवून त्याप्रमाणें ती पताका उचलून घ्यावी. ज्या पताकेचा सत्कार आज इतकीं वर्षें होत आहे व जी पताका अजून पावेतों या समुद्रावर व किल्ल्यावर सन्मानानें व प्रेमानें फडकत आहे, ज्या पताकेसाठीं शूर पोर्तुगीज वीरांनीं आपल्या प्राणांची आहुती दिली आहे व ज्या पताकेखालीं आजपर्यंत आपलें सुखासमाधानानें संगोपन झालें आहे, त्या विजयी पताकेचा कुत्सित बुद्धीनें धिकार करूं नका. ही पताका आह्मीं राज्यलोभाच्या अपवित्र धुळींत लोळवीत नेणार नाहीं. मोठ्या विश्वासानें पोर्तुगालच्या बादशहानें जसी ती सोज्वल स्वरूपांत आमच्या हवालीं केली आहे तसीच ती पताका जयवान न झाली, तरी कलंकरहीत स्वरूपांत परत त्यांच्या स्वाधीन करूं. या कामीं स्वतःचे प्राण खर्ची घालावे लागले तरी बेहत्तर; परंतु तिला काळिमा ह्मणून लागूं देणार नाहीं. आतां तिच्या शुभ्रपणांत कांहीं फेरफार होऊन डाग पडले असतील; तथापि ते डाग बेअब्रूचे नसणार. जे राजनिष्ठ आहेत, ते आमच्याप्रमाणें ही पताका संरक्षणार्थ उराशीं धरून लढतील व आपले प्राण देतील. ज्या यशाचा हेवा सर्व लोक कारितात, त्या यशास आह्मीं बट्टा लावून घ्यावा हें या देशांतील लोकही कबूल करणार नाहींत. आतां ज्याअर्थीं त्यांनीं बंड केलें, त्याअर्थीं त्यांनीं आपला हेतु उघड बोलून दाखवावा आणि आपआपल्या छावणींत परत प्रवेश करावा. कारण कीं, लष्करीलोकांस छावणी हेंच मानमान्यतेचें खरें मंदिर होय. क्रांतिकारक वर्तन आणि आडमार्ग हें पोर्तुगीज शिपायांस योग्य नाहीं. घोर चुकीनें आडमार्गांत जाणाऱ्या बंडखोरानें विचार करावा कीं, प्रांतांतील व्यापार नाहींसा होण्यास, कृषिकर्म बंद पड-

ण्यास व अखिल नागरिकांस सदैव चिंतेंत दिवस कंठण्यास बंड हेंच कारणीभूत आहे. आह्मीं चिंताक्रांत झालों असतांही शांततेनें व दृढनिश्चयानें असें सांगतों कीं, या बंडानें आमचा न्याय व जनहितेच्छा यांत कांहींच फेरफार होणार नाहीं. आह्मीं व इतर सरकारी अधिकारी यांचें मूलतत्त्व संरक्षण करण्याकरितां जे अधिकार आहेत त्यांनीं बळाच्या इन्साफापेक्षां इन्साफाचें बळ अधिक आहे हें दाखविण्याचा निश्चय केला आहे. आह्मांला देशवासी लोकांचा पाठिंबा आहे, बंडखोरांस ह्मणाल तर ते जेवढ्या जमिनीवर रहातात, तेवढ्या जमिनीखेरीज दुसऱ्या कशाचाही आश्रय नाहीं. अधिकाऱ्यांनीं आपलीं कामें करावीं, आह्मांस लोकांनीं साह्य द्यावें. देशवासी लोकांनीं आमच्या अनिश्चल निश्चयावर, न्यायावर व बंडखोरांच्या अंतःकरणावर विश्वास ठेवावा."

—व्हीस्कॉन्दि द सां जानुआरियु.

नवीन गोवें, ता० २५ सप्टेंबर इ० स० १८७१.

हा जाहीरनामा प्रसिद्ध होतांच बंडवाले विशेष हालचाल न करतां आपआपल्या छावणींत परत गेले. आणि त्यांनीं आपल्या मागण्या सरकारास कळवून त्या पुऱ्या करण्याबद्दल अर्जद्वारां गव्हर्नरास विनंती केली. त्याचा योग्य विचार करण्याचें अश्वासन देऊन त्यांना गव्हर्नरानें शांत केलें. परंतु या भयंकर स्थितीची बातमी पोर्तुगालांत पोर्तुगीजांस समजून तिकडे मोठी गडबड उडाली; आणि उदारमतवाद्यांची व राजपक्षियांची पार्लमेण्ट सभेंत खडाजंगीं उडूं लागली. त्याचा परिणाम असा झाला कीं, रिपुब्लीकनचें भूत गाडण्यासाठीं ह्मणून राजपक्षियांनीं लष्करी सत्तेस डोईजड करून ठेवल्यामुळें गोमांतकांत येणाऱ्या राज्यकर्त्यांना प्रजेच्या आर्थिक सुधारणेंत मन घालण्याचें, लष्करांत छाटाछाट करून तिजोरीच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याचें न सूचतां गरीब दुबळ्या प्रजाजनांनीं अत्यंत काबाडकष्ट करून रक्ताच्या थेंबावजा मिळविलेले आणि बादशाही लष्करच्या तोफखान्यास भिऊन सरकारी तिजोरींत भरलेले पैसे पाहिजे तसे उधळणें आणि तूट पडल्यास कर घालून पैसा जमविणें असली अंदाधुंदी चालूं लागली. अशावेळीं ह्मणजे इ० स० १८८१ त गोव्यांतील राज्यसूत्रें लष्करी

सत्तेचे भोक्ते कॉन्त आदूमिरल कायतान, आलशान्द्र आलमेद यांच्या हातांत पडून जवळ जवळ रशीयन राज्यपद्धतीवर येथील कारभार चालू झाला. ह्मणजे ' अजयूथा लांडगा जसा पाळी ' या न्यायानें वर्तत असत. अर्थात् अशा जागीं सामोपचाराचे व्यवहार न चालतां " कंटकेनैव कंटकम् " हाच न्याय चालूं व्हावा हें ठीकच आहे. न पेक्षां सत्तर प्रांतांतील बंडखोरांची इच्छा आणि जगांतील इतर कोणत्याही भागांतील बंडखोरांची इच्छा यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. इतर भागांतील बंडखोर स्वतंत्रेतेची, समतेची ध्वजा फडकावी ह्मणून लढत, तर सत्तरकर सुखासमाधानानें पोटभर अन्न खातां यावें ह्मणून झटत. सत्तरकरांनीं पोर्तुगीजांच्या पताकेवर हल्ला केव्हांच केलेला नव्हता. असें असतांना हे राज्यकर्ते त्यांनां पोटभर अन्न व अंगाला अंगभर कपडा मिळावा ह्मणून सुद्धां सौजन्य दाखवीत नव्हते. हा आप्पलपोटेपणा आश्चर्यजनकच नव्हे काय? अत्याचाराच्या कामांत नाणावलेली आसुरी सत्ता ज्यावेळीं रशियांत थैमान घालीत होती, त्यावेळीं बंडखोरांचें विशेष पीक काय तें रशीयांतच येत होतें; व त्यांचा हेतू सर्वांना दास बनविणाऱ्या सत्तेचा नायनाट करून दुसरीच पताका उभविण्याचा होता; व याअर्थीं त्यांचे याच तत्त्वावर प्रयत्न चालले होते. कारण रशियन कायद्याची निपज सर्वस्वीं राजाच्या लहरीवर अवलंबून असल्यानें सरकारी सत्ताधिकाऱ्यांची ज्यांच्यावर अवकृपा असे, त्यांचा सत्यनाश केव्हां होईल याचा नेम नव्हता. राव असो रंक असो; त्यानें पोलीसांची मर्जी राखलीच पाहिजे. झारच्या नांवावर जीं जुलमी फर्मानें सुटत तीं मुकाट्यानें मान्य केलींच पाहिजेत; प्रजेच्या भवितव्यतेचीं सूत्रें पोलीसांच्याच हातांत खेळत असत; यामुळें यःकश्चित् पोलीस शिपायांच्या मनांत येईल तर केवढाही वजनदार नागरीक असला तरी सैबेरीआच्या ओसाड मैदानांत त्याची रवानगी होण्यास उशीर लागत नसे. सारांश, लष्करी सत्तेची राक्षसी राज्यपद्धति ह्मणून ज्या ज्या ठिकाणीं आपला धिंगाणा घाली त्या त्या ठिकाणीं प्रजेची आतताईप्रवृत्ति पेट घेतल्यावांचून रहात नाहीं. उदाहरणार्थ, ईजीप्तांतील कहराकडे दृष्टी फेंका; आयर्लंडांतील परिस्थितीचें पर्यालोचन करा; किंवा आपल्या हिंदुस्थानांतील प्रत्येक गोष्ट ध्यानांत घ्या. दिल्लींतील गोळीबार,

पंजाबची कत्तल, धारवाडची करुणकहाणी, चौरीचौऱ्याचा धिंगाणा, मुंबईंतील धामधूम अशासारखी कोणतीही गोष्ट लक्षांत घेतली असतां सत्तान्ध अधिकाऱ्यांच्या राक्षसीमहत्त्वाकांक्षेस बळी पडून निःशस्त्र गरीब जनतेस कसें प्राणास मुकावें लागतें, हें आपणाला दिसून येतें. कदाचित् वरील गोष्टी या स्वातंत्र्य उपभोगण्यास प्रवृत्त झालेल्या जनमनादर्शक तरी होऊं शकतील; परंतु गोव्यांतील धामधूम ही नोकरशाहीच्या अरेरावीमुळें आणि त्या अरेरावीस मदत देणाऱ्या न्यायाच्या खेळखंडोब्यामुळें होत होती, असें पुढील वर्णनावरून दिसून येईल. वस्तुतः आह्मां आर्यांची राजनीति आह्मांस असेंच शिकवीत आलेली आहे कीं, "राजा पिता च माता च" व या दिव्य तत्वानुसार आमचे लोक वागत आलेले आहेत. या तत्त्वांना नांवें ठेऊन हिंदुसंस्कृतीचा उपहास करणारे युरोपीयन लोक आतां कुठें जागे होऊन नीहिलीस्ट, सिनफेन, बोल्सेव्हीक, रिपब्लिक, हीं प्रकरणें आहेत तरी काय याचा विचार करूं लागले आहेत. ज्या पौर्वात्य संस्कृतीनें "नाः विष्णुः पृथिवीपात्तिः" ह्मणून राजसत्तेचा गौरव केला, त्याच राजेलोकांचा शिरच्छेद आज यूरोपांत कां होत आहे याचा विचार करतां हिंदुसंस्कृति ह्मणजे वेड्यांचें शास्त्र, मूढांचीं तत्त्वें ह्मणून नांवे ठेवणारे युरोपियन लोक गळीं विष उतरल्यानंतर तींच दिव्य तत्त्वें खरीं ठरवूं लागले.

फ्रान्सांतील राजघराण्यांत झालेली कत्तल आणि विटंबना आज ऐकिल्या तरी सुद्धां कित्येकांना डोळ्यांतून अश्रू ढाळावयाला लावतील. त्या होण्याचें कारण राज्यकर्त्यांनीं आपल्या प्रजेशीं कसें वागलें पाहिजे, याचा विचार त्यांच्या शास्त्रांत नव्हता, किंवा राज्यकर्ते करीत नव्हते; ह्मणून घोर अनर्थ युरोपांत घडले किंवा घडत आहेत. तेच जर आपल्या ख्यालीखुशालीस लुब्ध न होतां प्रजेस, गर्भवंती स्त्री आपल्या गर्भाला हितावह होण्यासाठीं जशी वागते, त्याचप्रमाणें राजे लोक प्रजेच्या हितासाठीं जर बाजूस ठेवते, तर प्रजाही "राजा पिता च माता च" ह्मणून वागली असती; पण ज्याठिकाणीं आपल्या ख्यालीखुशालीकरतां, आवडीनिवडीकरतां आणि चैनीकरतां कोट्यावधि पैसा सत्तेच्या जोरावर उधळून फन्ना पाडण्यांत येतो, स्वतःच्या लहरीवर कायदे निर्माण करतां येतात, आणि विनाकारण अरेरावी

गाजविली जाते, त्याठिकाणीं विष्णु तर असोच, पण राजाला देखील राजा न समजतां तो एक उच्चदर्जाचा चाकर समजून प्रजा वागत असते व त्या चाकराच्या उर्मटपणाला जी टक्कर द्यावी लागते, त्याला लोक दरबारी भाषेंत बंड अशी संज्ञा देतात. आतां सत्तेच्या अतिरेकानें होणारीं बंडें कित्येक लोक आपल्या मनांत माजवितात तर कित्येक लोक जनांत माजवितात. उदाहरणार्थ, पोर्तुगीज सरकारचे कांहीं कायदे जरी चांगले असले, तरी त्या कायद्यांवर वरिष्ठांची अंमलबजावणी होत नसल्यानें नोकरलोक मनसोक्त धांगडधिंगा घालतात. कोर्टाचा एक नियम असा आहे कीं, प्रत्येक कोर्टाच्या बैठकीस तीन साक्षीदार काढले पाहिजेत. या नियमानें न्याय मागणाऱ्यावर खर्चाचा बोजा फार पडत नाहीं. ही गोष्ट खरी; परंतु अंमलबजावणी होत नसल्यानें आजच्या गोव्यांतील खालच्या कोर्टांत एका साक्षीदाराला कोर्टाच्या पांच पांच बैठकी भराव्या लागतात, यामुळें ज्या कोणास पांचशें रुपये खर्चून न्याय मिळविण्यांची आशा होती, ती त्या आशा निष्फळ होऊन पांचशेंच्या ठिकाणीं पांच हजार खर्च करावा लागून न्यायाची वाट बिकट होऊन बसलेली आहे. असें कां होत आहे ? तर तें इतक्याच करतां कीं, कोर्ट फी करतां नोकरलोक अधाशीपणानें टपून बसलेले असतात; कज्जेदलाली मिळविण्यासाठीं टपून बसलेले वकील लोक एकादी शिकार सांपडली ह्मणजे त्याला अल्लाचा फकीर बनवल्यावांचून सोडीत नाहींत; आणि अल्पखर्चांत प्रजेला न्याय मिळावा ही सद्वासना पांच मिनिटें बोलल्याबरोबर भारीच श्रम पावणाऱ्या न्यायाधिशाला नसते. न्यायाधिशाला जर न्यायाच्या बजावणीची चाड असती तर न्यायापायीं कुटुंबाचीं कुटुंबें भिक्षापति होऊन वकील, कारकून, बेलीफ वगैरे लोक लक्षाधिश कसे झाले असते ? त्यांतल्यात्यांत एकाद्या न्यायाधिशाची बदली होऊन दुसरा पोर्तुगालहून येण्याला कालावधि असला, ह्मणजे मध्यंतरीं अधिकारावर असलेल्या इंडियन साहेबाची पोळीच पिकते मग त्या न्यायाचा चुथडा विचारूंच नये. डिचोलीच्या कोर्टांत येथील चर्चकमेटीविरुद्ध हक्कदारी बद्दल माजलेल्या दाव्यांत न्यायाचा काय खेळखंडोबा झाला हें त्या परमेश्वरालाच ठाऊक ! बिचारा फिर्याद मांडणारा रा. फळारी न्यायाकडे न जातां बंड उभारता, तर मात्र त्याला फैसला तावडतोब मिळाला असता

पण तो विचारी, कुटुंबवत्सल आणि ' राजा पिता च माता च ' ही आर्यांची राजनीति पाळणाऱ्या पांढरपेशा मंडळींतील; ह्मणून त्यानें पूर्ण विश्वासानें ' राजा चक्षुर चक्षुषाम् ' ह्मणजे राजाचे कान, डोळे अशा नोकरांकडूनच न्याय मिळणार ही भावना दृढ धरली; पण कुष्टोबा या विचाराचा नव्हता. त्याची न्यायानें फसवणूक केल्यामुळें त्यानें बंड केलें. त्या हकीकतीकडे आतां वळूं.

परवशता, निरयदुःख आणि दारिद्य हीं मानी मनुष्याला पदोपदीं त्रासदायक होत असतात. त्यांत आणखी गर्विष्ठ मनुष्यांकडून त्याच्या जाणूनबुजून अपमान झालेला त्याला सोसवत नाहीं. तो अपमान त्याला एकाद्या कांट्याप्रमाणें त्रासदायक होतो. चारुदत्ताच्या मुखांतून " दारिद्याऐक्षां मरण बरें " असे उद्गार बाहेर पडण्याचें कारणही पण हेंच होय. अनेक कारणांमुळें सत्रींतील कांहीं घराणीं दारिद्यांत गांजलीं होतीं. त्यांत अडवई येथील हणमंतरावाच्या घराण्यांतील बायका गोविंदभट्ट अडवयकर यांच्या पोफळीच्या बागेंत काम करीत होत्या. त्या फिरून आपल्या घरीं परततेवेळीं त्या बागेंत खालीं पडलेले कांहीं बेडे घेऊन जाऊं लागल्या. हें त्यांचें कृत्य भटास समजून तो त्यांवर रागावून अनुच्चारित शब्दांनीं त्यांची विटंबना करूं लागला. ते शब्द त्या बायांस सहन न होऊन त्यांनीं उलट कांहीं दुःशब्द वापरले. त्यांमुळें तो भट चिडून जाऊन त्यानें त्यांची विटंबना केली; आणि शिक्षाही केली. यावेळीं गोविंद गोवेंकर या नांवाचा सांखळीचा व्यापारी शिकारीकरतां फिरत असतां तेथें पोंचला. त्यानें त्यावेळीं भटास दूर सारून बायांसही दूर नेलें. परंतु त्या खवळलेल्या नागिणींचा डंख भटास योग्य शासन झाल्यावांचून शमण्याचें चिन्ह दिसेना. त्यांनीं आपले नवरे घरीं आल्यावर ही बातमी फुगवून त्यांना सांगितली. राणे एकदम तुफान झाले व त्वेषानें भटाचा सूड घेण्याकरतां निघाले. शेवटीं भटांत आणि राण्यांत भयंकर मारामारी होऊन भटास जखमांनीं जर्जर करण्यांत आलें व हें प्रकरण सरकारांत गेल्यावर राण्यांवर वारंट सुटलें. एकास सरकारी लोकांनीं कैद करून नेलें व हणमंतराव व अमृतराव यांनीं पळ काढला. त्यांचें लपण्याचें ठिकाण

शोधून काढून त्यांना पकडण्यासाठीं एक शिपायांची तुकडी रवाना झाली, तेव्हां ते बार उडवून घरास दिलेल्या वेढ्यांतून एका शिपायास जखमी व एकास ठार करून निसटले व कांहीं मंडळी मिळवून बंड उभारण्याची तयारी चालविली; इतक्यांत सरकारच्या लोकांनीं शेतांची जप्ती करून तीं लिलावांत काढलीं आणि घरास आग लावून तें जाळून टाकलें. अशा वेळीं सरकारचें व उजगांवच्या कुष्टोबाचें वितुष्ट येण्यास एक कारण घडलें.

कुष्टोबा गांवकर हा अतिशय दांडगा, आजानुबाहू, सशक्त इसम “ मिठाचा ”चा व्यापार करून बैल वहात होता. त्याच्या अद्भूत शक्तीविषयीं अशी एक आख्यायिका प्रचलित आहे कीं, सुपें येथें व्यंकोबा दलालाच्या येथें आपले बैल घेऊन गेला असतां दोघां दोघां इसमांकडून बांबूची काठी घालून उचलण्यांत येणारी एक गोणी त्यानें एकाच हातानें सहज उचलून तडीस लावली. व्यंकोबानें त्याची विलक्षण शक्ति पाहून असा प्रश्न केला कीं, “ तुला कुस्ती खेळतां येते का ? ” त्यावर तो उत्तरला; “ मला कुस्तीचे डावपेंच ठाऊक नाहींत; तथापि घांटावरील दांडग्या चार पांच इसमांना मी हार जाणार नाहीं. या गोष्टीनें घांटी पाहिलवानास लाज वाटून त्यांनीं हें प्रकरण पैजेवर आणलें. हरणाऱ्या पक्षानें शंभर रुपये पैजेदाखल द्यावे असें ठरलें. पांच सशक्त घांटी इसमांशीं सामना देण्याचें निश्चित होऊन कुष्टोबानें पैज जिंकली. व्यंकोबानेंही एक उपवस्त्र देऊन त्याचा गौरव केला. गोवें ही त्यावेळीं बऱ्याच सशक्त लोकांची जन्मभूमि होती असें कुष्टोबा किंवा खेरूभट यांच्या गोष्टीवरून दिसून येतें. खेरु हें नांव त्यानें आपल्या अलोट शक्तीमुळें मिळविलें. त्याचा जन्म बोर्डेच्या ठाकूर ब्राह्मण घराण्यांत झाला. त्यांच्या संपूर्ण चरित्राबद्दल माहिती जरी आज उपलब्ध नसली, तरी असें खास ह्मणतां येईल कीं, ते एक भीमकर्मी वीर होते. ते घांटावरून खालीं येत असतां दहा बारा सशस्त्र रामोशांनीं त्यांवर हल्ला केला. बरोबरच्या मंडळींची बोबडी वळली; पण खैरूनें न डगमगतां जवळचा एक “ खैरी ”चा वृक्ष उपटून रामोशांचा समाचार घेतला. या शूर पुरुषाची व आजच्या पिढींतील पाद्यांच्या पितरांची तुलना केली ह्मणजे खरोखरच मन उद्विग्न होऊन जातें. असो.

कुष्टोबाचें आणि कष्टम अधिकाऱ्यांचें वितुष्ट पडून वाद उपस्थित झाला; व तो पुढें विकोपास जाण्यास असें कारण घडून आलें कीं, कुष्टोबानें बुलें भावीण या नांवाची मेलावली या गांवीं एक रखेली ठेविली होती. तिच्यावर एका शिपायाची नजर जाऊन तो तिच्याबद्दल खटपट करीत होता म्हणून कुष्टोबानें तिला गांजें गांवीं आणून ठेविली. त्या रागानें शिपायानें त्याच्यावर कुभांड रचून त्याचा चोरीचा म्हणून कांहीं माल पकडला. ही तक्रार त्यानें कुळेंच्या कष्टम अधिकाऱ्याकडे नेली; परंतु त्यानें कुष्टोबास न्याय न देतां पूर्वद्वेष उगवण्यासाठीं आपण " ऑफेंस " केलें म्हणून त्याला शिपायाकडून मेज करावयास लावलें. त्या दाणगटांचा सत्तेच्या बळावर झालेला अपमान व त्या अपमानाच्या आगींत बुलें-प्रेमी शिपायानें ओतलेलें तेल, येणेंकरून कुष्टोबाच्या सर्वांगाचा भडका उडाला. तो राग अनावर होऊन कुष्टोबानें संधी साधून शिपायाचा जीव घेतला; व नांवाचा कुष्टोबा असेन तर तुला तुझ्या उर्मटपणाचें प्रायश्चित देईन असा कष्टम अधिकाऱ्यास निरोप पाठवून तो हणमंतरावास जाऊन मिळाला. बंडाची धामधूम सुरू झाली व तिचें शमन करण्यासाठीं अधिकाऱ्यांची धांवपळ व सैन्याच्या इकडून तिकडे व तिकडून इकडे हालचाली होऊं लागल्या. दिवसेंदिवस कुष्टोबाच्या टोळीचें महत्त्व वाढूं लागून तिला राण्याचें नांव मिळालें. राण्याची टोळी ज्या ज्या ठिकाणावर हल्ला करी, तें तें ठिकाण—मग तें गांव असो किंवा शहर असो. धुऊन पुसून निघे. याप्रमाणें जिकडे तिकडे कहर उठला. लोकांचे खून या बंडांत फार पडूं लागले व लुटालुटीनें लोकांना भिकारी करून सोडलें. बंडखोरांचें निर्दलन करण्यासाठीं सरकारनेंही पुष्कळ खटपटी चालविल्या कुष्टोबास जीवंत धरून देणाऱ्यास तीन हजार रुपयांचें बक्षीस जाहीर करण्यांत आलें; व त्याला ठार करणाऱ्यास एक हजार रुपये देण्याचेंही सरकारनें आश्वासन दिलें. कुष्टोबाला पकडण्याचे बरेच प्रयत्न झाले परंतु तो धूर्त पुरुष सरकारी लोकांच्या हातावर तुरी देऊन पसार होई. त्याच्या धाकानें व दराऱ्यानें लोक थरथर कांपत असत. सरकारलाही गुप्त छापे व अचानक दरोडे घालून त्यानें भंडावून सोडलें. तो जसा धिप्पाड होता, तसाच तो हुशार, तिरंदाज व चपल असून सदा सशस्त्र व सावध

असे. परंतु त्याची कामवासना अनिवार होती. त्यानें एका ब्राह्मण स्त्रीला हजारों रु. दागदागिने देऊन फोंड्याजवळ कोर्लीला ठेविली होती. त्याचप्रमाणें त्याची पूर्वीची रखेली भावीण या धामधूमींत गांज्याहून काणकोणच्या एका खेड्यांत नेऊन ठेवण्यांत आली होती. सरकार फार हैराण होऊन त्याला पकडण्यासाठीं आंतून व बाहेरून सारख्या खटपटी करीत होतें. कुष्टोबाचा त्रास वाढत जाऊं लागला व त्यामुळें सरकारास कुटील राजनीतीच्या आडमार्गाचा अवलंब करणें भाग झालें. म्हावळींगच्या आपा राण्यास बोलावून द्रव्याच्या लालुचीनें बुलेभावणीस मोहिनी घालण्याचें काम सुरू झालें.

इकडे कुष्टोबाची धामधूम चालू असतां एके दिवशीं अशी गोष्ट घडून आली कीं, उजगांवास वार्षिक जत्रा मोठी होत असे व मोठमोठे व्यापारी वर्षोवर्षीं त्या जत्रेस आपला माल घेऊन जात होते; यावर्षी बंडाच्या भयानें व्यापारी संशयांत होते; परंतु महाजन मंडळीच्या आग्रहावरून सांखळीचे रा. गोंद पै, बुतल आणि डिचोलीहून रा. नारायण शेणवी पालेकर व इतर कांहीं व्यापारी गेले होते. त्याचप्रमाणें डिचोली येथील केशव शेट आळवे यांची नाटक. मंडळीही महाजन लोकांच्या आग्रहावरून तिकडे नेण्यांत आली होती. यावेळीं कुष्टोबा आपल्या टोळीसह अंत्रुजप्रांतीं धिंगाणा घालीत होता. तो आपल्या गांवच्या जत्रेसाठीं ह्मणून अकरा बारा वाजतां मुद्दाम आला. सरकारास ही बातमी पणजीस अपरात्रीं समजली. इकडे कुष्टोबाची स्वारी आलेली ऐकतांच सगळे व्यापारी कुष्टोबास शरण गेले व ' आह्मी पोटासाठीं तुमच्या देवाच्या जत्रेस आलों असून तुह्मी मेहेरबानी कराल तरच आह्मीं पार पडूं. ' अशी त्यांनीं कुष्टोबाला विनंति केली. कुष्टोबानें त्यांस अभय देऊन आपल्या सर्व लोकांस कोणासच न लुटण्याबद्दल ताकीद दिली. गांवांत चोंहोंकडे मोर्चे पहारे ठेवले व प्रसंगविशेषीं ज्यानें त्यानें आपआपले प्राण राखावे अशी सूचना देऊन मोठ्या हौसेनें आपण नाटकांत भाग घेतला. कुष्टोबा जत्रेस आल्याचें समजतांच पणजीहून कमाण्डर आगुस्तीन्ज्यु पिंज याला कांहीं गोरे सोल्जर व मुसलमान शिपाई हाताखालीं देऊन पाठविण्यांत आलें व त्यांनीं गुपचुप येऊन मंडपास वेढा दिला. ही बातमी कुष्टोबास समजतांच तो फार गांगरून गेला. लोकांतही मोठी खळबळ उडाली. कुष्टोबाच्या

ग्रेळींतील लोक फरारी झाले. क्याप्टननें शांततेनें नाटक पुरें करण्यास परवानगी दिली; परंतु आंतून बाहेर व बाहेरून आंत कोणासही उजाडण्यापूर्वी यावयास मिळावयाचें नाहीं असें बजावलें. शेवटीं कंपनीचे मालक रा. केशव आळवे यांनीं कुष्टोबावरील संकट टाळण्यासाठीं एक शक्कल काढली. मध्यंतरींच नाटकाचा प्रोग्राम बदलून मयासुराचा देखावा पुढें आणला व कुष्टोबासहीत सात आठ असामीस बेमालूम राक्षसी वेष देऊन आतषबाजी, नारिंगें, नळे, चंद्रज्योती वगैरे प्रकारचें दारूसामान लावलें. राक्षस गर्जना करीत नाचूं लागले व शिपाई लोक ती मजा पहाण्यांत मग्न झाले; इतक्यांत कुष्टोबा एकदोन शिपायांना गचांडी देऊन निसटला व कांहींसा पुढें जाऊन एका शेतांत उडी घेऊन तेथील एका कृत्रिम बाहुल्यावर आपला दीप वगैरे लावून सजवलेला टोप घातला व एकदम धूम ठोकून काणकोणचें रान गांठलें. इकडे सर्व शिपाई आपल्या बंदुका सरसावून त्याच्या पाठीस लागले व शेतांत दिसणाऱ्या बाहुल्यावर बंदुकीचे बार सोडूं लागले; परंतु कांहीं वेळानें तें बाहुलें असल्याचें दिसून आल्यावर सभोंवारच्या दऱ्याखोऱ्यांत व झाडाझुडपांत तपास करून निराश होत्साते परत फिरले आणि नाटकमंडळीला खालींवर करूं लागले. मंडळीनें त्यांस निक्षून सांगितलें कीं, "कुष्टोबा आमचा जीव घेण्याची भीति दाखवूं लागल्यामुळें आह्मीं त्यास केवळ अखेरची हौस फिटावी ह्मणून रंगवला. सरकारच्या लोकांनीं बाहेरून वेढा दिला असतां तो पळून जाईल हें आह्मांला काय ठाऊक? आह्मीं त्यास पळून जाण्याला तर सांगितलें नाहींच; परंतु वेढा घालणाऱ्या लोकांनाही त्यास वाट द्यावयासाठींही पण विनंति केली नाहीं." या उत्तरानें कॅप्टनचें समाधान झालें व हातची शिकार गमावल्याबद्दल हळहळत ते पणजीला परत फिरले.

यावेळीं कुष्टोबानें मोकळ्या मनानें डिचोलीच्या कांहीं मंडळीला जी हकीकत सांगितली तीवरून पाहतां एवढेंच दिसून येतें कीं, आजपर्यंत लोकांना तापदायक होणारीं सर्व बंडें एकाद्या ट फ करणाऱ्या आगलाव्या कज्जेदलालापासून तों वरच्या दर्जाच्या न्यायमूर्तीपर्यंत कोणत्यानाकोणत्या आमिषांना बळी पडून न्यायाचा चुथडा [illegible] न अहंपणा गाजवणाऱ्या, स्वार्थी मनुष्याच्या पातकापासून सुरू झालीं असून या एका व्यक्तीच्या अपराधाबद्दल सगळ्या जनतेचा कोंडमारा झालेला आहे.

राण्यांच्या हल्ल्यांत राण्यांना जीवाशेनें कोणी कांहीं दिलेलें समजलें ह्मणजे सरकार बंडखोरांना मदत केल्याबद्दल पकडून देणाऱ्यास तुरुंगांत ढकलण्यास कमी करीत नसे, उलट, बंडखोरांचा हल्ला आल्याबरोबर त्यांना पत्रपुष्प दिल्याशिवाय जिवानिशीं जगण्याची आशा नव्हती. घरदार, वतनवाडी, शेतीमाती सोडून दुसरीकडे राहून उदरपोषण करणें कंगालस्थितींत शक्यच नव्हतें व ह्मणूनच प्राप्तस्थितीला कसेंबसें तोंड देऊन दिवस कंठणें प्रजेला भाग झालें होतें. अशा वेळीं चमत्कारिक रीतीनें बंडाचा शेवट झाला.

कुष्टोबाचा कांटा उपटून काढण्यासाठीं आप्पा राण्यानें बुलें भावणीस फितूर करून घेतलें व त्याबद्दल बक्षीसही बरेंच देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें एके दिवशीं " मटण पार्टी " चा बेत जुळवून कुष्टोबाचा सोक्षमोक्ष करण्याचें निश्चित झालें. बुल्याच्या प्रयत्नानें या 'बांकेतीचा' बेत मुकरर होऊन आप्पा राण्याला आमंत्रण आलें. आपाची व कुष्टोबाची जुनी मैत्री होती. सरकारी लोकांची तुकडीही गुप्तवेषानें बुल्याकडून ठरल्याप्रमाणें इशारा मिळतांच हल्ला करावा, या हेतूनें दबा धरून बसली. कुष्टोबाच्या बंदुकींत पाणी ओतण्याचें काम बुल्यानें मोठ्या शिताफीनें बजावलें व सर्व मंडळी मटण खाण्यास बसली असतां थोड्याच वेळानें शौचाच्या निमित्तानें बुलें भावीण दार उघडून बाहेर पडलें. ही इशारत मिळतांच सरकारी इसमांनीं हलकेच त्या दारांतून प्रवेश करून नेमकी कुष्टोबाच्या बरगड्यांत गोळी झाडली. कुष्टोबानें बंदुकीस हात घातला, तों ती थंड असलेली पाहून त्याच्या डोक्यांत एकंदर लबाडीची कल्पना आली व तो " बुल्या, तुझा गर्भ खाणार, तुझ्या आंतड्या खाणार " असें ओरडूं लागला. गोळीच्या आवाजाबरोबर इतर मंडळी दुसऱ्या दरवाजानें पसार झाली व शिपायांनीं कुष्टोबावर दुसरी गोळी झाडून त्याला ठार केलें. त्याचें शीर पणजीस नेण्यांत आलें.

नंतर आबा राण्याच्या मध्यस्तीनें हणमंतराव राण्याचा हेतु समजून घेतला, तेंव्हां त्यानें आपली सरकारजमा झालेली वतनवाडी परत मिळावी, पकडून नेलेल्या आपल्या बंधूस बिनशर्त सोडावें व चालू वहिवाटीप्रमाणें सर्वांस माफी मिळावी अशा अर्थाच्या केलेल्या मागण्या सरकारनें कबूल करून माफीची द्वाही फिरविली व् अशा रीतीनें एकदां बंडाची शांतता करण्यांत

आली. वाचकांनीं यापासून एक गोष्ट ध्यानांत घ्यावी कीं, बुल्यासारखी एक यःकश्चित् स्त्री एका प्रतापी पुरुषाचें सर्वस्व स्वाहा करणारी अतिक्रूर सिंहीण होऊं शकते. असो.

---

प्रकरण सातव.

## जेथें स्वार्थाच्या आशेनें जुलूम केला जातो तेथें क्रांतीच्या कांट्यांनीं अंग फाटत असतें !

यथाहि गर्भिणी हित्वा स्वप्रियं मनसोऽनुगम् । गर्भस्य हितमाधत्ते तथा राज्ञाप्यसंशयम्।
वर्तितव्यं कुरुश्रेष्ठ सदा धर्मानुवर्तिना । स्वप्रियं तु परित्यज्य यद्यल्लोकहितं भवेत् ॥

—महाभारत.

धूर आहे तिथें आग आहे, डोंगरावर धूर आहे, तर तेथें आगही असणारच. हें तत्त्व भौतिकशास्त्रवेत्ते ज्या रीतीनें प्रतिपादितात, त्याचरीतीनें कार्य आहे तेथें कारणही असलेंच पाहिजे, असें प्रतिपादण्यास हरकत नाहीं. सत्तरप्रांतांत अत्याचार, बंडाळी फिरून फिरून कां माजत असेल तर त्यास तशींच बलवत्तर कारणें होतीं ह्मणून. केव्हांही कारणाशिवाय क्रिया होत नसते. परंतु कांहीं धूर्त लोकांचा स्वभावच असा असतो कीं ते स्वतःचें पांडित्य पाजळून काशीयात्रा केल्याच्या फुशारक्या मारीत सुटतात खरे; परंतु मांजराची हत्या केल्याचा थांगसुद्धां लागूं देत नाहींत. यामुळें लोक त्यांच्या पुण्याची प्रशंसा करून, पातक बिनवारसी ठरवितात. अशारीतीनें मुकें जनावर हालहाल होऊन कां मेलें याकडे कानाडोळा होऊन त्याची चौकशी जनतेच्या न्यायासनापुढें मुळींच होत नाहीं, हें एक आश्चर्यच नव्हे काय? सत्तरप्रांतांतील वस्तुस्थिति अशीच होती. अत्याचाराचा उगम कां व कोठून होतो याची काळजीपूर्वक चौकशी सरकार कर्तव्याला स्मरून करीत नव्हतें. स्टांपकागदांनीं शक्ति नसतांही केलेल्या विनंतिअर्जांना केराची टोपली दाखविण्यांत येत असे. उलट खालच्या नोकरांनीं दुरून कानांत ओतलेल्या गरळानें एकदम बेफाम होऊन दुसऱ्यांचा चावा घेण्यास धजण्यासारख्या लंबकर्णी धोरणानें अन्यायी जुलम घडून येत होता व त्यामुळेंच सत्तरप्रांतांत

अत्याचारांस ऊत येत होता. न्यायांत समता, स्वभावांत शांतता आणि खर्चांत काटकसरीपणा ठेऊन न वागतां स्वार्थी व लहरी कायदे, जुलुमाची अंमलबजावणी व अरेरावीचें वर्तन असें धोरण सरकार ठेवीत असल्यानें, बंडाला वारंवार उठाव मिळूं लागला. शांतता, सुबकता, व सत्य यांची आपल्या राज्यांत जोपासना करण्याचें ध्येय ठेवलेलें सरकार, आपल्या हातून झालेल्या दोषांची माफी उघडपणें मागून पुढें तसा प्रकार घडूं नये याबद्दल काळजी घेत असतें. उदाहरणार्थ, जनरल डायरची बाजू घेऊन एडवर्ड कार्सन ज्यावेळीं सन १९२२ त ता० ८ जुलई रोजीं लंडनच्या भर पार्लमेंटांत भांडूं लागले, तेव्हां इंग्रजी आर्मीखात्याचे प्रधान मि. चर्चिल यांनीं स्पष्टपणें सांगितलें कीं, " जनरल डायरनें जालीयनवाला बागेंत कत्तल करून हिंदुस्थान बचाविलें हें खोडसाळपणाचें आहे. आमचें राज्य केवळ मनगटाच्या जोरावर टिकलेलें नाहीं. प्रजाजनांच्या संमतीनें राज्य करण्याची कला आह्मांस साधलेली आहे. आणि हिंदुस्थानांत याच कलेवर आमचें राज्य टिकलेलें आहे. इजिप्तांत हल्लीं राज्यकर्ते व प्रजा यांमध्यें छत्तिसांचा आंकडा उत्पन्न होण्याचें कारण ह्मणजे आमचे लोक त्यांच्याकडे मत्सरी भावानें पाहूं लागले आणि आपले-पणा सोडून तरवार गाजवूं लागले हेंच होय. मॉंटेग्युसाहेबांनीं वेळींच सुधारणा दिल्या नसत्या तर हिंदुस्थानांतही तसाच घोर प्रसंग आला असता. तो प्रसंग टाळण्यास इंडिया ऑफिसनें जशी खबरदारी घेतली, तसेंच धोरण ईजिप्त व आयर्लंड यांकडें देखील आपण ठेविलें असतें, तर चांगलें झालें असतें. " सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, स्वतःच्या दोषांकडे दृष्टी वळ-वून ते सुधारण्याची दक्षता ठेवणें ह्मणजेच राष्ट्रांत खरी शांतता नांदवणें होय. असें न करतां दह्यांचें दूध करण्याची इच्छा धरली तर ती कशी साध्य होणार? सदोष राज्यपद्धतीमुळें होणारीं बंडें जरी मि. चर्चिलसारख्या सुविचारी पुरुषांनीं येऊन थंडावलीं, तरी, कार्सनडायरसारख्यांना तीं उप-स्थित करण्यास जीं साधनें मिळतात, तीं साधनेंच त्यांना न मिळूं देण्याची अधिकाऱ्यांनीं कायद्यानें खबरदारी घेणें, ह्मणजेच खरी शांतता होय, असें आह्मांस वाटतें. कारण नावाडी सुजाण असला तर नावेंतील उतारू सुखानें पैलपार होईल; नपेक्षां त्याच्या गाफीलपणामुळें सर्व उतारूंना दुःखें भोगावीं

लागतील. जी नावेची गोष्ट तीच राज्यनौकेची. ' पिंडीं तेंच ब्रह्माण्डीं ' या न्यायानें राज्यकर्त्यांच्या मूर्खपणाचें प्रायश्चित्त अखिल प्रजाजनांला कसें भोगावें लागतें त्याचें प्रत्यंतर खालील हकीकतीवरून वाचकांना आल्याशिवाय रहाणार नाहीं.

सत्तर, हेमाडबारशें व काणकोण या भागांतच फिरून फिरून बंडाची धामधूम कां उठते याचा विचार निस्पृहपणें करणाऱ्याच्या ध्यानांत एक गोष्ट अतिशय लवकर येते; व ती ह्मणजे आधींच नापिकपणामुळें हे प्रांत कंगाल असून, शिवाय, इल्य, सासष्ट, बारदेश वगैरे प्रांतांतील ख्रिस्ती लोकांप्रमाणें सज्ञानपणानें सरकारी नोकऱ्या स्वीकारणारे किंवा आफ्रिका, मुंबई, मद्रास वगैरे ठिकाणीं जाऊन बॉय-बटलर-कुकच्या जागा पत्करून कुटुंबपोषण करणारे लोक हिंदु नव्हत ही होय. दुसरें, विशेषतः हिंदु इसमास, आफ्रिकेस जाण्यास कायद्याचा मज्जाव, हा कायद्याचा दोष; धर्मशास्त्राची परदेशगमनास आडकाठी, हा कायद्याचा दोष व भीक मागून खाणें पत्करलें; परंतु घरदार, बायकामुलें सोडून बाहेर जाऊन मिळणारें सुख नको असें सांगणारा सामाजिक कमकुवतपणाचा दोष; इत्यादि अनेक कारणांनीं दारिद्र्याचा हुबेहूब देखावा या प्रांतांत बराच वरचेवर दृग्गोचर होतो. याहून खालचे लोक बहुतकरून अर्धपोटीं राहून किंवा भाजीपाला खाऊन आपला निर्वाह चालवितात. अशा लोकांसाठीं सरकारनें दुष्काळ--दुःख--निवारणार्थ रिलीफ वर्क्ससारखीं कामें अथवा विद्याध्ययनासाठीं शाळा किंवा जागा, खत, बींबियाणें वगैरे देणें इष्ट होतें. असें न करतां लष्करी खातें किंवा इतर नवनवीं खातीं निर्माण करून सालोसाल चैनीमुळें पडणारी तूट भरून काढण्यासाठीं नवनवे डोईजड कर आणि पैमासखात्यांत तयार केलेल्या कादास्त्रांत आधींच नापिक होत चाललेल्या जमिनीचा दुपटीतिपटीनें वाढविला गेलेला सारा, हींच बंडांचीं मुख्य कारणें होत. अशा अनेक कारणांच्या योगानें गरीबी ज्यांच्या जन्माची सोबतीण होऊन बसली आहे, अशा लोकांवर दत्तू नाडकर्णी यांसारख्या पुरुषाची योजना होऊन ' भिकेंत कावळा ' या ह्मणीप्रमाणें अरेरावी गाजविण्यांत आल्यामुळें आधींच परिस्थिति घोर झाली होती. सांखळींत आदमिनिस्त्रादोर व सत्तरींत दत्तू नाडकर्णी व दत्तू नाडकर्णी जें सांगेल तें

'आद्‌मिनिस्त्रादोरा' स मान्य; अशा स्थितींत बिचाऱ्या लोकांना न्याय मिळणें कठीण झालें होतें. अशा या स्थितीमुळें ' पैशाला पासरी 'प्रमाणें डिचोलीच्या कोर्टांत शेतें-ठिकाणें लिलांव होऊं लागलीं. प्रजेनें या त्रासामुळें पणजीचे गव्हर्नर सिं. राफेल द आन्द्राद यांकडे विनंती-अर्ज करून आपलीं गाऱ्हाणीं निवेदन केलीं. त्याचप्रमाणें अनाथ पोरांच्या इष्टेटीची राखणी, जामातांस श्वशुरांच्या इष्टेटीचा हिस्सा, मृतावर सरकारी कर, वगैरे असूं नये, अशीही मागणी करण्यांत आली. परंतु गव्हर्नरांस आगुस्तीन आद्‌मिनिस्त्रादोराच्या सल्ल्याची गरज भासली व त्यांनीं दत्तूच्या अनुमतें त्या मागणीचें वारेंपाणी करून सोडलें.

सत्तरप्रांत अशा रीतीनें बंडखोर होण्याच्या बेतांत असतां दुसरी एक गोष्ट घडून आली. ता. १३ सप्टेंबर सन १८९५ त आफ्रिकन सरकारकडून तेथील लोकांनीं माजवलेल्या बंडाच्या शमनासाठीं मदत मागून व्हॉयसराय यांस तार आली. गोव्यांत त्यावेळीं युरोपीयन सैन्य थोडें असून इंडियन सैन्य जाण्यास राजी होईल कीं नाहीं याची शंका होती. कारण हिंदुस्थानाबाहेर पाऊल न घालवण्याची हमी देऊनच सरकारनें त्यांस नोकरीवर ठेविलें होतें; परंतु सत्ता या शब्दांतच एक प्रकारची गुर्मी असल्यानें ' हम करे सो कायदा' वर्तन करण्याच्या वेळीं न्याय--अन्यायाच्या बाबतींत ती बऱ्याच वेळीं अंध होत असते. याही वेळीं अशीच स्थिति होऊन, सर्व लष्करी छावण्यांत हुकूम जाऊन बहुतेक सैन्य पणजीस गोळा करण्यांत आलें व त्यास आज पासून आठ दिवसांनीं तुह्मांस बाहेरगांवीं जावें लागणार आहे; तेव्हां आपणास काय काय सिधासामुग्री पाहिजे तें सरकारास कळवा, अशी ताकीद देण्यांत आली. बाहेर ह्मणजे कुठें व जावयाचें तें कां, याची कल्पना नसल्यानें आपल्या स्वभावगुणांस अनुसरून गव्हर्नराशीं त्यांनीं खालील सिध्याची मागणी केली. उकडे तांदूळ, डाळ, नारळ, मिर्चीसह सांभाराचे जिन्नस, सुकी मासळी वगैरे वगैरे. सरकारकडून ती पुरवण्याची कबुली मिळाली व त्याप्रमाणें शिपाई लोक पुढील तजविजीस लागले. इतक्यांत त्यांना कोणी तरी गुरु भेटला व त्यानें त्यांची चांगली कानउघाडणी केली. तो ह्मणाला, " तुह्मीं बाहेर जाण्यास सरकारशीं जी मान्यता दिली, त्यांत तुह्मीं कांहीं तरी मागचापुढचा विचार

केला आहे काय ? सरकारनें गोवा, दमण व दीव एवढ्याच प्रांतांचें संरक्षण करण्याच्या कामावर तुमची नेमणूक केली असतां, आफ्रिकेसारख्या परप्रदेशांत आपण आह्मांला कां व कसे पाठवितां, असा प्रश्न तुह्मीं सरकारास केला कां ? सरकार गैर कायदा आफ्रिकेस पाठवीत असेल तर आपणास या प्रसंगीं पगार काय मिळेल; याचा खुलासा तुह्मीं सरकारकडून करून घेतला आहे काय ? तिकडे किती दिवस रहावें लागेल याचा कांहीं नेम नाहीं, तेव्हां तुह्मीं शत्रूच्या माऱ्यांतून व तिकडील अपरिचित हवापाण्यांतून जगून यालच, याचा तरी नेम काय ? तुमच्यावरच बहुतेक अवलंबून असलेल्या कुटुंबांनीं इकडे निर्वाह कशावर करावयाचा ? " या अंजनानें शिपायांचे डोळे उघडून ते भावी काळाचा विचार करण्यास लगेच एकत्र झाले व वरील प्रश्नपरंपरेचा खुलासा दुसऱ्याच दिवशीं सरकारकडून वकीलामार्फत करून घ्यावा असें ठरलें. त्याचवेळीं असेंही ठरविण्यांत आलें कीं, समाधानकारक उत्तरें सरकारकडून न मिळाल्यास सर्व सैन्यानें सरकारच्या या अतिक्रमास आळा घालण्यासाठीं बंड उभारावें. दुसऱ्या दिवशीं सैनिकांच्या पुढाऱ्यांनीं गव्हर्नराची वकीलामार्फत भेट घेतली व त्यांना आपल्या प्रश्नांचीं उत्तरें आफ्रिकेस गेल्यावर येथील गव्हर्नर देतील, असा सडेतोड जबाब मिळाला. या एकंदर प्रकारावरून सरकारास यांस कोणीतरी उपदेशक मिळाला पाहिजे असा संशय आला व त्याप्रमाणें अशा रीतीनें फंदफितूरी माजवणाऱ्यांचा कसून शोध होऊं लागला. इतक्यांत सर्व सैन्यानें ठरल्याप्रमाणें तारीख १५ रोजीं बंदुका, दारुगोळा वगैरे ताब्यांत घेऊन बंडाची धुमाळी माजविली व पणजी शहरांत जिकडे तिकडे बंदुकांचे बार सुटूं लागले. ती रात्र मोठ्या आणीबाणीची होऊन गेली. शहरवासी लोकांनीं मोठ्या मुष्किलीनें आपल्या जीवाचें रक्षण केलें. दुसऱ्या दिवशीं ठरल्याप्रमाणें गोव्याहून कुंभारजुवेंच्या तरीनें डिचोलीस आले. इकडे डिचोलीच्या छावणींतही तेथील शिपायांनीं सरकारपक्षीय लोकांस कैद करून तेथील शस्त्रें, दारुगोळा वगैरे आपल्या ताब्यांत घेतलेंच होतें. इतक्यांत पणजीहून आलेले शिपाई एकत्र होऊन त्यांनीं सत्तरीकडे कूच केलें व आपली बैठक नाणसाच्या कोटांत ठोकून ते पुढील विचारास लागले. सरकार सबळ व सधन व उलट आपण निर्बल व निर्धन, अशा वेळीं बंडाची धामधूम न्याय मिळ

विण्यासाठीं माजविल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें त्यांना दिसून आलें; परंतु बंड कोणाच्या नांवें पुकारावें हा प्रश्न होता. कांहीं सैनिक खासे मंडळीची मदत घेण्याच्या हेतूनें कांहीं जणांच्या घरीं जाऊन आले, त्यांपैकीं दादा राणे यांनीं आपण ज्यावरून मुद्दाम मला बोलावण्यास आलां आहां, त्यावरून आपल्याला खालील अटी मान्य असतील तर मी आपल्या मागणीचा स्वीकार करीन असें आश्वासन दिलें:—( १ ) दत्तू नाडकर्णी यांस आणून माझे स्वाधीन करणें. ( २ ) आमच्या इतर खासे मंडळीस सामील करून घेणें. ( ३ ) यश येईपर्यंत बंड लढविणें. आवेशास चढलेल्या शिपायांनीं त्याच्या अटी कबूल केल्या आणि दादाच्या नांवें बंड पुकारलें. दादानें अशा रीतीनें बंडांत भाग घेण्यास दुसरींही कांहीं अंतस्थ कारणें होतीं. ह्मावळींगकर आप्पा राणे यांनीं एकदां अधिकाऱ्यांकडून दादास कैद करावयाला लावलें होतें व यावेळीं सरकारनेंहीं त्यांचा अर्ज फेंटाळून लावला होता, हें त्यांपैकीं एक होतें. अखेर सरकारावर फिरलेल्या शिपायांनीं बहुतेक राण्यांचीं घराणीं सक्तीनें व सामोपचारानें सामील करून घेतलीं आणि दत्तू नाडकर्णी यासही झोडपीत झोडपीत आणून दादांच्या स्वाधीन केला. त्यावेळची त्याची केविलवाणी स्थिति वर्णन करणें अशक्य. आतां तो केवळ घटकेचा सोबती होऊन बसला होता; परंतु शेवटपर्यंत दादांच्या कृपेनेंच त्याला जगवलें, हें विसरतां कामा नये. असो. याप्रमाणें गोष्टी घडून आल्या, तरीही इतक्या लोकांचा रोजखर्च भागवण्याची तजवीज होऊन थिथेच्या 'इगर्जे' वर हल्ला करण्याचें ठरलें व तेथें 'हरहर महादेव' घालून डिचोलींत येऊन ते छावणींत रिघले. डिचोली शहरांत त्यावेळीं एकच गोंधळ माजून जो तो भयानें कांपूं लागला; परंतु खवळलेल्या लोकांनीं किंवा राण्यांनीं लुटालूट न करतां गांवांतील सधन लोकांस बोलावणीं पाठविलीं. या स्थितींत कित्येकांच्या बोबड्या देखील वळणें सहाजिक आहे; परंतु केवळ अपरिहार्य ह्मणून नाईक, धोंड, कडकडे, कारापूरकर, लावणीस वगैरे मंडळी जाऊन त्यांना भेटली. बंडखोरांनीं त्यांस असें कळविलें कीं, जर शहरांत लुटालूट होऊं नये अशी आपली इच्छा असेल, तर आमच्या सतरा—अठराशें मंडळीस जेवण घालून आपण बोळवावें. वरील शहरवासी मंडळींनीं ही त्यांची इच्छा मान्य केली व त्याप्रमाणें खालीलप्रमाणें तरतूद राखण्यांत आली:—

सरकारावर फिरलेले शिपाई आठशें, बाजारबुणगे गुंड आठशें व देसाई, खासे वगैरे मिळून पन्नास पाऊणशें इसम अशी ही मंडळी होती. इतक्यां मंडळीसाठीं तीन खंडी तांदूळ, पांचशें नारळ, अर्धगोण डाळ, सात पाटीं सुकी मासळी इतकें सामान खरेदी करून, एकवीस जवान स्वयंपाकी नेमण्यांत आले व त्यांवर देखरेख ठेवण्यासाठीं एका तज्ञाची योजना केली गेली. स्वयंपाक करण्यास गेलेल्या मंडळीची इतकी कांहीं त्रेधा उडाली कीं, पगारावजा अनुच्चारित शिवीगाळ यांची त्यांच्यावर लाखोली पडली; परंतु हूं कीं चूं करण्याची प्राज्ञा होती कुणाची ? एक एक मागतो, तर दुसरा दुसरेंच. व न मिळालें कीं घातली शिवी. अशा स्थितींत हाडांचा चूर होऊन दमून गेलेल्यांची इच्छा, एकदां कुठेंतरी दूर जीव घेऊन जाऊन विश्रांति घ्यावी हीच होती. कारण कूच करण्याच्या वेळीं आणखी हमालगिरी करावी लागेल ही धास्ती त्यांच्या दृष्टीसमोर उभी होती. शेवटीं या लोकांनीं रात्रौ आठ वाजतां बड्या खाशांचे पाय धरून निरोप घेतला व धूम ठोकून झावळींगेस विश्रांति घेतली. पुढें नऊ वाजतां बंडखोरांनीं डिचोलीचा तळ हालवून ते थियेच्या इग्रर्जीवर हल्ला करण्यास गेले व तेथील पाद्रीभटास मारपीट झोडधपट करून तिजोरीच्या चाव्या घेतल्या. तिजोरींत एकंदर ८०-९० हजार रुपये मिळाले ते घेऊन त्यांनीं म्हापशें शहरावर हल्ला केला. तेथील ट्रेजरी ऑफिस व इतर कांहीं ऑफिसें लुटून व नासधूस करून शहरांतही बरीच लुटालूट केली. ही संधि सरकारी नोकरांस बरीच फायद्याची गेली; कारण एकंदर जमाखर्च राण्यांच्या नांवावर लागू होऊन उरलेली चुकलेली रकम यांच्या घशांत सहज उतरली. येथून पुढें बंडखोरांचा हल्ला पेडणें शहरावर झाला. पण तेथील बाबूसाहेबांनीं त्यांना मिष्टान्न घालून व योग्य संभावना करून पुढेंही असेंच करण्याचें आमीष दाखविल्यामुळें ते संतोषित झाले. पेडणेंहून पुन्हां म्हापसें शहरीं फिरण्याच्या बेतांत असतां, आपणांवर पणजीहून सरकारी सैन्य रवाना झालें असल्याची बातमी त्यांना लागली व त्यांनीं आपला मोर्चा डिचोलीकडे वळविला. वाटेंत थिवी येथें मुक्काम करून व तेथें लुटालूट करून दिपवाळीच्या दिवशीं दुपारीं त्यांनीं डिचोलीच्या छावणींत मुक्काम केला. बहुतेक लोक देवळाकडे गेलेले; कांहींजण त्या दिवशीं आपल्या घरीं आपल्या गडबडींत

असलेले. अशावेळीं शहरांत चोंहोंकडे धांदल, गडबड सुरू होऊन सर्व लोक भयभीत झाले. गुंड—बाजारबुणग्यांना देखील आर्जवानें जी, खासे, अशा संबोधनांनीं मान देणें लोकांस भाग झालें. लूट काढण्याची खाशांनीं बंदी केली असल्यामुळें क्षुधेसाठीं खायाला द्यावयाची हे गुंड लोकांवर सक्ती करीत व जें मिळेल तें स्वाहा करीत. त्याचप्रमाणें त्यांच्याकडून चोऱ्याही होत होत्या; परंतु गांगरून गेलेले लोक त्यांची गोष्ट काढण्यास धजत नसत. रा. धोंड यांच्याइथें त्यांना चहा वगैरे देऊन संतुष्ट करण्यांत आलें. खाशासाठीं शहरांतून मोठमोठीं फराळाचीं ताटें भरून छावणीकडे जात होतीं. ही बातमी सरकारी लोकांस समजून त्यांचें सैन्य दौड करीत आलें आणि डिचोलकर बंडवाल्यांना सामील झाले, अशा समजूतीनें आपलें ठाणें जुवें बेटांत ठेवून डिचोलीवर तोफा डागण्याचा बेत करूं लागलें; परंतु डिचोलीच्या कोर्टाचे जज्ज तावारसाहेब यांस ही बातमी डिचोलीच्या रहिवाशांनीं कळवून आपल्यातर्फे सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेण्याची विनंति केली व तिला मान देऊन ते कांहीं मंडळी बरोबर घेऊन जुवें बेटांत असलेल्या सैन्याचे कॅप्टन गॉमीस् द कॉस्त यांना जाऊन भेटले. सरकारी लोकांची त्यांनीं बरीच कानउघाडणी केली. ते ह्मणाले, डिचोलीवर तोफा डागण्याचा जो आपण विचार केला आहे तो मुळींच योग्य नाहीं. डिंचोलीची जनता राजनिष्ठ आहे. प्रसंगोपात प्राण रक्षणासाठीं जर त्यांनीं बंडखोरांशीं सहानुभूति दाखविली, तर तो त्यांचा दोष ह्मणतां येईल काय? स्वतः निःशस्त्र असून सरकारनें संरक्षणाची कांहींच तजवीज केली नसल्यामुळें ते प्राप्तप्रसंगास कसें बसें तोंड देऊन चालढकल करीत असतां, त्यांच्यावर तोफा डागणें न्याय्य होईल काय? आपल्या जातभाईच्या या खरमरीत उपदेशानें कॅप्टनसाहेब शांत झाले. इकडे बंडखोर लोकांनींही आपला तळ पांच वाजण्याच्या सुमाराला उचलून नाणसाच्या कोटांत बैठक ठोकली. सरकारनें ही बातमी पोर्तुगालसरकारास कळवून या बिकट प्रसंगीं मदतीची मागणी केली होती. शिपायांनाही अराजक वृत्तीस प्रवृत्त करणाऱ्याचा शोध चालविला होता; त्यांत पाठशाळेच्या मुख्याध्यापकांवर वहीम येऊन त्या जागेवर असलेले लष्करशाहीचे कट्टे दुष्मन् सि. बेर्नार्द द कॉस्त यांस दीव बेटांत शिक्षेसाठीं पाठविलें व दुसऱ्या कित्येकांस जबर शिक्षा केल्या,

पण संशयीत आरोपींचा गुन्हा अजून मुद्देमालासह सिद्ध झालेला नव्हता. कामुर्लेचे एक पदवीधर कारवाल यांवरही संशय होता व सरकारचे गुप्त हेर त्यांना पुराव्यानिशीं पकडण्याची शिकस्त करीत होते. सरकारच्या पदरीं सैन्य थोडें होतें व त्याचा फायदा घेऊन गुंडांनीं चोहोंकडे लुटालूट, मारामार चालविली होती. तारा तोडून टाकणें, टपालें लुटून घेणें, रेल्वेचे रूळ मोडून रेल्वे लुटणें, अशा कामांत कितीतरी टोळ्या पुढें येत होत्या. प्रसिद्ध टोळ्या ह्मणजे काणकोण, सांगें महालीं बाबणे सावंत, फोंडू सावंत इत्यादि भयंकर दरवडेखोर; केपें कुसमण या बाजूनें फटो बोरकर, यानें कुंकळी येथें एका ब्राह्मणाच्या घरीं गर्भाधानविधी व्हावयाचा होता; अशी संधी साधून त्या गांवावर हल्ला केला व वराला खांब्याला बांधून वधूवर अत्याचार केला. इतर पुष्कळ बायकांचीही या गुंडानें अब्रू घेतली. अशा रीतीनें यानें लोकांस सळो कीं पळो करून सोडलें होतें. साळ, मेंढकुरें, धुमाशें या बाजूनें ब्रिटिश हद्दींतील कासार, तेली, देवळी, कुंभार वगैरे लोक मोडकीं तोडकीं शस्त्रें, जुन्यापुराण्या बंदुका, कोयते, कुऱ्हाडी, पाळ वगैरे शस्त्रें घेऊन लोकांस धाकधपटशा दाखवून व प्रसंगविशेषीं खून देखील पाडून लुटालूट करीत; मतग्रामांत दीनमहंमद, अर्जून रावत, सदगो देवळी, यांच्या टोळ्या लुटालूट करीत होत्या.

अशा या स्थितींत जनतेची काय स्थिति झाली असेल ती एका देवालाच ठाऊक! निःशस्त्र प्रजा प्रतिकार करण्यास असमर्थ होती व सरकारकडे तोंड देण्यासारखें सैन्य नव्हतें. अशा या घालमेलींत वर्ष दीड वर्षांचा काळ गेला. इतक्या अवधींत बंडखोरांची रग जिरवून त्यांचा बीमोड करण्याकरतां मागविलेलें सैन्य येऊन लगेच सत्तरीवर मोहीम करण्याची तयारी झाली व लागलीच सरकारी सैन्यानें डिचोलीपर्यंत मजल गांठली. या सैन्याला तोंड देण्यासाठीं फिरलेले शिपायीही मोठ्या दिमाखानें पुढें पुढें होऊं लागले व शेवटीं उभयतांची गांठ सांखळीनजिक कोंडाळें येथें पडून गोळीबाराला सुरवात झाली कांहीं वेळ सामना चालला व इतक्यांत सरकारी तोफखाना येऊन पोंचला. लढाईला निकरानें सुरवात झाली व पुढें असलेले दीन महंमद व त्याचे कांहीं

शौर्यानें अबदुलबादशहा ह्मणवून घेण्याची इच्छा झाली होती. त्यांची तोफेच्या गोळ्यांनीं बोहरी केली व अशा रीतीनें त्यांच्या आशेचा भंग झाली. एकाच गोळ्यानें पांचपन्नास मनुष्यांना हवेंत उडवून दिल्यामुळें बाकीच्यांची त्रेधा उडून जो तो जीवाशेनें रानाचा रस्ता पकडूं लागला, डोंगराचा आश्रय शोधूं लागला, कांहीं लोकांनीं मागचा पाय घेऊन पळ काढला. तोफाही एक-सारख्या दणाणूं लागल्या. अखेर सरकारी सैन्यानें भुरट्या लोकांचा पाठलाग सुरू केला व त्यांना सांपडेल तिकडे गोळ्या घालून ठार करण्याचा क्रम सुरू केला. अशा रीतीनें बाजारबुणग्या व भुरट्या लोकांचें प्रस्थ कमी पडूं लागलें व अशा या यशप्राप्तीमुळें राणेही आपणाला शरण येतील अशी सरकारी अधि-काऱ्यांची साहजिकपणें कल्पना झाली. याच कल्पनेनें प्रेरित होऊन जुवें बेटांतील कोलून द प्रेपारासांवचे मुख्य गोमीस द कॉस्त आणि युरोपीयन तुक-डीचे कॅप्टन पुशोल हे आपआपल्या तुकड्या घेऊन राण्यांचें निर्दलन करण्या-करतां मोठ्या आढ्यतेनें जाऊं लागले. खासे लोकांना हें वर्तमान कळतांच चालून येणाऱ्या सैन्याचे श्रम कमी करण्याच्या इच्छेनें त्यांनीं करनळ्यापर्यंत आपल्या लोकांच्या टोळ्यां सारख्या दबा धरून बसवल्या व त्यांना असें सांगितलें कीं, जो कोणी एखाद्या मोठ्या ऑफिसरास खालीं पाडील त्यास चांगलें बक्षीस देण्यांत येईल. अशा रीतीनें प्रत्येकजण तयारींत होता. थोड्याच वेळानें सर-कारी सैन्य एका खिंडींत गांठून राण्यांनीं गोळीबार सुरू केला. उलट युरो-पीयन शिपायांकडून फेरींवर फेरी झडूं लागल्या. बंडखोर लोकांच्या दुर्गम निवासस्थानामुळें त्यांना गोळ्या लागणें शक्यच नव्हतें उलट बंडवाल्यांच्या फैरी सरकारी सैन्यांतील एक दोन मुडदे अचूक पाडीत होत्या. अशा स्थितींत युरोपीयनच्या तुकडींतील तीन सार्जंट आणि कॅप्टन पुशोल व त्याचप्रमाणें इंडियन सैन्य घेऊन गेलेले कॅप्टन कॉस्त यांस गोळ्या लागून भयंकर जखमा झाल्या व अशा रीतीनें त्यांचा गर्व उतरून ते मागें फिरले. गत-प्राण झालेल्या गोऱ्यांस व जखमी इसमांस डोलींत घालून डिचोलीस आण-ण्यांत आलें. सरकारी लोकांत मोठीच गडबड उडाली. ही बातमी पणजीस समजून तेथेंही खळबळ माजली. अशा वेळीं ह्मणजे ता० १२ नव्हेम्बर सन १८२६ त पोर्तुगालहून राजबंधु डॉ. आफोंस ग्रेन्हीक आणि नवे राजप्रतिनिधि

इयोकीं झुजे माशाद् यांच्या स्वाऱ्या बंडाचा उपशम करण्याच्या उद्देशानें आल्या. त्यांच्याबरोबर कांहीं सैन्यही होतें. सत्तरप्रांतांत चाललेली हकीकत ऐकून संतप्त झालेले राजबंधु स्वतः मोहीमेवर जाण्याची इच्छा करूं लागले व त्याप्रमाणें सरकारकडून तयारीही होऊं लागली. एकंदर सरकारचे संस्थानिक, वतनदार, मोकासेदार, पेनशनी लोक यांना लढाईवर हजर होण्यासाठीं निमंत्रणें गेलीं. सर्वांनीं पणजीस येऊन ' इंफांतीं ' बरोबर गेलें पाहिजे असें बजावण्यांत आलें. त्याप्रमाणें विश्वासराव, प्रतापराव, सूर्यराव, जयवंतराव इत्यादि सरदेसाई, सांखळीकर, झावळींगकर, केरकर वगैरे बंडांत न रिघलेले मोकासेदार राणे, गांवठणकर आदिकरून मराठे देसाई वगैरे मंडळी पणजीस जमा झाली. अखेर बरोबर निवडक फौज व लवाजमा घेऊन दॉं आफोंस यांची स्वारी सत्तरीवर हल्ला करण्यासाठीं चढाव करून गेली. या स्वारीच्या वेळीं बंडखोरांच्या बंदुकीचे बार सुटले असते; पण पूर्वसंकेतानुरूप बंडखोरांनीं बार काढले नाहींत. याचें कारण असें होतें कीं, सरकारनें संशयीतपणामुळें खाशा स्वारीपुढें राणे, देसाई यांच्या रांगा उभ्या करून जर ते बंडखोरांवर बार न सोडतील, तर आपल्या नोकरांकडून राणे, देसाई यांना यथोचित बक्षीस देऊन थंड करावें, असा सरकारचा हेतु होता व तो ओळखून सनदी नोकर, राणे, देसाई यांना वेळेप्रमाणें वागणें भाग पडलें. कारण, फिरंगी लोकांच्या राज्यांत न्याय म्हणजे ' पैसा शेर आटा व पैसा शेर घी ' असाच असून विजातीय लोकांच्या गुणांची पारख थोडीच. अशा रीतीनें प्राप्तप्रसंग निभावून नेणें भाग झालें. असो. त्वेषपूर्वक गेलेल्या राजबंधूनें बंडखोरांच्या घरांवर आपला राग उगवून घेतला. बंडखोरांच्या घरांची चौकशी करून त्यांवर रॉकेल तेल ओतून बत्ती दिली व लंकादहनाची दुसरी कृती करून दाखविली व अशा रीतीनें बरोबर नेलेल्या लोकांची तारांबळ उडवून ते परत राजधानीस आले. कित्येक खाशांना निजण्यास धड जागा नाहीं, शिजवून खाण्यास धड भांडीं नाहींत, आणि शीतनिवारणार्थ धड चिरगुट नाहीं, असा थोड्याच दिवसांचा अनुभव घेऊन ते एक चक्कर मारून परत फिरले होते; पण अशानें बंडखोर थंड पडण्याऐवजीं विशेष तुफान होऊन अत्याचार वाढले. त्यांच्या कहरानें प्रजा अगदीं हवालदील होऊन गेली. सरकारास प्रजा शरण जाई व सरकारकडून जाज्वल उपायांची योजना होई.

या उपायांचा परिणाम इतकाच झाला कीं, सरकारवर फिरलेल्या बहुतेक शिपायांनीं बंडांतून पाय काढून ते पळून गेले व सरकारबरोबर एकट्या राण्यांनाच टक्कर देणें भाग पडलें. शिपायांनीं राण्यांना तोंडघशी पाडून एक अत्यंत नीच कृत्य आचरलें नाहीं असें कोण ह्मणेल ? अशा स्थितींत आणखी एक गोष्ट घडून आली. बारदेशांतील जुव्यांवरील राण्याचें व नानोडें येथील पेद्रुपाग्याचें ठिकाणाच्या वतनदारीविषयीं वैर चालत होतें. या पेद्रुपाग्याचे दोघेतिघे मुलगे लष्करांत नोकरीवर होते. त्यांच्या मदतीनें राण्यांचा सूड उगवण्याचा पाग्यानें बेत केला. सरकारशीं अशी एक चहाडी झाली कीं, जुंवेवरील रावजी राणे व त्याचे बंधु आपल्या बंडखोर जातभाईना सामिल असून ते त्यांना बुद्धि व शस्त्रें यांच्याद्वारें मदत करीत असतात; आणि ही बुद्धीची मदत घेण्याकारितां त्यांची विशेषेंकरून कामुर्लेंच्या व्हीस्कॉन्द काव्हाल यांच्या घरीं ये जा सुरू असते. इतर हरएक बाबतींतहि काव्हालसाहेबांची त्यांस मदत असते. ही गोष्ट सरकारच्या कानापर्यंत तिखट-मीठ लाऊन गेली. आधींच सरकार वैतागून विचारनष्ट झालें होतें. त्यांत लामगांव, मूळगांव, मयें, बोर्डें वगैरे गांवांतील गुंडांनीं हळडणच्या चर्चवर हल्ला करून तेथील पाद्रीसाहेबांस चोप देऊन दांडगाई केली होती व त्यांस तेथील ख्रिस्ती लोकांनीं चिखलांत पुरून जरी मारलें होतें तरी या हल्ल्यांत पाद्री व कांहीं ख्रिस्ती नाहक मेले; हा आधार घेऊन, हिंदूंवर आग पाखडणारे त्यावेळचे पात्रियार्क दों आन्तॉनियु ह्मालेत यांनींही स्वधर्माचा अभिमान धरून सरकारास भंडावून सोडलें होतें. यामुळें रावजीराण्यासहीत सर्वांस पकडून आणण्यास सरकारचा हुकूम झाला. त्याचा पूर्ववैरामुळें त्यावर नेमलेल्या सार्जंटनें ह्मणजे पेद्रूपाग्याच्या मुलानें दुरुपयोग करून तो कामुर्लेंच्या सड्यावर रावजीची मार्गप्रतिक्षा करीत बसला. इतक्यांत आपलें कामकाज आटपून रावजीराणा परत येत असतां, इतकेंच नव्हे तर तो निःशस्त्र असल्यानें त्याला पकडून आणणें सहज व सुलभ असतां, वैरभावानें पछाडलेल्या सार्जंटनें शंकर सावंत तुयेंकर या शिपायास त्यावर गोळी घालण्यास लावून त्याला ठार केलें. सरकारांत असा रिपोर्ट देण्यांत आला कीं, दंगामस्ती करून हा पळत होता व ह्मणून त्याला गोळी घालून

ठार करणें भाग झालें. इकडे त्याच्या भाईबंदांत ही बातमी लागतांच ते एकदम संतापून गेले व ज्यांनीं त्याचा खून केला होता त्यांचा सूड घेण्यास ते तयार झाले. इकडे ज्यांनीं त्याचा जीव घेण्यास लावलें, त्यांना आपल्या कृत्याची फुशारकी घराकडे मारण्याची भारी उत्कंठा, शिवाय त्याचा वर्षदिन ह्मणून या दिवशीं सर्व भाऊ रजेनें घरीं आलें होते. त्याचप्रमाणें कांहीं निमंत्रित मंडळींही त्या दिवशीं त्यांच्या इकडे एकत्रित झाली होती. या संधीचा फायदा घेऊन रावजी राण्याचे बंधू लक्ष्मणराव, भाऊराव व अप्पा-साहेब यांनीं कांहीं मंडळी जमवून त्याच रात्रीं पेद्रुपाग्याच्या घरावर हल्ला चढविला. परंतु पेद्रूला ही हल्ल्याची वार्ता समजतांच घरांत असलेल्या बंदु-कांच्या सहाय्यानें त्यानें नाचतमाशाला फांटा देऊन व दारें बंद करून खिडक्यांतून प्रतिकारार्थ बार काढण्यास सुरवात केली. चार वाजेपर्यंत आंतून व बाहेरूनही गोळ्यांची सरबत्ती सुरू होती. शेवटीं पहांट झाल्यावर ही शिकार हातची जाण्याचा संभव आहे असें जाणून राण्यानीं अगदीं निकरानें हल्ला चढविला. चारही बाजूनीं राकेल तेलाच्या सहाय्यानें अग्नी पेटवून दिला. आंतली मंडळी दारूगोळ्याच्या अभावीं डबघाईस आलीच होती. अशा परिस्थितींत राणे दारें फोडून आंत घुसले व लहान अर्भकांव्यतिरिक्त सर्व माणसांची त्यांनीं सरसहा कत्तल केली. अशा रीतीनें रावजींच्या खुनाचा सूड उगवून हर्षभरीत होत्साते ते बंडखोरांस मिळाले. त्यामुळें बंडखोरांसाहि नवीन चैतन्य व उत्साह आला. व दिवसेंदिवस त्यांचें बल शुक्लेंदुवत वाढत जाऊन ते दुर्दमनीय बनत चालले. त्यांची रग जिरविण्यासाठीं राजबंधूंनीं पर्यायुद्धें फिरून त्यांजवर निकराची स्वारी केली परंतु त्यांत त्यांस विशेष यश आलें नाहीं. स्वतः राजबंधूंस एक गोळी पायांस निसटती लागली व त्यांच्या सोबत्यास कमरेवर गोळी लागून तो निकामी झाला. अशाप्रकारें ह्या मोहिमेचा निराशाजनक शेवट झाला. तरीपण सरकार आपला दम सोडीना. त्यानें नवी नवी रिक्रूटभरती करून राण्यावर पुनः पुनः हल्ले करून पाहिले; पण मजा अशी होऊं लागली कीं, राण्यानीं गोऱ्या सोल्जरांवरच तेवढा गोळीबार करावा व ह्या काळ्या देशबंधूंनीं एकमेकांची गांठ पडल्यास हवेंत गोळ्या झाडून दारूगोळ्यांची तेवढी नासाडी करावी. बंडखोरांनीं रानावनाचा आश्रय

धरलेला. काळे लोक अशा रीतीनें सरकारशीं प्रतारणा करणारे व गोरे शिपाई रानावनांत व गिरीकंदरांत भटकण्यास असमर्थ व खुषी नसलेले.

अशा परिस्थितींत त्यांना माफी देण्यावांचून सरकारास दुसरा सोइस्कर मार्ग दृष्टीपुढें दिसेना. आतांपर्यंत राजबंधु मुखत्यारीनें राज्यकारभार चालवीत असल्यामुळें नव्या साहेबास डोळे उघडे ठेवून राजबंधूंच्या लीला पाहण्या-वांचून दुसरा मार्ग नव्हता; परंतु जेव्हां स्वतःच त्यांच्या जीवावर प्रसंग येऊन ठेपला व गोळी लागून जखमी झालेल्या सोबत्याचें कर्णकर्कश विव्हळणें रात्रंदिवस कानांत शिरूं लागलें तेव्हां कोठें राजबंधूचे डोळे उघडले व नवे गव्हर्नरसाहेब माशाद यांस हा राज्यकारभार तुह्मीं आपल्या हातांत घ्या अशी त्यांनीं गळ घातली. माशाद साहेबांनीं अनुसरलेलें धोरण योग्य व बंडाचा उपशम शांततेच्या व प्रेमाच्या मार्गानें होण्यास सहाय्यभूत होणारें होतें. तत्कालीन मिनिस्तमंडळाचे प्रेसिडेंट सिं. आंद्राद कार्मू यांनीं पोर्तुगालच्या पार्लमेंटमध्यें केलेलें भाषण येथें नमूद करण्यासारखें आहे. ते ह्मणाले:—

" गोव्यामध्यें आपण येथून जे प्रतिनिधी पाठवीत असतों त्यांची निवड करण्यांत आपणाकडून घ्यावी तितकी काळजी घेत नसतों व या आमच्या अदूरदर्शित्वाचा परिणाम बंडाच्यारूपानें आह्मांला भोगावा लागतो. यापुढें तरी तेथें पाठविण्यांत येणारा प्रतिनिधी आपल्या कर्तव्याला जागणारा, वसाहतीच्या अभ्युदयार्थ जीवापाड मेहनत घेणारा व तेथील प्रजाजनांच्या सुखदुःखांची पूर्णपणें काळजी वाहणारा असाच पाठविला पाहिजे. नपेक्षां अधिकारमदानें धुंद झालेले व स्वार्थाला सोकावलेले लोक तेथें गेले ह्मणजे साहजिकच ' हम करेसो कायदा ' या न्यायानें ते तेथील लोकांवर आपला करडा अंमल चालवितात व या अरेरावीनें त्रस्त झालेली प्रजा निरुपायानें बंडाला प्रवृत्त होते. निरुपद्रवी व सहनशील लोकांना त्रास देण्याची दुर्बुद्धि ज्या ज्या राष्ट्रांना झाली, त्या त्या राष्ट्रांनीं तिचीं दारुण प्रायश्चित्तें भोगलेलीं आहेत. याचीं कैक उदाहरणें इतिहासाच्या प्रत्येक पानांत खच्चून भरलेलीं आहेत. रोमन, ग्रीक, हॉलंड, फ्रान्स वगैरे प्रमुख राष्ट्रांनीं यांचीं कटु फळें चाखलेलीं आहेत. गोमांतकाचा आजपर्यंतचा अनुभवही हेंच सांगतो. तरी एक गोष्ट सुदैवाची कीं, पोर्तुगिज राष्ट्रपताकेवर हल्ला चढविण्याची बुद्धि त्यांच्या

डोक्यांत केव्हांही आलेली नाहीं त्यांचे प्रयत्न स्वतःवर होणाऱ्या जुलमांचा व अन्यायांचा प्रतिकार करण्याकरतां असतात असें जरी असलें तरी एवढ्या-वरूनच शहाणपणा शिकून आपण आपलें वर्तन सुधारलें पाहिजे. " इत्यादि.

पोर्तुगालमधील या श्रेष्ठ दर्जाच्या मुत्सद्द्यानें काढलेले हे उद्गार किती अर्थपूर्ण व मननीय आहेत हें आतापर्यंतच्या एकंदर विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. सियोर माशाद हाहि त्यांचेच शिष्य असल्यामुळे त्यांनीं प्रथम बंडवाल्यांचा उद्देश समजून घेण्याचा प्रयत्न केला. आणि ' नवै राज्यन् राजसोन्नादण्डो नच दांडिकः । धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षतिस्म परस्परम् ॥ या श्लोकाप्रमाणें गव्हर्नरसाहेबांनीं वागून जे खरोखरच अधिकाऱ्याच्या अरेरावी-मुळे आपल्या हक्कदारीस मुकून क्रांतिकारक पक्षास मिळाले होते, त्यांस त्यांच्या अपराधाची क्षमा करून व त्यांच्या मागण्या पुऱ्या करण्याचें अभि-वचन देऊन व त्याचप्रमाणें जे कांहीं पळपुटे लोक केवळ लुटालुट करण्याच्या आशेनें या बंडांत सामील झाले होते त्यांनाहि यथायोग्य शिक्षा करून त्यांनीं सर्वत्र शांतता केली. त्यांनीं सबंध प्रांतांत स्वतः दौरा काढला व आपल्या डोळ्यांनीं लोकांची स्थिति पाहण्याचा निश्चय केला. या दौऱ्यामध्यें त्यांना जे कित्येक तापदायक प्रकार दिसून आले, त्यामुळें त्यांचें हृदय फार द्रवून गेलें. नवीन काबिजादींत तर जिकडे तिकडे भयंकर दुष्काळ, बुभुक्षितपणा, बंडाच्या असह्य त्रासामुळें त्रस्त झालेली प्रजा, पीकांची नासाडी वगैरे गोष्टी निरीक्षण करून त्या महाभागाचें उदार मन गहिंवरून आलें व प्रजेच्या अनुकंपनीय स्थितीची त्यांना दया आली. त्यांच्या बाह्य चेहऱ्यावरून ते इतके कनवाळू व मृदु अंतःकरणाचे असतील असें कोणालाच वाटलें नसतें. कारण त्याची धिप्पाड देहयष्टी, भव्य घोंसदार मिशा, तेजःपुंज व पाणीदार नेत्र वगैरे लक्षणांवरून तो बेफिकीर मनुष्य दिसत होता. असें असलें तरी त्याच्या-सारखा दयाभूत अंतःकरणाचा प्रज्ञावंत पुरुष सबंध पोर्तुगालच्या राजवटींत एकही झाला नाहीं. त्याने प्रथमतः सरकारच्या खर्चानें बाहेरून तांदूळ, नाचणे वगैरे धान्यें व कपडालत्ता मोफत पुरवून बुभुक्षित व अनाथ लोकांचा दुवा घेतला. मागील सरकारसाऱ्याची सूट दिली. पुढें आठ आण्याखालचा सारा माफ केला. गरीब लोकांना न्याय तावडतोब व चोख मिळण्याची

व्यवस्था केली. लांच खाणाऱ्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करून योग्य शिक्षा दिली. अशा रीतीनें विसकटलेली घडी नीट करण्याच्या तयारींत ते असतां हिंदु लोकांना शक्य तितकें पाताळांत दडपण्याचें सोडून त्यांना वर काढण्याचे प्रयत्न माशादसाहेबांकडून होत असलेले पाहून धर्मवेडानें बेफाम झालेल्या एका कलि पुरुषानें म्हणजे पणजी येथील पात्रियार्क दो. आंतोन वालेत यानें ते डिचोलीस आहेत ही संधि साधून राजेसाहेबांच्या कानांमध्यें चाहाड्यांचें गरल ओकण्यास सुरवात केली. डिचोली येथील प्रजेचा सन्मान स्वीकारून व त्यांच्या इच्छित मागण्या शक्य तितक्या पुरविण्याचें अभिवचन देऊन ते पुढें जातात, तोंच त्यांना परत राजधानीस फिरण्याचा टेलिग्राम हातीं पडला. तो वाचतांच त्या थोर पुरुषाचें तोंड खरकन उतरलें व तो तसाच राजधानीकडे परत फिरला.

माशादसाहेबांची पाठ गोमांतकाकडे वळतांच पुनश्च लष्करी हडेलहप्पीला सुरवात झाली. सत्तरप्रांत लष्करी लोकांच्या ताब्यांत देण्यांत आला व फिरून लष्करी सत्तेच्या उदयकालास प्रारंभ झाला. मोठ्या शहाणपणानें व मुत्सद्देगिरीनें माशादसाहेबांनीं प्रस्थापित केलेल्या शांततेचा विचका झाला. शक्य त्या रीतीनें राण्यासारख्या शूर क्षत्रिय जातीचा उच्छेद करावा, ही प्रबल आशा उराशीं बाळगून लष्करी सत्तेची हालचाल सुरू झाली. इतक्यांत असा एक प्रकार उपस्थित झाला कीं, लेफ्टेनंट बस्तूच्या क्यांपमध्यें दररोज दुधाचा रतीब एका राण्याच्या हुजऱ्यानें पत्करला होता. त्यावर त्याला मासिक बरीच किफायत होई. हें अर्थात् त्याच्या एका शेजाऱ्याला पाहवलें नाहीं व त्यानें संधि साधून बस्तूच्या कानाचा चावा घेऊन भयंकर गरल त्याच्या कानांत ओतलें. अमुक इसम जें दूध आपणास पुरवितो तें एका रोगी, सडलेल्या व किवण पडलेल्या गाईचें असून येणेंकरून आपल्या जीविताला अपाय व्हावा असा त्याचा उघड हेतु दिसतो, असें त्याच्या मनांत भरवून देण्यास त्यानें कमी केलें नाहीं. याहून उत्तम व निर्भेळ दूध मी आपणास आणून देत जाईन. तरी याची योग्य चौकशी करून मला हुकूम द्यावा, असें सांगून तो दुष्ट निघून गेला.

बस्तूसाहेबांनीं दुसऱ्यादिवशीं त्या गाईसहीत हुजऱ्याला शिपाई पाठवून

पण संशयीत आरोपींचा गुन्हा अजून मुद्देमालासह सिद्ध झालेला नव्हता. कामुर्लेचे एक पदवीधर कारवाल यांवरही संशय होता व सरकारचे गुप्त हेर त्यांना पुराव्यानिशीं पकडण्याची शिकस्त करीत होते. सरकारच्या पदरीं सैन्य थोडें होतें व त्याचा फायदा घेऊन गुंडांनीं चोंहोंकडे लुटालूट, मारामार चालविली होती. तारा तोडून टाकणें, टपालें लुटून घेणें, रेल्वेचे रूळ मोडून रेल्वे लुटणें, अशा कामांत कितीतरी टोळ्या पुढें येत होत्या. प्रसिद्ध टोळ्या ह्मणजे काणकोण, सांगें महालीं बावणे सावंत, फोंडू सावंत इत्यादि भयंकर दरवडेखोर; केपें कुसमण या बाजूनें फटो बोरकर, यानें कुंकळी येथें एका ब्राह्मणाच्या घरीं गर्भाधानविधी व्हावयाचा होता; अशी संधी साधून त्या गांवावर हल्ला केला व वराला खांब्याला बांधून वधूवर अत्याचार केला. इतर पुष्कळ नायकींचीही या गुंडानें अब्रू घेतली. अशा रीतीनें यानें लोकांस सळो कीं पळो करून सोडलें होतें. साळ, मेंढकुरें, धुमाशें या बाजूनें ब्रिटिश हद्दींतील कासार, तेली, देवळी, कुंभार वगैरे लोक मोडकीं तोडकीं शस्त्रें, जुन्यापुराण्या बंदुका, कोयते, कुऱ्हाडी, पाळ वगैरे शस्त्रें घेऊन लोकांस धाकधपटशा दाखवून व प्रसंगविशेषीं खून देखील पाडून लुटालूट करीत; भतग्रामांत दीनमहंमद, अर्जून रावत, सदगो देवळी, यांच्या टोळ्या लुटालूट करीत होत्या.

अशा या स्थितींत जनतेची काय स्थिति झाली असेल ती एका देवालाच ठाऊक! निःशस्त्र प्रजा प्रतिकार करण्यास असमर्थ होती व सरकारकडे तोंड देण्यासारखें सैन्य नव्हतें. अशा या धालमेलींत वर्ष दीड वर्षांचा काळ गेला. इतक्या अवधींत बंडखोरांची रग जिरवून त्यांचा बीमोड करण्याकरतां मागविलेलें सैन्य येऊन लगेच सत्तरीवर मोहीम करण्याची तयारी झाली व लागलीच सरकारी सैन्यानें डिचोलीपर्यंत मजल गांठली. या सैन्याला तोंड देण्यासाठीं फिरलेले शिपायीही मोठ्या दिमाखानें पुढें पुढें होऊं लागले व शेवटीं उभयतांची गांठ सांखळीनजिक कोंडाळें येथें पडून गोळीबाराला सुरवात झाली. कांहीं वेळ सामना चालला व इतक्यांत सरकारी तोफखाना येऊन पोंचला. लढाईला निकरानें सुरवात झाली व पुढें असलेले दीन महंमद व त्याचे कांहीं वाळपईचे अल्लाचे भक्त अबदुलखां वगैरे, कीं ज्यांना एकदोन महिने आपल्या

१२१

शौर्यानें अबदुलबादशहा ह्मणवून घेण्याची इच्छा झाली होती. त्यांची तोफेच्या गोळ्यांनीं बोहरी केली व अशा रीतीनें त्यांच्या आशा नष्ट झाली. एकाच गोळ्यानें पांचपन्नास मनुष्यांना हवेंत उडवून दिल्यामुळें बाकीच्यांची त्रेधा उडून जो तो जीवाशेनें रानाचा रस्ता पकडूं लागला, डोंगराचा आश्रय शोधूं लागला, कांहीं लोकांनीं मागचा पाय घेऊन पळ काढला. तोफाही एक-सारख्या दणाणूं लागल्या. अखेर सरकारी सैन्यानें भुरट्या लोकांचा पाठलाग सुरू केला व त्यांना सांपडेल तिकडे गोळ्या घालून ठार करण्याचा क्रम सुरू केला. अशा रीतीनें बाजारबुणग्या व भुरट्या लोकांचें प्रस्थ कमी पडूं लागलें व अशा या यशप्राप्तीमुळें राणेही आपणाला शरण येतील अशी सरकारी अधि-काऱ्यांची साहजिकपणें कल्पना झाली. याच कल्पनेनें प्रेरित होऊन जुवें बेटांतील कोलून द प्रेपारासांवचे मुख्य गोमीस द कॉस्त आणि युरोपीयन तुक-डीचे कॅप्टन पुशोल हे आपआपल्या तुकड्या घेऊन राण्यांचें निर्दलन करण्या-करतां मोठ्या आढ्यतेनें जाऊं लागले. खासे लोकांना हें वर्तमान कळतांच चालून येणाऱ्या सैन्याचे श्रम कमी करण्याच्या इच्छेनें त्यांनीं करनऱ्यापर्यंत आपल्या लोकांच्या टोळ्या सारख्या दबा धरून बसवल्या व त्यांना असें सांगितलें कीं, जो कोणी एकाद्या मोठ्या ऑफिसरास खालीं पाडील त्यास चांगलें बक्षीस देण्यांत येईल. अशा रीतीनें प्रत्येकजण तयारींत होता. थोड्याच वेळानें सर-कारी सैन्य एका खिंडींत गांठून राण्यांनीं गोळीबार सुरू केला. उलट युरो-पीयन शिपायांकडून फेरींवर फेरी झडूं लागल्या. बंडखोर लोकांच्या दुर्गम निवासस्थानामुळें त्यांना गोळ्या लागणें शक्यच नव्हतें. उलट बंडवाल्यांच्या फेरी सरकारी सैन्यांतील एक दोन मुडदे अचूक पाडीत होत्या. अशा स्थितींत युरोपीयनच्या तुकडींतील तीन सार्जंट आणि कॅप्टन पुशोल व त्याचप्रमाणें इंडियन सैन्य घेऊन गेलेले कॅप्टन कॉस्त यांस गोळ्या लागून भयंकर जखमा झाल्या व अशा रीतीनें त्यांचा गर्व उतरून ते मागें फिरले. गत-प्राण झालेल्या गोऱ्यांस व जखमी इसमांस डोलींत घालून डिचोलीस आण-ण्यांत आलें. सरकारी लोकांत मोठीच गडबड उडाली. ही बातमी पणजीस समजून तेथेंही खळबळ माजली. अशा वेळीं ह्मणजे ता० १२ नव्हम्बर सन १८९६ त पोर्तुगालहून राजबंधु दॉं आफोंस येन्हींक आणि नवे राजप्रतिनिधि

आपल्यासमोर धरून आणलें. पाहूं जातां त्या गाईला एक लहानसें किंवण ( क्षत ) होतें व त्यामुळें बस्तूसाहेब परमावधीचे चिडून गेले. त्यांनीं तोंडानें शिव्यांचा भडीमार चालविला व या असल्या रोगट गाईला ठार मारून टाकलें पाहिजे असें ह्मणून त्यानें भरलेली बंदूक त्या हुजऱ्याच्या हातीं दिली व तिजवर गोळी झाडण्यास हुकूम केला. पण तो हिंदु हाडामांसाचा असल्यानें त्या गाईवर गोळी कशी झाडील ? साहेबांनीं आपल्या आज्ञेचा धडधडीत अपमान होत असलेला पाहून एकदम उग्र स्वरूप धरिलें व त्या हुजऱ्याला कैद करण्याची आज्ञा केली. हां हां ह्मणतां गावांत ही बातमी पसरली. सदर हुजऱ्याचा धाकटा बंधु आपल्या भावाची चौकशी करण्यासाठीं पोलीसठाण्यावर गेला. त्याजवरहि तशाचप्रकारें चवताळून गाईला मारण्याविषयीं तो त्याला हुकूम करूं लागला. त्यानें शांतपणें साहेबांस असा प्रश्न केला कीं, साहेब, आपली आई जर करतां एकाद्या वेळीं कोणत्याही जखमेनें किंवा अन्य रीतीनें आजारी झाली तर आपण तिला मारून टाकाल काय ? जरकरतां आपणांस दूध नको असेल तर त्याबद्दल आमची कोणत्याच प्रकारची तक्रार नसून तें आपण अवश्य दुसऱ्याकडून घ्यावें. आह्मीं गाईला घरीं नेऊन आमच्या शक्तिनुसार औषधोपचार करूं.

अशा प्रकारें आर्जवानें व हातापायां पडून तो आपल्या बंधूस व गाईस घेऊन परत घरीं आला; परंतु आपल्या गाईची व बंधूची त्या दुष्ट साहेबानें केलेली विटंबना त्याच्या लक्षांत पुरेपुर राहिली व त्याचा सूड उगविण्याचा त्यानें निश्चय केला. साहेब स्नानाला जात असलेल्या वाटेवर तो बंदूक घेऊन पाळत राखीत बसला व संधि साधून त्यानें साहेबावर गोळी घालून त्यास ठार केलें व तो पळून गेला. याचा परिणाम असा झाला कीं, यांत दादाराण्याचें अंग आहे, अशा वहिमानें त्यास त्याच्या मुलांसह बेसावध स्थितींत पकडलें व त्याचप्रमाणें इतर बऱ्याच राण्यांस कैद करून त्यांस आफ्रिकेस रवाना करून दिलें. जे कांहीं थोडे राणे सरकारच्या जबड्यांतून सुटले ते सांवतवाडी संस्थानच्या हद्दींत पळून गेले. त्यांचाहि पाठलाग करण्यासाठीं गोमिस द कोस्त कांहीं शिपायांनिशीं वाडीदरबारांत गेले व सदर राण्यांना पकडून आपल्या स्वाधीन करण्याची त्यांनीं विनंति केली; परंतु फोंडसांवताच्या बंडाची आठवण

करून देऊन आमच्या आश्रयार्थ आलेल्या इसमांस आह्मीं आपल्या स्वाधीन करूं शकत नाहीं असा स्पष्ट जबाब मिळाल्यावर स्वारी जशाची तशी परत आली. अशा रीतीनें आप्पा राणे, गांवठणकर वगैरे मंडळी तेथेंच राहिली.

दादा राणे बेसावध असतां त्यास विश्वासघातानें पकडण्यास त्याचेच जातभाई कारण झाले असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें दादाचा स्वभाव, त्याची इतर जनांशीं मन मिळावूपणाची वर्तणूक वगैरे गोष्टी लक्षांत घेतां त्यास शत्रु उत्पन्न होण्यास एरव्हीं विशेषसें कारण नव्हतें. त्याच्या विषयींच्या ज्या थोड्या गोष्टी प्रचलित आहेत त्यांवरून तो गृहस्थ मोठ्या थोर अंतःकरणाचा होता असें साहजिकच दिसून येतें. ज्या दत्तू नाडकर्णी याच्या रक्ताच्या थेंबानें बंडाला सुरवात झाली व त्याच्याच पूर्णाहुतीनें या बंडाचा उपशम होणार असें स्पष्ट दिसत होतें त्याला या महदापत्तींतून सोडविण्यास एक दादाची दयान्वित वृत्तीच सर्वथैव कारणीभूत झाली. असें असतां त्याच दत्तू नाडकर्ण्यानें दादाचें घरदार सरकारास दाखवून त्याचा दाणागोटा भस्म करविण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. दुसरें व्हेनो गावडो नांवाचा दादाच्या विश्वासाचा एक हुशार तिरंदाज होता. त्यानें एकदां परस्त्रीवर हात टाकला ह्मणून येळगें येथें आपल्या समक्ष त्याला गोळी घालून ठार करविलें. तिसरें लक्ष्मण येळगेंकरास पाळीयेस मोर्च्यावर ठेविलें असतां आपलें कर्तव्य सोडून तो आपल्या एका खासगी शत्रूचा सूड उगविण्यासाठीं दुसरीकडे गेला ह्मणून त्यालाही त्यानें देहांत शिक्षा दिली. अशा थोर पुरुषास कांहीं चुगलखोर लोकांनीं पकडून देऊन त्यास काळ्यापाण्याची सजा प्राप्त व्हावी यासारखी दुर्दैवाची गोष्ट कोणती ? या बंडास आरंभ करण्यांत दादाचा कोणताही खासगी हेतु नव्हता. केवळ आपले जातभाई व धर्मबंधू परकीय सत्तेखालीं विनाकारण व विनापराध झोडपले जातात तर त्याला कांहीं तरी आळा पडल्यास पाहवा या एकाच उच्च हेतूनें प्रेरीत होऊन त्यानें बंडाचें निशाण उभारलें. आपल्या घरादाराचा त्याग केला. या बंडाच्या अमलादींत कैक इसम प्राणास मुकले. कित्येक लोकांचीं घरेंदारें अग्नीच्या विशाल जबड्यांत विलीन झालीं असंख्य निरपराधी लोक विनाकारण त्रासले व पीडले गेले व या सर्व स्वार्थत्याग, त्रास व हालअपेष्टा यांबद्दल पारितोषक काय तर स्वजनांचा विरोध, विश्वास-

घात व कृतघ्नता ! हे काळ्यापाण्यावर गेलेले राणे लोक तेथें मरून जातील व येथें मात्र अजरामर झाले असते असें थोडेंच आहे ! नोकरशाहीनें फोडा व झोडा या तत्वानुसार आपल्याच लोकांना हाताशीं धरून राण्यांला पकडावें यांतहि त्यांच्या दृष्टीनें वावगें किंवा असंभाव्य असें कांहींच नाहीं; पण ज्या-बद्दल अंतःकरणाला घरें पडतात, मन खेदानें विषण्ण होतें तें आपल्याच जात-भाईच्या नामर्दपणामुळें होय. गोमांतकांतच हा प्रकार घडून आला असें नसून हिंदुस्थानच्या इतिहासाचीं कैक पानें असल्या संतापजनक उदाहर-णांनीं खचून भरलेलीं आहेत. असल्या चांडाळ व नतद्रष्ट पागलांना या अनाथ व असहाय हिंदभूमीमध्यें जन्म देण्याचा ईश्वराचा काय हेतू असेल तें फक्त त्यालाच ठाऊक !

---

प्रकरण आठवें.

—:※:—

## निर्बलांची गळेचेप.

अश्वंनैव गजं नैव व्याघ्रं नवै च नवै च ॥
अजापुत्रं वलिं दद्यात देवो दुर्वल घातकः ॥१॥

* * *

स पिता पितरस्तेषां केवलं जन्म हेतवः ॥

इ० स० १८९७ त सप्टेंबरच्या ९ तारखेस दादा राण्याचें बंड शांत करून ना. माशादसाहेबांनीं या प्रांताच्या जमाखर्चाचा जो रिपोर्ट प्रसिद्ध करावयास लावला त्यावरून असें दिसून आलें कीं, गोमांतकाच्या राष्ट्रीय तिजोरींत ५० लक्ष रु. रोकड नाणें शिल्लक असून तें शिपायांच्या व राण्याच्या भीतिमुळें बॅम्बे बँकेमध्यें व्याजीं ठेऊन दिलें होतें. अर्थात् राष्ट्राला पैशाचा तुटवडा होता म्हणून नवे नवे कर बसविणें भाग झालें व त्यामुळें प्रजा असंतुष्ट होऊन बंड पुकारते अशांतला प्रकार मुळींच नसून केवळ सरकारी अधिकारी आपापल्या पोळीवर तूप ओतण्याच्या आसुरी लालसेला बळी पडून गरीब प्रजेचा नाहक छळ करीत होते व त्याचाच परिणाम म्हणजे वरील बंडें व असंतोष होय; हें कोणालाही साहजिकच कळून येण्यासारखें आहे. ता० २८ मार्च सन १९०४ रोजीं मुगांव येथील इंग्रजी वकिलानें

( Eusul ) जो आपल्या सरकारास व्यापारासंबंधीं रिपोर्ट केला होता त्यांतहि बंडाचीं हींच कारणें विषदरीतीनें दाखविलीं आहेत. परंतु पोर्तुगालच्या प्रधानमंडळांत जोंपर्यंत नेक नामदार आंद्राद कोरबू होते किंवा त्यांचें वजन होतें तोंपर्यंत गोंव्याच्या राजकारभारावर त्यांनीं निवडलेलीच मंडळी येऊन गोमांतकांतील प्रजेला थोडे फार सुखाचे दिवस लाभले. या अवधींत जे थोडे सज्जन इसम येथें आले त्यांची आठवण गोमांतकाला चिरकाल राहिल्याशिवाय रहाणार नाहीं. या मंडळींत म्यानुयल गोराजांव, माशाद, नोव्हाइस फेरैर गाल्हार्दु वगैरे लोकांकडून शक्य त्या रीतीनें गोमांतकाचें थोडें फार कल्याण झाल्याखेरीज कदापिही राहिलें नाहीं व ही ह्या चांगल्या लोकांची परंपरा जर असीच चालू राहिली असती तर गोमांतकाचें कल्याण झाल्याखेरीज कदापिहि राहिलें नसतें; परंतु पोर्तुगालच्या राजदरबारांत दिवसेंदिवस भल्या माणसांचा तुटवटा अधिकाधिक पडूं लागल्यामुळें व लांचलुचपत, हांजीखोरपणा वगैरे दुर्गुणांच्या माणसांचा उदो उदो चालल्यामुळें गोमांतकाचें दुर्दैव ओढवलें व येथील प्रजेविषयीं मनांत भरपूर उदासीनता असलेलेच प्रांताधिपती इकडे विशेष प्रमाणांत येऊं लागल्यामुळें गोमांतकाच्या कल्याणाचे मार्ग रोधले गेले. असो. दादाराण्याच्या बंडाचा वचपा काढावा ह्मणून कष्टमड्युटीवर वीस टक्के जादा कर बसविण्यांत आला व असल्या पांच बंडांचा खर्च निघून गेला तरीहि आपल्या बोकांडीं बसलेला हा कर अद्याप हालत नाहीं. गेल्या दहा पंधरा वर्षांमागें गोमांतकाला कर्जबाजारीपणा विशेष ठाऊक नव्हता. कितीही उधळपट्टीनें खर्च केला तरी जमाखर्चाची तोंडमिळवणी होत असे. परंतु आजकालचा और प्रकार पाहिला तर मन आश्चर्यातिरेकानें व्यग्र होऊन जातें. प्रत्येक वर्षीं लाखों रुपयांची पडणारी तूट, ती भागविण्यास गरीब व दुबळ्या प्रजेवर लादले जाणारे असह्य कर, अनावश्यक, अप्रयोजक व खर्चिक खातीं वाढविण्याचा भयंकर सपाटा, आपल्या सग्यासोयऱ्यांची व बडेबापके बेट्यांची वर्णी लावण्यासाठीं गोमांतकाला कर्जाच्या कितीहि घनघोर खड्यांत लोटण्याचा अनावर मोह वगैरे अनेकविध गोष्टी लक्षांत घेतल्या तर आपल्या प्रत्यक्ष आईकडून जसें बालकाचें संरक्षण होतें तसें भाडोत्री दाईकडून कदापिही होऊं शकत नाहीं हें निर्विवाद रीतीनें

सिद्ध होऊं शकतें. ही स्थिति वसाहतींची झाली. खुद्द पोर्तुगालची परिस्थिति-देखील विशेष आशाजनक होती अशांतला भाग नाहीं. तेथें सुद्धां थोड्या-फार प्रमाणावर हाच प्रकार चालू होता. आमच्यासारखे नेमळे लोक म्हणजे जिंकून आणलेलीं मेंढरें. ते सांगतील तें ऐकावें व करतील तें पहावें. जास्त बोलण्याची मगदूर नाहीं. पोर्तुगालच्या जनतेचा प्रश्न याहून निराळा होता. ते किती झाले तरी शास्ते. शासितांची सर त्यांना कशी यावी? तेथील लोकांनीं राजाच्या वर्तनांत किंचित् अरेरावीपणा दृष्टीस पडतांच राजसत्ताच म्हणून पाडण्याचे प्रयत्न चालविले. आपल्या मायबाप सरकारावर उलथून पडण्यास पोर्तुगीज लोक काय वेडे, स्वाभिमान्यशून्य व स्वराष्ट्रविघातक होते, अशांतला प्रकार नाहीं. तर जोंपर्यंत मूल सरळ येतें तोंपर्यंत त्याची ममता असते पण तेंच आडवें आलें असतां कापून काढून बाळंतिणीची सुटका करण्याचा शहाण्याचा समंजसपणा असतो; परंतु जेव्हां राजाला आपली चैन, उधळपट्टी व स्वच्छंदीपणा भरमसाट चालवावयाचा असतो तेव्हां सहाजिकच प्रजेच्या प्रेमालाहि त्याला वंचित व्हावें लागतें. आह्मीं या प्रकरणांतील मथळ्यांत घेतलेल्या श्लोकाचाही असाच अर्थ आहे.

कविकुलगुरु कालिदास यांच्या वरील उक्तींत वर्णन केलेल्या ध्येया-बरहुकूम प्रजापालन करणारा राजा हाच प्रजेचा खरा 'मायबाप' होय. राजा आणि प्रजा, यांचे अन्योन्यसंबंध वगैरे विषयांसंबंधीं विस्तृत विवेचन करण्याचें हें स्थल नसल्यामुळें तो मोह आवरून धरणें भाग होत आहे. राजशासनसंस्थेंतील मूलभूत तत्वांमध्यें उत्क्रांति होत होत प्रस्तूत जें स्वरूप तिला प्राप्त झालें आहे तें जरी पाश्चात्य लोकांना अयोग्य वाटत नसलें तरी आह्मां हिंदीसंस्कृतिमध्यें वाढलेल्या लोकांना तें नवस्वरूपांत दिसत असल्यामुळें नवखें वाटलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. प्रजेच्या संमतीनेंच राज्यकारभार चाल-विण्याचें तत्त्व पुराणकालीं प्रचलीत होतें. याचे दाखले पाहिजे तितके सांपडूं शकतील. शिवाय राजाच्या ठिकाणीं वसत असलेल्या प्रजावात्सल्यामुळें प्रजाहि राजाला पितृतुल्य मानीत असे आणि ह्मणूनच 'मायबापसरकार' हे शब्द प्रेम आणि आदर या भावनांनीं युक्त असून सहेतूक व सार्थ असत; परंतु आतां त्या शब्दांमध्यें तो अर्थ तितक्या प्रमाणांत राहिला नसल्यामळें मंगल-

सूत्राविहीन स्त्रीच्या गळ्याप्रमाणें तो ओका व नीरस दिसत असतो. हें गोमांतकांतील प्रजेकडून कराच्या व अन्य रूपानें वसूल केलेला पैसा चैन, ख्यालीखुशाली यांत उधळून टाकला जात असलेला पाहून वाटल्याखेरीज रहात नाहीं. प्रत्येक राजानें आपणास प्रजेकडून मिळणारी ही 'मायबाप' पदवी सार्थ करण्यास निरंतर झटणें हें त्याचें कर्तव्य असतें; परंतु असा अनुभव फारच थोड्या लोकांच्या नशिबीं येत असतो. असो.

निदान ५ अक्टोबर १९१० रोजीं जी द्वाही गोमांतकामध्यें फिरली तिच्या सन्मानार्थ तरी तसा अनुभव गोमांतकांतील प्रजेला यावयास पाहिजे होता; परंतु मोनार्की जाऊन त्याजागीं रिपब्लीकचा जरी नामभेद झाला तरी हिंदी प्रजेला त्याचा फायदा मुळींच न होणें साहजिकच होतें. कारण ह्या वरपांगी नामभेदांत मनुष्यांच्या मनोवृत्ति व वासना अचल व विचलीत राहिल्या. त्यांत फरक मुळींच झाला नाहीं. मनुष्य तेच, धार्मिक भावना त्याच, हिंदीसंस्कृतिविषयीं अनुदार भावना व असहिष्णुता यांचा पगडा हृदयावर आज हजारों वर्षांपासून पूर्णपणें बसलेला. त्याचें परिवर्तन काय क्षणिक भेदामुळें होऊं शकेल ? सारे अधिकारी औट घटकेचे. आयुष्य क्षणभंगुर असल्यामुळें जेणेकरून आपल्या पोळीवर तूप जितकें जास्त ओढतां येईल तितकें प्रत्येक जण पाहणारच. शिवाय हरहमेश होणाऱ्या राज्यक्रांत्या, ज्यांची यशस्विता आरमार व लष्कर यांवर अवलंबून असते त्यांना भरपूर पगार चारून डोक्यावर घेऊन नाचण्याची प्रवृत्ति, प्रत्येक पक्षांत बेसुमार दिसत असल्यामुळें व यासाठीं पैसा आणण्याला वसाहतींशिवाय अन्य जागा नसल्यामुळें प्रत्यहीं त्यांच्यावर नवे नवे कर लादावे हाच त्यांचा व्यवसाय होऊन बसला आहे. पोर्तुगिज रिपब्लीकचें हें उदाहरण, तर ग्रीस देशांतील रिपब्लीकनाकडून ह्याच्या उलट प्रकार दिसून आला. साकेतिसासारख्या लोकमान्य पुढाऱ्यास युद्धामध्यें विजयी होऊन आला असतांना त्याच्याकडून कायद्याविरुद्ध घडलेल्या थोड्याशा दोषास्तव त्यास देहांतशिक्षा सांगण्यास तेथील न्यायाधीश कचरले नाहींत आणि आपल्या करड्या अमलानें प्रजेच्या माना मुरगाळून अवाच्यासव्वा पैसा लुटणारा वाळपईचा कमांडर सि. लोर पेरैर याच्याकडून दुखावलेल्या प्रजेनें न्यायप्रीय अशा रिपब्लीकचे पहिले गव्हर्नर

डॉ. कोसैर द कॉस्त यांच्याकडे न्यायाची याचना केली असतां चार फुकाच्या शब्दांनी गुन्हेगार लोरे परैर यांस ते दुखवूं शकले नाहींत.

यावरून रिपब्लीक रिपब्लीक ह्मणून अज्ञ प्रजेनें नाचण्यांत कितपत फायदा आहे हें तात्काळ कळून येईल. रिपब्लीकची उच्चतत्वें आचरणांत आणण्यासाठीं प्रजाहि त्याच प्रमाणें सुसंस्कृत, निर्लोभी, निर्भीड व निस्पृह झाली पाहिजे. त्याशिवाय रिपब्लीक चालविणें मोठें धोक्याचें काम आहे. लोकांना योग्य न्याय देण्यासाठीं जे आपसांतीलच लोक आपण निवडतों तेच जर लोभी, लांचखाऊ व कामांध निपजूं लागले तर शेत खाणाऱ्या कुंपणाप्रमाणें त्यांचें अस्तित्व चिरदु:खदपरिणामी समजावयास नको काय? आजकाल नव्या कायद्यानें स्वराज्याचे जे हक्क गोमांतकाला दिले आहेत त्यांन्वयें कौन्सिलांतहि कांहीं जागा आह्मा इंडियनांना मिळाल्या आहेत; परंतु अरण्यरूदनापलिकडे या जागांचा फारसा उपयोग होऊं शकत नाहीं. एकादे वेळीं थोडासा झालाच तर सुद्धां सर्टीफिकेटच्या जोरावर पाहिजे ती गोष्ट पास करून घेण्याची कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुंची शक्ति सरकारच्या हातांत कायद्यानें देऊन ठेविली आहे. इतकेंच नव्हे, एकादी गोष्ट ह्या कौन्सिलनें पास केली तर देखील त्यावर शेवटचें शिक्कामोर्तब होण्यास या ठरावांचें पार्सल पोर्तुगालला रवाना व्हावें लागतें व तेथील लहरीपणावरहि पुष्कळदां त्याचें भवितव्य अवलंबून असतें. तात्पर्य सर्व सत्ता ह्यांना त्या रीतीनें आपल्या हातीं ठेवायाची व केवळ हें कौन्सिलचें फार्स करून पातकाचे धनी लोकांना करून ठेवायाचें असा हा युरोपीयन लोकांचा कावा आहे, हें आपण विसरतां कामा नये; पण शहरांतील लोकांची अशी स्वाभाविक प्रवृत्ति असते कीं, त्यांचें मन निरनिराळ्या मोहांना लगेच बळी पडतें; अंगांत ऐक्य राखण्याच्या स्वाभाविक धर्माचा ऱ्हास झाला असल्यामुळे सामर्थ्यहीनत्व अंगांत हीनबलता उत्पन्न करतें व आपणासच हे उपद्व्याप कां ह्मणून ते कोणत्याहि अरेरावी सत्तेचा प्रतिकार न करतां तिला उरून रहातात. पण खेड्यांपाड्यांतील प्रकार तसा होऊं शकत नाहीं. तेथील लोक स्वाभाविकपणेंच आडदांड व कमी समंजस असल्यामुळें थोड्याशा अन्यायामुळें ते चिडून व चौताळून जातात व अत्याचारांला प्रवृत्त होतात. हा त्यांच्यामध्यें वसत असलेल्या स्वाभिमानाचाच गुण होय व हाच त्यांचा स्वाभिमान

त्यांना सरकारविरुद्ध उठण्यास कारणीभूत होतो. अन्यायाचा प्रतिकार करण्याची प्रवृत्ति ही एका मनुष्यप्राणांतच आहे अशी गोष्ट नसून अगदीं क्षुल्लक अशा जीवजंतूंमध्येंही तिचा वास असतो व त्यामुळें ते खरोखर सुखी असतात. उदाहरणार्थ, सर्प हा अगदीं लहान प्राणी असून सुद्धां त्याच्या ठिकाणीं स्वाभिमान भरपूर वास करीत असल्यामुळें त्याच्या वाटेस कुणीच जात नाहीं. उलट त्याची पूजाअर्चा करून त्याला देवाप्रमाणें मान देतात. याच्या उलट मेंढा हा सर्पापेक्षां किती तरी पटीनें जास्त मोठा असून सुद्धां त्याच्या ठिकाणीं स्वाभिमानतेचा पूर्ण अभाव असल्यामुळें अंगावरची लोंकर, मांस, कातडें वगैरे कोणतीहि वस्तु त्याच्या संमतीशिवाय घेऊन त्याला यमलोकींची वाट दाखविण्यांत येते.! तात्पर्य स्वाभिमानपणा दाखविल्यानें सर्प पूज्य होतो व त्याचा त्याग केल्यानें मेंढा तुच्छ मानला जातो. इतिहास सुद्धां आपणास हेंच शिकवितो. पोर्तुगालहून इकडे येऊन पोर्तुगिज लोकांनीं स्वाभिमानीपणाच्या जोरावर गोव्याचें राज्य घेतलें व त्याच स्वाभिमानाच्या अभावामुळें आम्हीं तें त्यांना बिनहरकत घेऊं दिलें.

स्वाभिमान उत्तमपणें लोकनिदर्शनास आणण्यासारखी आमच्या सभोवती अनुकूल परिस्थिति नाहीं. किंवा त्या प्रकारचीं उत्कट साधनेंही आपणाकडे नाहींत हें जरी खरें असलें तथापि स्वाभिमान केवळ परिस्थितीची व साधनाचीच वाट न पहातांसुद्धां आपलें तेज प्रगट करतो, शिवाजी राजानें जो साम्राज्याचा पाया घातला त्याजकडे साधनें कुठें होतीं? आजकालचीं आयर्लंड, चीन वगैरेसारखीं पूर्ण किंवा अंशतः पारतंत्र्यामध्यें खिचपत पडलेलीं राष्ट्रें आपली परक्यांच्या मगरमिठींतून सुटका करून घेऊं पाहतात व तसा निरालस्य प्रयत्न करतात कीं, ज्यांची यशस्विता आपण आज थोड्या फार प्रमाणावर पहातही आहों. त्यांजकडे काय पाश्चात्य युद्धकलाविशारद व शस्त्रास्त्रनिपुण राष्ट्रांपेक्षां साधनें जास्त होतीं? श्रीरामचंद्र प्रभूनें पुराणकालीं रावणासारख्या अजिंक्य व बलाढ्य राजांवर जो अतर्क्य जय मिळविला तो माकडांच्याच साह्यानें नव्हे काय? तात्पर्य काय तर समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें 'भाग्यासी काय उणे रे यत्ना वांचोनि राहिलें' हीच गोष्ट खरी आहे. इतर पांढरपेश्या लोकांप्रमाणें राण्यांच्या अंगांतील स्वाभिमानपणाचा अंगार

एकदम विझून गेला नव्हता. त्यामुळें लोर्ड पेरेरीच्या अरेरावी कारकीर्दींत जे अमानुष अत्याचार असहाय व मुक्या प्रजेवर होत असत त्यांमुळें त्यांच्या अंगांत वसत असलेली स्वाभिमानपणाची ज्योत किंचिन्मात्र प्रज्वलीत होत असे. आपल्या मालकीच्या जमिनींतील झाडें तोडण्यास परवानगी, कुमेर-भरड करून चार दाणें उत्पन्न करावयाचे झाले तरी लायसन्स. बळजबरीनें दुसऱ्याच्या जमिनी घशाखालीं ओढल्या तर त्याची ना दाद ना मनसुबी. त्यांतच फारतर चारपांचशें रुपये उत्पन्न होण्याचे ठिकाणीं चार हजारांची वारणी सरकारी अधिकाऱ्यांनीं केली व ती सक्तीनें वसूल करण्याचा घाट घातला; अशा अनपेक्षित अत्याचारांमुळें सत्तरप्रांतांतील लोकांचा निद्रिस्त अभिमान जागृत झाला व त्यांनीं अर्ज्या डेपुटेशनें वगैरेंच्या द्वारें वरिष्ठ सरकार-कडे या गोष्टींची दाद मागण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळचे सरकारी अधिकारी यांनीं रयतेच्या रास्त तक्रारींकडे दुर्लक्ष्य करून प्रत्येक शेतावर आपला एक एक शिपाई ठेवला. इकडे गव्हर्नरसाहेबांस केलेल्या अर्जांची दाद तर राहोच पण जबाबसुद्धां मिळेना. शेवटीं कांहींच्या नांवें एक अर्ज करून तो वकिलामार्फत पाठविला व त्यांत एक तर आह्मांस न्याय द्या किंवा आह्मीं परमुलखांत जात आहों यासाठीं चांगल्या वर्तणुकीचा दाखला द्या अशी मागणी केली. ह्या अर्जास मी स्वतः येऊन काय तो निकाल देईन, असा गव्हर्नरसाहेबांकडून जबाब आला. परंतु या उत्तरांत अमुक एक नक्की दिवस ठरविला नसल्यानें पिकलेल्या शेतांची नासाडी पशुपक्षी करूं लागले. या अवधींत सरकारच्या तीन मैल लांबीच्या ज्याफरीच्या मळ्यास आग लागून तो भस्मसात होऊन गेला. हें एवढें मोठें झालेलें तुफान पाहून अधि-कारी अतिशयच चिडून गेले व त्यांनीं सरकारास भलताच रिपोर्ट करून त्याचें मन कलुषित केलें.

गव्हर्नरसाहेबांनीं तारीख २० एप्रिल १९११ रोजीं वाळपईस येण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ही बातमी तेथील सर्व लोकांमध्यें पुकारण्यांत आली. त्याप्रमाणें नेमलेल्या दिवशीं सत्तरप्रांतांतील सर्व रयत लोक वाळपईस जमा झाले. ज्यावेळीं गव्हर्नरसाहेब वाळपईस पोंचले त्यावेळीं त्यांनीं ऐसपैस 'काळी कांबळीवाला' अवाढव्य समाज पाहिला, त्यावेळीं त्यांनीं असा

हुकूम फर्माविला कीं, या लोकांनीं आपली मुलाखत घेण्यासाठीं छावणींत यावें. त्याप्रमाणें लोकांनीं आपणांतून धामाशेंचा बाबलो मेळकर, सिरसोडेंचा पांडगो खोत, कुडाशेंचा झिलु कुडसेकर आणि बाबलो पर्येकर यांना मागण्या वगैरे सुचवून छावणींत बोलण्यास पाठविलें आणि बाकी सर्व मंडळी खालीं उतरली. त्यावेळीं रयत लोकांचीं व अधिकाऱ्यांचीं खालीलप्रमाणें प्रश्नोत्तरें झालीं—

गव्हर्नरः—तुह्मीं जाफरीच्या मळ्यास आग कां लावली ?

रयतः—ही आग आह्मीं लावली नसून ती कोणी लावली व कशी लावली हें आह्मांस मुळींच माहीत नाहीं.

अधिकारीः—मला कांहीं दिवसांमागें अर्ज कोणी केला व अशा तऱ्हेचा मसुदा वकिलाकडून करून घेण्याचें कारण तरी काय होतें ?

रयतः—आह्मीं आजपर्यंत चार वेळां आपणांस निनांवी अर्जद्वारें इकडील वस्तुस्थिति कळविली; कदाचित् त्या अर्ज्या आपणाला मिळाल्या नसाव्या किंवा आपण त्यांकडे लक्षच दिलें नसावें. तेव्हां आमच्या ह्मणण्याचा अर्थ आपल्या बरोबर लक्षांत यावा या हेतूनें आह्मीं वकिलामार्फत आपणास अर्ज केला व तो आमच्या नांवेंच केला.

अधिकारीः—बरें, आपली मागणी तरी काय आहे हें निश्चित शब्दांत परंतु सरकारास जड न वाटेल अशारीतीनें आपण कळवाल काय ?

रयतः—आह्मीं मायबाप सरकारकडे इतकेंच मागत आहों कीं, जमिनीचा खडकाळपणा, ती कसण्यास लागणारे श्रम व इतकेंही करून हातास पीक लागण्याची पंचाईत. अशा आमच्या विविध अडचणी लक्षांत घेऊन इतर जमिनींप्रमाणें आमच्या जमिनींवर सिदा व महसूल न वाढवतां तो पूर्वीप्रमाणेंच घ्यावा व भरडकुमेरीकरतां झाडेंझुडपें तोडण्याची आह्मांस सवलत द्यावी. त्याचप्रमाणें आमची गरीबीची स्थिति लक्षांत घेऊन आह्मांला जनन-मरणावरील कर माफ करावा. शेतावर ठेवलेल्या शिपायास उठवावें " इंव्हेन्तार्यु " कायदा आह्मांस लागू न करावा व कोणत्याही नोकरास येथें कायम न करतां वेळोवेळ त्याची बदली करावी. आह्मीं अर्जांत केलेल्या मागण्या अशाच स्वरूपाच्या होत्या.

यावर गव्हर्नरसाहेबांनीं असें सांगितलें कीं, वरील मागण्या अशक्य

कोटींतील असून सरकारास त्या देणें मुळींच शक्य नाहीं. याचवेळीं रयतेस असेंही सांगण्यांत आलें कीं, सरकारास नमविण्याच्या उद्देशानें रयत बंडास प्रवृत्त झाल्यास तींत तिचेंच नुकसान आहे; कारण एकतर सरकार पूर्वींप्रमाणें नेभळें व कमकुवत राहिलें नसून, शिवाय पूर्वींप्रमाणें बंडवाल्यांना गय करण्याचे दिवसही आतां राहिलेले नाहींत. अशा तऱ्हेचे धमकीचे बोल बोलून गव्हर्नरसाहेबांनीं हातांतील अर्ज फाडून टाकला व लोकप्रतिनिधींस जावयास सांगितलें.

छळवादाचा कळस झाला ह्मणजे दुर्बळांसही बळ चढून ते बंडाला प्रवृत्त होत असतात. वरील प्रकारानें कांहीं तरुणांचें तरुण रक्त तामसी विचारांनीं उसळ्या मारूं लागलें व मोर्यांराव राणे, तातोबा कुमारखणकर, यशवंतराव राणे, हणमंतराव राणे वगैरेंनीं विचाराअंतीं असें ठरविलें कीं, गव्हर्नरसाहेबांचा सांखळीला जातांना वाटेंत समाचार घ्यावा.

पूर्वापार वहिवाट अशी होती कीं, बंड पुकारण्यापूर्वीं कांहीं देवतांची साह्यार्थ प्रार्थना करावी. नंतर ज्याच्या नांवें बंडास उठाव द्यावयाचा असेल, त्याच्या नांवें करनळें येथील शिळा उघडण्याचा समारंभ करावा व इतकें झाल्यावर बंडाला सुरवात करावी. बंड यशस्वी झालें ह्मणजे शिळा सशास्त्र बंद करण्यास बराच खर्च येत असे व यावेळीं साखळीच्या पांडुरंगास नजराणा पाठविण्याचाही रिवाज होता.

या बंडांत वरील रिवाजाला फांटा देण्यांत आला. अपशकून होत असतांही कांहीं लोक बंदुका घेऊन गव्हर्नराच्या वाटेंत दबा धरून बसले. गव्हर्नरसाहेबांस हें असें होणार हें दुष्ट स्वप्न पडलेंच होतें, त्याप्रमाणें कोसेरसाहेबांनीं आल्या वाटेनें परत न जातां लांबचा पल्ला धरण्याचें ठरविलें आणि केळावड्याहून निघून ते पणजीला गेले. हें पाहून बंडवाल्यांचा जळफळाट झाला. दुसऱ्या दिवशीं होंडाच्या मेटासमीप तेनेंत आलेलुई याचा खून पाडला. करनळेची छोटी छावणी जाळण्यांत आली, पणजीहून वाळपईकडे नेण्यांत येणारी माल बॅग लुटली गेली व केरीच्या मेटावर गोळीबार होऊन कांहीं शिपाई मारले गेले आणि कांहीं जखमी झाले. अशारीतीनें बंडास सुरवात झाली.

याचवेळीं राजपक्षीय लोकांनीं पायव्ह कोसेर यास पुढें करून स्पॅनिश सरहद्दीच्या आधारें पोर्तुगालांत रिपब्लीक सरकारविरुद्ध बंड माजवल्याकारणानें गोव्यांतील कॅथोलिकांना हुकी येऊन सत्तरीच्या बंडाच्या आधारें रिपब्लीक-सरकारवर आकाश कोसळून पडणार अशी दंगल माजवण्याची लहर आली. आणि त्या लहरीप्रमाणें भाषणांतून, वर्तमानपत्रांतून कोसेरसाहेबांवर टीका-स्त्राचा वर्षाव होऊं लागला. पोर्तुगालांत गडबड उडून गेली. लोर पेरैरीस सस्पेंड करून त्याच्या कारभाराचा जाब घ्यावा असा हुकूम आला. सि. माजोर फ्रांसीस्क शावियेर द सिल्व्ह यांची नेमणूक झाली. त्यांनीं बंड-वाल्यांच्या मागण्या सरकारास मान्य करण्याबद्दल रदबदली करतों असें आश्वासन देऊन बंडाचा ओघ एक महिना थोपवून धरला; परंतु शेवटीं त्यांचे प्रयत्न निष्फल ठरले. हे प्रयत्न निष्फल ठरण्यास बहुतांशीं गोव्यांतील जाज्वल्य खिस्तानुयायी कारण झाले. त्यावेळीं रिपब्लिक सरकारची नाचक्की करण्याचा त्यांनीं सपाटा धरला होता. अंतर्यामीं राजसत्तेचा अभिमान भर-लेला होता; परंतु बाह्यात्कारीं रयतेच्या मार्गाचें समर्थन करण्याचा ते आव आणीत होते. गव्हर्नरांस त्यांचा पक्का संशय आला. त्याप्रमाणें त्यांनीं ओर्लीस निघणारें " जॉर्नेल द इंदिय " नांवाचें पत्र, " इंदिस्पेंसाऽवेल् " नांवाचें बस्तोड्यास निघणारें मासिक व ब्रिटीश हिंदुस्थानांतील " कॅथोलिक राजि-ष्टर " हीं पत्रें बंद करून त्यांनीं कांहींवर खटले चालविले. गव्हर्नराचें असें ठाम मत बनलें कीं, बंडखोरांस या लोकांची चिथावणी आहे. बंडासंबंधीं पोर्तुगालसरकारास येथील गव्हर्नरांनीं केलेल्या रिपोर्टावर सीनेट सभेंत गोव्याचे सेनादोर सि. गोव्हेय पिन्तु यांनीं केलेलें खरमरीत भाषण व ' सार्वजनिक अशांतता ' या सदराखालीं त्या भाषणाचा गोषवारा देऊन पणजीच्या " कोमेर्सीयु " पत्रानें केलेली कुत्सित टीका हीं पाहून तर त्यांच्या संशयांत विशेषच भर पडली. ते एकदम हट्टास चढले आणि बंडखोरांची पुरी खोड मोडण्याचा त्यांनीं निश्चय केला.

त्यावेळीं येथील बहुतेक सैन्य माकावला पाठविलें होतें. तिकडेही गडबड चालू होती. अर्थात् पोर्तुगालहून सैन्य येण्यास, माकावहून सैन्य येण्यास, शिद्दी लोकांचें आफ्रिकेंतून सैन्य येण्यास व इकडे रिक्रूट जमवून

सैन्य तयार करण्यास, जो वेळ लागला, तितक्या अवधींत बंडानें उग्र रूप धारण केलें. सगळ्या प्रजेला बंडवाल्यांनीं सळो का पळो करून सोडलें. लोकसंरक्षणाकरतां सरकारनें ज्या ठिकाणीं मिलिटरी टाणीं बसविलीं असतील अशा जागीं जाऊन आणि तेथील सरकारी लोकांवर गोळीबार करून किंवा त्यांना अशा दंगलींत गुंतवून ते बाहेर लुटालुटीला आरंभ करीत. यांची ही लूट ह्मणजे सर्वापहाराचा एक महापूरच होय. हा पूर ज्या घरावरून किंवा गांवावरून गेला असेल, तेथें माणसांवांचून दुसरी कसलीच वस्तु रहात नसे. हा ओघ नवीन काबिजादींतील साऱ्या प्रदेशांत एक-दीड वर्ष सारखा खेळत राहिला होता. कारण हा पूर थोपवून धरण्याकरतां हव्या असलेल्या बांधाची सरकार करीत असलेली तयारी अजून पूर्ण झाली नव्हती. बंडखोरांना तर स्वार्थानें पछाडलें होतें, दुर्बुद्धीनें घेरलें होतें व नीतीनें पुरें सोडलें होतें. यामुळें त्यांच्या हातून अनन्वित अत्याचार घडत होते. शेवटीं नीच व स्वार्थी विचारांनीं शेफारलेल्या कांहीं उपटसुंभांनीं श्रीसत्यनारायणाच्या पूजेवर हात टाकून जो प्रमाद केला, तेव्हां त्यांच्या अपराधाचें माप पुरेपूर भरून गेलें व त्यांची सारखी वाताहात होऊन गेली. त्यांनीं वनांत देवावर हात टाकून पूजेचा ज्या दिवशीं भंग केला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं त्यांना आपल्या हातून घडलेल्या चुकीचा प्रत्यय आला. शंभर लोकांनिशीं अस्नोडेस हल्ला करण्यास ते गेले असतां त्यांचा त्या दिवशीं मोड होऊन पुष्कळजण मारले गेले. इतकें झालें तरीही, प्रख्यात दरोडेखोर कुस्तो द नोरैंज्य याचें भय कमी झालें नव्हतें.

इकडे माजी अधिकारी ( Cmanbanre ) सिं. रोल पेरैर याच्या कारभाराचा जाब घेण्यास नेमलेल्या सिं. ग्रानांतनीं ( कष्टमचे अधिकारी ) गुळाचा गणपति व गुळाचाच नैवेद्य करून ते पोर्तुगालला निघून गेले. त्यांच्या नंतर कापिताव द पोर्तु-सिं. नेवपार्त यांची नेमणूक झाली पण त्यांच्या हातूनही काळाचा अपव्यय करण्यापलीकडे मोठीसी कामगिरी कांहींच घडली नाहीं. नंतर सत्तरप्रांतावर कॉमान्दान्तीच्या जागीं असलेल्या सील्व्हसाहेबांनीं बंडखोरांच्या हालचाली, त्यांच्या आवडीच्या जागा वगैरे हुडकून काढण्यासाठीं गुप्त हेर नेमले. या हेरांनीं अशी बातमी आणली कीं, बंडखोरांचे प्रमुख

गुळेले येथें येणार आहेत. ही बातमी मिळतांच सरकारसैन्यानें रात्रौ बारा वाजतां तिकडे जाऊन वेढा घातला आणि घरांतील माणसांना बजावलें कीं, उजाडण्यापूर्वी बाहेर जाण्याचा प्रयत्न कोणी करूं नये. अशा रीतीनें यशवंतराव व माणिकराव पर्येकर यांस पकडलें. त्यांकडे ४ बंदुका, २२ काडतुसें व १ तलवार सांपडली. त्याचप्रमाणें त्यांनीं आपणाकडे असलेले २२३ रुपये कोमांदांतीच्या स्वाधीन केले. त्यांच्या पायांत बेड्या ठोकण्यांत येऊन त्यांना लढाऊ जहाजावर पाठवून देण्यांत आलें परंतु हे केवळ नामधारी प्रमुख असल्यानें बंडाचें मान कमी होण्याचा रंग दिसेना. कांहीं दिवसांनीं केपें, सांगें वगैरे ठिकाणीं भयंकर त्रास करणारा दरोडेखोर झीला सावंत व त्याचे साथीदार यांनाही तिकडे गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. बाबलो राणे पर्येकर यासही असाच अचानक पकडला. याचवेळीं, ह्मणजे माहे जून, ता० ९ सन १९१२ रोजीं सातआठशें बंडखोरांनीं सांखळीवर हल्ला चढवला. हल्ल्याचा उद्देश कॅप्टन दों आंतोन मिनेझिस् व त्यांचे मदतगार यांचा सूड घेण्याचा होता. परंतु तो ते साध्य करूं शकले नाहींत. तरीपण त्यांनीं सांखळी लुटली व जातां जातां रा. विष्णु शेणवी बोरकर यांचा त्यांनीं निरपराधीपणें खून केला. त्याचप्रमाणें कॅप्टन साहेबांस आव्हान करून त्यांना पत्रद्वारें दहशत घालण्यास त्यांनीं मागें-पुढें पाहिलें नाहीं.

ता० ११ रोजीं पोर्तुगालहून युरोपीय सैन्य घेऊन कोमांदांत आन्तोनियु फेरैर हे गोव्यांत आले. लष्करी कायदा पुकारून जिकडे तिकडे बंडखोरांस मारण्यांत येऊं लागलें. अर्थात् त्यांचें प्रस्थ मंदावलें. तरी पण संतोबाची टोळी, मोरयारावांची टोळी आणि कुस्तुलो ऊर्फ कुस्तोज नेरोज याची टोळी या मतग्रामांत पीडापीड करीत होत्या. त्याचप्रमाणें मनुष्यरक्तभक्षक क्रूर दरोडेखोर गोविंद सावंत सांगें, केपें वगैरे प्रांतांत पुष्कळ त्रास देत होता. तसेंच झीला सावंताची टोळी बोडको देवळी याच्या प्रामुख्याखालीं लुटालूट करीत होती. इकडे कुष्टुलो हा धाडसी बंडवाला तर सरकारी लोकांची गुमान न धरतां दिवसाढवळ्या लुटालूट करीत होता; त्याला धरण्यांकरतां सरकारी अधिकाऱ्यांनीं आडरस्त्याचा अवलंब केला. अस्नोडें येथें कुष्टोबाच्या

मीतींतील एका नायकिणीस लांच देऊन त्यांनीं सामील करून घेतली व कुष्टुलो यावयाच्या दिवशीं कांहीं शिपाई घराच्या जवळपास लपून बसले; या शिपायांनीं संधी साधून कुष्टुलो यास गोळ्या घालून ठार केला व कांहीं साथीदारांस पकडून म्हापशास नेलें. पुढें एकदां युरोपीय लोकांची एक तुकडी वाळपईकडे जात असतां बंडखोरांनीं मोठमोठीं झाडें तोडून त्यांच्या रस्त्यांत घातलीं व अशारीतीनें दोन मैल वाट आडवून टाकली, साहजिकच यामुळें सैन्याला पुढें जातां येईना. ही संधी साधून बंडखोरांनीं त्यांवर गोळ्या झाडण्यास सुरवात केली; पण सरकारी लोकांनीं पाठलाग करतांच ते रानांत पळून गेले. यानंतर सैन्याची तुकडी सुखरूपपणें वाळपईस पोंचली.

कांहीं बंडखोर कुडाचिरेंस झोंपडी बांधून असतात, अशी वर्दी लागतांच सार्जंट लीमच्या हाताखालीं कांहीं शिपायी देऊन त्यांना तिकडे पाठविण्यांत आलें. त्यांनीं अचानक हल्ला करून विष्णु देवळी यास कैद केलें, आणि निळबा कासरपालकर यास गोळी घालून ठार मारलें. घोंगुल पळत होता त्यासही पकडण्यांत आलें. दुसऱ्या एका प्रसंगीं गांजें येथें राणे आलेले कळतांच तिकडे लष्करी फोर्स पाठवून देण्यांत आला. वाटेंतच उभयतांची टक्कर लागली. कांहीं बंडखोर पडले; पण रामचंद्रराव राणे, अमृतराव राणे खडकीकर, बाळा देसाई अडवयकर आणि रामचंद्रराव गांवठणकर हे पळून गेले. माणिकराव गांवठणकर यांच्या टोळीनें बरेच लोक जमा करून डिचोलीवर हल्ला केला आणि छावणींतून कोणीं बाहेर पडूं नये म्हणून दाराजवळ मोर्चा ठेवला. पण ते लुटालूट करण्याच्या बेतांत असतां छावणींतून सील्व्ह सार्जेंट कांहीं शिपायांसह बाहेर पडला. व त्यानें गोळीबारास सुरवात केली, बंडवाल्यांची एक गोळी सील्व्ह सार्जंटास लागून तो जखमी होऊन पडला. परंतु शिपायांनीं न डगमगतां गोळीबार चालू ठेवल्यानें बंडवाल्यांचा मुख्य तिरंदाज गोळी लागून पडला व तें पाहून बंडवाले सैरावैरा पळत सुटले. जातां जातां बंडखोरांनीं कांहीं नागरिकांना धरून नेलें. यांपैकीं कांहींजण पळून आले व कांहींजणांस पैसे भरून परत आणलें. यापूर्वीही बंडखोरांनीं डिचोलीवर हल्ला केला होता, पण त्यावेळीं त्यांचा उद्देश केवळ लुटीचाच नव्हता. त्यांचे कांहीं साथीदार डिचोलीच्या तुरुंगांत होते व त्यांना सोडवून नेण्याचा

त्यांचा बेत होता. त्यावेळींही गोळीबार झाला व एक नागरीक मेला; पण सरकारी लोकांनीं विनदिक्कत त्याला बंडखोरांत जमा करून शौर्य जोडलें! असो.

गोवा सरकारनें बंडाचा बीमोड करण्यासाठीं उभारलेल्या सैन्याची जय्यत तयारी होतांच मोहीमेस सुरवात झाली. सन १९१२ त अक्टोबरच्या अखेरीस सत्तर प्रांतावर स्वारी करण्यास सैन्य रवाना झालें. माकावला सरकारी सैन्य गुंतलें असल्यानें दरोडेखोरांस बरेंच फावलें होतें. मध्यंतरीं गोविंद सावंत, झिला सावंत यांस मारल्यामुळें गोव्याचा दक्षिण भाग त्रासांतून सुटला होता व कुस्तोज यास मारल्यामुळें बारदेशचा राहू गेला होता; पण सत्तरींत अजून गडबड कायम होतीच. दोन महिन्यापूर्वी यशवंतराव गुथेकर यानें उभारलेल्या बंडाचा तो नामधारीच असल्यामुळें फारसा उपयोग झाला नाहीं. कोणत्याही रीतीनें या बंडाचा कायमचा निकाल लावावा ही गव्हर्नरसाहेबांची इच्छा असल्यामुळें चार पांच महिन्यांत त्यांनीं सैन्यांत एकसारखी भरती करण्यास सुरवात करून सहासातशें नवीन शिपायी तयार केले; त्याचप्रमाणें पोर्तुगालहून युरोपीय सोल्जर व आफ्रिकेहून निग्रोंची एक कंपनीही आणण्यांत आली; इकडील स्थायिक कंपनी माकावला गेली होती, तीही ता० २८ सप्टेंबरला येऊन दाखल झाली. अशा रीतीनें सत्तरीवर स्वारी करण्यास निघतेवेळीं दोन तीन हजार सैन्य हजर होतें. प्रांत डोंगराळ असल्यामुळें व शत्रूच्या गनिमी काव्याशीं टक्कर द्यावयाची असल्यामुळें शत्रूचा कायमचा सोक्षमोक्ष करण्याचें काम बरेंच कठीण आहे हें जाणून खुद्द गव्हर्नर साहेबांनीं पोर्तुगालहून नवी-नच आलेले सेनापती ( Chefe do Estado maiot ) यांच्यासह स्वतः जावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें मुख्य छावणी सांखळीस ठेवून सत्तरीस चोहूं-बाजूंनीं वेढा दिला व बंडखोरांना कोठें जातां येऊं नये अशी खबरदारी घेतली. कांहीं बंडखोरांनीं धाडसानें गव्हर्नरांच्या तुकडीवर फेळवडेस गोळी-बार केला. एक गोळी गव्हर्नरांस लगटून गेली, तरीपण हिंमत न सोडतां ते सैन्यावर देखरेख ठेवूं लागले. यावेळीं बंडखोरांस शरण किंवा मरण यांपैकीं एक मार्ग पत्करावा लागला, तरी कांहीं बंडखोरांनीं संधी साधून ब्रिटीश हद्द धरण्याचा प्रयत्न केला. यांपैकीं बहुतेक सरकारच्या हातीं लागले; तरी शंभु मोरया, विश्राम बाबलो, आप्पासाहेब गांवठणकर इत्यादि पुढारी पळून

गेले. निग्रो शिपाई गस्त घालीत असतां मिळेल त्या बंडवाल्यास पकडीत व न मिळाल्यास गोळी घालून ठार करीत. यांमुळें बरीच दहशत बसली होती; परंतु हिरवें बुद्रुक, हिवरें खुर्द, चोरावडें व गोळावली या गांवांतून गस्तीस गेलेल्या शिद्दी शिपायांवर बंडखोरांनीं गोळीबार केला. सरकारी शिपायांनीं त्यांचा पाटलाग करून त्यांपैकीं दोघांस ठार केलें व एकास पकडून आणलें. त्याच्याजवळ एक उत्तम स्नायडर बंदूक, ६१ काडतुसें व ५० रुपयांच्या इंग्रजी नोटा व कांहीं कपडे सांपडले. पकडलेला इसम रायू नाईक हा सालेलीचा राहणारा होता व त्याजवळ मिळालेली बंदूक प्रख्यात शंभू मोरयाची होती. हे इसमही त्यांच्याच टोळींपैकीं होते. सारांश आज वर्ष दीड वर्ष पावेतों गोमांतकांतील प्रजेला भंडावून सोडणारें हें बंड आतां शमत चाललें होतें. प्रथम दहाबारा महिनेपावेतों या बंडाची धामधूम अवर्णनीय होती; नंतर एकीकडून झीला सावंत आणि दुसरीकडून बंडाचे मुख्य अधिपति यशवंतराव राणे यांची गिरफदारी व त्याच्या मागोमाग झालेला कुष्टुलो याचा वध. एका मागून एक घडलेल्या गोष्टींपासून बंडाला उतरती कळा लागली; मुख्य सरकारी मोहिमीनें तर तें नामशेषच झालें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सत्तरींतील बंडाचा शेवट माफीनेंच व्हावयाचा अशी आजपर्यंतची वहिवाट होती; परंतु आतां मनु बदललेला होता व त्याप्रमाणें या मन्वंतराचा प्रभाव याबाबतींतही दिसून आला. नेकनामदार साहेबांचें मनोधैर्य याबाबतींत बरेंच दिसून आलें. आपल्या करारी स्वभावास अनुसरून त्यांनीं जें नेटाचें धोरण दाखविलें त्यामुळें पुष्कळ अदूरदर्शी टीकाकारांच्या टीकेला ते पात्र झाले. पूर्वापार वहिवाटीप्रमाणें आतांही सरसकट माफी पुकारणें हाच शहाणपणाचा मार्ग होय, असें या लोकांचें ह्मणणें पडलें; पण गव्हर्नरनीं आपलें धोरण तसेंच कायम ठेवलें. इतकेंच नव्हे तर स्वतः जातिनिशीं सैन्यास प्रोत्साहन देण्यासाठीं हजर राहून व त्याचप्रमाणें परिस्थितीचें स्वतः निरीक्षण करून व ठिकठिकाणीं फिरून व प्रसंगीं प्राणांतिक हल्ल्यांशीं तोंड देऊन त्यांनीं आपला कार्यभाग सिद्ध केला. शेवटीं पणजी म्युनिसिपालिटीनें जेव्हां त्यांचें जाहीर स्वागत करून त्यांच्या कर्तव्यतत्परतेचा गौरव केला, तेव्हां आपल्या श्रमांचें योग्य पारितोषक दिल्याबद्दल गव्हर्नरसाहेबांनीं उपकृत मनानें समाधान व्यक्त

केलें व पुन: एकदां आपल्या धोरणाचें स्पष्टीकरण करून असें सांगितलें कीं, सत्तरीचे बंडवाले अजिंक्य आहेत. हा समज आतां खोटा ठरला आहे; ही एकच गोष्ट बहुतेकांच्या माताविरुद्ध मी जें धोरण पत्करलें होतें, त्याचें समर्थन करण्यास पुरेशी आहे, तथापि एवढ्यानेंच आपलें कार्य संपलें असें आपण समजत नसून शांततेची पुरी प्रस्थापना होऊन जेव्हां सत्तरप्रांत प्रगतिपथाचें आक्रमण करूं लागेल, तेव्हांच त्याची पूर्ति झाली असें आपण समजूं. पुढें गव्हर्नरसाहेब म्हणाले कीं, आपण केलेल्या परिश्रमांचीं फळें जरी आपणा स्वत:स खावयास सांपडलीं नाहींत, तरी भावी पिढी आमचें कार्य ओळखून जी आपली आठवण काढील तींतच आपणाला समाधान आहे.

वरील सारख्या मिठ्या भाषणांनीं ज्यांनीं सत्तरकरांचें व इतर पोर्तुगीज हिंदुस्थानचें हित करण्याचें कंकण बांधून घेतलें, त्यांच्या निर्लोभ वृत्तीचें थोडेंसें प्रदर्शन करूं; कारण स्वत:च्या कारभारावर स्वत:ची दृष्टी नसल्यामुळें अनेकपरीनें त्रास कसा भोगावा लागतो हें त्यावरून चांगलें दिसून येतें. बंडाच्या नांवावर जितका माल सत्तरप्रांतीं गेला त्यांतील बहुतेक माल मधल्यामध्यें गडप होऊन त्याचा खर्च तेवढा तिजोरीवर पडला; हा एक बंडामुळें कारभाऱ्यांना फायदा झाला. पुढें ५ डिसेंबर १९१३ त पुरी शांतता प्रस्थापित होऊन लष्करी कायदा रद्द केल्याचें जेव्हां जाहीर झालें तेव्हां सत्तरप्रांतीं कोमान्द मिलितारच्या जागीं कापितांव गॉदिश ऑझॉर्यु याची नेमणूक झाली. यावेळीं उरल्यासुरल्या बंडखोरांस पकडण्याच्या कामीं ऑझार्यु यांच्या बायकोनें बरीच हिंमत दाखविली; ती अशी:—सदरील बायको सि. दोना बातु या पूर्वीपासून हुशार असल्यामुळें त्यांनीं शंभूमोरया, अप्पाराव गांवठणकर यांस पकडून देणाऱ्यांस बक्षिसें जाहीर केलीं आणि फंदफितुरीनें त्यांचे त्यांच्याच लोकांकडून खून करविले. या खुनी लोकांना मिठ्या भाषणाच्या मेजवान्यांशिवाय दुसरें काय पैदा झालें असेल तर तें देवालाच ठाऊक ! पण इतकें खरें कीं, या बक्षिसांच्या रकमेचा ताण सरकारी तिजोरीवर पडला. याच मासल्याचें आणखी एक उदाहरण ह्या ख्रिस्तभक्तांनीं काळ्या लोकांचें हित करण्याकरितां, शेतकीची सुधारणा करून राणे लोकांस पोटापाण्याचा मार्ग दाखविण्याच्या उद्देशानें गोव्याच्या तिजोरींतून काढलेली भली मोठी

रक्कम होय. या रकमेंतून २॥ लक्ष केसरीचीं झाडें, हजारों काजूचीं झाडें, ४० हजार सांवरीचीं झाडें, ४० हजार शिसवीचीं झाडें कल्पनेच्या जमनींत लावलीं गेलीं; पण स्वार्थाच्या किडीनें तीं जमिनींत रुजूं दिलीं नाहींत. आणि २०० फणसाचे रोप व ५ हजार निलगिरीचे रोप खताच्या अभावीं मरून गेल्यामुळें त्यांच्या जागीं शेतकीचें शिक्षण देण्याकरितां एक शेतकीची फिरती शाळा काढण्याचें ठरलें. त्या कामीं एक भली मोठी रक्कम मंजूर झाली; पण सत्तरकर मूळचेच मठ्ठ डोक्याचे असल्यामुळें ह्मणा, अगर दुर्दैवानें उपजत पोर्तुगीज भाषेचें ज्ञान त्यांस नव्हतें ह्मणून ह्मणा, पणजीहून सि. पेद्रु कुरेय यांनीं पोर्तुगीज भाषेंत दिलेलें व्याख्यान त्यांस सांनिध ऐकूं आलें नाहीं—अथवा समजलें नाहीं; मात्र १४२८५ रुपये या कामीं खर्च झाले. लोकांच्या सोईसाठीं पणजींत तरते धक्के बांधण्यास काढलेली ८५७१५ इतकी रक्कम, तरते धक्के कल्पनेंत विराम पावून विरजली गेली. त्याचप्रमाणें सरकारी जमाबंदीखात्याची पद्धति सुधारण्याकरितां तज्ज्ञ आणण्यास १४२८५ इतकी रक्कम काढली गेली. असें असलें तरी सत्तरकरांची मागणी या अधिकाऱ्यांना मान्य करतां आली नाहीं. प्रजेवर बसाविलेले जादा कर हलके करतां येत नव्हते, परंतु त्या करांची उधळपट्टी वरील प्रकारांनीं करतां येत होती. याचा अर्थ काय हें कोणी सांगूं शकेल काय ?

कराच्या प्रतिकारार्थ सत्तरकरांनीं बंड पुकारावें आणि अधिकाऱ्यांनीं लुटावें गरीब प्रजेस ! उलट बंडाच्या शमनार्थ सैन्य जमवून किंवा यूरोप-आफ्रिकेंत गोव्याच्या रखवालीस ह्मणून सैन्य ठेवून भराभर कर घालावे हेंही पण दुबळ्या जनतेवरच ! अशा या राण्यांच्या बडग्यानें आणि सरकारच्या सोडग्यानें गोमांतकस्थ जनता हवालदील होऊन गेली असतां गोव्याच्या उन्नतीच्या फुशारक्या मारणाऱ्या गव्हर्नरांनीं सि. रोल परेरीच्या बाबतींत ( Sinbicancia ) कांहींच निकाल न देतां ते खुशाल पोर्तुगालास निघून गेले. बरें, निकाल देतां येत नव्हता ह्मणावें, तर येथील आरोग्यखात्याचे "चेफ" व 'सुब-चेफ' व मेडीकल स्कूलचे प्रोफेसर डॉ० दीयास व डॉ० ऑल्फांग द सील्व्ह या दोन अधिकाऱ्यांच्या विरुद्ध दोन वर्षेंपर्यंत खटला चालवून प्रोफेसरांस लष्करी शिस्तीप्रमाणें अनुक्रमें सहा व दहा दिव-

त्यांची शिक्षा खुद्द गव्हर्नरांनीं अमलांत आणली. ही शिक्षा अमलांत आणूं नये ह्मणून सर्व नागरिकांनीं गव्हर्नराशीं मागणी केली; गुरूची शिक्षा संपेपर्यंत शाळेंत जाऊं नये असा मेडीकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं संप केला; लिसेवच्या विद्यार्थ्यांनींही संपाशीं सहानुभूति दाखवून तसेंच आचरण केलें. अशा रीतीनें सर्वांची नापसंती दिसून आली तरी कौसेरसाहेबांची न्यायदेवता डोळे उघडीत नव्हती. इतकेंच नव्हे तर, उलट मेडीकल स्कूल बंद करणें व लिसेवच्या विद्यार्थ्यांस शिक्षा देणें अशा सारख्या योजना डोकें वर काढूं लागल्या. दुर्वर्तनांवरे व उधळपट्टीवर टीका होते, ह्मणून फांचू लोयोलचें पत्र "जॉर्नाल द इंदिय" बंद पडलें असतां त्यांनीं अनावृत्त पत्र काढून टीका केली. राज्यकारभारांतील दोष झणझणींत शब्दांत जाहीर करण्यांत या पत्राचा हातखंडा होता. पत्र बंद पडल्यानंतर गव्हर्नरसाहेबांस पत्रकर्त्यांनीं खालीलप्रमाणें जाहीररीत्या आव्हान केलें:—

"अमर्यादित अधिकार बळकावून आपण पुरे नबाब बनलां आहां. दोषांचें आविष्करण झालेलें नको, ह्मणून प्रांतिक स्वास्थ्याची खोटी सबब पुढें करून माझें पत्र बंद पाडण्याचें श्रेय आपण घेतलेंत. यापुढें 'रेबात' नांवाचें पत्र सुरू करून आपली झोटिंगपाच्छाई जगजाहीर करण्याचा मी निश्चय केला आहे. तेंही आपण बंद कराल तर दुसरा एकादा उपाय मी शोधून काढीन; पण आपण चालविलेला जुलूम छपूं देणार नाहीं. प्रांतिक स्वातंत्र्याच्या खोट्या सबबीवर लोकांस काळ्या पाण्यावर पाठविण्याचा आपण सपाटा धरलाच आहे. त्याच दावणींत मला गोवून एकाद्या किल्ल्यावरील अंधारकोठडींत गाडून मोकळे कां होत नाहीं?" लोयोलांचा हा निर्वाणीचा सवाल होता; पण गव्हर्नरसाहेबांची न्यायदेवता त्याला सरळ उत्तर न देतां आडमार्गाला कां लागली? बरें, ज्या न्यायप्रिय गव्हर्नरांनीं मडगांवच्या जज्जकोर्टांतून न्यायाच्या बाता झोडल्या त्याचें प्रत्यंतर ह्मणून गव्हर्नराच्या जागीं येतांच कांहीं अवश्यक पलासींतील सामान गाडी-घोडे विकून काटकसरीची फुशारकी मारणाऱ्यांचा निस्पृहबाणा पुढें अधिकारावर कायम राहिला नाहीं. लोयलनीं 'मोत्यांच्या कंठ्याची कहाणी' उद्यांपासून सुरू करणार ह्मणून मोठ्या अक्षरांत जाहीर करतांच त्यांना फांचू लोयोलचें ध्यान लागलें

वर्तेपणजीत, अल्वियाचें कळतांच त्यांस पालासींत येण्यास निमंत्रण गेलें. तेथें गोव्याची उन्नति करणाऱ्या या बहाद्दरानें रिव्हॉल्वर काढला ! यावेळीं साहेबांची न्यायबुद्धी कोठें गेली होती कुणास ठाऊक ! !

दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चाललेल्या गोमांतकाकडे वेळींच दृष्टी दिली नाहीं तर गोमांतकाची ममता या पाठीवर बिऱ्हाड घेऊन येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कृत्यांत दिसून येत आहे ती गोमांतकाला पुरें लुबाडल्याशिवाय रहाणार नाहीं. अशाच रीतीनें विचार केला असतां असें दिसून येतें कीं, बंडखोरांच्या चळवळीस अधिकाऱ्यांची लुटालूट कारणीभूत असून अधिकाऱ्यांच्या चळवळीच्या मूळाशीं बंडखोरांची लुटालूट असते. अधिकाऱ्यांच्या विचारसरणीवरून असें दिसून येतें कीं, एका बंडाच्या उत्पादकांस माफी दिली ह्मणजे दुसऱ्या बंडाला उठाव मिळतो. त्यांच्या मतें असें दिसतें कीं, यापुढें गोव्यांत बंड न उद्भविण्यासारखें करण्यास एकच उपाय आहे व तो ह्मणजे संशयीत आरोपींस भराभर काळ्या पाण्यास पाठविणें किंवा हद्दपार करणें हा होय. ही झाली आपल्या पोर्तुगीज मुत्सद्यांची विचारसरणी. आतां आपण जर एकाद्या इंग्रजी मुत्सद्यास असा प्रश्न केला कीं, बंडाचा उपशम करण्यास दुसरा उपायच नाहीं काय? तर तो खात्रीनें सांगेल कीं, त्याला अन्य उपाय आहे. सरकारी कामदारांच्या अन्याय्य वर्तनामुळें ज्यांनीं निरुपायानें हातांत शस्त्र घेतलें असेल, त्यांच्या प्रकरणाचा निःपक्षपातीपणें विचार करून अपराध्यांस—मग तो सरकारी अधिकारी असो किंवा एकादा बंडवाला असो—शासन करावें. जे निरपराधी ठरतील त्यांस माफी द्यावी व त्यांच्या रास्त मागण्या मान्य करून शांतता स्थापावी. सरकारच्या न्यायी वर्तनाबद्दल लोकांची खात्री असणें हें राज्याच्या चिरस्थायीपणास अत्यावश्यक आहे. निष्ठुरपणें दिलेल्या शिक्षेपेक्षां किंवा भराभर केलेल्या खटल्यांपेक्षां न्याय्य वर्तनानेंच सरकारची इभ्रत वाढत असते. असेंच तो ह्मणेल असें आह्मास वाटतें.

## प्रकरण नववें.

## विषयोपन्यास

जयास जीवाचें वांटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ॥
कांहीं तरी करूनि उपाये । पोट भरावें ॥ १ ॥
बहुतां दिवसांचें बंड । म्लेंच्छ माजले उदंड ॥
याचें करूनि दुखंड । राज्य करावें ॥ २ ॥ —श्रीसमर्थ

इंग्लंडचा राजा चौथा हेनरी याचा ज्येष्ठ पुत्र युवराज प्रिन्स ऑफ वेल्स ह्मणजे जो पुढें पांचवा हेनरी ह्मणून प्रसिद्ध झाला, तो लहानपणीं अतिशय हूड व दंगेखोर असून, टवाळ लोकांच्या संगतीनें अतिशय नीच व मूर्खपणाचीं कृत्यें करीत असे. एकदां त्याच्या एका मित्रास मुख्य न्यायाधिशानें कैदेची शिक्षा दिली. राजपुत्र कोर्टांत हजर होता. त्याला या कृत्याचा राग आला व संतापाच्या भरांत युवराज यानात्यानें आपल्या मित्रास सोडून देण्याचा हुकूम तो न्यायाधिशास करूं लागला. न्यायाधिशानें साहजिकच अन्याय्य वर्तन करणें नाकारलें. राजपुत्रास या कृत्याचा इतका राग आला कीं, तो जबरदस्तीनें आपल्या मित्रास सोडविण्याचा प्रयत्न करूं लागला; पण न्यायाधिशानें त्याला साफ सांगितलें कीं, माझ्या सत्तेंत हात घालण्याचा अधिकार तुह्मांला नाहीं. हें ऐकून तर राजपुत्राच्या तळव्याची आग मस्तकालाच चढली, आणि भर कोर्टांत त्यानें न्यायाधिशाच्या थोबाडींत दिली! हें पाहून न्यायाधिशानें आपली बेअदबी केल्याबद्दल राजपुत्रालाही त्याच्या मित्राबरोबर तुरुंगांत नेण्याचा हुकूम दिला; नंतर राजपुत्रास उद्देशून तो ह्मणाला:—"अहो, तुह्मांला पुढें राज्यपदारूढ व्हावयाचें आहे. तेव्हां तुह्मीं स्वतःच जर कायद्यास धाब्यावर बसवूं लागलां तर तुमचे हुकूम प्रजा कसे मानील?" हें ऐकून राजपुत्राच्या हृदयांत प्रकाश पडला व मुकाट्यानें न्यायाधिशास मुजरा करून तो तुरुंगाकडे चालता झाला. पुढें तो राजपुत्र सिंहासनारूढ झाल्यावर आपला सूड उगवील ही न्यायाधिशाची भीति फोल ठरली व नव्या राजानें उलट त्याचे मनःपूर्वक आभार मानून त्यास तो

ह्मणाला कीं, " तुमच्यासारखे कर्तव्यदक्ष आणि निस्पृह न्यायाधिश आह्मांस लाभावा अशी मी इच्छा करितों. "

राज्यकर्त्याच्या ठिकाणीं अधिकार असला तरी स्वकर्तव्याची जाणीव आणि प्रजेच्या हक्कांचें संरक्षण करण्याची दक्षता त्याला किती बाळगावी लागते, हें वरील उदाहरणावरून दिसून येतें. हक्क हा व्यक्तीनें अगर समुदायानें काय केलें तर चालेल हें दाखवितो आणि अधिकार हा एका व्यक्तीनें अगर व्यक्तिसमुच्चयानें दुसऱ्याचे निसर्गसिद्ध हक्क कोठपर्यंत मर्यादित करावें हें दाखवितो. अर्थात या दोहोंचा विरोध आहे हें विधान साधारणपणें बरोबर आहे. याला बंडाच्या परिस्थितीचें उदाहरण द्यावयाचें ह्मणजे कोमांदांत लोर पेरैरीचें होय. त्यांना विशिष्ठ परिस्थितीस सत्तरकरांवर कर घालण्याचा अधिकार होता; पण त्या अधिकारांना विरोध करणारे सत्तरकरांचे हक्क होते. गव्हर्नर जनरल कौसैर द कॉस्त यांनीं जरी सत्तरीच्या प्रजेच्या मागण्या व गाऱ्हाणीं पूर्ण ऐकिलेलीं नसलीं तरी या दोन गोष्टींचा विरोध त्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट करून दाखविला नाहीं. नुसता अधिकार अमर्यादित असतो, तसेच हक्कही अमर्यादित असणार. अधिकाराला व हक्काला कर्तव्याची मर्यादा घालण्यांत येते, आणि देपुताद गोवे पिन्त यांनीं सुद्धां कोमांदांत लोर पेरैरच्या अमर्यादित अधिकाराच्या कल्पनेला मुख्यत: कर्तव्याचीच मर्यादा घातली होती. प्रजेच्या हक्काचा उल्लेख गोवे पिन्त साहेबांनीं केला आहे. इतकेंच नव्हे तर त्या हक्काच्या पायावरच स्वकर्तव्याची इमारत उभी केलेली आहे, तरीपण कमांडर–इन–चिफ् साहेबांनीं कोमांदांत पेरैरला राजीनामा देण्यास सांगतांना जें कारण सांगितलें आहे व जें गव्हर्नर–साहेबांनीं प्रसिद्ध केलें आहे, तें पेरैर कर्तव्यांत चुकला हेंच आहे. दंगेखोर जमावाशीं लढाईत जिंकलेल्या व राज्यव्यवस्था स्थापित न झालेल्या प्रदेशांखेरीज इतर प्रदेशांत वागतांना पोर्तुगीज अंमलदाराचें आपल्या प्रजेशीं वागण्याचें जें कर्तव्य आहे त्यासंबंधाची कोमांदांत पेरैरला कल्पना झालेली नव्हती, त्याची जी कल्पना होती ती पोर्तुगीज राजघटनेच्याविरुद्ध अतएव रिपब्लिक सरकारच्याविरुद्ध ह्मणून ती सरकारला मान्य नव्हती. यामुळें चौकशी-कमिटीचा फार्स होऊन पेरैरला राजिनामा देण्याची आज्ञा झाली. अधिकाऱ्यांना अशी कर्तव्याची जाणीव उघडपणें देण्याचे प्रसंग निदान परतंत्र

राज्यांत फारच थोडे येतात. विशेषतः धर्माधर्मांच्या काळीं तर अमर्यादितपणा हा गुण पोर्तुगीज अंमलदारांच्या हाडीमासीं खिळून राहिला होता याचें कारण आमचा परतंत्रपणा ! स्वतंत्र राष्ट्रांत अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव पुष्कळदां करून देण्यांत येते. खुद्द पोर्तुगालमध्यें पोर्तुगालचे राज्यसंस्थापक दों एर्रीक खिस्तवासी झाल्यानंतर त्यांची बायको पोर्तुगालची राणी दुराचारी व अधर्मरत होऊन बिनहरकत थैमान घालूं लागली व एका स्पॅनिश सरदाराच्या अनुमतीनें राज्यकारभार चालवूं लागली, असें असतां एक दिवस आपल्या प्रियकरास बरोबर घेऊन ती चर्चमध्यें आली असतां मुख्य धर्मोपदेशकानें तिच्या वर्तनावर कडक टीका करून तिचें कर्तव्य डोळ्यांसमोर उभें केलें व ती अधोवदनानें निघून गेली; परंतु तिनें अधिकाराचा दुरुपयोग करून त्या पाद्रीचा सूड उगवला नाहीं. यानंतर पोर्तुगालचे चौथे एडवर्ड राजे आपल्या राज्यकारभारांत अंदाधुंदी करून चैन खेळणें, शिकार खेळणें व प्रणयबद्ध होऊन प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करणें इत्यादि गोष्टींत गुंग होऊन गेले त्यावेळीं त्यांच्या मुख्य प्रधानानें त्यांची इतक्या निस्पृहतेनें व सडेतोडपणें कानउघाडणी केली व त्यांच्या कर्तव्याची त्यांस इतक्या लवकर स्मृति करून दिली कीं, लोकांना वाटलें कीं, हा ह्या वाघाच्या जबड्यांतून आतां कांहीं सलामत सुटत नाहीं; परंतु प्रधानाचा कोणत्याच रीतीनें उपमर्द न करतां तो राजा स्वतःचीं कर्तव्यें पाळण्यांत दक्ष राहिला.

प्रजेचें गाऱ्हाणें पार्लमेंट सभेंत मांडण्यास आफोंस कॉस्तांना दिक्कत वाटत नव्हती व पार्लमेंटच्या एकंदर सभासदांवर सडकून लिहिण्यास बोमे खिस्तास कोणी प्रतिबंध करीत नाहींत. यांचें कारण त्यांची स्वतंत्रता हेंच होय; पण ही गोष्ट होणें परतंत्र राज्यांत जवळ जवळ अशक्य असतें. त्यांतल्यात्यांत जेथें नोकरशाही उघड उघड राज्य करते, तेथें तर वर्तमानपत्रांची "पिग्मेव" सारखी मुस्कुटदाबी होऊन प्रेससुद्धां मोडला जातो. 'भारत' सारख्यावर भराभर खटले भरले जातात आणि भर कौन्सिलांत एकाद्या सभासदाची श्रीमुखपूजा केली जाते. अशा ठिकाणीं अधिकाऱ्यांचीं कर्तव्यें किंवा गुणदोष त्यांना दाखवून देऊन न्याय मिळविण्याचे प्रसंग कपिलाषष्ठीच्या योगाहूनही जास्त विरळा. अधिकारी वेळींअवेळीं प्रजेला

हक्कांकडे फाजिल लक्ष दिल्याबद्दल दोष देत असतात. कायदेपंडितसुद्धां कायदेशीर हक्कांचें विवरण करतांना साधारणपणें हक्कांकडे फाजिल लक्ष पुरविण्याची मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति असते आणि कर्तव्याची जाणीव त्यामानानें कमी असते अशी ओरड करतात. या ओरडीच्या मुळाशीं हक्क आणि कर्तव्य यांचा विरोध आहे. कायदेपंडितांना या गोष्टीची जाणीव अवश्य असते. एक व्यक्ति दुसरीकडून कांहीं तरी मागते, त्यावेळीं हा प्रश्न पुढें रहातो. एका माणसाला दुसऱ्या माणसाकडून कांहींतरी मिळण्याला दोन गोष्टींची आवश्यकता असते. मागणाऱ्या व्यक्तीचा हक्क आणि दुसऱ्या व्यक्तीच्या कर्तव्यांत चूक. अशाप्रकारें हक्क एकाचा व कर्तव्य दुसऱ्याचें असाच प्रश्न कायदेपंडितांपुढें असतो.

इ० स० १९१२ त मडगांव म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास उत्तर देतांना गोव्याच्या प्रांताधिपतींनीं या विरोधाचें चित्र काढून ते ह्मणाले कीं, लोकांनीं स्वतःच्या हक्कापेक्षां कर्तव्याची जाणीव जर विशेष ठेविली, तर या जगांतील जीवन पुष्कळ कमी त्रासाचें होईल. हा उपदेश त्यांनीं अधिकाऱ्यांना केला असता तर तें जास्त सयुक्तिक झालें असतें. अधिकारी हे नोकर असतात. कांहीं गोष्टी प्रजाजनांपैकीं दरएक व्यक्तीला करणें शक्य नसतें; पण समाजाच्या दृष्टीनें अवश्य असतें. त्याचप्रमाणें व्यक्तिव्यक्तीमध्यें किंवा समुदाया-समुदायामध्यें बेबनाव होतांच त्याची बाधा समाजाला पोंचू नये अशी व्यवस्था ठेवणें अवश्य असतें. याकरितां सर्व समाजाचें मुख्य जें सरकार त्याच्या हुकमतीखालीं कर्तव्य बजावण्याकरितां पगारी नोकर ठेवण्यांत येतात. त्यांचे अधिकार कर्तव्य बजावण्यापुरतेच असतात आणि त्याचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ति होऊं नये ह्मणून कमीजास्त पगारही त्यांना देण्यांत येतो. अधिकार आणि मद यांचा इतका निकट संबंध आहे कीं, मदापासून अलिप्त ठेवण्यासाठीं अधिकाऱ्यांना कर्तव्याची जाणीव एकसारखी देत रहाण्याचें काम समाजाचे मुख्य प्रतिनिधि या नात्यानें प्रांताच्या गव्हर्नरासारख्यानें करीत राहिलें पाहिजे. अधिकारी डोईजड होऊं नये यासाठीं शिस्तीचे नियम व वरिष्ठ अधिकाऱ्याचें नियंत्रण यांची आवश्यकता असते. समाजांतील एकादी दुसरी व्यक्ति खेरीजकरून बाकीच्यांपैकीं कोणत्याही एकाद्या व्यक्तीला

हक्काच्या फाजिल जाणिवेमुळें जो त्रास उत्पन्न करतां येईल, तो समाजाच्या हजारों व्यक्तींच्या मानानें अगदीं क्षुल्लक होईल. उलट अंमलदार डोईजड झाल्यामुळें कितपत त्रास होतो हें दाखविण्यासाठीं पोर्तुगालसारख्या प्रजासत्ताक राज्यांतील अंमलदारांचें उदाहरण देण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

रिपब्लीक झाल्यानंतर पोर्तुगालांतील लष्करशाही फार वाढली आणि तिच्यापायीं खर्चाचा मोठा बोजा प्रजेवर लादला गेला. कारण ज्या बाजूला लष्करशाही असेल त्या पक्षाचा दर्जा मोठा होत असल्यानें जो तो प्रजेला पिळून लष्करशाहीची आराधना करण्यांत गढून गेलेला असतो; याबद्दल पोर्तुगालचीं सर्व पत्रें विशेषतः बोमे खिस्ताचा ' उ द आवेर ' हा फार ओरड करीत आहे. या ओरडीचा ध्वनि पार्लमेंट सभेंत घुमूं लागला म्हणजे जहालांचे पुढारी आफोंस कॉस्तसाहेब येऊन सांगतात कीं, आम्हीं खर्चांत काटकसर करावयाचें कबूल करतों; पण बजेट करणारे मुख्य मंत्री किंवा आम्लेद पक्ष ती अामलांत आणूं धजत नाहीं. आयात, निर्गत मालावर वाटेल तेवढी जकात वाढवा, उत्पन्नावरील कर वाढवा; राष्ट्रीय पुढाऱ्याच्या या विचारामुळें वसाहतीं- तील बिंचवाचें बिऱ्हाड घेऊन आलेल्या अधिकाऱ्यांना आयतें फावतें आणि वस्तूवरच नाहीं तर माणसांवरसुद्धां कर घालण्यास ते मागेंपुढें पहात नाहींत. दुबळ्या जनतेवर कराचा बोजा पाहिजे तेवढा घालण्यास हे अधिकारी तयार होतात परंतु नोकरींत ठेवलेल्या माणसांची फाजील संख्या अगर हास्यास्पद पगार कमी करण्याची मात्र त्यांना छाती होत नाहीं. प्रधानमंडळांतील कित्ये- एक पुरुषांनीं फ्रान्सांतील कांहीं कंपन्याशीं देवघेव करून हजारों रुपयांची अफरातफर केल्याची ओरड ऊ द आवेटसारखीं पत्रें एकसारखी करीत आहेत. ही स्थिति जर ज्या देशांत समाज प्रभुपदावर आहे त्या देशांत होऊं शकते, तर बव्हंशीं परतंत्र अशा गोवाप्रांताची विपन्नावस्था कोणत्या थराला गेली असेल, हें लिहिण्याची जरूरीच नाहीं.

या नवीन क्रांतीच्या काळीं लोकांना थोडे थोडे अधिकार देणेस सुर- वात करतेवेळीं त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देणें हें अनियंत्रित सत्ताधाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यापेक्षांही विशेष महत्त्वाचें आहे. ज्याप्रमाणांत आपण सुशिक्षित प्रजाजनाला जास्त ठेचूं त्या- प्रमाणांत आपली कर्तनगारी जास्त ठरेल, असले विचार उराशीं बाळगणाऱ्या

अधिकाऱ्यांना प्रांतिक पार्लमेंटांतील चर्चा असह्य वाटण्याचा संभव आहे; कारण फ्रेतशं रीबैरसारख्या जबाबदार व उदारमतवादी अधिकाऱ्याचें मत पाहिलें तर आपल्या साम्राज्यापेक्षां आपल्या पाद्रीपणाची महती हिंदु लोकांवर लादण्याची आकांक्षा अद्याप कमी झालेली नाहीं, असेंच दिसून येतें. जुन्या धर्मवेडानें चांगल्या चांगल्या प्रजासत्ताक वाघांना अजून आपल्या मिठींतून सोडलें नसल्यानें निःपक्षपातीपणा पोर्तुगीज रिपब्लीकन लोकांपासून अजून पुष्कळ लांब आहे, पाद्र साल्दाञ्ज इजिप्स द सौज, आराऊक्षग्र मास्कारेञ्झरस वगैरे ख्रिस्त भक्त हिंदूंच्या उत्कर्षाबद्दल कशीं नाकें मुरडीत असतात, हें पाहिलें ह्मणजे व पोर्तुगालमधील राजकीय वातावरणांत धनलोभ- अतएव अधिकार-लोभ भरल्याकारणानें प्रधानमंडळाचे चारचार दिवसांत होणारे अस्तोदय लक्षांत घेतले ह्मणजे असें वाटूं लागतें कीं, हिंदुसमाजानें स्वतः खंबीर न होतां लंबकाच्या आंदोलनाप्रमाणें हेलकावे खात असलेल्या पोर्तुगीज राजकारणावर विसंबून राहणें बरोबर होणार नाहीं. हिंदूसमाजानें न्याय मिळावा ह्मणून आजपर्यंत केलेल्या मागण्या, विनंत्या व रेकुर्स यांची कशी काय विल्हेवाट लावली गेली व हटवादी गव्हर्नर कौन्सिलच्या सुधारणा फोल करावयाला कसे तयार होतात, हें लक्षीं आणून हिंदुसमाजानें आपल्या उत्कर्षा-साठीं, उन्नतीसाठीं व अभ्युदयासाठीं संघटीत होऊन खऱ्या लोकशाहीच्या आराधनेला लागलें पाहिजे. अधिकाऱ्यांना त्यांचीं कर्तव्यें उघडपणें दाखवून देण्याची पद्धत सुरू झाली पाहिजे व प्रजेनें निरालस वृत्ती स्वीकारून स्वतः कर्तव्यतत्पर राहिलें पाहिजे. अधिकाऱ्यांनीं अधिकाराचा उपयोग कर्तव्य ह्मणून केला पाहिजे व प्रजेनेंही आपल्या हक्कांचा उपयोग कर्तव्य ह्मणून केला पाहिजे. एकाद्या माणसानें आपले पांच रुपये हरविले किंवा विहिरींत फेंकून दिले, तर त्याला आपण फारतर निष्काळजी किंवा माथेफिरू ह्मणूं; तो आपल्या कर्तव्यांत चुकला असें ह्मणत नाहीं. त्याचे पैसे त्यानें घालविले त्याला दोष देण्याचा आपल्याला काय अधिकार? असें आपण समजतों. ही विचारसरणी कितपत बरोबर आहे हा प्रश्न बाजूला ठेविला, तरी पुष्कळशा स्वतःच्या वस्तुसुद्धां पाहिजे तशा वापरण्याचा कायद्यानें आपणांस अडथळा केलेला आहे. दरएकाचा हक्क असा आहे कीं, फक्त निरोगी वस्तूच त्यानें

जवळ बाळगाव्या; ह्या हक्काचा त्यानें अतिक्रम केल्यास त्याचा हक्क कर्तव्य म्हणून बजावण्यास कायदा अगर समाज त्याला भाग पाडील. स्वतःचा जीव घेण्यांचा प्रयत्न करणाऱ्याला तर कायद्यानें उघड उघड शिक्षाच ठेविली आहे. ह्याही बाबतींत कायदा हक्क बजावण्याला कसा लावतो हें दिसून येतें. ज्याप्रमाणें चोरी झाल्याची फिर्याद पोलीस शिपायाकडे गेल्यावर आपल्या अधिकाराचा उपयोग करणें हें त्याच्या मर्जीवर राहात नाहीं, त्याचप्रमाणें ज्याची चोरी झाली असेल त्याच्याही मर्जीवर फिर्याद करणें न राहातां पोलीस अधिकारी परस्पर फिर्याद करून त्याला चोरीबद्दल साक्ष देण्यासाठीं कोर्टांत येण्याचें कर्तव्य बजावण्यास भाग पाडूं शकतात.

वरील सर्व विवेचनाचा मुख्य उद्देश म्हणजे राणे लोकांचे हक्क व पोर्तुगीज अधिकाऱ्यांचीं कर्तव्यें यांचा विरोध जितका दिसतो आहे, तितका तो वस्तुतः नाहीं हें दाखविण्याचा नाहीं. हक्क व कर्तव्यें यांचा खरा मिलाफ मात्र करारी माणसांशिवाय इतरांना पटणें शक्य नाहीं. त्यांतही ज्यांनीं जीव कःपदार्थ मानून क्षात्रधर्म स्वीकारला आणि रांडेबटकीचे म्हणून घेऊन जीव जगविण्यापेक्षां परसत्तेशीं लढून मोक्ष मिळविणें प्रिय मानलें, त्यांना प्रजापालनाचें राजकर्तव्य चुकवून नैसर्गिक मानवी हक्कांवर घाला घालणाऱ्या मत्त म्लेंच्छांशीं एकदां सोडून एकवीसदां टक्कर देणें अपरिहार्य होतें. मानभंगाची खरी खंती व क्षात्रधर्माची खरी किंमत, राजकीय स्वातंत्र्याच्या आकांक्षा ज्या मानवी हृदयांवर खेळल्या जातात त्यांनाच कळते. नाशिवंत देहाची खरी कल्पना ज्या समाजांत रूढ असते त्या समाजांत कर्तव्य आणि हक्क यांचा मिलाफ समजणें कठीण पडणें दुर्घटच होय. अशा समाजांत आपले हक्क चिकाटीनें राखणाऱ्याला यश आलें तर तेवढ्यावरच भागतें. म्हणजे वीस वेळां सरकारकडून जय घेणाऱ्यांना एकविसाव्या वेळीं लफंग्या लोकांच्या नादानें पुष्कळ लोकांनीं आपले हक्क बजावण्यांत व आद्यपरंपरा चालवण्यांत कसूर केल्यामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीपायीं जर कां अपयश आलें तर मग त्यांच्या अपकीर्तीला पारावारच नसतो. मग त्यांनीं तपेंच्या तपें केलेली हिंदू बांधवांची सेवा, आपले देह धारातीर्थी ठेऊन परकीयांना लावलेला वचक आणि जीवाकडे न पहातां आंखून ठेविलेला मार्ग क्रमण्यांत वाखविलेली

चिकाटी हीं सर्व बाजूला रहातात आणि आत्मघातकी, मूर्ख, फाजीलशहाणा, अशा पदव्यांचा त्यांच्यावर वर्षाव होऊं लागतो. वर रेखाटलेलें चित्र नवीन कारभारांत तर सर्वांच्या परिचयाचें आहे.

आपल्या हक्काचा कर्तव्य ह्मणून उपयोग न करणाऱ्यांची संख्या गोऱ्यांत पांढरपेशा मंडळींत तर मोठीच असल्यामुळें त्यांचा उपयोग करणाऱ्या थोड्याशा व्यक्तींना अपेश येतें--निदान त्रास सोसावा लागतो. उदाहरणार्थ रजिष्टर ऑफिसांतील मुख्याला नऊ जणांनीं लांच दिला ह्मणजे दहाव्या इसमाला लांच न देतां काम करून घेणें जवळजवळ अशक्य, निदान कठीण व त्रासदायक होत असतें. एखादा कर असह्य असतांही नऊ जणांनीं भयानें भरला, ह्मणजे जो दहावा इसम आपला हक्क बजावून प्रतिकार करण्याचा प्रयत्न करील त्याला सरकार भाजून पोळून काढूं शकतें. हा प्रकार सरकारच्या बाबतींतच नसून खाजगी संस्थांतही लोक आपली हक्कदारी चुकवून दोन चार व्यक्तींच्या हातांत सारा अधिकार सांठवूं देतात व हे त्यांचा मन मानेल तसा उपयोग करतात, अशी आपल्याकडे नेहमीं ओरड असते. एकाद्या फंडाचा अगर संस्थेच्या अध्यक्ष, चिटणीस अगर खजिनदार होण्याचा सुयोग अगर कुयोग ज्याला लाभतो त्याला अशातऱ्हेचे आरोप आपणांवर केलेले पाहण्याचा प्रसंग वारंवार येतो. कांहीं वेळां हे आरोप खरे नसतात; परंतु ते खरे असल्याचींही उदाहरणें बरींच दिसून येतात. असे हे प्रसंग उद्भवण्याचें कारण काय बरें ? कारण एवढेंच कीं त्या संस्थांचे सभासद अगर वर्गणीदार आपल्या हक्कांचा कर्तव्यदृष्ट्या उपयोग करीत नाहींत. त्यांनीं जर आपले हक्क वापरले, निवडलेले अधिकारी योग्यरीतीनें काम करतात कीं नाहीं हें पहाण्याचा आपला हक्क जर त्यांनीं बजावला, तर असले आरोप करण्याचा प्रसंगच त्यांच्यावर येणार नाहीं. दिलेल्या 'आवतोनोमीचा' फायदा प्रजेला पुरेसा मिळूं नये अशी खटपट अधिकार अनियंत्रितपणें वापरून लुटीला चटावलेले युरोपीयन किंवा एकहाती अधिकार राखण्यास खिस्त भक्तीचें नातें पुढें उभें करण्यास सोकावलेले युरोपीयन प्रयत्न करीत असतील, तेव्हां त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं प्रत्येक हिंदुमात्रानें आपले नवीन हक्क कसोशीनें वापरण्याचा निश्चय केला पाहिजे. दर एक मतदारानें खर्चाकडे अगर कालाकडे

लक्ष न देतां आपलें मत नोंदलें पाहिजे. मतदानाचा हक्क ही एक वस्तु आहे; ती पाहिजे तर आह्मी वापरूं–इच्छेस न आल्यास वापरणार नाहीं; अशातऱ्हेची विचारसरणी आवडणाऱ्यांस देशद्रोहीच ह्मणावें लागेल. समरांगणावर पावलेल्या व शत्रूशीं तोंड देण्यांत गुंतलेल्या फौजेपैकीं एकादा शिपायी पळून जाऊं लागला असतां तो जितका गुन्हेगार ठरेल, तितकाच आपल्या मत देण्याच्या हक्कासंबंधीं बेपर्वाई दाखविणारा हिंदू मतदार गुन्हेगार ठरेल. कोणी असें ह्मणेल कीं, ख्रिस्त्यांतील पुष्कळसे मतदार आपलीं मतें नोंदावयास जाण्यांत कसूर करतात; ते दोषास पात्र नाहींत काय? ह्या त्यांच्या कसूरीबद्दल त्यांचे पुढारी व पत्रकर्ते त्यांना दोष देतात ही गोष्ट बाजूला ठेविली, तरी हिंदु समाजाची परिस्थिति व ख्रिस्ती समाजाची परिस्थिती यांमधील भेद हा मुद्दा शिल्लक रहातोच.

उदाहरणार्थ ख्रिस्ती लोकांची धर्मप्रसारपद्धति ही ख्रिस्ती लोकांना साधक, तर ती हिंदू लोकांना बाधक. गोव्यांतील पोर्तुगीजांचें अस्तित्त्व स्वातंत्र्यदृष्ट्या जाचक आहे, असें हिंदूंना वाटल्यास तेंच अस्तित्त्व परतंत्र स्थितींतही ख्रिस्त्यांना सुखावह वाटणार आहे. सामाजिकदृष्ट्या 'कानेक' ह्मणून ह्मणविणारा एकादा वरीष्ठ अधिकारी त्यांना जवळ करूं लागल्यास ते जवळ होतील; परंतु हिंदूंनीं 'भाईहो' ह्मणून जवळ बोलावल्यास ते जवळ येणार नाहींत. आज त्यांची मनःस्थिती अशी दिसत आहे. शिवाय त्यांचा वरिष्ठ अधिकारासाठीं लोचटपणा, संपत्तीची गुर्मी, विद्वत्तेची आढ्यता आणि सामाजिक संघटना, या बाबतींत हिंदुसमाजांत व त्यांच्यांत इतका फरक आहे कीं, उंच हुद्द्यावर अजून हिंदु लोक चढलेले नाहींत. निर्धनता ही हिंदू लोकांची जन्माची सोबतीण झाली आहे व अशिक्षितपणाच्या गर्तेतून वर येण्याचें सामर्थ्य आज हिंदूजनतेंत नाहीं. या सर्वांपेक्षां असंघटितपणामुळें तर हिंदूसमाजाचें भयंकर नुकसान झालेलें आहे. असें हें अंतर लक्षांत घेतां आपल्यापासून दूर राहूं पाहणाऱ्या ख्रिस्ती समाजाशीं आणि पारतंत्र्याच्या जाळ्यांत पकडून लुटूं पाहणाऱ्या परकीय लोकांशीं स्वसामर्थ्यानें टक्कर देऊं पहाणाऱ्या उदयोन्मुख हिंदूला किती डावपेच खेळावे लागतील हें दाखविण्यासाठीं बंडखोरांच्या मनोवृत्तीकडे लक्ष देणें भाग आहे.

राणे व अधिकारी या दोहोंमधील विषम झगड्यांत जर हिंदुप्रजेला अधिकाऱ्यांच्या अनियंत्रित अधिकारवालसेला आळा घालून आपले हक्क मिळविण्याच्या कामीं यश संपादन करावयाचें असेल, तर अधिकाराच्या कणागणिक अंमलदार ज्या चिकाटीनें झगडले त्याच चिकाटीनें हिंदुप्रजाजनांनीं आपल्या हक्काच्या कणाकणासाठीं झगडलें पाहिजे. अर्थात् क्षत्रियांचें क्षात्रतेज संरक्षणासाठीं आणि तें ज्या रीतीनें समाजाला बाधक होत आहे, त्याप्रमाणें तें न होतां साधक व्हावें यासाठीं त्यांच्या वस्तीच्या खेडोखेडीं किंवा निदान दोन दोन चार चार खेड्यांनीं एक एक याप्रमाणें, राष्ट्रपोषक असा सुविचार फैलावणाऱ्या लोकसंस्था स्थापन झाल्या पाहिजेत आणि त्यांच्या बुद्धीला जें स्वार्थी अंधत्व आलें आहे, तें निघून जाण्यासाठीं जुना इतिहास व चालू राजकारण यांची त्यांना ओळख करून देण्यासाठीं व त्यांच्या मनोवृत्ति स्वातंत्र्याकडे वळवून घेण्यासाठीं त्यांच्यांत सुशिक्षणाचें कार्य झपाट्यानें झालें पाहिजे. ह्मणजे शूर लढवय्या क्षत्रियांचें बळ अशक्त हिंदुसमाजाला पुष्कळच उपयोगी पडेल. आज जर आपण विस्कलित झालेलें बळ संघटित करून एका सूत्रावर आणूं तर आपले ख्रिस्तीबांधवसुद्धां सशक्त ह्मणून पोर्तुगीजांकडे आजच्याप्रमाणें धांव घेण्याचें सोडून कालेंकरून आपणाकडे आल्याशिवाय रहाणार नाहींत. आज ख्रिस्तीसमाजाचें बलाधिक्य असल्यानें समतोलपणा राखण्यासाठीं जरी युरोपीयनांचें आदरातिथ्य करणें भाग असलें, तरी स्वत्व विसरून तत्स्वरूपी होणें भावीकाळीं घातक होणार. ह्मणून एका बाजूनें क्षात्रतेजाचा दाब परकीयांवर रहावा ह्मणून समाजसंरक्षक क्षात्रत्त्वाची जोपासना ज्या त्या-समाजाकडून होणें अत्यावश्यक आहे.

कारण जीवनकलहांत ज्याप्रमाणें बौद्धिक बल पाहिजे त्याचप्रमाणें परकीयांच्या माऱ्यापासून सुटण्यास किंवा बुद्धिवर्चस्वानें मिळविलेलें धन राखण्यास क्षात्रबलाची जरुरी आहे. परंतु बुद्धिबल व क्षात्रबल हीं एकमेकांपासून दूर असतां कामा नयेत. तीं एकीकडेच असलीं पाहिजेत. तीं विस्कलित झाल्यामुळें गोमांतकाला दोन्हीं माऱ्यांना तोंड देणें भाग पडलें. एकीकडून गोव्यांतील जनतेस सरकारनें कर घालून लुटावें आणि राण्यांनीं दुसरीकडून बंड करून लुटावें. एवंच राण्यांचा झगडा व सरकारचा सोडगा खाऊन

रोडावलेली गोमांतकस्थ जनता जर तात्त्विकदृष्ट्या याचा विचार करील तर तिला इतकें कळून येईल कीं, ' बुडे बुडो सागरीं, तरि सुकर्णधाराविना। सहाय नसतां स्वयें परतटासि ती दाविना ॥ ' हे पंतांची उक्ति तत्त्वांच्या बाबतींतही खरी आहे. तत्त्वांचें गलबत हांकारून सुरक्षितपणें बंदरांत न्याव-यास क्षात्रनैकेला बुद्धिवान कर्णधार असावा लागतो. तो नसल्याकारणानें राण्यांकडून अनुच्चारित अत्याचार घडले ही गोष्ट खोटी नाहीं. तरी पण धर्मांतर करून दुसऱ्यांच्या कळपांत शिरलेले लोक अथवा जबरदस्तीनें गोवा-प्रांत बळकावून बसलेले. परकी लोक त्यांना ज्याप्रमाणें पुंड, लुटारू, दरोडेखोर, बंडखोर असें ह्मणून धिःकारतात त्याप्रमाणें आपणही त्यांना तुच्छ मानून धिःकारणें योग्य होणार नाहीं. श्रीशिवाजीमहाराजांना परक्यांनीं हींच विशे-षणें लावलीं परंतु आपल्या लोकांनीं त्यांना बळकट साह्य दिल्यामुळेंच त्यांना महाराष्ट्रांत हिंदुपदपातशाहीची स्थापना करतां आली. आपले पुढारी आपल्या मतदारांची संख्या वाढविण्याची जितकी काळजी घेत असतात तितक्याच काळजीनें राण्यांना शिक्षण देऊन पुढें आणिलें पाहिजे. कारण विपुल पैसा खर्चून व फार श्रम घेऊन हिंदूसमाजानें आपले दोनतीन प्रतिनिधी कौन्सिल सभेंत खुर्च्या आडवून बसविल्यानें समाजहित झालें असें थोडेंच आहे. कारण या कौन्सिलरांना आधीं मिनेज ब्रागास, सालीस द आंद्राद, यांसारखी अस्ख-लित विषयप्रतिपादनाची शैली साधली पाहिजे; बरें अशा शक्तीचे पुरुष आंज ना उद्यां हिंदूसमाजांत चमकूं लागतील असें ह्मटलें तरी सुद्धां त्यांच्या-कडून विशेष कार्यभाग होणें शक्य दिसत नाहीं. त्यांनीं हिंदूसमाजाच्या हिताबद्दलचा एखादा ठराव आणला व तो हिंदूद्वेष्ट्यांनीं बहुमतानें नापास केला किंवा परकीय अधिकाऱ्यांनीं अधिक मतांच्या जोरावर तो धुडकावून लावला तर अशावेळीं आकाशपाताळ एक करून टाकणारी अचाट शक्ति कौन्सिलरांच्या मागें जय्यत तयार असणें इष्ट नव्हे काय ? असें करावयाचें ह्मणजे केवळ निवडणूकीच्या वेळीं मतें नोंदवून भागणार नाहीं. मतें तर दरएकानें नोंदविलीं पाहिजेत व हिंदूसमाजानें मत-दारांची संख्या वाढवून हिंदूसमाजानें रद्द केलेले हक्क मिळविण्यास झटलें पाहिजे, हें खरें असून त्यासाठीं आमची पांढरपेशा वर्गांतील मंडळी विचा-

रांची क्रांति, आवेशाची ओरड व वायफळ गोष्टी तर करीत आहेच; पण दुसरेंही एक महत्त्वाचें कार्य आहे. अधिकाऱ्यांच्या प्रत्येक कृतीबद्दल मत प्रदर्शित करण्याचा आपल्याला हक्क आहे याची जाणीव राण्यांना करून दिली पाहिजे. ही गोष्ट अनियंत्रित अधिकाराला आळा घालण्यास व स्वयंनिर्णयाचा उत्कर्ष होण्यास अत्यंत उपयोगी पडेल. यासाठीं आमच्या विवेचनाचा अर्थ लक्षांत घेऊन आमचे गोमांतकांतील पुढारी इकडे लक्ष पुरवितील काय ?

अथैव दूरवर नजर देऊन भावी काळाचा विचार करणें व क्षुद्र हेतू बाजूला सारून उच्च हेतूनें प्रयत्न करणें हीं साधनें ज्यांना साध्य आहेत, किंवा साध्य करून घ्यावयाचीं आहेत, त्यांनीं तरी या अशा प्रश्नांचा नीट विचार करावा.

कारण जिवाचें भय धरून राजकारणाच्या आखाड्यांत उतरणें मुळींच शक्य नाहीं. तसेंच पोटाचें पाईक होऊन परसत्तेच्या खड्यांतूनही वर येणें संभवनीय नाहीं; ह्मणूनच क्षात्रबल आणि बुद्धिबल यांचें मधुर मिलन बनवून शतकानुशतकें परसत्तेच्या अखंड जुंवाखालीं रखडत असलेला हा आपला परमपूज्य गोवा प्रांत मुक्त करण्याची आमचे पुढारी काळजी घेवोत अशी विनंती करून प्रेमळ वाचकांची रजा घेतों.

समाप्त.

## परिशिष्ट अ

सांखळीकर राणे यांस खेमसावंत महाराज यांचें आज्ञापत्र.

ता० जुलैई सन १७१३.

राजेश्री जैतोजी राणे देसाई ता० सांखळ गोसावी यांसी छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहपूर्वक खेम सावंत भोंसले राजे सरदेसाई प्रांत कुडाळ महालानिहाय येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करणें. तुह्मी विनंति अर्ज पाठविले ते प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जाहलें. भेटीस यावयाचा अर्थ लिहिला. ऐशास राजेश्री विसाजी आपा शेणवई येतील त्यांज पाशी वर्तमान जें असेल तें सांगणें. आण मशारनिले बांदेस आलेवर तुमचे मसलत जे आसतील त्याचे विल्हे कर्तव्य तें केले जाईल. तुह्मीं आपलें समाधान असो देणें पूर्व आज्ञापत्र वहईवाटेप्रमाणें मिरास तुमची करार करून दिलि असे. सर सुभेदार यास भेटून परगणे मजकुराचा बंदबस्त करून चाकरीस हजीर राहणें. हा लिहिलेला हुकूम फार थोर असे जाणावे ज्यादा काय लिहावे. छ छ १९ मा जिल्काद. —मोर्तब.

## परिशिष्ट ब

—श्रीमंत बहादूर यांस सत्रोजी राणे देसाई यांचें विनंती पत्र.

ता० ६ आक्टोबर १७१९.

श्रीमंत राजेश्री रामचंद्र बाबा यांसी

स्वामीचे सेवेशी, सेवक.

सत्रोजी जैतोजी राणे देसाई यांचा साष्टांग नमस्कार विनंति विशेष:—

तुह्मीं पत्र पाठविलें तें पावोन लिहीला मजकूर कळाला. फिरंगी याणी चोहोकडून सिलांदाज करून रात्रीपासून किल्ला जेर केला. किल्लेकरामधी अवसान राहीले नाहीं. बाहिरले कडून येलगार करावा तर इलाज नाही. तशामधे उपाय होईल ते करतो. दारू अगदी नाही पाठविली तिही सरली त्यामुळे घात जहाला. चंद्रोबा यांस कागद सांबाळकीचे लिहून त्यांस यशवंतगडाची कुमक करावी असें लिहावें व दारूगोळेसह सत्वर रवाना करून द्यावे. सध्य डिचोली महालीं बखेडा माजला आहे. ईश्वरदये स्वल्प रोजांत सरकार अंमल पडतो, कोवळा मोड आहे. तो मडल्यानें उत्तम भारी जहालेनें सर्वांचें वाईट हें पुर्ते चितांत आणून समर्पक ते करावे ६२२ रमजान बहुत काय लिहिणें हे विनंती. —इति लेखनसीमा.

३४३०

## परिशिष्ट क

### सांखळीकर राणे यांस खेमसावंत महाराज यांचें आज्ञापत्र.

ता० ५ नोव्हेंबर १७८२

राजेश्री खंडोजी राणे देसाई ता॥ साखळी गोसावी यांसी ६ अखंडीत लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहपूर्वक खेमसावंत भोसले सरदेसाई प्रा॥० कुडाळ व महालनीहाय येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करावे विशेष.

तुह्मीं कित्येक आपलेकडील निष्टेचा अर्थ राजश्री म्हामे गांवस देसाई ते॥० मणेरी यांचे विद्यामानें हु॥० विदीत केलेत अशास तुह्मीं या राज्यांतील

| |
|---|
| शिक्का |

वतनदार सरकारचे पदरचे तेव्हां तुह्मीं हुजूर एकनिष्ठेनें असोन सरकार सेवेसी तत्पर राहोन आपले ऊर्जीत करून घ्यावे ही तुमची उमेद अ॥०निखालस जाणोन तुह्मांवर कृपाळू होऊन हें आज्ञापत्र सादर केलें असे याचा तपसील.

(१) तुमचें वतन जें आहे तें जिवाजी विश्राम याणी तुह्मांस देवीलेप्रमाणें तुह्माकडे चालवूं. जैतोजी राणे यांस पेसजी हुजूर आणविलें तेव्हां कतबा रुपयेचा घेतला तो तुह्मांवर कृपाळू होऊन ते रुपये तुह्मांस माफ करून कतबा तुमचा तुह्मांस देवविला आहे. (१) ते सांखळी येथें तुमचे सेलकीसी सनदी पहिलेपासोन चालत आहे त्या॥ प्र॥ देवउं व महाल ते॥० मणकुरे बोली ज्या प्रें॥ केली होती त्या प्रें॥ चालविली जाईल. (१) तुह्मीं राजेश्री का दळवी आहेत तेथे आले नंतर तुह्मांस हुजुरून घोडा एक व कडे सोन्या देवीलीं जातील. (१) साखळीचा कोट फिरंगी याजकडे आहे त्यास तुह्मी सरकारचे फौजेस सामील होऊन कोट हस्तगत जहालेवर मोडून टाकीला जाईल

येणेप्रमाणें चार करार करून देवीले आहेत. त्यास तुह्मीं कोणा गोष्टीविसी चित्तात शंका न धरीतां सरकारसेवेसीं तत्पर असोन धणीकामाविसी एकनिष्ट राहून धणीकाम करीत जाणें तुह्मीं सरकारची फौज डिचोली व साखळी प्रांती आहे त्यास राजेश्री दळवी आहेत, तेथें येऊन धणीकाम करीत जाणे तुह्मीं एकनिष्टेनें राहून सरकारी काम केल्यास तुमचे चालणेस दुसरा अर्थ नाहीं. सु॥ सल्लास समानैन मयां अल्लफ रवाना जिलाकाद.

**मोर्तब.**